# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY

OU_192774

UNIVERSAL LIBRARY

OUP—881—5-8-74—15,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M83/K46V Accession No M2855

Author

Title

This book should be returned on or before the date last marked below

# विजय : [सामाजिक कादंबरी.]

लेखक

भालचंद्र दत्तात्रय खेर, बी ए.

[ प्रस्तावना लेखक — प्रो श्री· म. माटे, एम्. ए. ]

प्रकाशक :
मॉडर्न बुक डेपो,
बुकसेलर्स व पब्लिशर्स
पुणें २

डिसेंबर १९४१ ] [ मूल्य २ रुपये

# प्रगतीचीं प्रतीकें (१९४०)

**दि ट्रस्ट ऑफ इंडियाची प्रगति स्थैर्याकडे लक्ष पुरवूनच होत आहे.**

| सन | आलेलें काम | पूर्ण झालेलें काम |
|---|---|---|
| १९३८ | ४,६८,७७५ | ३,७४,९३८ |
| १९३९ | ५,८५,५५२ | ४,०७,५२० |
| १९४० | ७,३६,०२२ | ५,८३,१७२ |

हप्त्याचें उत्पन्न, खर्च व कार्याचा विस्तार यांचा योग्य मेळ बसविल्यामुळें पहिल्याच मूल्यमापनांत कंपनी फायदा दाखवूं शकली

| सन | हप्त्याचें उत्पन्न | लाईफ फंड |
|---|---|---|
| १९३८ | ४५,००४-७-० | ३७,८०१-१४-१ |
| १९३९ | ७०,६५६-७-० | ४८,७०६-५-५ |
| १९४० | ७३,७९४-१-१ | ६१,४५५-१-११ |

नामवंत कंपन्यांच्या उत्पन्नाशी पडणाऱ्या खर्चाच्या प्रमाणांतच कार्याचा विस्तार होत असल्याने लाईफ फंडांत व्यवस्थित वाढच होत आली आहे

+ त्रैवार्षिक बोनस हजारी ३० व ३६ रु. + सरकारी रोखे १ लाख ४० हजारांपेक्षां जास्त (२० जून १९४१ पर्यंत) + चालू वर्षी स्वतांच्या इमारतीची योजना




## दि ट्रस्ट ऑफ इंडिया अ.कं.लि.पुणें.

उपशाखा व प्रचार–केंद्रें

मुंबई, नगर, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, बेळगाव, **मध्यप्रांत–वऱ्हाड**–नागपूर, अकोला, सीवनी, खाडवा, **मध्य–हिंदुस्थान**–ग्वाल्हेर, इंदूर, **मद्रास**–नेलोर, बेझवाडा, **बंगाल**–मेहेरपूर, पुरूलिया, इ.

**दि ट्रस्ट ऑफ इंडियाची एजन्सी घेऊन आपली प्राप्ति व प्रतिष्ठा वाढवा.**

माझे बंधू

नारायण गंगाधर खेर, बी ए. एल्एल् बी

आणि

कृष्णाजी गंगाधर खेर, बी. ए.

यांना सप्रेम समर्पण

# ध्वज उभारतांना -

"नाद-लहरी" या कथासंग्रहानतर "विजय" ही कादबरी रसिक वाचकांच्या हातीं देण्यांत मला आनंद वाटत आहे. परतु तो आनंद अजून अपुरा आहे. कादंबरी वाचून वाचकांना जेव्हां त्या कादबरीपासून आनद लाभेल तेव्हांच माझ्या स्वतःच्या आनंदाला खरी पूर्णता येईल. कला निर्मितीचा निर्भेळ आनंद कांहीं कमी नाहीं. परंतु कोणत्याहि कलेचा निर्माता एवढ्यावरच सतुष्ट नसतो त्या कलावस्तूबद्दल रसिकांनी आपलें कौतुक करावें ही इच्छा, त्याच्या मनातील एका कोपऱ्यांत कां होईना पण वास करीत असतेच आणि म्हणूनच मी म्हणतों की कलानिर्मितीच्या आनदाला पूर्णता येण्यासाठी रसिकांच्या कौतुकाची तितकीच गरज आहे तेव्हां सध्यां मला माझा आनद अपुरा वाटत असल्यास त्यात नवल तें काय ?

"मनोहरची आकाशवाणी" या पुस्तकांतून प्रो. ना सी. फडके यांचें सॉमरसेट मॉमच्या "The Sacred Flame" या नाटकावर केलेलें भाषण जर मी वाचलें नसतें तर ही कादबरी या स्वरूपांत खचित दिसली नसती. एवढा त्या नाटकाचा उल्लेख पुरेसा आहे. कारण बाकी सर्व कथानक सर्वस्वी स्वतत्र आहे

या कादबरींत मुंबईला महागाईभत्त्याबद्दल झालेल्या गिरणीकामगार सपाबद्दलची हकीगत गोंवली आहे कादबरींत वर्णन केलेलीं स्थळें मीं प्रत्यक्ष जरी बघितलीं असली तरी अनेक वृत्तपत्रांचा आणि मासिकांचा कादबरी लिहिण्याच्या कामीं मला उपयोग झालेला आहे.

प्रो. श्री. म माटे हे माझे गुरुजी असल्यामुळें त्यांनीं आपल्या शिष्याच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहावी हें उचितच आहे तरी सुद्धां शिष्याला आपला हक्क बजावू दिला याबद्दल सदैव त्यांच्या ऋणांत राहण्यांत मला अवघड वाटणार नाहीं.

श्री. केशव हरी उर्फ भाऊसाहेब फणसळकर यांनीं मला अत्यंत आपुलकीच्या भावनेनें अथपासून इतिपर्यंत जी मदत केली त्याबद्दल

औपचारिकपणाचा दोषारोप पत्करून देखील मी त्यांचें अतःकरणपूर्वक आभार मानतों

अखेरीस कादबरीला नेटकें स्वरूप देऊन तिला या युद्धकालीन परिस्थितीत सुद्धा प्रसिद्धि दिल्याबद्दल श्री. नारायणराव भिडे याचे, त्याचप्रमाणें पुस्तकाच्या उत्तम छपाईबद्दल दातार ब्रदर्स याचे, तसेंच मुख-पृष्ठावर दिलखेचक चित्र काढल्याबद्दल चित्रकार श्री कुरवाळीकर यांचे आभार मानणें अत्यावश्यक आहे.

आणखी कितीतरी लोकांचे मला आभार मानावे लागतील. पण त्यांचे आभार न मानण्यातच त्याना अधिक गौरव वाटत असेल तर त्यांचे आभार माना तरी कशाला ?

रसिक वाचकांचा

पुणें
१२ डिसेंबर १९४१

भा. द. खेर.

प्रकाशक— ना. त्र्य. भिडे, बी ए, मॉडर्न बुक डेपो, पुणें २.
मुद्रक— ह. द. दातार, दातार प्रिंटिंग प्रेस, पुणें १.

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.)

# 'विजय' कादंबरीचा परामर्ष

## लेः– प्रो श्रीपाद् महादेव माटे, एम ए

माझे विद्यार्थी मित्र भालचद्रपंत खेर यानी ही एक मोठी सुंदर कादंबरी लिहिलेली आहे. इग्रजींतील एका प्रसिद्ध नाटकांतून त्यानीं आपल्या या कादबरीची कल्पना उचललेली आहे या इग्रजी नाटकाची ओळख प्रो. फडके याच्या एका पुस्तकांत आलेली आहे आणि रेडिओवर करण्यासाठीं तयार झालेल्या एका लहानशा नाटिकेंतही ही कल्पना येऊन गेली असावी असें वाटतें आपल्या परिस्थितीशीं जुळविण्यासाठीं मुख्य कल्पनेंतील एक विशेष भडकभाग रा खेर यानीं वगळला आहे आणि उरलेली कल्पना चागली वठविण्यासाठीं अवश्य त्या आधुनिक तऱ्हेच्या नव्या पात्रांचा आपल्या कादबरींत अतर्भाव केला आहे. या कादंबरीचा आणि तिच्या लेखन शैलीचा गुणसमुच्चय उच्च प्रकारचा आहे. कादबरीचें कथानक भराभर पुढें चाललेलें असतें, रसोत्कर्षासाठीं लेखकानें कथानक कोठेंही घोटाळत ठेवलेलें नाही प्रत्येक प्रकरणांत कादंबरीचा नवा झोळ उलगडत असल्यामुळें आपली उत्सुकता सारखी कायम राहते आणि कादबरी म्हटलें तरी आपण एक प्रदीर्घ कथा सागत आहों याची अखंड जाणीव लेखकाला असल्यासारखी दिसते. लेखकाची लेखनशैली उत्तरोत्तर चागली बनत चालली आहे असें दिसतें. वर्ष दीड वर्षापूर्वी त्यांनीं जें एक लघुकथांचें पुस्तक ( नाद-लहरी ) प्रसिद्ध केलें होतें त्याच्या लेखनशैलीशीं प्रस्तुतची लेखनशैली तोलून पाहातां हें दिसून येतें. मधून मधून प्रसंगाला अनुसरून कांहीं थोडें काव्य करावें असें रा खेर यांना वाटतें. परतु या काव्यामुळें कथेची गति कुठेंही थबकलेली नाहीं. आणि कोणत्याही पात्राचा स्वभाव-विशेष अवास्तवतेनें जिरलेला नाहीं.

एक दोन ठिकाणी आलेलीं "इंडिरेक्ट" रचनेचीं उदाहरणें सोडलीं आणि एकारांत आडनांवांना, त्याचें सामान्यरूप न करताच विभक्तीप्रत्यय लावल्याचा दोष जर वगळला तर लक्षांत येण्याजोगें भाषेचें कसलेंही वैगुण्य दिसून येत नाहीं

कादबरीचे कथानक अगदीं थोडक्यात असें आहे विजय हा कादबरीचा नायक एक वैमानिक होता परंतु एकदा विमान खालीं आणता आणता तें जमिनीला एकदम जोरानें लागलें आणि त्याबरोबर विजयाच्या कमरेपासून खालच्या अंगाला असा टाका बसला की तें अगदी निकामीच होऊन गेले आपली पत्नी नीला, –जिच्याशी त्याचा विवाह काहीं महिन्या पूर्वी झाला होता–हिचा जन्म आता वाया जाणार हें पाहून तिला मुक्त करण्यासाठी आपल्या जिवाचें काहीं बरें वाईट करून घ्यावें असें त्याच्या मनात येतें परंतु आईनें त्याला या हेतूपासून परावृत्त केले तथापि त्यानें उमाबाईपासून एक चमत्कारिक वचन घेऊन ठेविलें आणि अनेक भानगडी झाल्यानंतर पुढें त्यानीं हें वचन पाळल्यानतरच कादबरीचा शेवट होतो. विजयचा एक मावसभाऊ या घरात येऊनजाऊन असतो मुबईच्या एका मोठ्या गिरणी मालकाकडे त्याला असिस्टट मॅनेजरची जागा मिळण्यासारखी असते, व त्याप्रमाणें तो तेथें रुजूही होतो. अप्पासाहेबाची मुलगी निर्मला ज्यूनिअर बी ए मध्यें असून तिच्या आईच्या मताप्रमाणें तिचा विवाह विद्याधर नावाच्या एका तरुण जहागिरदाराशी व्हावयाचा होता. परतु त्याच्या घरीं अरविंदाची येजा सुरू झाल्यापासून निर्मलेचें मन हळूहळू पालटू लागलें आणि त्यांतच विद्याधराच्या व्यसनाधीनतेची वार्ता कळल्यानंतर तिचें मन त्याच्यावरून अगदींच उडालें. आईच्या मनानें तिनें विद्याधराशीच लग्न करावयास हवें होतें कारण तो श्रीमत होता. अप्पासाहेबाचा मात्र आग्रह असा कांहीच नव्हता उलट अरविंदाकडे तिचें मन वळलें याची त्यांना काही विशेष मातब्बरी वाटली नाहीं. कारण एक श्रीमंती सोडली तर सर्व बाबतींत तो विद्याधरापेक्षां श्रेष्ठ होता. हा

आतां आपल्या हाताखालीं हळूहळू वाढत जाऊन मॅनेजरही होईल असेंही त्यांना वाटू लागलें होतें. पण त्याचें दुर्दैव असें कीं मालक बनावयाचें ध्येय टाकून देऊन हा पोरगा, गिरणींत मोठ्या अधिकाराच्या जागेवर असता मजुराचाच पक्ष घेऊन भांडू लागला! शेवटीं अप्पासाहेब याच्याशीं थोडी रदबदली होऊन त्यानें नोकरीचा राजिनामा दिला मजुराचा संप सुरू झालेला होता त्यात तो मोठ्या ईर्षेनें सामील झाला प्रथम प्रथम निर्मलेला त्याचें हें करणें जरी पसत नव्हतें तरी त्याच्यावरील प्रीतीमुळें शेवटी तीही त्याच्याच मताची होऊन त्याच्याशीच विवाह करण्याचा आपला निर्धार तिनें आईबापाना कळविला तुरुगातल्या हालामुळें अरविंदाची प्रकृति फार बिघडली म्हणून सरकारानें त्याला सोडून दिलें पुण्यास विजयाच्या घरीं काहीं दिवसांपुरता तो आला असता विजयाची स्त्री नीला हिनें आपलें गुप्त मनोगत त्याच्यापाशीं व्यक्त केलें आणि वर थोडें तत्वज्ञानही सागितलें परतु त्यानें तिचें म्हणणें झिडकारून लावलें, पण विजयच्या आईनें हा त्याचा गुप्त सवाद सहजगत्या ऐकिला व मुलाला तिनें दिलेलें वचन एकदम खरें करून दाखविलें. दुसऱ्या दिवशीं सकाळी खोली उघडून पाहतात तों विजय गतप्राण झालेला दिसला माझ्या पत्नीचें माझ्यावरचें प्रेम उडालें आहे असें तुला दिसू लागतांच तूं मला विषाची गोळी दे असें विजयानें आपल्या आईला सागितलें होतें, नीला ही चळू लागली आहे असें तिला स्पष्ट दिसलें आणि म्हणून त्याला वचन दिल्याप्रमाणें तिनें त्याला काल विषाची गोळी दिली अरविंद प्रकृति सुधारण्यासाठीं लोणावळ्याला जाऊन राहिला निर्मला सुद्धा लोणावळयास आपल्या मावशीकडे त्याच कारणासाठीं येऊन राहिली. एकदा असें झालें कीं त्यांची अचानक गांठ पडली. आणि संपाच्या पुढाऱ्यांनीच 'अवसान घात करून संप बद केल्यामुळें तिकडला ओढा फारसा न उरून अरविंदानें निर्मलेच्या प्रीतीचा स्वीकार केला.

मूळ इंग्रजी नाटकांतील कथानक अत्यत हृद्य वाटल्यामुळें

त्याच्यावरच आपण कांहीं तरी लिहावें असें रा. खेर यांना वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. मूळ नाटकांतील नीला ही आपल्या या चंचल प्रवृत्तींत पुष्कळच पुढें गेलेली आहे; इतकी कीं तिला तेथून परत फिरण्यासारखें नव्हतें, आणि यामुळेंच आपल्या मुलाच्या कानावर हें भयंकर वर्तमान येण्याचें आंतच त्यानें आपणाकडून घेतलेलें वचन आपण पुरें करावें असें नायकाच्या आईनें ठरविलें व तें पुरें केलें रा खेर याच्या कादंबरींतील नीला ही इतकी बेताल होण्याच्या आंतच तिच्या सासूनें लेकाला दिलेलें वचन पुरें केलें आहे आपल्या सामाजिक परिस्थितीशीं इंग्रजी नाटकांतील नीलेची अत्यंत उच्छृंखल वृत्ति जमावयाची नाहीं म्हणून खेर यांनीं आपल्या कादंबरीतील नीला त्या पायरीपर्यंत खालीं गेल्याचें दाखविलेलें नाहीं पण ही तरतूद त्यांनीं केली असूनसुद्धा कथानकाच्या या भागाचा मेळ आपल्या परिस्थितीशीं जमत नाहीं हें शिल्लकच उरतें. आपल्या मुलावर तो केवळ अगतिक असता काहीं तरी ऐकण्याचा प्रसंग येऊं नये असें आईला वाटणारच. पण त्या प्रसंगातून त्याला वांचविण्यासाठीं ती त्याला अफूची गोळी देईल हें आपल्या इकडल्या आयांची ज्यांना माहिती आहे त्यांना खरें वाटणार नाहीं इंग्लंडमधल्या आईच्या हातून-सुद्धा हें साहस होईलसें वाटत नाहीं. मुलाची बेअब्रू झालेली पाहाण्याच्या ऐवजी एखाद्या आईनें आपलाच घात करून घेतला असतां हें मात्र बरेंचसें संभवतें इंग्लडमधल्या आईला तरी हा उद्योग उरकतां आला हें नाटकांत लिहिलेलें आहे इतकेंच काय तें आणि येथेंच एक मोठा थोरला वाद सुरू होतो. कादंबरीकार जें लीहितात तें त्यांच्या कल्पनेला भावेल तसें लिहितात का समाजांत घडतें तसें लिहितात? म्हणजे कल्पनेला बरें वाटेल तसें कादंबरीकारानें लिहावें कां समाजांत जें वास्तविकपणें घडत असेल त्याचेंच चित्रण त्यानें करावें, हाच तो वाद होय. या प्रश्नाचें उत्तर एकच एक असें देतां येणार नाहीं. कारण कांहीं कादंबरीकार कल्पनेच्या वारूवर बसून कोणीकडेही दौड मारतात.

आणि कांहीं वास्तवाच्या रस्त्यानें आणि बोळानें हळूहळूं हिंडत राहतात. कोणीं काय लिहावें याला नियम कसा घालतां येणार? म्हणजे कल्पना चालवून गमत करूच नये, तर जें दिसत असेल तेवढेंच लिहावें असा नियम कसा करतां येणार?

विवेचक असणारे रसिक लोकही, या दोघांतलें अतर ओळखतात पण जे नुसतेच रसिक असतात त्यांना कल्पित आणि वास्तव यांचा सकर निवडिता येत नाहीं आणि जें केवळ कल्पित असेल तें वास्तवच आहे असा ते आपला समज करून घेतात, आणि त्या प्रमाणें आनद किंवा दुःख मानितात. कित्येक कादंबरीकार आपल्याला सुखप्रद वाटणारीं कल्पितें, वास्तवरूपाचीं म्हणून, समाजावर लादतात आणि भोळे वाचक आतांच सांगितल्या प्रमाणें त्या कल्पितांनीं आनदून जातात किंवा त्याच्या मनाची चडफड होते. इंग्रजी वाङ्मयाची गांठ पडल्यापासून तिकडला माल घाऊक पद्धतीनें आणून आपल्या बाजार पेठेत माडण्याची पद्धतीच पडून गेली आहे आपल्या समाजाला कांहीं स्वतत्र अस्तित्व आहे याची दाद फार थोड्या कादंबरीकारांना असते इंग्रजी वाङ्मयाच्या द्वारा त्यांना इंग्रज समाज माहीत झालेला आहे. पण सहानुभूतीचें वेष्टण पुरेसें दीर्घ नसल्यामुळें आपल्या समाजाची मात्र त्यांना माहिती होत नाहीं. बरें, कादंबरी लिहावयाची तर ती आपल्या समाजांतल्यासारखी आहे असें तर दिसावयास हवें. म्हणून त्यांतील माणसांचीं गावें, नांवें ते बदलून टाकतात आणि आपल्या इकडील पेहराव त्यांना चढावितात. पण तेवढ्यानें विचारपिंड बदलत नाहीं आणि प्रवृत्तीचा विसर पडत नाहीं. तो इंग्रजीच राहातो. या साठीं होतकरू लेखकांनीं जर समाजाच्या विविध थरांतून सहानुभूतीनें शिरावयाचें ठरविलें आणि त्यांतील स्त्री पुरुषांविषयीं आपल्या मनांत प्रीति उत्पन्न करून घेतली तर त्यांना अगदीं अस्सल देशी आणि जिवंत कथानकें आपल्या समाजांत वाटेल तितकीं सांपडतील. पण हें जर होईना तर त्यांनीं निदान एक तरी करावें इंग्रजींतील वस्तू इकडे घेतांना त्यांनीं नांवें पालटूं नयेत—मुळांत असतात तशींच ठेवावींत.

या नांवानींसुद्धा कथानकाचें रूप साफ पालटतें, तें सर्व मानव जातीचें केती, परकी समाजाचें किती आणि आपल्या समाजाचें किती ह्याचा वेवेक या नावाच्या छापामुळें वाचकाना जलदीनें करता येतो आणि मलतेंच कांहि तरी लिहून यानें तें आपल्या समाजाच्या गळीं बांधलें आहे असा दोष तो लेखकाला देत नाहीं.

प्रस्तुत कादंबरीत रा खेर यांनी या उपायाचा अवलंब केला असता आणि मग इंग्रजी कादंबरींतल्या नीलेचें बेताल वर्तन जसेंच्या तसें उमटाविलें असतें तरी वाचकाला त्याचें काहीं वाटलें नसतें. आणि तिच्या सासूची ती चमत्कारिक धमक पाहून इंग्लंडातील मातृमनाविषयीं तो मनात काहि कल्पना करीत बसला असता. पण केवळ बाह्यांगें बदलून परकी वाङ्मयातील विचाराचा किंवा प्रवृत्तीचा कद जशाच्या तसा इकडे आणणें हें धड करमणुकीतही दाखल होत नाहीं आणि वास्तवाचेंही निदर्शक होत नाहीं असो कादंबरीचें दुसरें अर्ध म्हणजे अरविंद आणि निर्मला याचा कष्टानें घडून आलेला प्रीतिसंयोग हें होय. यातील कल्पना केवळ मामूल आहे. मजुराच्याबद्दल काहीं भावनेची तिरमीर प्राप्त होऊन त्या चळवळींत जाऊन पडावयाचें आणि थोड्या वेळात संप विसर्जनाबरोबर कर्तव्य कल्पनेचेंही विसर्जन करून, अर्धवट राहिलेलें आपलें प्रेमाचें आख्यान पुरें करावयाचें असा अनेक कादबऱ्यांतून आणि कथातून सप्रदायच पडलेला दिसतो म्हणून त्याला मामूल म्हटलें आहे या नायकांनीं आपलीं मनें नीट ओळखिलेलीं नसतात. परमेश्वराची भक्ति जशी 'सुळावरची पोळी' असते तशी समाजाची भक्तिसुद्धा सुळावरचीच पोळी असते किंबहुना सूळच तेवढा मिळतो पण पोळी मात्र कधीं तोंडांत पडत नाहीं. पण कादंबरींतील आमच्या नायकांना पोळी हवी असल्यामुळें ते सुळाकडे दुर्लक्ष करतात आणि प्रेमाच्या पगतीला जाऊन बसतात. याचा अर्थ असा कीं कादबरीच्या दोन भागांपैकीं विजयासंबंधींचा भाग अस्वाभाविक वाटतो आणि अरविंदासंबंधींचा भाग मामूल वाटतो.

पण असें असूनही लेखकानें आपल्या लेखनांतील अनेक गुण-विशेषामुळं ही कादंबरी वाचनीय बनविली आहे यांत कांहीं शंका नाही. प्रकरणाला धरून असलेलीं व वर्णनांचें, काव्याचे आणि किचकट संवादाचे सोगे कोठेंही न सुटलेली अशीं लहान लहान आणि चटकदार प्रकरणें एकामागें एक सारखी येत असतात. आणि त्यामुळें वाचकाच्या मनांत कथानुसंधान अखड राहून २, २॥ तास उत्तम प्रकारची करमणूक होते.

रा. खेर यांच्या लिहिण्याचा आणखी एक गुण असा आहे कीं श्रृंगारवर्णनाच्या ऐन रंगातहि तें सभावित रहातें वास्तविक पहातां ललित वाङ्मयांत सध्या सहज दृग्गोचर होणारी हीन रुचीची हौस प्रकट होण्यासारखी कित्येक स्थळें प्रस्तुत कादंबरीत आहेत, पण रा. खेर यांनीं सदाभिरुचीचा त्याग कोठेंही केलेला नाहीं

शिवाय अमुक एका वडील लेखकाच्या लेखनशैलीची छाप त्यांच्या शैलीवर पडली आहे असें कोठेंहीं दिसत नाहीं ते स्वतः आपल्याला जसें लिहितां येईल तसेंच लिहीत जातात

रा. खेर यांनी मनमोकळेपणानें सांगितलें की अगदी योग्य वाटेल तेंच लिहा व त्या प्रमाणेंच लिहिलें आहे. वर सांगितलेले दोष वगळून जर त्यांनीं आपलें लिखाण चालू ठेवलें तर त्याच्या हातून उत्तरोत्तर चांगलें लिखाण होत जाईल असा बळकट भरवसा आहे.

---


श्री. भा. द. खेर, बी. ए
यांचें

**आगामी वाङ्मय**

**१ पुष्पमाला** (कादंबरी)
**२ मधुबिंदु** (लघुनिबंध संग्रह)

# प्रकरण १

" तुमच्या पुण्यात बघण्यासारखं असं काय आहे ? " असा प्रश्न तुम्ही कोणत्याहि पुणेकराला करा, कीं लगेच तो तुम्हाला पर्वती, शनिवारवाडा यासारख्या इतिहासप्रसिद्ध स्थळांचें वर्णन करून सांगेल, एम्प्रेस, बंड, बोट्यानिकल वगैरे बागा पाहून येण्याबद्दल तो तुम्हाला शिफारस करील; कॉमनवेल्थ, सर परशुराम भाऊ कॉलेज यासारख्या आणखी कितीतरी इमारतींची मनसोक्त स्तुति करून त्या बघण्यास विसरूं नका असेंहि तो तुम्हास बजावील आणि सरते शेवटीं म्हणेल " आमच्या पुण्यातलं ' प्रभात नगर ' देखील मोठं बघण्याजोगं आहे, आणि प्रभात नगरला जाणारच असाल तर मध्यें रस्त्यावरच अगदीं प्रभात नगरानजिक ' विजय व्हिला ' नावाचा बंगला आहे, तो बघण्यास मात्र चुकूं नका. मोठा सुंदर आहे तो ! "

आणि खरोखरच कोणीहि मनुष्य प्रभात रोडवरून प्रभात नगरकडे जाताना वाटेवर लागणाऱ्या त्या बंगल्यासमोर थोडा वेळ थबकून त्याच्याकडे बघितल्याखेरीज व त्या छोट्या व टुमदार बंगल्याचें वर्णन केल्याखेरीज कधींच पुढें सरकणार नाहीं.

आतां त्या बंगल्याच्या सौंदर्याचें सार कशात आहे याबद्दल मात्र कधींच कोणाचें एकमत होणें शक्य नाहीं. कोणाला वाटेल त्या बंगल्याभोंवती फुलांची सुंदर बाग आहे म्हणून त्या बंगल्याला सौंदर्य प्राप्त झालें आहे. कोणी बंगल्याच्या सौंदर्याचें श्रेय तेथें सतत थुईथुई उडत असलेल्या व क्वचित् प्रसंगीं सूर्याची किरणं पडून इंद्रधनुष्याची शोभा निर्माण करणाऱ्या एका कारंज्याला देईल. तर काहींना वाटेल कीं बंगल्याच्या भिंतीवर रंगसंगतींत साधलेल्या कौशल्यांत किंबहुना

बंगल्यावर एका संगमरवरी दगडावर हिंदमातेचें चित्र काढून तिच्या हातांतील ध्वजावर कोरलेल्या 'विजय व्हिला' या नांवांतच एक प्रकारची जादू भरली आहे व त्यामुळेंच बंगल्याला खरें सौंदर्य प्राप्त झालें आहे.

कांहीं असलें तरी तो बंगला सुंदर आहे या एका गोष्टीबद्दल मात्र कोणाचेंच दुमत असणें शक्य नाहीं.

रोज सकाळीं सात वाजतां "लॉ कॉलेज" चे विद्यार्थी जेव्हां त्या बंगल्यावरून जात तेव्हां ते अगदीं निराळ्याच दृष्टीनें त्या बंगल्याकडे बघत. कारण नेमकी त्याच वेळीं नीला बागेंतील फुलें तोडण्यासाठीं म्हणून बागेंत इकडून तिकडे फिरतांना दिसे. अशा वेळीं "बंगल्याच्या सौंदर्याचं इंगित कशांत आहे ?" असा प्रश्न जर त्या विद्यार्थ्यांना कोणी केला असता तर त्यांच्यापैकीं प्रत्येक जणानें अगदीं वेळ न गमावतां बागेंतील त्या चालत्या बोलत्या सौंदर्याकडे आपलें बोट खास दाखविलें असतें.

एके दिवशीं सकाळीं ते विद्यार्थी असेच नेहमींप्रमाणें त्या बंगल्याकडे बघत चालले असतांना नीला तिच्या रोजच्या नियमाप्रमाणें बागेंतील फुलें तोडीत होती. त्या फुलांमधलें एक गुलाबाचें टपोरें फूल तिनें तिच्या अंबाड्याच्या किंचित् उजव्या बाजूला खोवलें होतें. त्याच्याकडे बघत एक विद्यार्थी सर्वांना उद्देशून उद्गारला. "बोला, त्या फुलानं तिच्या केसांचं सौंदर्य वाढवल आहे, कीं तिच्या केसांनीं त्या फुलाच सौंदर्य वाढवलं आहे ?"

त्या प्रश्नाबद्दल त्यांच्यामध्यें विनोदानें थोडी उलटसुलट चर्चा झाली. नंतर त्यांपैकीं दुसरा एकजण म्हणाला, "अरे मला एक शोध लागला आहे !"

"सर्व जणांनीं एकदम विचारलें, "काय कसला शोध ?" मग तो

पहिला पुन्हां म्हणाला, " तिच्या नांवाचा ! " सर्वांनीं त्याच्याकडे अगदीं उत्सुकतेनें प्रश्नार्थक मुद्रेनें बघितलें मग त्यानेंहि सर्वांची उत्सुकता फारशी वाढूं न देतां म्हटलें " तिच नांव नीला आहे. " आणि थोडा वेळ थांबून तिच्या नांवावर भाष्य करण्यासहि तो विसरला नाहीं. तो म्हणाला " खरंच, तिच्या निळया डोळयांकडे बघितल म्हणजे तिच्या नांवाची सार्थकता पटते नाहीं का ? " आणि लोकमत अजमाविण्याच्या दृष्टीनें त्यानें सर्वांकडे आपला दृष्टिक्षेप टाकला. परंतु त्यांपैकीं एकजणानें यावर त्याला " आहे बुव्वा " चा नुसता आहेर दिला. पण लगेच तो म्हणाला " लेका, तिचं लग्न झाल आहे बर का ? "

" मग त्यांत काय झालं ? " दुसरा उद्गारला

परंतु या बोलण्यावर आंबट तोंड करून आतांपर्यंत गप्प असलेला एक विद्यार्थी म्हणाला " अरे आपण आतां आर्टस् कॉलेजचे विद्यार्थी नव्हत. तेव्हां आपण आतां जरा गांभीर्य अंगीं आणल पाहिजे. " या बोलण्यावर सर्व विद्यार्थ्यांनीं निरनिराळी टीका केली व सर्वजण त्याच्या " आजोबा तत्त्वज्ञानावर " कुत्सितपणानें हंसले.

अशाच प्रकारचीं निरनिराळीं बोलणीं रोजच त्या विद्यार्थ्यांत नीलेसंबधी चालत तिला तीं नेहमींच ऐकूं येत असत असें नाहीं पण तिनें जरी तीं बोलणीं क्वचित् प्रसंगीं ऐकलीं तरी तिला त्याबद्दल कांहींच वाटत नसे. कारण कॉलेज-जीवनांत अशा प्रकारची टीका करण्याचा विद्यार्थ्यांना जणू ' पासच ' असतो असें ती समजे, आणि शिवाय एखाद्या गोष्टीला निष्कारण नसतें महत्त्व देऊन स्वतःच्या मनाला त्रास करून घेणाऱ्या वर्गापैकीं ती खचित नव्हती.

त्या दिवशीं नीला नेहमींपेक्षां जास्तच वेळ फुलें तोडण्यांत गुंतली होती. परंतु फुलें तोडण्याऐवजीं मधूनच ती जेव्हां थबके त्या वेळीं ती कांहींतरी गोड विचार करण्यांत गुंतली आहे असें

तिच्याकडे बघणाराला सहज वाटे. त्या दिवशीं विजयबद्दल तिचे विचार चालणें व त्यांतच फुलें तोडण्याऐवजीं तिनें गुंगून जाणें सहाजीकच होतें. त्या गोड विचारांत ती रंगली असताना आंतून एकदम तिला हांक ऐकू आली, "अग नीला, ए नीला, तुझं आटपणार तरी केव्हां बाई? किती उशीर करते आहेस?"

उमाबाईंचे हे शब्द ऐकताच ती तेथें मग फारशी थांबली नाहीं व "झालंच, आले ह!" असें म्हणून फुलांची परडी घेऊन ती धांवतच आंत गेली.

हातांतील फुलांची परडी खालीं ठेवते न ठेवते तोंच उमाबाईंनीं तिला विचारलें "काय ग, चांदीची अत्तरदाणी गुलाबदाणी बाहेर काढून ठेवलीस का?" तिनें नकारार्थी मान हालवतांच उमाबाई पुन्हां म्हणाल्या "अग दुपारीं एक एक मंडळी जमायला लागली म्हणजे त्यांच्याशीं बोलण्यात तुला कांहीं सुचायचं नाहीं आणि मग सर्व काम राहून जातील."

मग मात्र वेळ न गमावता लगेच घाईघाईनें ती कामाला लागली

त्या बंगल्यांतील एकंदर गडबडीवरून त्या ठिकाणीं आज कांहींतरी मोठा समारंभ आहे असा तर्क जर कोणी बांधला असता तर तो क्वचित चुकीचा ठरला नसता. आणि खरोखरच त्या दिवशीं विजय व नीला यांच्या लग्नाच्या वाढदिवसाचा समारंभ होता.

नीला एक एक काम करण्यांत गुंतली होती खरी. परतु तिचें मन मात्र विजयबद्दलच्या विचारांत पूर्णपणें गर्क झालें होतें. किंबहुना असेंच म्हणणें जास्त सयुक्तिक ठरलें असतें कीं, विजयबद्दल विचार करणें हेंच तिचें प्रमुख काम होतें, व ती करीत असलेलीं बाकीचीं कामें गौण होतीं.

तिचें मन गेल्या वर्षाचा आढावा घेत होतें. गत वर्षीं नक्की या

दिवशीं ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या तारखेला विजयचें आणि नीलाचें मुद्राविधान पद्धतीनें लग्न झालें होतें पहिल्या प्रथम उमाबाईनीं त्या लग्नपद्धतीला आपली नापसंती दर्शाविली होती. परंतु विजयनें त्या पद्धतीनें लग्न करण्याचा जवळ जवळ हट्टच धरला. ज्या गोष्टींत आपला विशेष तोटा नाहीं अशा क्षुल्लक गोष्टींत दुसऱ्याचें मन सहसा दुखवायचें नाहीं असा उमाबाईंचा स्वभाव असल्या कारणानें त्यांनीं तात्काळ त्या लग्नाला आपली समती दिली होती. विजयसुद्धां हट्टी स्वभावाचा होता असें मात्र खास नव्हे त्याला ती विवाहपद्धती फारच आवडलेली होती. कारण एकतर तिचा आटोपशीरपणा! व दुसरी गोष्ट म्हणजे त्या विवाहपद्धतींत असलेली घटस्फोटाची सवलत! आणि जी गोष्ट सारासार विचार करून मनाला पटते त्या गोष्टीत मनुष्यानें आपला हट्ट खुशाल चालवावा अशा मताचा विजय होता

त्याचा तो प्रेमविवाह होता असेंहि नव्हतें नीला त्याच्या नात्यांतली होती व त्यांचें लग्न वडील मंडळींनी लहानपणापासून जवळ जवळ ठरवूनच टाकलें होतें आणि विशेष हें कीं हें लग्न ठरविण्यांत उमाबाईंचाच अधिक भाग होता. तेव्हां केवळ मुद्राविधान पद्धतीनें त्यांनीं लग्न केलें या एकाच गोष्टीबद्दल त्यांच्या मनांत त्या दोघांच्या विषयीं अढी निर्माण होणें शक्य नव्हतें आणि यदाकदाचित् ती निर्माण झालीच असती तर ती पार घालवून टाकण्यास एक कारण लवकरच घडून आलें होतें त्या दोघांचें लग्न झाल्यानंतर दोनच महिन्यांनीं विजयला वैमानिक खात्यांत मोठ्या पगाराची नोकरी लागली होती व त्यामुळें नीला चांगल्या पायगुणाची ठरली होती. अशा स्थितींत त्या दोघांच्याबद्दल उमाबाईंच्या मनांत राग राहावा ही गोष्ट खास शक्य नव्हती.

उमाबाई प्रथम कशा रागावल्या? नंतर विजयनें हट्ट धरल्यावर त्यांनीं कशी संमती दिली? आणि विजयला नोकरी लागल्यावर नीला

चांगल्या पायगुणाची म्हणून आपलें किती प्रकारें कौतुक केलें वगैरे गोष्टी नीलेला जसजशा आठवत होत्या तसतसें तिला त्या गोष्टीबद्दल अनावर हसूं येत होतें. आणि ती हसतांच नेहमीं प्रामुख्यानें दिसणारे तिचे वरचे दोन शुभ्र दांत आताहि पण मधून मधून दिसत होते. ती जेव्हा हंसे तेव्हां तिच्या निळया डोळ्यांत हंसरे भाव व्यक्त होत व मग अशा वेळीं तिच्याकडे बघणाराला ती हंसतांना दिसणाऱ्या त्या दोन शुभ्र दांतांकडे बघावें कीं ती हंसतांना तिच्या निळया डोळ्यात जे हंसरे भाव व्यक्त होत त्यांच्याकडे बघत राहावें असा संभ्रम कांहीं काळ पडत असे. आतांहि तसा संभ्रम तिच्याकडे बघणाराला खास पडला असता. परंतु ती त्या मोठ्या दिवाणखान्यांत एकटीच होती. आणि रामा गड्यानें "बाईसाहेब, बाईसाहेब" म्हणून तिला जेव्हां हाका मारल्या तेव्हा तर तिच्या तोंडावरचें हास्यसुद्धा पार मावळून गेलें होतें.

आज लग्नाचा वाढदिवस म्हणून गेल्या वर्षी लग्न झाल्याबरोबर एकत्र काढलेला त्याचा मोठा फोटो ती दिवाणखान्याच्या मध्यभागीं टांगण्यांत गर्क झाली होती ज्या ठिकाणीं तिला फोटो टांगायचा होता त्या ठिकाणीं कांहीं केल्या तिचा हात पुरत नव्हता. अशात रामानें तिला एकसारख्या हांका मारण्याचा सपाटा चालविल्याकारणानें ती दिवाणखान्यांत आलेल्या रामावर थोडी चिडूनच ओरडली "कायरे उगाच मोठ्यानें हाका मारतोस ?"

"नाहीं बाईसाहेब, भाऊ व आई आल्या आहेत."

"खरं का ? ही आलेच मी !" असें म्हणून दिवाणखान्यांतुन पळतच ती निघाली. पण दाराशीं जराशी थबकून रामाला म्हणाली "रामा, तो फोटो तेवढा मध्यभागीं नीटसा टांग बरं का ! माझा मेला हातच पुरत नाहीं."

त्या वेळची तिची धांदल पाहून कोणालाहि हंसू आलें असतें. ती कितीहि मोठी झाली तरी माहेरच्या माणसांबद्दल तिचा ओढा कधींहि

कमी होत नाहीं, हें नीलेच्या उदाहरणावरून आतां सहज पटण्याजोगें होतें तेव्हां त्या वेळीं तिचे आई-वडील गावाहून आले आहेत असें कळतांच ती हातांतील काम टाकून तात्काळ ओसरीवर आली. आईला बघतांच ती तिच्या अगदीं जवळ जाऊन उभी राहिली आणि आश्चर्यानें तिच्याकडे बघत म्हणाली " अग, या गाडीला तुम्ही कसे आलांत ? पुढच्या गाडीला येणार होतां ना ? मी तर पुढच्याच गाडीला रामाला स्टेशनवर धाडणार होतें ! " वास्तविक आईला एकाहि प्रश्नाचें उत्तर देण्यास तिनें मध्यें अवसर दिला नाहीं. इतकेंच नव्हे तर वरील एकाहि प्रश्नाचें उत्तर आईकडून तिला आलें नाहीं. तरी तिनें आपल्या पुढील प्रश्नांचा भडिमार तिच्यावर करावयास कमी केलें नाहीं. त्यांचा प्रवास कसा काय झाला ? आईला नेहमींप्रमाणें गाडी लागली किंवा नाहीं ? गगूवन्स त्यांच्याबरोबर येणार होत्या त्या कां आल्या नाहींत ? वगैरे माहिती तिनें भराभर तिला विचारली या वेळपर्यंत भाऊ-तिचे वडील-टांग्याचे पैसे चुकते करून आत आले. मग तेच स्वतः जेव्हां म्हणाले " अग नीला आईला बसूं तर देशील कीं नाहीं ? मग विचार एक एक माहिती ! " तेव्हा तिनें आईला आत नेऊन एका कोचावर बसविलें.

सर्वांचा चहा-फराळ झाल्यानंतर नीला आईला म्हणाली " खरंच, आई, गगूवन्स केव्हां येणार हें नाहीं सांगितलस ? तुमच्याबरोबरच येणार होत्या ना त्या ? "

" हो येणार होत्या. पण प्रभाकरपंतांचंहि आयत्या वेळीं यायच ठरलं. तेव्हां ते म्हणाले, मागच्या गाडीनं आम्ही येऊं."

" पण प्रभाकरपंत येणार नव्हते ना ? "

" या डॉक्टर लोकांचं म्हणजे सर्वच अनिश्चित ! पहिल्या प्रथम म्हणाले मला कामामुळें येतां यायचं नाहीं. आणि लागलीच आज सकाळीं निरोप आला कीं एका दिवसाची रजा घेऊन मी येत आहे.

आणि हो नीला, तुला कळल का प्रभाकरपतांची ठाण्याहून पुण्याला बदली झाली ?"

"नाहीं बाई ! मला कसं कळणार ? बर झालं ! आता गंगूवन्सं आमच्या पुण्याला येणार तर ! मग सर्व बिऱ्हाड ठाण्याहून केव्हां हालवणार ?"

"आत्तांशी कुठे हुकूम हातांत पडलाय ! आता पुढें सर्व बेत"

आणि नंतर मग गंगूवन्संच्या अरूणबद्दल नीलेन आईला खूपच प्रश्न विचारले. तो आतां मोठा झाला असेल, चालायला लागला असेल; खूप खूप बोलत असेल वगैरे तर्क आईनें काहीं एक न सांगतां नीलेन केव्हांच करून टाकले होते.

थोड्या वेळानें आपलें काम आटोपून उमाबाईहि त्याच्या गप्पांत सामील झाल्या कोण कोण लोक समारंभास येणार आहेत यावरून विजयचा मावस भाऊ अरविंद याच्याविषयीं जेव्हां बोलणें निघालें तेव्हां नीलेची आई म्हणाली "खरंच, अरविंद अजून कसा नाहीं आला ? वास्तविक अशा कामात त्याचाच पुढाकार पाहिजे !"

"तो नाहीं आज हजर राहणार !" असें उमाबाईनीं म्हणतांच नीलेच्या आईनें नुसती आश्चर्यकारक मुद्रा केली. मग उमाबाईनीं थोडा वेळ थांबून पुन्हां म्हटलें, "त्याच कालच पत्र आल आहे कीं कोणत्यातरी मजुरांच्या चळवळींत तो गुतला असल्यामुळें त्याला येता यायचं नाहीं."

नतर त्याच्याविषयींच्या एकदर बोलण्यावरून नीलेच्या आईनें ताबडतोब ताडलें कीं, उमाबाईंच्या मनांत अरविंदाविषयीं अलीकडे थोडासा विकल्प उत्पन्न झाला आहे. आणि त्यांच्याच सांगण्यावरून तिला कळून आलें कीं अरविंदाला उमाबाईनीं लग्नाचा पुष्कळ आग्रह केला असतांना त्यानें उत्तर दिलें होतें कीं मजुरांच्या चळवळीशीं त्याचें लग्न लागलें आहे.

मग त्या काहींशा अप्रिय विषयापासून अलिप्त राहण्यासाठीं म्हणून नीलेच्या आईनें पुष्कळच निरनिराळ्या गप्पा काढल्या. गप्पांतून कांहीं तरी आठवण झाल्यासारखी करून उमाबाई म्हणाल्या "अग नीला, अत्तरदाणी-गुलाबदाणी नुसती काढून ठेवलीस पण त्यामध्यें अत्तर आणि गुलाबपाणी भरलस का ?"

नीला मग हसतच तेथून उठली कारण उमाबाईंनीं तिला तें काम सकाळींच सांगितलें होतें ती गेल्यावर उमाबाई तिच्या आईकडे बघत म्हणाल्या, "ही एकदा गप्पांत रंगली म्हणजे कांहीं विचारूं नका. करायचीं काम मग ती अगदीं विसरून जाते"

यावर पुष्टीदाखल तिच्या आईनें नुसतें हास्य केलें. आणि दुपारीं जेव्हा गगूताई आली व तिच्याशीं गप्पा मारण्यात जेव्हा नीला रंगून गेली तेव्हा तर उमाबाईंचें वरील म्हणणें अधिकच सयुक्तिक ठरलें. गगूताईच्या अरूणला चॉकोलेट देऊन त्याच्याशीं बोबडें बोलण्यात तिचा जेव्हां [illegible] तेव्हा तेव्हा उमाबाईंना तिला कामाची सारखी आठवण करून द्यावी लागत होती. समारंभाची जेव्हां सर्व तयारी झाली तेव्हा कोठे उमाबाईचा जीव थोडा खाली पडला

वाढदिवसानिमित्त बंगल्यामधील दिवाणखाना उत्तम तऱ्हेनें शृंगारण्यांत आला होता दिवाणखान्याच्या मध्यभागीं भिंतीवर नीला आणि विजय या दोघाचें भव्य छायाचित्र लावलें होतें व त्या छायाचित्राच्या दोन्ही बाजूंला मखमली पडद्यावर काढलेलीं दोन सुंदर सृष्टिसौंदर्याचीं चित्रें लोंबत होतीं ठिकठिकाणीं भिंतीवर अशाच प्रकारचीं अनेक चित्रें लावण्यांत आलीं होतीं पण मौज ही कीं बाकीच्या त्या चित्रांऐवजीं बघणाराची नजर नीला व विजय यांच्या छाया-चित्रावरून निघून त्याच्या भोंवती असलेल्या त्या दोन चित्रांवरच प्रथम स्थिर होई. दिवाणखान्याच्या मध्यभागीं हिरव्या रंगाचा

गालिचा पसरून त्या भोंवती चारी बाजूना थोडी रिकामी जागा सोडली होती. जामिनीच्या फरशीचा रंग तांबडा असल्यामुळें तांबड्या गालिच्यावरच मध्यभागीं हिरवा गालिचा घातला आहे किंवा काय असा भास त्यामुळें सहज निर्माण होत होता, आणि सोडलेल्या मोकळया जागेवर ओळीनें ज्या खुर्च्या मांडण्यात आल्या होत्या त्यासुद्धा बघणाराचें चित्त काहीं काळ वेधून घेतल्याशिवाय राहात नव्हत्या.

दिवाणखान्यात अजून फारशी मडळी जमायला लागली नव्हती मधूनच दोन लोक येऊन तबला व तबोरा लावून गेले. कारण वाढ-दिवसानिमित्त मुख्य कार्यक्रम अमीरखान यांच्या गाण्याचा होता, आणि अमीरखानांचें गाणें म्हणजे एखाद्या दिलखुलास मेजवानी-प्रमाणेंच लोकाना वाटे. स्वतः अमीरखान बंगल्यासमोर असलेल्या बागेंत एका बाकावर बसून गप्पागोष्टी करीत होते व बहुतेक मडळींचा घोळका त्याचाच भोंवती जमा झाला होता. आणि जी मडळी त्या घोळक्यात नव्हती ती लहान लहान जमावानें ठिकठिकाणीं बसून किंवा उभे राहून बागेंत केलेल्या रोषनाईकडे बघत होती. किंबहुना असेंच म्हणावें लागेल कीं जमलेल्या मंडळींपैकीं जो रसिक वर्ग होता त्याला त्या वेळीं गप्पागोष्टींपेक्षा त्या सौंदर्याकडे निरखून बघणेंच जास्त आवडत होतें. कारण त्या वेळीं बागेंत ठिकठिकाणीं उडत असलेल्या कारंजां-च्या तुषारातून मावळत्या सूर्याचीं कोवळीं किरणें परावर्तीत होऊन त्याची शोभा मोठी अवर्णनीय दिसत होती. आणि त्या शोभेकडे बघणाराच्या मनात एकच प्रश्न प्रामुख्यानें उभा राहत होता. तो हा कीं, सूर्य मावळल्यावर त्यांच्याभोंवती ओळीनें लावलेल्या रंगीबेरंगी दिव्यांमुळें त्या तुषारांना याप्रमाणें शोभा येईल किंवा नाहीं? तसेंच बंगल्याच्या कडेनें, फुलांच्या कुंड्याच्या सभोंवती, बंगल्याच्या मुख्य दरवाजावर याप्रमाणें बहुतेक सर्व ठिकाणीं रंगीबेरगी दिव्यांची रोषनाई केलेली होती; व ती पाहून कांहींना तर अगदीं

संध्याकाळ होऊन आपल्याला त्यांची शोभा केव्हां बघायला सांपडते असें होऊन गेलें होतें. इतक्यांत कसला तरी आवाज येऊन कांहीं काळ सर्वत्र स्तब्धता झाली आणि सर्वांची नजर त्या आवाजाच्या दिशेकडे गेली व मग मात्र थोडासा हंशा पिकला. कारण ज्या ठिकाणीं "विजय व्हिला" हीं अक्षरें कोरलीं होतीं त्याच्या थोडें खालीं दूर ध्वनिक्षेपकाची व्यवस्था केलेली आहे हें लोकांना तेव्हां कळून आलें, व तशी व्यवस्था करण्याची वास्तविक जरूरी नव्हती केवळ शोक म्हणून ती व्यवस्था करण्यात आलेली आहे हा विचार त्यांच्या मनांत येऊन त्यांना त्या वेळीं हसूं आलें असावें. त्या दिशेनें अजून आवाज येतच होता.

" हॅलो, हॅलो, ऐकू येत का ? "

नीला बाहेर येऊन ऐकत होती व पुन्हा आंत जाऊन कांहींतरी सांगत होती. ध्वनिक्षेपकाची व्यवस्था उत्तम झालेली आहे हें बघतांच त्यावर बोलणारी व्यक्ती म्हणाली " हॅलो, सद्‌गृहस्थहो, कृपा करून सर्वांनीं दिवाणखान्यात येऊन बसाव. कार्यक्रमाला लवकरच सुरुवात होणार आहे "

हे शब्द ऐकल्यानंतर पुन्हां कांहींशी स्तब्धता झाली व त्यांच्यापैकीं नीलेच्या चांगल्या ओळखीचे जे लोक होते ते तिच्याभोंवतीं जमा झाले व म्हणाले " अहो, हें काय ? कार्यक्रमाला सुरुवात कशी होणार? अजून विजयचा तर पत्ता नाहीं. "

नीलेनें त्या सर्वांना सांगितलें कीं विजयचें कालच पत्र आलेलें आहे कीं, तो अगदीं आयत्या वेळीं त्याच्या मित्राच्या मोटारनें येणार आहे. या तिच्या खुलाशानें त्या मंडळींचें समाधान झालें किंवा नाहीं हें सांगणें कठीण आहे. पण नीलेच्या मनांत मात्र त्या वेळीं थोडीशी रुखरुख उत्पन्न झाल्यावांचून राहिली नाहीं. वास्तविक तो बराच आधीं यायला पाहिजे होता. त्याच्या न येण्याबद्दल तिच्या मनांत कांहीं

कुतर्क यापुढें कदाचित् निर्माणहि झाले असते पण लगेच त्या वेळीं स्वतः भाऊच बाहेर आले व सर्वांना म्हणाले " आपण आपला कार्यक्रम सुरू करू या. कारण आत्तांच साडेसात वाजले आहेत. अर्धा तास आधींच उशीर झाला आहे विजय आत्ता येईलच, आणि मग तोहि आपल्या कार्यक्रमांत सामील होईल. त्याच्याकरितां थांबण्याची मुळींच जरूरी नाहीं " भाऊच्या कडक शिस्तीच्या वागण्याची बरीच ख्याती होती म्हणून मग क्षणाचाहि विलंब न करतां सर्व लोक दिवाणखान्यांत जमा झाले नीलासुद्धां दिवाणखान्यांत जाऊन बसली पण तिच्यासाठीं व विजयसाठीं म्हणून मुद्दाम जवळ जवळ मांडलेल्या खुर्च्यांपैकीं एकीवर न बसतां ती दुसरीकडेच जाऊन बसली या वेळीं तिनें विजयला आवडणारें अस्मानी रंगाचें जॉर्जेटचें पातळ परिधान केलें होतें. पण त्यामुळें तिचा विजयच्या न येण्याबद्दलचा विषाद जास्तच वाढत होता मधूनच तिला वाटे तो आतां लवकरच येईल व आपल्या पातळाची खचित चीज होईल पण नेहमीच्या नियमानुसार प्रियजनांच्या अतिस्नेहामुळें उत्पन्न होणारे वाईट विचारच तिच्या मनांत त्या वेळीं जास्त डोकावत होते.

दिवाणखान्यांतील बहुतेक सर्व लोकांची विजयच्या न येण्याबद्दल कमी अधिक प्रमाणांत नीलेप्रमाणेंच स्थिति झाली होती अमीरखानांनीं स्वतः तंबोरा चांगला लागला आहे किंवा नाहीं याची कसून तपासणी करून तो साथीदाराच्या हातीं दिला तबलेवाल्यानें तबल्यावर थोडी हातोडी मारून तो तालबद्ध केला व अमीरखानांनीं थोडेसें खांकरून गाण्याला सुरुवात केली. थोड्याच वेळात सर्व लोकांचे पूर्वीचे विचार गाण्याच्या स्वरांत विरून गेले. पण अमीरखान जी चीज गात होते तिच्या अर्थाकडे जर कोणाचें लक्ष गेलें असतें तर प्रत्येकाला अशी शंका खचित आली असती कीं, त्या अर्थामध्यें नीलेच्या मनःस्थितीचें थोडेंफार वर्णन केलेलें आहे कीं काय ? पण बहुतेक सर्व लोक स्वराशींच इतके तद्रूप झाले होते कीं अर्थाकडे त्यांचें क्वचितच लक्ष होतें.

परंतु नीलेच्या मनात मात्र त्या चिजेचा अर्थ आला असावा. कारण दोन तीन चिजा झाल्या तरी तिचें मन त्या पहिल्या चिजेच्या अर्थाभोंवतीच वावरत होतें त्या चिजेचा अर्थ थोडक्यांत असा होता. " अति आसक्तीच्या पोटींच तीव्र निराशेचा जन्म होतो अतएव मनुष्यानें अति आसक्ती ठेवूच नये. '

ह्या चिजेनतर अमीरखानांनीं दोन गाणीं म्हटलीं आणि तीं फारच सुंदर वठलीं. सर्व लोक अधिक अधिक खूष होत होते व गाण्याला आता यापुढें उत्तमच रंग भरणार असें वाटायला लागलें होतें पण नीलेच्या मनात मात्र पहिल्या चिजेसंबधीच अनेक विचार घोळत होते तिचें मन सारखें म्हणत होतें- " मनुष्यानें अति आसक्ती धरूं नये म्हणजे काय ? अति आसक्तीशिवाय काय उत्कट प्रेम निर्माण होईल ? आणि तसल प्रेम करतांना मनुष्याला जरी तीव्र निराशेचा झटका बसला तरी उत्कट प्रेम करण्याचा ब्रह्मानद त्याला प्राप्त होणार नाहीं काय ? "

" बाईसाहेब, बाहेर कुणीतरी आल आहे " हा निरोप घेऊन रामा जर तिच्याजवळ आला नसता तर या असल्या विचारात तिचें मन किती वेळ बुडून राहिलें असतें हें सागणें कठीण आहे ती उठून बाहेर गेली फार थोड्या लोकाचें तिच्याकडे लक्ष होतें. अमीरखान स्वरावर खेळण्यात फारच रंगले होते व श्रोत्यानाहि ते आपल्याबरोबर खेळवीत होते

बाहेर आल्यावर पोस्टमन दाराशी उभा असलेला दिसला. तो म्हणाला " बाईसाहेब, तार आहे ! "

उमाबाई नीलेच्या पाठीमागें उभ्या होत्या. त्याना वाटलें कोणाची तरी अभिनदनाची तार असेल. कारण ज्या लोकांना बोलावणें असून समारंभाला येता येणें शक्य नव्हतें त्यापैकीं बहुतेकांच्या अभिनदनार्थ बऱ्याच तारा आल्या होत्या. पण का कोणास ठाऊक नीलेला ती

तशा प्रकारची तार असेल असें वाटलें नाहीं. सही करून तिनें तार फोडली व तारेंतील अक्षरांवरून नजर फिरतांच " आई ग ! " असा कांहींसा शोकविव्हल स्वर काढून ती मटकन् खालींच बसली व मग उमाबाईनें " काय आहे ग तारेंत ? " असें पुनः पुन्हां जरी तिला विचारलें तरी तिच्या तोंडावाटे शब्दहि फुटला नाहीं आणि तारेंत असा कोणता मजकूर आहे हें उमाबाईनाहि कळलें नाहीं.

—:०:—

## प्रकरण २

अरविंद आज अगदीं पहाटेपासून जागा झाला होता. आणि रात्रीपासून पहाटेपर्यंत त्याला जी झोंप लागली होती तीसुद्धा अस्वस्थ अशीच होती. आदले दिवशीं संध्याकाळीं 'विलास मिल्स'च्या मालकाकडून परत आल्यापासून त्याच्या मनांत परस्परविरोधी विचारांचें मोठें वादळ सुरू झालें होतें. 'विलास मिल'मध्यें ॲसिस्टट मॅनेजर हवा होता. त्यांची 'टाइम्स'मधील जाहिरात वाचून अरविंदानें त्या नोकरीसाठीं अर्ज टाकला होता. व त्याप्रमाणें त्या मिलचे मालक आप्पासाहेब भट यांनीं त्याला भेटीसाठीं काल आपल्या बंगल्यावर बोलाविलें होतें. पहिल्या प्रथम नोकरीविषयीं त्यांचें संभाषण झाल्यानंतर आप्पासाहेबांनीं त्याला विचारलें " अरविंद, तुमचं मूळगांव कोणतं ? "

" नागपूर ! माझे वडील तेथें वकील आहेत."

या अरविंदाच्या बोलण्यावर आप्पासाहेब आश्चर्यानें उद्गारले, "म्हणजे आबासाहेब गोखले ?"

अरविंदानें यावर नुसती मान हालवली.

मग आप्पासाहेब पुन्हां म्हणाले "ओहो ! अरे आबासाहेब म्हणजे आमचे अगदीं बालपणापासूनचे स्नेही ! आणि त्यांचा तूं मुलगा ? मला वाटलच ! बाकी अलीकडे बरेच दिवसांत त्यांची आमची गांठभेट नाहीं म्हणा !"

आणि पुढें बराच वेळ त्यांच्या तोंडाला खीळ अशी पडली नाहीं जुन्या आठवणी निघाल्या म्हणजे बहुतेक वृद्धांची हीच स्थिति होत असावी. त्या आठवणींविषयीं बोलतांना प्रत्यक्ष वाक्देवी त्यांच्या मुखांत आवरते कीं काय कोणास ठाऊक ! मग तो प्रसग जणू काय आपल्या डोळ्यांदेखत घडत आहे असा भास ते आपल्या बोलण्यानें निर्माण करतात आप्पासाहेबाची अगदीं हीच स्थिति झाली होती. त्यांनीं अरविंदाला आबासाहेबांच्या व त्याच्या बालपणच्या अनेक गोष्टी सांगितल्या इतकेंहि करून ते थांबले नाहींत तर त्या आठवणींत कोणीतरी दुसऱ्यानें भाग घ्यावा या हेतूनें त्यांनीं लगेच आपली पत्नी रमाबाई व आपली मुलगी निर्मला याना हांक मारून बाहेर दिवाणखान्यांत बोलावून घेतलें रमाबाई कांहींतरी काम करीत होत्या. त्या हात पुशीत पुशीतच बाहेर आल्या. आपल्या खोलींतून लगेच निर्मलाहि पण दिवाणखान्यांत आली आल्यावर तिनें एक ओझरता दृष्टिक्षेप अरविंदावर टाकून आप्पासाहेबांना विचारलें "काय आप्पा, कशाला हाक मारलीत ?"

"अग बैस तर खरी. मग सांगतों."

मग उभ्या असलेल्या आपल्या पत्नीकडे दृष्टि टाकून ते म्हणाले "तू उभी कां ? खाली बैस." आणि पत्नीवरची दृष्टी बाजूला न काढता ते म्हणाले "तूं याला ओळखलंस का ?"

रमाबाईनें अरविंदाकडे बघून नकारार्थी मान हालवली. निर्मला त्याच्याकडे टक लावून सारखी बघत होती मग एखाद्या परीक्षकाचा आव आणून आप्पासाहेब म्हणाले "नाही ओळखलस ? अग नागपूरला आपण राहात होतों ना ? त्या वेळीं आपल्या शेजारचे आबासाहेब गाखले तुला आठवत असतील ! त्याचा हा मुलगा !"

"म्हणजे अरविदा कां हा ?"

आणि आप्पासाहेबानीं मान हालवताच रमाबाई म्हणाल्या "किती मोठा झाला आहे ! मी बाई मुळींच ओळखला नाहीं ! किती लहानपणीं बघितला होता ! हा इथे काय करतो ?"

"गतवर्षींच बी. कॉम्. झाला आहे. आणि आपल्या गिरणीत ॲसिस्टंट मॅनेजरची जागा मोकळी आहे ना ? त्या जागेसाठीं यानें अर्ज केला आहे. म्हणून तर आज भेटीला आला आहे"

आतांपर्यंत चाललेल्या प्रकारावरून निर्मलेला काहींच बोध होईना तिच्या तोंडावर कुतूहल दिसत होतें. ही गोष्ट जेव्हां आप्पासाहेबांच्या लक्षांत आली तेव्हा ते निर्मलेला म्हणाले "अग हा तुझा बालपणचा स्नेही आहे. तुझ्या लहानपणीं आपण जेव्हा नागपूरला होतों तेव्हां तुझी आणि याची फार गट्टी जमायची ! काय त्या वेळच्या एक एक गंमती ! आठवण झाली कीं अंतःकरण कस भरून येतं. याच्या आईचं तुझ्यावर भारी प्रेम ! मोठी माऊली होती !" आणि अरविंदाकडे वळून लगेच ते म्हणाले "तुझी आई नागपूरलाच असेल नाहीं ?

"छे ! आई मागेच वारली !"

"काय ? मला नव्हतं माहीत. अरेरे ! ती आज असती तर......" एवढें बोलून आप्पासाहेब गभीर झाले. त्याना पुढें काय बोलायचें होतें हें त्याच्या गंभीर झालेल्या मुद्रेवरून कोणालाहि ताडता येणें शक्य नव्हतें.

अखेर अरविंदाला निरोप देण्यासाठीं सर्व मंडळी जेव्हा उभी राहिली तेव्हा आप्पासाहेब म्हणाले "अरविंद, उद्या सकाळीं सात वाजता इकडे या मी तुम्हाला नोकरीचें नक्की सांगतों बाकी आता तसा कांहींच प्रश्न नाहीं. फक्त केव्हा रुजू व्हायचं हेंच सांगणार"

पण या बोलण्याकडे अरविंदाचें अर्धवटच लक्ष होतें. त्याचे कान जरी त्याच्या बोलण्याकडे होते तरी त्याचे डोळे मात्र आप्पासाहेबांच्या मागें उभ्या असलेल्या निर्मलेकडे लागले होते. अखेर स्मित मुखानें त्यानें त्या सर्वांचा निरोप जरी घेतला तरी बराच वेळ निर्मलेची मूर्ती त्याच्या डोळ्यापुढून हालली नाहीं.

तेव्हा आपल्याला नोकरी मिळणार याविषयीं त्याला मुळीच शंका वाटत नव्हती. पण ती नोकरी एकदम मान्य करून त्या नोकरीवर रुजू व्हावयाचें किंवा नाहीं याविषयी मात्र त्याच्या मनात विचाराचा एकसारखा गोंधळ माजला होता. मजुराच्या चळवळीला सर्वस्वी वाहून घेण्याच्या एकाच ध्येयानें तो मुंबईला आला होता. आणि योगायोग पहा कीं मजुराच्या सेवेसाठीं मुंबईला आलेला अरविंद नोकरीवर रुजू होऊन त्या मजुरानाच उलट आपली सेवा करण्यास लावणार होता. त्याला वाटलें सकाळीं जाऊन आप्पासाहेबांना सरळ सांगावें की "माफ करा. मला नोकरी करता येणार नाहीं." पण हें उत्तर मनापुढें आणताच दुसरीकडून आपल्याला कोणीतरी एक दिव्य शक्ति त्या नोकरीवर रुजूं होण्यास भाग पाडीत आहे असा त्याला सारखा भास होई. मजुराच्या गिरणींत नोकरी करायची किंवा नाहीं या एकाच प्रश्नाविषयीं त्याचें मन रात्रभर सारखा विचार करीत होतें. अखेर त्यानें ठरविलें कीं काहीं झालें तरी या नोकरीवर रुजूं होण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं. मजुरांची परिस्थिति सुधारायची म्हणजे ती परिस्थिति नीट समजावून घ्यायला पाहिजे. आणि ही परिस्थिति आपल्याला जितकी जवळून अवलोकन करतां येईल तितकी त्या परिस्थितीवर योग्य तोड आपल्याला काढतां येईल. तेव्हां

मजुरांच्या गिरणींत नोकरी पत्करून त्यांची स्थिति नीट समजावून घेणें हेंच आपलें खरें काम आहे स्वतःच्या अगदीं तत्त्वाविरुद्ध एखादी गोष्ट करायची मनुष्यावर पाळी आली म्हणजे मनुष्य अशाच प्रकारें आपल्या मनाचें लगडें समाधान करून घेत असतो अरविंदानें त्याच-प्रमाणें आपल्या मनाचें समाधान करून घेतलें आणि गिरणींत नोकरी करण्याचा अखेर निर्णय जेव्हां त्याच्या मनानें कायम केला तेव्हां कधीं एकदां सात वाजतील व आपण त्यांना आपला निर्णय कळवू असें त्याला होऊन गेलें. पहाटे चार वाजेपासून अनेक वेळा त्यानें घड्याळाकडे बघितलें आणि त्याला निष्कारणच वाटलें कीं आपलें टेबलावरचें घड्याळ मद गतीनें चालत आहे मग त्यानें आपल्या उशाला ठेवलेलें रिस्टवॉच काढून बघितलें पण त्या दोन घड्याळांत एका मिनिटाचाहि फरक नव्हता अखेर शेजारच्या खोलींतील घड्याळांत जेव्हां साडेपांचचा ठोका पडला तेव्हा आपल्या घड्याळांत साडेपांचला अजून पाच सात मिनिटें अवकाश आहे याचा मुळींच विचार न करतां तो कॉटवरून उठला व जाण्याच्या तयारीला लागला. तोंड धुतल्यानतर अगांत कोट घालून नुकत्याच काढलेल्या परीट घडी धोतराचा त्यानें काचा मारला, व पुन्हा कगवा घेऊन कांहीं केंस जे उभे राहिले होते ते हात फिरवून त्यानें नीट बसविले. जाताना तो आपल्या पोऱ्याला म्हणाला "सदू, मी बाहेरून येतों "

सदू अजून जागेवरच उभा असलेला पाहून त्यानें विचारलें "काय रे? कांहीं बोलायचं आहे का?"

"नाहीं साहेब, म्हटलं चहा अगदीं थोड्या वेळांत झाला असता. मला उठायला थोडा उशीर झाला म्हणून वाटतं?"

यावर अरविंद मोठ्यांदा हंसून म्हणाला "अरे त्यांत काय आहे? एखादे वेळीं झोंप नाहीं आवरत. मी जातांना तांब्यांच्या 'कोना' मध्यें चहा घेऊन जाईन. बरं, आज जेवायला काय करणार आहेस? तुझा नेहमीचा कांदेबटाट्याचा रस्सा करशील?"

या बोलण्यानें सदूची वृत्ति पुन्हां कांहींशी उल्हसित झाली "साहेब बाहेरून लवकरच या, उत्तम बनवतों रस्सा!" असें म्हणून आपल्या पाकशास्त्रांतल्या नैपुण्याबद्दल मनांतल्या मनात अभिमान बाळगत सदू कामाला निघून गेला

सहा नबरची ट्रॅम जेव्हां दादर ट्रॅम नाक्यावर थांबली तेव्हां लगेच अरविंद खालीं उतरला रस्त्यावर फारशी रहदारी सुरू झाली नव्हती. त्यामुळें सकाळच्या शाततेचा काहींसा गोड अनुभव त्याला येत होता. त्या शांततेंत समोरच्या "मनोहर सगीत विद्यालयां"तून गाण्याचे मधुर स्वर प्रामुख्यानें ऐकू येत होते त्यानें मनगटावरच्या घड्याळांत बघितलें पावणेसात वाजले होते त्याला वाटलें पधरा मिनिटांत आपण सहज शिवाजी पार्कपर्यंत जाऊं म्हणून तो चालतच निघाला आणि गंमत ही कीं त्यानें जेव्हां आप्पासाहेबांच्या बगल्यांतील 'कॉलबेलचें' बटन दाबलें तेव्हां त्याच्या घड्याळांत बरोबर सात वाजले होते. दार उघडायला खुद्द निर्मला आलेली बघून त्याला तो शुभ शकूनच वाटला कालच्यापेक्षां त्याला ती अधिकच सुंदर दिसली कोणी तरी आपल्याकडे येणार आहे या हेतूनें तिनें आपली वेषभूषा नीटनेटकी केलेली आहे असें तिच्याकडे बघणाराला सहज वाटलें असतें त्या वेळीं अरविंदाच्याहि मनांत तोच विचार आला खरोखर केवळ आपण येणार म्हणून तिनें एवढी सुदर वेषभूषा केली आहे काय? हा विचार जेव्हां त्याच्या मनात आला तेव्हां त्याचें अंतःकरण अननुभूत अशा वृत्तींनीं भरून गेलें. तो कांहीं काळ तिच्याकडे नुसता बघत उभा राहिला मग निर्मलाच जेव्हां म्हणाली "या ना आंत!" तेव्हां तो जागचा हालला.

दिवाणखान्यांत बसल्यावर त्यानें आप्पासाहेब कोठे आहेत हें बघण्यासाठीं इकडे तिकडे शोधक नजर टाकली. निर्मलेनें त्याचा हेतु जाणून म्हटलें, "आप्पा काल रात्रींच त्यांच्या एका महत्त्वाच्या कामासाठीं बाहेर गेले ते अजून परत आलेच नाहींत. थोड्या वेळां

पूर्वीच त्यांचा फोन आला आहे कीं आठ वाजेपर्यंत मी येत आहे. अरविंदांना बसवून घ्या."

हें ऐकतांच अरविंद कांहींसा विचारांत पडला. एक तास बसून येथें काय करायचें हा विचार त्याच्या मनांत येतो न येतो तोंच निर्मला म्हणाली "आपण जरा बॅडमिंगटन् खेळूं या का?" दुसरें कांहींच गत्यतर नाहीं असें पाहून अरविंदानें होकारार्थी नुसती मान हालवली. निर्मला म्हणाली "चला मग काढा तर कोट! ही पहा मी रॅकेट देतेंच!

आणि तिनें दिलेली रॅकेट घेऊन मुकाट्यानें तो निर्मलेच्या मागोमाग कोर्टवर गेला.

थोड्याच वेळांत निर्मलेला कळून आलें कीं तो उत्तम खेळाडू आहे. कांहीं वेळानें ती म्हणाली "आपण आता मोजून खेळूं"

"माझी कांहीं हरकत नाहीं. पण मोजून खेळल म्हणजे खेळ मोकळेपणानें होत नाहीं."

इतक्यांत आतून रमाबाई बाहेर आल्या आणि म्हणाल्या, "नाहीं हो, तुम्ही किनई मोजूनच खेळा. आमच्या निमाताईला खेळण्याचा भारी गर्व आहे"

"इश्श्य आई, तुझ आपल कांहीं तरीच! मी कुठे ग गर्व करतें? आणि कुणापुढें गर्व करायचा हें मला कळतं."

यावर रमाबाई म्हणाल्या "अग मोजून खेळून तर बघ"

मग मार्क मोजून त्यांच्या खेळास प्रारंभ झाला. अरविंदाचे जेव्हां आठ झाले तेव्हां निर्मलेला अवघा एक मार्क मिळाला. नंतर अरविंदानें मुद्दाम वाईट खेळून तिला आणखी तीन मार्क दिले. तेव्हा निर्मला म्हणाली "मला मुद्दाम दिलेले मार्क नाहीं आवडत. नीट खेळा ना!"

तिच्या लक्षांत ती गोष्ट आलेली आहे हें बघून अरविंद हंसला. मग मात्र एकहि मार्क तिला न देतां त्यानें निर्मलेवर सरळ गेम दिली. दुसऱ्या गेमला ते सुरुवात करणार इतक्यांत बाहेरून कोणी तरी निर्मलेला हाक मारलेली ऐकूं आली.

" हॅलो निर्मला ! गुड मॉर्निंग ! मला जरा उशीर झाला. माफ कर " एक अत्यंत नीट नेटका सूट घातलेला तरुण आंत येताना अरविंदाला दिसला. निर्मला त्या तरुणाकडे बघून म्हणाली " Good morning ! Come in " ( " नमस्कार. आंत या ना ! " )

" छे, छे ! आम्ही नाहीं आंत येत. तुम्हींच बाहेर या " असें म्हणत तो तरुण आंत आला आणि निर्मलेकडे बघून म्हणाला " वा ! चागल टेनीस खेळायच सोडून देऊन हा काय बायकी खेळ सुरूं केलात ? बाहेर हवा कशी झकास पडली आहे टेनीस खेळायचं कबूल केल होतस ना ? "

त्याच्या बोलण्यावरून त्या तरुणाला उत्तम टेनीस खेळतां येत असेल अशी जर कोणी समजूत केली असती तर ती खचित चुकीची ठरली असती पण त्याचें हें बोलणें ऐकल्यानतर अरविंद म्हणाला " आतां आपण पुरे करूं. तुम्ही जा टेनीस खेळायला. आप्पासाहेब आत्तां येतीलच " असें म्हणून तो बाजूला सरकून उभा राहिला.

" बर, कांहीं हरकत नाहीं आपण आतां थोडा वेळ बसून इथेंच चहा घेउ " असें म्हणून निर्मलेनें वामनला हांक मारली. वामन आल्यावर ती म्हणाली " वामन आमचा सर्वांचा चहा इथेच आण लवकर बर का ! "

बॅडमिंगटन् कोर्टवर एका बाजूला ओळीनें ज्या खुर्च्या मांडलेल्या होत्या त्यांच्यासमोर एक छोटेसें चहाचें टेबल ठेवून वामननें त्याच्यावर चहाची किटली व कपबशा वगैरे सामान मांडून ठेवलें. चहा घेतांना निर्मला अरविंदाकडे बघन म्हणाली " यांची ओळख करून देतें. हे

विद्याधर भाटे. सीनीअर बी ए.ला आहेत मोठ्या जमीनदाराचे चिरंजीव आहेत.'' शेवटच्या वाक्यावर निर्मलेनें मुद्दाम जोर दिला नतर विद्याधराकडे वळून तिनें म्हटलें '' आणि हे अरविंद गोखले बी कॉम् आहेत याचे वडील नागपूरला मोठ वकील आहेत ''

नागपूरचे नांव ऐकताच विद्याधर काहींशा आश्चर्यानें उद्गारला '' नागपूरचे गोखले ! माझ्या वडिलांच्या चांगल्या माहितींतले आहेत ''

अरविंदानें सुद्धा नागपूरच्या भाटे घराण्याविषयी आपल्या वडिलांच्या तोंडून पुष्कळच माहिती ऐकली होती ती माहिती अर्थातच चांगली नव्हती प्रथमच जेव्हा त्यानें विद्याधरला बघितलें तेव्हा त्याच्याविषयीं अरविंदाचें थोडेसें प्रतिकूल मत झालें होतें आणि तो नागपूरच्या भाटे घराण्यांतला आहे हें कळल्यानंतर त्याच्या प्रतिकूल मतात अधिकच भर पडली.

त्या सर्वांचें चहापान सपतें न सपतें तोंच आप्पासाहेब घाईघाईनें आत शिरताना अरविंदाला दिसले त्यानें लगेच उठून त्या दोघाचा निरोप घेतला, व तो दिवाणखान्याकडे वळला जाता जातां निर्मला व विद्याधर याचा खालील सवाद त्याला ऐकू आला.

विद्याधर निर्मलेला आग्रह करीत होता '' निर्मला, चल मग टेनीसचा लवकर एक सेट मारूं. पुढें ऊन होईल.''

हात वर करून आपल्या शरिराला शक्य तितके आळोखे-पिळोखे देत निर्मला म्हणत होती '' नको बाई, मी फार दमले आहे. अरविंदानीं चांगला खेळ खेळून फार दमायला लावलं. मी नाहीं बाई येत आतां ! ''

'' निर्मला, तूं......''

पण लगेच आप्पासाहेबांनीं त्याच्याशीं बोलायला सुरवात केल्यामुळें त्यांच्या पुढील संभाषणाकडे लक्ष देणें त्याला अशक्य झालें. आप्पासाहेब म्हणाले '' मला फारच उशीर झाला. पण काम जरा

महत्त्वाचं होत मी फोनवरून तसा निरोप धाडला होता. कळला ना तुम्हांला ? ”

“ हो कळला ”

“ मग काय केलंत इतका वेळ ? ”

“ थोड बॅडमिंगटन् खेळलों ”

“ अरे वा ! तुम्हांला खेळतां येतं का ? ”

“ फार नाहीं थोडं येत ”

हें ऐकून निर्मला आत येतांना हंसत म्हणाली.

“ अप्पा थोड कसल चागलंच खेळतात हो हे ! ”

मग अरविंदाकडे बघून आप्पासाहेबानीं विचारलें

“ मग आमच्या निमाताईंचा गर्व हरण केलात का नाहीं ? ”

“ छे, छे ! त्या चागलं खेळतात ” अरविंदाचें हें बोलणें ऐकून निर्मला खूपच लाजली

विद्याधरहि एका खुर्चीवर येऊन बसला होता त्याच्या चेहऱ्यावरून तो बराच नाखुष झालेला दिसत होता त्याच्याकडे बघून आप्पासाहेबांनीं निर्मलेला विचारलें.

“ काय ग अरविंदाची नि याची ओळख करून दिलीस का ? ”

“ हो. मी कशी चुकेन ! ”

आप्पासाहेब तोंडावर मिष्किल हास्य आणून म्हणाले,

“ हो ! तेंहि खरच. अशी गोड ओळख करून द्यायला कोण बर चुकेल ? ”

“ हें हो काय आप्पा ! कांहीं तरीच बोलायचं ! ”

निर्मलेच्या या बोलण्यांत रुसव्यापेक्षां रुष्टताच अधिक होती पण विद्याधराला त्यामध्यें प्रणयिनीचा रुसवा दिसला व त्यामुळें त्याची वृत्ति कांहींशी आनंदित झाली नतर अप्पासाहेब विद्याधरला म्हणाले.

" माझं जरा अरविंदांशीं काम आहे तुम्ही दोघेजण इथेंच बसा. मी यांना घेऊन आंतल्या खोलींत जातों. "

विद्याधराला अर्थात् तें बरेंच वाटलें. निर्मलेशीं एकातांत बोलण्याचा मुद्दाम योग दिल्याबद्दल त्यानें आप्पासाहेबांच्या चातुर्याची मनांतल्या-मनांत तारीफच केली. पण नतर त्या दोघाच्यामध्यें जो काहीसा कलहपूर्ण सवाद झाला त्या संवादानें त्याच्या आनदावर विरजण पडलें.

" टेनीस नाहींतर बाहेर फिरायला तरी चल " असें विद्याधरानें म्हणतांच निर्मला म्हणाली " मला थोडा अभ्यास आहे. "

" अग ज्यूनिअर बी ए ला कसला अभ्यास ? ज्यूनिअर बी ए चें वर्ष म्हणजे स्वर्गसुखाचा काळ ! "

" पण मला पहिल्या खेपेला बी ए पास व्हायच आहे. " हें वाक्य निर्मला कोणत्या हेतूनें बोलली हें सागणें जरा कठीण आहे पण विद्याधर बी ए ला सहा वेळां नापास झाला असल्यामुळें त्याला हें वाक्य बरेंच झोंबलें किंबहुना निर्मलेनें आपल्याला लागण्यासाठींच मुद्दाम तें उच्चारलें आहे असें त्याला वाटलें यावर कांहीं तरी बोलायचें म्हणून तो म्हणाला "बी. ए. ला पाहिल्या प्रथम पास होण्यांत पुरुषार्थ आहे वाटत ? "

" मग कशात पुरुषार्थ आहे ? पुनः पुन्हा नापास होण्यात ? "

" तू माझ्याशीं मुद्दाम भांडण काढण्याचं ठरवलं आहेस का ? "

" इश्श्य, मी कशाला भांडण उकरून काढूं ? "

" मग......... "

तो पुढें कांहींतरी बोलणार इतक्यांत अप्पासाहेब व अरविंद या दोघांनीं दिवाणखान्यांत प्रवेश केला अप्पासाहेब निर्मलेला म्हणाले, " अग केवढ्या मोठ्यादा बोलत होतात ? भांडत होता वाटतं ? बाकी प्रेमकलहाशिवाय गंमत नाहीं ! " अप्पासाहेबांचें म्हणणें निर्मलेपेक्षां विद्याधरालाच जास्त पटलें. आतांपर्यंत निर्मलेनें आपल्याशीं केवळ प्रेमानेंच वाद घातला अशी त्याच्या मनाची समजूत होऊन त्याचा राग पार नाहींसा झाला मनुष्य एकदा प्रेमभावनेनें पछाडला गेला म्हणजे तो कोणत्या गोष्टीचे कोणते अर्थ काढील याचा कांहीं नियम नसतो परतु निर्मलेला मात्र अप्पासाहेबाचें बोलणें खचित आवडलें नाहीं ती रागावूनच म्हणाली " हें हो काय अप्पा ? मला नाहीं असल बोलण आवडत ! " आणि विषय बदलण्याच्या हेतूनें अरविंदाकडे स्मित मुद्रेनें बघून तिनें विचारलें " मग नोकरीवर रुजू होणार ना ? " हा प्रश्न विचारताना तिच्या मुद्रेवर इतकं मार्दव आलें होतें कीं थोड्या वेळापूर्वी रागावलेली निर्मला ती ही नव्हे असें तिच्याकडे बघणाराला खास वाटलें असतें तिच्या प्रश्नाला अरविंदानें उत्तर देण्यापूर्वीच अप्पासाहेब म्हणाले " अग रुजूं होणार म्हणजे काय अगदीं उद्यां रुजूं होणार

" असं का ? मग मला त्यांच अभिनंदन केलंच पाहिजे " मग अरविंदाकडे बघत ती म्हणाली " Hearty Congratulations in anticipation of your getting Service " ( " तुम्हांला नोकरी मिळाल्याबद्दल मी तुमचें मनपूर्वक अभिनंदन करतें. " )

अरविंदानें त्या अभिनदनाचा तितक्याच स्मित मुखानें स्वीकार करून म्हटलें. " Thanks ! " ( " मी तुमचा आभारी आहे " )

विद्याधरानेंहि वरवर अरविंदाचें अभिनंदन केलें नतर अप्पासाहेब निर्मलेला म्हणाले " निमाताई, आपण असलं नुसत कोरड अभिनंदन करीत नसतों. अभिनंदनार्थ आज रात्री मी याना छोटी मेजवानीच

देणार आहे. काय अरविंद, आमच्या अभिनंदनाचा स्वीकार करणार ना ?"

"वा ! असल्या गोड अभिनंदनाचा स्वीकार कोण-करणार नाहीं ?" या अरविंदाच्या बोलण्यावर सर्वच मडळी हसली मग आप्पासाहेबांनीं विद्याधराकडे वळून म्हटलें "विद्याधर, आपणहि यायच रात्रीं मेजवानीला" यावर त्यानें थोडासा विचार करून उत्तर दिलें "मला जमेलस दिसत नाहीं."

"का ? कुठे जायच आहे वाटत ?" असें आप्पासाहेबानीं विचारताच त्याला न येण्याचें कारणहि नीट सागता येईना किंबहुना न येण्याला त्याला कांहींच कारण नव्हतें पण त्याची मनातून इच्छा होती कीं आपल्या नकारावर निर्मलेनें आपल्याला खूप आग्रह करावा व मगच आपण आमत्रण स्वीकारावें पण आप्पासाहेब जेव्हां निर्मलेला म्हणाले कीं "बघ बुवा तू त्याच त्याना तुझ खास आमंत्रण हवं असेल" तेव्हा ती म्हणाली "त्यांना दुसरीकडे जायच असल तर त्याच्यामधें आपण उगाच कशाला या ? इच्छेविरुद्ध मनुष्याला आग्रह करूच नाहीं आपण आपल्याकडून आमत्रण दिल आपलं काम संपलं !" विद्याधराच्या मनातील इच्छा सफळ न झाल्यामुळें तो मनातून खूपच खट्टू झाला मग तो तेथें फारसा थांबला-देखील नाहीं. सर्वांचा औपचारिक निरोप घेतल्यानंतर त्यानें मोटारींत पाय टाकला व चिडून जोरानें मोटार सुरूं करून तो निघून गेला. अरविंदहि तेथें नंतर फारसा थाबला नाहीं "बरं येतो." म्हणून त्यानें आप्पासाहेब व निर्मला या दोघांचा निरोप घेतला. अप्पासाहेबांनीं ड्रायव्हरला हांक मारली व म्हटलें "शंकर, यांना तेवढं घरीं सोडून ये." शंकरनें "कुठें ?" असें विचारतांच आप्पासाहेबांनीं आश्चर्याचा उद्गार काढून अरविंदाला विचारलें. "अरविंद तुम्ही राहतां कुठे ?"

" गिरगांवांत हेमराज वाडीत!"

" मग रोज इकडे कसे येणार?" मग थोडा वेळ विचार करून ते म्हणाले "असं करा कीं, आमच्या तिसऱ्या मजल्यावरची बरीच जागा रिकामी आहे. तिथेच राहायला या तुला कस वाटतं निमाताई?" यावर निर्मलेनें समती दर्शक नुसती मान हालवली

" पाहूं कस जमतं ते!" असें म्हणून अरविंद जेव्हां मोटारींत बसला तेव्हा रात्रींच्या मेजवानीला न चुकतां येण्याबद्दल त्याला बजावण्यास आप्पासाहेब चुकले नाहींत मोटार निघतांना निर्मलेनें असें काहीं गोड हास्य केलें कीं त्या हास्यात "तुम्ही रात्रीं आलंच पाहिजे बर का?" असा लडिवाळ आग्रह भरलेला अरविंदाला सहज दिसला. व मग मोटार हालली तरी बराच वेळ निर्मलेची ती हास्ययुक्त मूर्ती त्याच्या नजरेसमोरून हालली नाही. काल सध्या-काळींसुद्धा त्याची हीच स्थिती झाली होती प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यात असा एक काल येतो कीं त्यावेळीं त्याला वाटतें कीं आपलें सुख अमुक एका व्यक्तीवर अवलंबून आहे अरविंदानें या दोन दिवसात आपल्या भावी आयुष्याविषयीं खूपच विचार केला आणि त्यालासुद्धा वाटू लागलें होतें कीं निर्मला या एका व्यक्तीवर आपलें सुख अवलंबून आहे. आतांसुद्धां मोटारींत बसल्यानतर तोच विचार त्याच्या मनांत आला. पण लगेच विद्याधराची मूर्ती त्याच्या डोळ्या समोर उभी राहिली आणि तो मनात म्हणाला कीं आपण वेड्या आशे-वरच आपल्या भावी सुखाचे मनोरे बाधीत आहोत मग लगेच त्यानें मनाशीं निर्धार केला कीं निर्मलेविषयीं आपण यापुढें काहींच विचार करतां कामा नये ती विद्याधराची वाग्दत्त वधू आहे! बस्स ठरलें! पण विचार सोडूं म्हणून तो सुटत नसतो किंबहुना मनुष्य जेव्हां जेव्हां म्हणतो कीं अमका विचार मी सोडला आहे तेव्हां तेव्हा मनांतून तो त्या विचाराला अधिकच बिलगत असतो. याशिवाय अरविंदानें ड्रायव्हरला विद्याधराविषयीं माहिती असूनाहि जणूं कांहींच

माहीती नाहीं असा आव आणून असा प्रश्न खास विचारला नसता कीं "कायरे, हे विद्याधर कोण आहेत?"

यावर आश्चर्य दाखवून शंकर म्हणाला "माहीत नाहीं साहेब? अहो ते एका मोठ्या जमीनदाराचे चिरंजीव आहेत ताईसाहेबांशीं त्यांचं लग्न व्हायच आहे"

अरविंदानें यावर वरवर बेफिकीरीनें म्हटलें "असं कां?"

"हो तर. साहेबांच्या नाहीं फारसं मनांत पण बाईसाहेबांचाच फार आग्रह चाललाय" आणि सांगू का नको असा कांहींसा विचार करून शंकर पुढें म्हणाला

"साहेब बाईसाहेबांच्या अगदीं मुठींत आहेत. आणि बाई-साहेबांचा सर्व डोळा आहे पैशावर!"

हें ऐकून शंकरला सशय येणार नाहीं इतक्या बेतानें अरविंदानें विचारलें "पण ताईसाहेबांच्या मनांत काय आहे रे?"

"अलीकडे तर त्या त्याच्याशीं नीट वागतच नाहीत. नेहमीं भांडणं होतात दोघांची! मग बाईसाहेब त्यांच्यावर खूप रागावतात अहो, बाईसाहेब तर त्यांना मॅनेजरच करून द्या म्हणत होत्या. पण बरं झाल साहेबांनीं ऐकल नाहीं तें! सबध वाटोळं झाल असतं गिरणीचं. त्याला आहे बाटलीच व्यसन कुणाचं चांगलं झालं आहे असलं व्यसन ठेवून?"

बराच वेळ त्याची एकसारखी असली बडबड चालू होती. मोटार अतिशय भरवेगानें धांवत होती. अरविंदाला वाटलें कीं एक वेळ या मोटारला ब्रेक लावणें शक्य आहे. पण त्याच्या बोलण्याला ब्रेक लावणें मोठें कठीण काम आहे.

मोटार "बाळाराम स्ट्रीट" वर वळतांच मोटारला एकदम ब्रेक लावून शंकर ओरडला "हरामखोर! मरायचें कां?" एक वर्तमान-

पत्रें विकणारा पोऱ्या अगदी मोटार नजिक उभा होता. अरविंदाच्या कानावर त्या पोऱ्यानें ओरडलेले शब्द मागेच पडले होते.

" अपघात ! मोठा अपघात !! विमानाचा भयंकर अपघात ! " पण स्वतःच तो पोऱ्या मोटारीच्या अपघातांत सापडत होता. संकट टळल्यानतर समाधानाचा उसासा टाकून अरविंद त्या पोऱ्याला म्हणाला " आता बघू तुझा तो विमानाचा अपघात ! "

कोणतेहि संकट टळल्यानतर त्यावर विनोद करण्याचा मनुष्याचा उपजतच स्वभाव आहे कीं काय कोणास ठाऊक !

त्या पोऱ्यानें हातातील वर्तमान पत्रांतून एक पत्र काढून अरविंदाच्या हातात दिलें अरविंदानें त्याच्या हातावर एक अधेली ठेवली बाकीचे पैसे तो पोऱ्या जेव्हा परत द्यायला लागला तेव्हा अरविंद म्हणाला "जा. ठेवून दे तुझ्याजवळ तुझा अपघात टळला म्हणून तुला बक्षीस!" अरविंदाकडे मोठ्या कृतज्ञतेनें बघत तो पोऱ्या आनदानें ओरडत निघून गेला. आणि मोटार सुरू झाली त्या वर्तमानपत्राच्या वरच्याच पानावर मोठ्या मथळ्यांत छापलें होतें " **भयंकर वैमानिक अपघात ! विजय मराठे यांची प्राणसंकटांतून सुटका !!** " आणि त्या मथळ्याखाली खालील मजकूर लिहिला होता

" काल टाटा कंपनीच्या बडोदा लाईनवर विमान चालवीत असतांना विजय मराठे यांच्या विमानाला मोठा अपघात झाला. त्यांचें विमान वरून तळावर उतरत असता इंजिन बिघडून बंद पडलें, व खालीं कोसळलें या अपघातानें त्यांचें कंबरेखालचें सर्व शरीर निकामी होऊन गेलें आहे. त्यांत दुःखाची गोष्ट ही कीं नुकतेच गेल्या-वर्षी त्यांचें लग्न झालेलें आहे. त्यामुळें कौटुंबिक दृष्ट्या या अपघातानें झालेल्या दुःखास सीमाच नाहीं. त्यांत महाराष्ट्र अशभागी आहेच. खरोखर आता यापुढें मृतवत् आयुष्य कंठणें त्यांच्या कपाळीं आलें आहे. हिंदुस्थानांतील भावी वैमानिक वर्चस्वासाठीं हिंदुस्थानानें सुर-

वातीस पायांत दिलेले हे बळीच होत, अशी यथार्थ व्यापक राष्ट्रीय कल्पना करूनच त्यांच्या कुटुंबियांनीं धैर्यानें व अभिमानानें प्राप्त झालेल्या घोर प्रसंगास तोंड दिलें पाहिजे."

या मजकुरावर अरविंदाची दृष्टि देखील नीट ठरना.

ठाकुरद्वार रोडला जेव्हा मोटार वळली तेव्हां शंकरनें विचारलें "साहेब, हेमराजवाडी म्हणजे करेलवाडीच्या पलीकडे ना?"

त्या प्रश्नावर त्यानें नुसतें "हं" म्हटलें.

आणि मोटार जेव्हा हेमराजवाडीच्या तोंडाशीं थांबली तेव्हां त्याला खालीं उतरायचें देखील भान राहिलें नाहीं शंकरनें दार उघडून "साहेब, हेंच ना ठिकाण?" असें म्हटलें तेव्हा तो काहींसा भानावर आला, व खाली उतरला

खोलीत जाऊन कॉटवर बराच वेळ तो पडून राहिला सदूनें जवळ येऊन "चहा पाहिजे का?" असें विचारताच तो फक्त एवढेंच म्हणाला "सदू मला चहा तर नकोच आहे पण मी दुपारीं जेवणार देखील नाहीं." यावर सदू काहींतरी नक्की बोलला असता पण लगेच त्याला मघाशीं आलेल्या तारेची आठवण झाली व तो म्हणाला "तुम्ही गेल्यावर एक तार आली आहे" असें म्हणून टेबलावरची तार त्यानें अरविंदाच्या हातात दिली नी लगेच त्यानें फोडली. तारेंत तोच मजकूर होता.

"Vijay Serious Start immediately" Umabai.

("विजय अत्यवस्थ आहे. तावडतोब निघून ये" उमाबाई)

लगेच त्यानें सदूला सांगितलें "दुपारीं माझी जाण्याची तयारी कर. मला पुण्याला जायचं आहे."

दुपारीं जाण्याच्या आधीं तो आप्पासाहेबांची परवानगी विचारण्यास त्यांच्या बंगल्यावर गेला असतांना त्यांची वामकुक्षी नुकतीच संपली

होती आप्पासाहेबांनीं त्याला जाण्याची परवानगी तर दिलीच, पण ते पुनः पुन्हा सारखे म्हणत होते "अरविंद, तुमच्या विजयला परमेश्वर कृपेनें लवकर आराम पडो !"

ते दोघेजण आतल्या खोलींत बसले असतांना निर्मला काही कामासाठी त्या खोलीत आली व अरविंदाकडे बघून आश्चर्यानें उद्गारली "तुम्ही यावेळीं इथे कसे ? मेजवानी रात्री आहे ना कां !"

पण तिचें वाक्य संपतें न संपतें तोच आप्पासाहेब म्हणाले "निमाताई, त्याच्यावर एक मोठं संकट आलं आहे त्याचे मावसभाऊ विजय मराठे हे विमान अपघातात सांपडून त्यांचं अर्धशरीर निकामी झालं आहे "

अंगावर शहारे आल्याप्रमाणें करून निर्मला म्हणाली "आई ग ! आता ? केवढं संकट हें देवा !"

आणि तो बंगल्याच्या बाहेर जेव्हा पडला तेव्हां आप्पासाहेब व निर्मला त्याला पुनः पुन्हा एकसारखी म्हणत होती "अरविंद, ईशकृपेनें त्यांना ताबडतोब बरं वाटेलच नंतर तुम्ही लवकर इथे या"

यावर अरविंद वरकांती 'हो" म्हणत होता खरा पण मनातून मात्र तो पुटपुटत होता "आतां लवकर परत येतो कीं कायमचा तिकडे जातो कुणास ठाऊक !"

---

# प्रकरण ३

---

एखाद्या कुटुंबावर एकदां संकट परंपरा सुरू झाली म्हणजे ती कांहीं केल्या संपत नाहीं अशावेळीं मनुष्य एका संकटाला तोंड देण्याची तयारी करतो न करतो तोच दुसरें संकट त्याच्यापुढें दत्त म्हणून उभे

राहातें विजय विमान अपघातांत सापडल्यापासून त्या कुटुंबातील मंडळींची याचप्रमाणें केविलवाणी स्थिती झाली होती तो पहिल्या-प्रथम ज्या दिवशीं घरीं आला तेव्हां चार मंडळींनीं त्याला मोटारींतून उचलून बंगल्यात आणलें त्याची ती अवस्था पाहून नीलेला तर मूर्च्छाच आली उमाबाईनाहि परमावधीचें दुःख झालें पण विज-यचे वडील वारल्यापासून त्यांच्या घरांत कर्ती अशी तीच स्त्री होती. आणि कुटुंबांतील कर्त्या माणसानें कसल्याहि प्रसंगी दुःख जरा आवरतें घ्यावें लागतें म्हणूनं उमाबाई आपल्या दुःखात फारशा निमग्न झाल्या नाहींत. उलट त्याहिस्थितींत कां होईना पण आपला मुलगा आप-ल्याला निदान जिवत परत मिळाला याबद्दल त्या माउलीनें देवाला हजारो धन्यवादच दिले; आणि त्या दुःखाला तोंड देण्यासाठीं त्यांनीं आपलें मन घट्ट केलें. पण या प्रसंगानंतर नक्की आठच दिवसांनी असा एक प्रसंग घडला कीं त्या प्रसंगानें उमाबाईंना सारखें वाटू लागलें कीं आणखी कोण कोणती संकटें आपल्या कुटुंबावर कोसळतात कोण जाणें!

त्या दिवशीं दुपार पासूनच विजयच्या मनात विलक्षण चलबिचल सुरू झाली होती · तो एकाच जागेला खिळून असल्यामुळें त्याचें जेवणहि तो त्याच्याच खोलींत घेत असें. नीलेनें दुपारीं त्याच्या जेवणाची तयारी खोलींत केली. पण त्याला जेवण कांहीं केल्या जाईना. तिनें तसें विचारतांच तो म्हणाला "माझ्या तोंडाला चवच नाहीं!"

"पण भाताबरोबर थोडं सार खाऊन बघाना? त्यानें थोडी चव येईल तोंडाला."

"नको. मला इच्छाच नाहीं" असें म्हणून त्यानें आपलें ताट बाजूला सारलें. नीलेनें दोन घांस खाण्याविषयीं त्याची खूप विनवणी केली. पण शेवटीं तिचा नाईलाज झाला. त्याचें ताट घेऊन ती बाहेर जात असतांना विजय तिला म्हणाला "नीले, ताट ठेवून परत ये. मला तुझ्याशीं खूप बोलायचं आहे."

" आलेंच हं ! " असें म्हणून ती ताट घेऊन बाहेर निघून गेली. नीला खोलींत परत आली तरी विजयला काय बोलावें हें कांहीं केल्या सुचेना त्याच्याकडे बघून नीलेनें म्हटलें, " बोला ना काय तें " ?

" मला कांहींच सुचत नाहीं ! " एक दीर्घ सुस्कारा टाकून त्यानें खिडकीच्या बाहेर आपली नजर लावली. त्याच्या डोळ्याच्या कडा जरा ओलसर झाल्या होत्या नीलेलाहि काय बोलावें हें सुचेना. तिनें त्याच्या अंगावरून प्रेमभरानें फक्त हात फिरवला विजयनें नीलेचा तोच हात आपल्या हातात घेऊन म्हटलें, " नीले, तुला दुःख देण्यासाठींच मी जन्माला आलों आहें ! "

" अस काय बर बोलावं ? मला कसल दुःख आहे ? "

" पण माझ्या मनात येत...... " इतके बोलून तो थांबला. नीलेनें प्रश्नार्थक् मुद्रेनें त्याच्याकडे बघितलें. तो तिला म्हणणार होता " नीले, आपल्याला एक मुलगा होऊन नतर माझी ही अवस्था झाली असती तर फार बर झाल असतं " पण त्या ऐवजीं तो बोलला मात्र अगदीं निराळें ! तो म्हणाला

" नीले, तुझ माझ्यावरचं पूर्वीचें प्रेम आतां कायम राहील का ? "

" अस कसं तुमच्या मनात येत ? माझ तुमच्यावरच प्रेम कधींच कमी होणार नाहीं. " नीला त्याच्या म्हणण्यावर असें जरी बोलली तरी मघाशीं विजयच्या मनात आलेला अपत्याविषयींचा विचार तिच्याहि मनांत त्यावेळीं आल्याशिवाय राहिला नाहीं. कधीं कधीं अगदीं प्रिय व्यक्तींमधले विचार एकमेकांशीं अगदीं सलग्न होतात असा अनुभव आपल्याला नेहमीं येतो कारण आतां हेंच पहाना कीं विजयच्या विचाराशीं नीलेचा विचार अगदीं ततोतंत जुळला. अपत्य-प्राप्ती शिवाय स्त्रीचें आयुष्य व्यर्थ आहे हें विजय पूर्णपणें जाणून होता व म्हणूनच तो नीलेच्या प्रेमाविषयीं मनांत साशंक झाला होता. कारण ज्या पतीकडून पत्नीच्या अपत्य-

विषयक आकांक्षा पुऱ्या केल्या जाणार नाहींत त्या पतीविषयीं पत्नीचें प्रेम कितपत टिकाव धरू शकेल याची कल्पना त्याला करतां येईना मग नीलच्या बोलण्यावर तो अगदीं स्तब्ध राहिला. नीलाहि पुढें बराच वेळ गप्प होती. एखादें अनपेक्षित दारुण दुःख माणसावर कोसळलें व त्यावर उपाय करणें मनुष्याच्या शक्तीबाहेरचें असलें म्हणजे त्या माणसाची जी मोठी चमत्कारिक स्थिति होते त्याच स्थितीचा अनुभव सध्या नीला व विजय या दोघांना एकसारखा येत होता वास्तविक तिच्याशीं पुष्कळ बोलण्याच्या उद्देशानें त्यानें तिला खोलींत बोलाविलें होतें पण तो तिच्याशीं फारच थोडावेळ बोलूं शकला. नतर नीला बाहेर उठून गेली व तो अस्वस्थ अशा मनानें पडून राहिला.

खरोखर विजयचें मन आनंदित राहावें म्हणून प्रत्येकजण आपापल्या-कडून आटोकाट प्रयत्न करीत होता त्याला गाण्याचा भारी शोक म्हणून त्याच्यासाठीं मुद्दाम एक भारीपैकीं रेडिओ खरेदी करून तो त्याच्याच खोलींत ठेवला होता उमाबाईंना आंतून कितीहि दुःख होत असलें तरी वरवर त्या आनंदाचें नाटक करीत. आणि हें नाटक करताना क्वचितप्रसगीं त्याना दुःखाचा उमाळा इतका असह्य होई कीं कोठेंतरी एकांतांत जाऊन त्याना त्या दुःखाला मोकळी वाट करून द्यावी लागत असे पतिनिधनाच्या दारुण दुःखाचा विसर त्याना पडतो न पडतो तोंच त्यांच्यापुढें हें नवें दुःख निर्माण झालें होतें. आणि विजयच्या त्या अवस्थेमुळें आपल्या लाडक्या-सुनेची जी केविल-वाणी स्थिति झाली होती ती पाहून तर त्यांचें अंतःकरण नेहमीं पिळवटून येत होतें. पण या सर्व दुःखाला बांध घालणें हें आपलें खरें कर्तव्य आहे हें त्या पूर्णपणें जाणून होत्या. आपणां सर्वांना दुःख होत आहे हें विजयला दिसून येतां कामा नंय म्हणून घरांत शक्य तितकें आनंदी वातावरण निर्माण करण्याकडे त्यांचें सर्व लक्ष असे. त्या विजयला त्याच्याजवळ बसून कधीं गंमतीच्या गोष्टी

सांगत. तर कधीं रेडिओ लावून त्याची गाण्याची हौस भागवीत. आणि ज्यावेळीं रेडिओ बद असेल त्यावेळीं फोनोवर त्याच्या आवडत्या रेकार्डस् लावून त्याचें मन आनंदी राखीत.

त्यादिवशीं रात्रीं रेडिओवर कोणाचेंतरी गायन होतें अरविंदानें नऊ वाजतां मुंबई स्टेशन लावलें पहिली ठुमरी झाल्यानंतर " अपत्याविना स्त्रीजीवन नाहीं पूर्ण " हें दुसरें मराठी पद सुरू झालें. रेडिओ बंद करण्यास सागून विजय म्हणाला, " मला जरा स्वस्थ पडू दे डोकं दुखतय माझ ! "

सर्व मडळींनीं काय तें ताडलें. पण कोणीच कांहीं बोललें नाही. नीला व अरविद उठून बाहेर आलीं उमाबाई तेथेंच त्याच्याजवळ बसून राहिल्या

दहा वाजेपर्यंत तो स्वस्थ पडून राहिला रात्री त्याच्याजवळ फक्त उमाबाईच असत दहाच्या सुमारास तो उमाबाईंना म्हणाला, " आई, मला झोंपच येत नाहीं ग. "

" विजू, डोकं शांत ठेवून झोप म्हणजे येईल झोप माणसांनीं सारखा विचार करून डोक्याला नसता त्रास करून घेऊ नये "

" कुठे विचार करतोंय मी ? पण झोपच येत नाहीं मला झोपेची गोळी देतेस ? चांगल्या दोन दे."

" छे ! गोळी एकच घ्यायची ! जास्त गोळ्या घेतल्या तर जिवाला धोका होण्याचा सभव असतो अस दुपारीं डॉक्टरनीं नाहीं का सांगितल ? "

" बरं, एकच दे."

उमाबाईनें मग त्याला एक गोळी दिली, नंतर त्या म्हणाल्या, " अगदीं स्वस्थ पडून राहा पाहू ! आत्तां लागेल झोप ! "

अर्ध्या तासानें त्याला झोप लागलेली पाहून उमाबाई स्वतःहि

झोपल्या. पण खरोखर विजयला झोप लागलेली नव्हती. किंबहुना झोप घेणें हें त्याच्या शक्तीबाहेरचें काम होतें. त्याच्या मनानें पक्कें घेतलें होतें कीं आता आपलें आयुष्य संपलें ! अशा स्थितींत जगात राहून आपल्यावर अवलंबून असलेल्या माणसाना आपण विनाकारण त्रास देणें हें आपल्याला मुळींच उचित होणार नाही. यापेक्षा आपण आपल्या आयुष्याचा शेवट करून घेणेंच इष्ट आहे. आपल्या लोकाना त्यामुळें काहींकाळ दुःख होईल, ही गोष्ट खरी पण त्यामुळें नीलेचा तरी मार्ग मोकळा होईल. अपत्याशिवाय तिच्या आयुष्यात केव्हाहि आनंद निर्माण होणें शक्य नाही त्याला स्वतःचे हे विचार पूर्णपणें पटले, व मग उमाबाईचा डोळा लागलेला आहे असें बघून त्यानें आपल्या उशालगत असलेली गोळयाची बाटली घेतली व त्यामधून बऱ्याच गोळया काढून हातात घेतल्या पण काय योगायोग पहा ! त्याचवेळीं उमाबाईना काहींतरी वाईट स्वप्न पडून त्या दचकून जाग्या झाल्या व त्यानीं विजयकडे बघितलें. त्याच्या हातात काहीतरी आहे असें बघून त्या ओरडल्या, "विजय, काय आहे हातात ?"

"आई झोप येत नाहीं म्हणून आणखी गोळया घेतों"

उमाबाईना त्याच्या गांगरलेल्या चेहऱ्यावरून त्याचें म्हणणें अर्थात् खरें वाटलें नाहीं. त्या काकुळतीनें म्हणाल्या, "विजय आम्हाला सोडून जाण्याचा विचार आहे काय तुझा ? तुला आमचा कंटाळा आला ?"

विजयला पुढें लपवाछपवी करणें शक्य नव्हतें उमाबाईनें आपला हेतू पूर्णपणें ओळखला आहे याची त्याला खात्री पटली. मग तो म्हणाला, "आई, मला नाहीं तुमचा कंटाळा आला. तुम्हाला मांझा येईल. म्हणून......" पण त्याचें वाक्य पुरें होण्याच्या आधींच उमाबाई म्हणाल्या, "विजू, आईला मुलाचा कधी कंटाळा येत असतो ?"

'आई, तुला नाहीं ! पण नीलेला ! आणि तिला तरी माझा

कंटाळा कां येऊं नये ? पती या दृष्टीनें आतां तिच्या कोणत्या आकांक्षा मी पुऱ्या करू शकणार आहें ? मी आतां असून नसून सारखाच आहें !"

"तस नाहीं रे ! तिच तुझ्यावर किती प्रेम आहे म्हणून सांगू ?"

"म्हणून तर मला अशा स्थितींत जाऊ दे!" नंतर उमाबाई काकुळतीनें म्हणाल्या, "विजय, प्रिय माणसाला सोडून जायचं असत का ?"

"होय, आई ! तिच माझ्यावर उत्कट प्रेम असतांना मी तिला सोडून गेलों म्हणजे मला अत्यत सुख लाभेल. पण तिच माझ्यावरचं प्रेम जर का नाहींस झाल म्हणजे जिवतपणींच मला मरणप्राय दुःख होईल आई! मनुष्य कोणत्यातरी एका भावनेवर जगतो आणि त्या भावनेला जर का एकदां धक्का बसला तर त्याचें आयुष्यच संपनं ! आई, मला घेऊ दे ना तुमचा निरोप ! त्यातच मला खरा आनंद लाभेल."

उमाबाईना यापुढें आपला हुंदका आवरून धरणं अगदीं अशक्य झालें आतांपर्यंत दुःख आवरून धरण्याचा त्यांचा प्रयत्न एकाएकीं विफळ झाला आणि बुद्धिःपुरस्सर बांध घातलेलें दुःख तो बाध फोडून एकदम बाहेर पडलें बराच वेळ त्यांना कांहींच बोलतां येईना. विजयचें म्हणणें तर्काच्या कसोटीवर घातलें असतांना त्यामध्यें त्यांना कांहींच दोष दिसेना. पण भावनेचे व्यवहार तर्कानें कधींच सुटत नसतात जगात कोणतीहि माता आपल्या पुत्राला मरणाची परवानगी देणें कधींच शक्य नाहीं. उमाबाई बराच वेळ गप्प बसून एकदम म्हणाल्या, "विजय, मी नाहीं तुला सोडणार आणि तूंहि मला सोडू नकोस !" मग क्षणभर विचार करून विजय म्हणाला,

"पण मग मला एक वचन देशील का?" उमाबाई चटकन म्हणाल्या, "कोणत वचन देऊं बाळ ? बोल. माग वचन."

"तू जवळ ये. सांगतों तुला." मग उमाबाई त्याच्या अगदीं जवळ

गेल्या. विजयनें आपलें तोंड त्याच्या अगदीं कानाजवळ नेऊन त्यांना कानांत कांहींतरी सांगितलें. तें ऐकून उमाबाई एकदम ओरडल्या, "विजय, कसलं रे भयंकर वचन मागतो आहेस?"

"आई, हें वचन दिलं नाहींस तर......"

पण लगेच त्याच्या तोंडावर हात ठेवून उमाबाई म्हणाल्या, "नको-ना रे पुढें बोलूस! देतें मी तुला तें वचन पण—पण·तें दिल्यावर तरी तू मला सोडून जाणार नाहींस ना?"

विजयनें नकारार्थी मान हालवली. नतर उमाबाईनें त्याचें डोकें आपल्या मांडीवर घेऊन त्याला बराचवेळ थोपटलें थोड्याच वेळात त्याला शात झोप लागली. मग त्याचें डोकें नीट उशीवर ठेवून उमाबाई बाहेर गॅलरींत आल्या. बाहेर हवेंत थोडासा गारवा आलेला होता त्यामुळें त्यांना थोडीशी हुषारी वाटली चद्र अगदीं मावळण्या-च्या बेतात होता. त्याचा मद प्रकाश सबंध लॉ कॉलेजच्या टेंकडीवर पसरला होता खरोखर त्या मावळत्या चंद्राचें तें रमणीय दृश्य पाहून कोणाचेंही मन आनंदानें नुसतें फुलून गेलें असतें. पण तें दृश्य बघून उमाबाईच्या मनाला यत्किंचितहि आनंद वाटला नाहीं विजयला दिलेल्या विचित्र वचनाची त्यांना अत्यत रुखरुख लागून राहिली होती एकीकडून त्यांना तें वचन विचित्र जरी वाटत होतें तरी तें दिल्या-शिवाय आपल्याला गत्यंतर नव्हतें याची त्याना खात्री पटली आणि मग जणूकाय त्या मावळत्या चंद्रालाच उद्देशून त्या म्हणाल्या, "किती विचित्र वचन दिलं मी? कोणत्यातरी मातेनें आपल्या पुत्राला असलं भयंकर वचन दिलं असेल काय?"

उमाबाईनें दिलेलें वचन खरोखरच विचित्र होतें आणि त्यांनीं म्हटल्याप्रमाणें जगांत कोणत्याहि मातेनें आपल्या पुत्राला असलें भयंकर वचन देणें शक्य नव्हतें. माता आपल्या पुत्रासाठीं केवढा अपूर्व त्याग करूं शकतें याचें तें उत्तम प्रत्यतर ठरलें असतें. आणि

त्यावेळीं उमाबाईनें केलेल्या त्या त्यागाचें तेज असह्य होऊनच कीं काय तो मावळता चंद्र लाजून तात्काळ दृष्टी आड झाला !

———

## प्रकरण ४

आज शनिवार असल्यामुळें दुपारीं दीड वाजता कॉलेज सुटून निर्मला निदान दोन वाजेपर्यंत तरी घरीं येईल असा विचार करून विद्याधर अप्पासाहेबांच्या घरीं आला परंतु बाहेरच रमाबाईनें ती अजून घरीं न आल्याचें सांगताच त्याला जरा आश्चर्यच वाटलें. कारण निर्मलेनें आज लवकर घरीं यायचें व नंतर दोघानीं मिळून दुपारच्या सिनेमाला जायचें असें त्याचें कालच ठरलें होतें अर्थात् निर्मलेनें या बेताला प्रथम आपली संमति दर्शविली नव्हती. नानाप्रकारचीं कारणें शोधून तिनें विद्याधरला नकार देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्यानें आपला हट्ट न सोडल्यामुळें अखेर या कार्यक्रमाला तिला नाइलाजानें आपली संमति द्यावी लागली होती. आढे वेढे घेऊन का होईना, पण निर्मलेनें अखेर आपलें म्हणणें कबूल केलें याबद्दल तो काल विशेष आनंदांत होता आणि अप्पासाहेबांच्या घरात प्रवेश करण्यापूर्वीसुद्धा तोच आनंद त्याच्या चर्येवर स्पष्ट दिसत होता. परंतु निर्मला अजून घरीं न आलेली समजताच त्या आनंदाची जागा काहींशा विषादानें घेतली.

" आंत या ना ? आतां येईल निर्मला ! " असें रमाबाईनें म्हणतांच तो आंत गेला खरा. पण त्याच्या मनांत एकच विचार सारखा

येत होता तो हा कीं निर्मला अलीकडे आपल्याला मुद्दाम टाळण्याचा प्रयत्न करीत आहे. या विचाराला त्याच्या मनांत थारा मिळतो न मिळतो तोंच रमाबाईनें विचारलें, " काय ? कुठे जाण्याचा बेत आहे वाटत ? "

" बेत होता पण आतां शक्य दिसत नाहीं "

" कसला ? "

" मी नि निर्मला आज दुपारच्या सिनेमाला जाणार होतों कालच ठरलं होतं आमच ! "

" असं का ? मग मला बोलली कशी नाहीं ? अलीकडे तिच लक्षच नसतं कशांत ! "

या बोलण्यावर विद्याधर काहींच बोलला नाहीं. आपल्या काल ठरलेल्या कार्यक्रमाचें तिला कांहींच महत्त्व वाटलें नाहीं हें रमाबाईच्या बोलण्यावरून त्याला कळून चुकलें रमाबाईसुद्धां मग फारशा बोलल्या नाहींत विद्याधराप्रमाणें त्यानाहि वाटूं लागलें होतें कीं निर्मलेमध्यें अलीकडे बराच बदल होत चाललेला आहे आणि तसा बदल अरविंदाची आणि तिची ज्यादिवशीं प्रथम ओळख झाली त्या दिवसापासून तिच्यामध्यें घडून येत आहे ही गोष्ट जशी विद्याधर जाणून होता तशीच ती गोष्ट रमाबाईनाहि कळून चुकली होती किंबहुना ती गोष्ट विद्याधरापेक्षां त्याच्याच प्रथम ध्यानांत आली होती त्याच गोष्टीवर आतांसुद्धां त्यांनीं कांहीं काळ विचार केला. आपण बराच वेळ स्तब्ध राहून एखाद्या गोष्टीवर गंभीर विचार करीत आहोंत हें विद्याधरला कळून येऊं नये म्हणून त्या लगेच म्हणाल्या, " विद्याधर, तुम्ही आंत येनां का ? स्वयपाक घरांत बसून आपण गप्पा मारूं माझं अजून बरच काम आटपायचं आहे नाहींतर तुम्हांला हवं असेल तर निमाताईच्या खोलींत जाऊन बसा. किल्ली देतें. "

" द्या किल्ली ! मी बसतों तिच्याच खोलींत. तुमच्या कामांत उगाच

व्यत्यय नको.'' वरकरणी ही सबब जरी त्यानें मांगितली तरी खरोखर त्यावेळीं त्याला त्यांच्याशीं गप्पा मारणें नको होतें पण रमाबाईनें निर्मलेच्या खोलीची किल्ली देताच तो तिच्या खोलींत जाऊन कॉटवर पडला. कॉटवर पडल्या पडल्या त्यानें सध्यांच्या परिस्थितीचा बराच विचार केला निर्मला आपल्याला दूरावत चालली आहे ही गोष्ट खरी ! पण त्याला कारण काय ? अरविंद आल्यापासून तिच्या मनांत हा फरक झाला मग हा कांटा आपल्या मार्गातून दूर कसा करायचा ? त्यानें खूप वेळ त्या गोष्टीवर विचार करून बघितला. पण त्याला काहीं केल्या मार्ग सापडेना आपल्या मार्गातील एखादें सकट दिसलें असताना त्याच्या निवारणार्थ कोणताच उपाय मनुष्याला जेव्हां सांपडत नाहीं तेव्हा तो स्वतःवरच चिडतो जवळजवळ तासभर त्या गोष्टीवर विचार करूनहि जेव्हा त्याला काहींच तोड सापडेना तेव्हां तो स्वतःवर याचप्रमाणें चिडला व मग कॉटवरून उठून तो टेबलाजवळच्या खुर्चीवर जाऊन बसला टेबलावर निर्मलेचें शेक्सपिअरचें नाटक पडलें होतें. तें उघडून वाचाण्याचा त्यानें बराच प्रयत्न करून बघितला पण त्यामध्येंहि त्याचे मन रमेना मग त्यानें टेबलावरची सर्व पुस्तकें एकामागून एक उलथून चाळण्यास आरभ केला जणू काय त्या पुस्तकांची जोरानें उलथापालथ करून त्यांच्या मालकिणीवरचा राग तो त्याच्यावरच काढीत होता पुस्तकांची याप्रमाणें उलथापालथ करतांना त्याच्या हातांत एक डायरी आली त्याचें कुतुहल जागृत होऊन लगेच त्यानें ती उघडून बघितली कालच्याच तारखेवर त्याला पुढीलप्रमाणें मजकूर आढळला

" एखाद्या व्यक्तिविषयीं प्रथम दर्शनींच जबरदस्त आकर्षण निर्माण व्हावें ही एक मानवी मनाची मौजच नव्हे काय ? अरविंदाची आणि माझी अगदीं बालपणीं गट्टी होती ही गोष्ट खरी पण बालपणीं आपल्याला अगदीं परिचित असलेल्या व्यक्तीचें आकर्षण पुढील वयांत कायम टिकतें काय ? छे ! तें कांहीं नाहीं अरविंदांच्यामध्यें .... "

पुढील मजकूर वाचण्यासाठी त्यानें तें पान उलटलें. पण लगेच कोणीतरी आल्याची चाहूल लागताच गडबडीनें त्यानें डायरी मिटली त्या गडबडींत एक बंद केलेलें कोरें पाकीट त्या डायरीमधून बाहेर पडलें. पण तें सुद्धा त्यानें डायरीमध्यें गडबडीनें घालून ठेवून ती डायरी जागच्याजागीं ठेवून दिली, आणि आपण तिची डायरी वाचल्याचा संशय तिला येऊ नये म्हणून पहिल्याप्रथम हातात घेतलेलें शेक्सपिअरचें नाटक त्यानें टेबलावर सहज रितीनें उघडून ठेवलें. दारावर थाप बसतांच त्यानें " कोण आहे ? " म्हणून दार उघडलें निर्मला आंत आली आणि हातातील पुस्तकें टेबलावर फेंकून देऊन म्हणाली "Excuse me ! I am rather late" ( " मला थोडा उशीर झाला नाहीं ? माफ करा, " )

" पण तू काल कबूल केलं होतस कीं मी नक्की दोनला यईन " विद्याधराच्या या बोलण्यात रागाची स्पष्ट छटा दिसून येत होती. पण यावर निर्मला ओशाळगत होऊन म्हणाली, "हो कबूल केल होत खर पण आमच्या कॉलेजांत आज जादूचे प्रयोग होते म्हणून उशीर लागला "

" जादूचे प्रयोग बघण्यास काय तू कुक्कुल बाळ आहेस वाटत ?"

" चिनी होता तो जादूगार ! आणि इतक्या लांबून ते जे लोक येतात ते फक्त लहान मुलांनाच त्यांचे प्रयोग दाखविण्यासाठींच कीं काय ? खरोखर मला भारी आवडले त्याचे प्रयोग ! काय बाई एक एक मजा !"

निर्मलेनें उशिरा येण्याबद्दल दिलेलें कारण विद्याधराला पूर्णपणें पटलें. आणि मघाशीं त्याच्या मनांत जो विचार डोकावला होता कीं निर्मला आपल्याला टाळण्याचा मुद्दाम प्रयत्न करीत आहे तो विचार त्याच्या मनांतून काहींसा दूर झाला. मग त्यानें त्या चिनी जादूगाराच्या प्रयोगाबद्दल निर्मलेला बरीच माहिती विचारली तो जेव्हां निर्मलेला म्हणाला, "सांग

तरी आम्हांला त्यानें काय काय प्रयोग केले ते ?'' तेव्हां निर्मलेनें त्याला त्या प्रयोगांचें मोठें रसभरीत वर्णन करून सांगितलें. त्यानें भुताचा मेळावा आपल्याभोंवतीं कसा जमा केला, पैशांचा पाऊस कसा पाडला; मोकळ्या पेटीतून एक सुदर स्त्री कशी निर्माण केली; मोठा जाळ करून त्यामध्यें उडी टाकून तो कसा अदृश्य झाला वगैरे माहिती सागून निर्मलेनें म्हटलें, "तो मोठा मनकवडा सुद्धा आहे. मनांतल अगदीं बरोबर ओळखतो !''

"खर ?"

"अहो, माझी एक मैत्रिण उभी राहून त्याला म्हणाली, 'ओळखा बघूं माझ्या मनातल !' मग त्यानें काहीं काळ डोळे मिटले. नतर डोळे उघडून हसन तिच्याकडे बघत तो म्हणाला, 'ओळखू ? तुमच्या मनात तुमच्या लग्नाविषयीं विचार चालला आहे तुमच एका माणसावर प्रेम आहे पण तुमचे आई वडील तुमच्या लग्नाला कांहीं समति देत नाहींत' तो पुढें बोलणार होता पण माझी मैत्रिण जेव्हां म्हणाली, 'पुरे आतां !' तेव्हा तो हसला आणि गप्प बसला. तिची तर लाजून लाजून मुरकुंडीच वळली !"

"मग तूं नाहीं का त्याला आपल्या मनातल ओळखायला सांगितलस ?" विद्याधरनें हा प्रश्न निर्मलेला मुद्दाम खोंचक तऱ्हेनें विचारला तिनें लिहिलेला डायरींतील मजकूर त्याच्या डोळ्यासमोर येऊन त्याला वाटलें कीं या आपल्या प्रश्नाचें उत्तर देतांना निर्मला कदाचित् चाचरेल. पण निर्मलेनें सरळ उत्तर दिलें "छे! मी नाहीं बाई त्याला प्रश्न विचारला. आपल मन आपण स्वतः ओळखलं म्हणजे पुरे !"

विद्याधर यावर उघड रितीनें कांहींच बोलला नाहीं पण तो मनात म्हणाला, "तूच काय पण मी सुद्धां तुझं मन ओळखल आहे."

तीं दोघेजण त्या ठिकाणीं अजून बसलीं असतीं तर यापुढें त्यांच्यामध्यें कोणता सवाद झाला असता हें सांगणें कठीण आहे. डायरीं-

तील मजकूर वाचून उत्पन्न झालेला राग विद्याधरच्या मनांत अगदी ताजा होता. तेव्हां कदाचित् त्या दोघांमध्यें बेबनाव उत्पन्न करणारा संवाद यापुढें झाला असता. पण रमाबाईनें त्या दोघाना स्वयपाकघरांत चहा पिण्यासाठीं हांक मारली.

निर्मलेनें चहाचा कप तोंडाला लावतांच रमाबाई तिला म्हणाल्या, " किती ग उशीर करायचा ? उगाच एखाद्याला किती वाट बघायला लावायची?" लगेच तोंडाचा कप बाजूला काढून निर्मलेनें म्हटलें, " अग पण मी मुद्दाम नाहीं उशीर केला विचार वाटलं तर याना ! आमच्या कॉलेजांत जादूचे प्रयोग होते " आणि तिला विचारलेला प्रश्न बाजूला ठेवूनच तिनें आपलें बोलणें पुढ सुरू केलें, " आणि आई, तो जादूगार कांहीं इथला नव्हता ! चिनी होता खूप गमती केल्या त्यान तू असतीस तर... .. " याप्रमाणें तिचें बोलणें यापुढ किती लांबलें असतें कोणास ठाऊक ! पण मध्येंच तिला अडवून रमाबाई म्हणाल्या,

" मग साग काय सांगायच तें चहा निवून जातोय "

मग कपांतला उरलेला चहा पिऊन कप खालीं ठेवतांना हसत तिनें म्हटलें, " मला थड चहा घेणच फार आवडत "

" तुझ कांहींतरीच ! मला वाटतं थड चहा घेऊनच तूं अशी थंड बसली आहेस."

" आई, थंड वृत्ति तर फार चांगली ! "

" तुला वाटत असेल चांगली पण बाकीच्या लोकाना त्याचा किती त्रास होतो हें तुला कळत नाहीं."

हें वाक्य रमाबाईनें विद्याधरकडे बघून उच्चारलें तें त्यांनीं निर्मलेच्या अलीकडच्या वागणुकीस अनुलक्षून उच्चारलें आहे हें त्यानें ओळखलें. त्यावर निर्मला काय उत्तर देते इकडे त्याचें लक्ष लागलें होतें. पण निर्मला उत्तर देण्याच्या भानगडींत न पडता फक्त एवढेंच म्हणाली, " आई, रात्रीं सांगेन तुला त्या जादूगाराच्या एक एक गमती ! " मग

विद्याधरकडे बघून तिनें विचारलें, " बर, आतां काय बेत आहे ? " त्यानें लगेच आपल्या मनगटावरच्या घड्याळावर नजर टाकली. त्याचा आशय ओळखून ती म्हणाली,

" पण आता ' शो ' सांपडणार नाहीं, इथेंच चार वाजले आहेत "

" 'शो' नाहीं. पण बाहेर तर पडूं. मग बघूं कुठें जायचं तें "

निर्मलेला यावर नाहीं म्हणणें शक्यच नव्हतें कारण अलीकडे या महिन्यात जवळ जवळ प्रत्येक गोष्टींत तिनें विद्याधरास नकार दिलेला होता. अगदी पहिल्या प्रथम अरविंदाशीं बॅडमिंगटन् खेळल्यानतर टेनीस खेळण्याची इच्छा जेव्हा त्यानें प्रदर्शित केली होती तेव्हा तिनें त्याला स्पष्ट नाही म्हणून सागितलें होतें. नतर मागच्या रविवारीं एक दिवस जुहूला जाण्याचा बेत जेव्हा त्यानें केला होता तो बेतसुद्धां तिनें कांहीं-तरी कारण सागून हाणून पाडला होता. आणि काल तर सिनेमाला जाण्याच्या कार्यक्रमाला पुष्कळ आढेवेढे घेऊनच तिनें आपली समति दर्शविली होती पण त्यांचा तोहि कार्यक्रम आज पार पडू शकला नव्हता. तेव्हा या स्थितींत यापुढें त्याला नकार देणें तिला इष्ट वाटलें नाहीं आपलें मन विद्याधराविषयीं पूर्णपणें प्रतिकूल होत चाललेलें आहे हें ती चागलें जाणून होती तसें पाहिलें असता त्याच्याविषयीं तिचें मन केव्हाच स्वच्छ नव्हतें पण तें आणखी अस्वच्छ होण्यास अरविंद कारणाभूत आहे हें तिला नाकबूल करता येणें शक्य नव्हतें हा तिच्या मनातील फरक केवळ अरविंदामुळें झालेला आहे हें तिलाहि कळत होते. तसा कबूलीजबाब तिनें आपल्या मनाशी हजार वेळा दिलाहि असेल पण हा झालेला फरक सध्यांच जगाला दिसणें इष्ट आहे काय याविषयीं तिचें मन थोडेसें साशक बनलें होतें कारण तिला वाटे कीं आपण अरविंदाविषयीं विशिष्ट प्रकारच्या भावना ठेवल्या आणि त्याना त्याच्याकडून अनुकूल प्रतिउत्तर मिळालें नाहीं म्हणजे आपलें जगात हसंच होईल. यापेक्षा आपल्या भावनाना सध्यां मुरड घालणें हें केव्हांहि उचित होय. असा विचार करून ती विद्याधरला म्हणाली, "बर, चला "

"चल मग. लाग तयारीला"

"इश्श्य ! तयारी कसली ?"

"वा ! बायकांचा पोषाख म्हणजे एक तासाची निश्चिंती."

"कांहींतरीच !" असें म्हणून ती पळतच आपल्या खोलीकडे निघाली. जणूं काय त्या पळण्यानें ती विद्याधरला म्हणत होती, 'तास कशाला ? एका मिनिटांत पोषाख करतें !'

खोलींत जाऊन तिनें दार लोटून घेतलें; आणि कपड्याच्या कपाटां-तून तिनें एक पोपटी रंगाचें पातळ बाहेर काढलें. नंतर त्या पातळाच्या रंगाला कोणता ब्लाऊज जास्त शोभेल असा किंचित् काळ विचार करून तिनें त्याच रंगाचा ब्लाऊज पसंत केला तें पातळ परिधान केल्यानंतर ती आरशासमोर जाऊन उभी राहिली, व केसांवरून कंगवा फिरविण्यास तिनें सुरवात केली. तोंडावर पावडरचें फूल फिरवितांना तिला सकाळीं लिहिलेलें पत्र टाकण्याची आठवण होऊन लगेच तिनें आपलें वेशभूषेचें काम जरा आटोपतें घेतलें. आणि आपल्या डायरींतून तें पाकीट काढून तिनें त्यावर सुंदर अक्षरांत लिहिलें, "अरविंद गोखले"

मग ताबडतोब बाहेर पडून दिवाणखान्यांत कांहींतरी वाचीत बस-लेल्या विद्याधरला तिनें म्हटलें, "हं, चला."

विद्याधर स्तिमित होऊन तिच्याकडे नुसता बघतच राहिला ! निर्म लेच्या सौंदर्याची त्याला कांहींकाळ भुरळ पडली आणि याशिवाय तिनें आपल्या वेशभूषेंत दाखविलेल्या कौशल्यानें त्याला मनस्वी कौतुक वाटलें. तो मनांत म्हणाला, "असली वेशभूषा करण्यांत एक तासच काय पण एक दिवस खर्च झाला तरी हरकत नाहीं." त्याच्या स्तब्धते-वरून त्याच्या मनावर आपल्या सौंदर्याचा परिणाम झालेला आहे हें निर्मलेनें जाणलें किंबहुना प्रत्येक स्त्रीला आपल्या सौंदर्याची पुरेपूर जाणीव असते. आणि ती जाणीव दुसऱ्याला व्हावी म्हणून तिची नेहमीं खटपट चाललेली असते पण मौज ही कीं दुसऱ्याला ती तशी

जाणीव होतांच त्या थोड्याशा गोंधळून जातात निर्मलची तीच स्थिति झाली विद्याधरला आपल्या सौंदर्याची जाणीव झालेली आहे हें कळून येतांच ती तशीच गोंधळून जाऊन म्हणाली, "कां ? आटोपल कीनई लवकर ?"

"नशीबच म्हणायच ! मला वाटल मध्याकाळ इथेच होणार"

मग तीं दोघें मोटारींत जाऊन बसलीं. रमाबाई गॅलरींतून कौतुकानें त्याच्याकडे बघत होत्या त्याचें मन भविष्यकाळात वावरत होतें त्याच्या मनात विचार आला कीं त्या दोघांचा जर विवाह झाला तर निर्मला अशीच नहमीं विद्याधरबरोबर मोटारीतून हिंडेल आणि मग ती खरोखरच सुखी होईल पण त्यांची नजर जेव्हा समोरच्या समुद्रावरच्या पाण्यावर स्थिर झाली तेव्हा त्यांचें मन निराळाच विचार करू लागलें समुद्राच्या पाण्यावर सूर्याचीं किरणें पडल्यामुळें जिकडे तिकडे सोनें पसरलेलें आहे असा भास निर्माण होत होता. रमाबाई मनाशीं म्हणाल्या, "या पाण्यावर जिकडे तिकडे सोनेच सोनें दिसत आहे पण तो सोन्याचा नुसता भासच नव्हे काय ? मनुष्याचें मन नुसत्या भासावर जगत नसतें निर्मलेनें विद्याधरविषयीं प्रेमाचा कितीहि भास निर्माण केला तरी तिचें खरें प्रेम त्याच्यावर आहे काय !......"

आणि दादरच्या पोष्टासमोर जेव्हां मोटार थांबली तेव्हां विद्याधरच्या मनात हाच प्रश्न उभा राहिला कीं निर्मलेचें आपल्यावर खरेंखुरें प्रेम आहे काय ?

कारण दादरच्या पोष्टासमोर मोटार उभी करण्यास सांगून निर्मला म्हणाली, "मला पोष्टांत एक पत्र टाकायचंय"

"कुणाला लिहिल आहेस पत्र ?" असें विद्याधरनें विचारताच तिनें म्हटलें "माझ्या एका मैत्रिणीला !"

"मग मी टाकू का ?"

"नको. मीच टाकतें" असें म्हणून ती खालीं उतरली व पोष्टाच्या

दिशेनें चालूं लागली विद्याधरला डायरींतून पडलेल्या पत्राची आठवण झाली. त्याला वाटलें कीं तें पत्र तिच्या हातातून हिसकावून घेऊन आपण वाचावें. पण त्यानें तसें केलें नाहीं तो मनाशीं एवढेंच म्हणाला, "स्त्री किती लबाड असते !" आणि त्याचवेळीं वरील प्रश्न त्याच्या मनात उभा राहिला तें पत्र मैत्रिणीला असणें शक्य नाही अरविंदालाच तें लिहिलें असलें पाहिजे याची त्याला खात्री झाली मग 'असें काय लिहिलें असेल तिनें पत्रांत ?' या गोष्टीची त्याला अत्यंत रुखरुख लागून राहिली आणि नंतर पत्र टाकून निर्मला जेव्हा मोटारींत येऊन बसली तेव्हा तिच्याशीं काय बोलावें हें त्याच्या गोंधळलेल्या मनाला मुळींच सुचेना पण मौज ही की त्यावेळीं निर्मलेचीहि तीच स्थिति झाली होती अरविंदाला तिनें पत्र टाकलें होतें खरें पण त्याबद्दल त्याला काय वाटेल याविषयीं तिचें मन साशंक झाल्यामुळें तिलाहि काय बोलावें हें त्यावेळी सुचत नव्हतें मोटारींत तीं दोघें जवळ जवळ बसलीं होतीं खरीं पण मनानें मात्र तीं एकमेकापासून दूर दूर जात चाललीं होतीं.

—:०:—

## प्रकरण ५

डॉक्टर प्रभाकरपताना पुण्यांत सोमवार पेठेंत बिऱ्हाड करून नुकतेच दोन दिवस झाले होते आणि अरविंद आज उमाबाईंचा काहीं-तरी निरोप घेऊन त्याच्याकडे गेला होता. तो परत येत असताना त्याचा टांगा जेव्हां शनिवार गेटाजवळ आला तेव्हां त्याला कसलीतरी मोठी आरडा ओरड ऐकू आली "कसली गडबड आहे रे ?" असें टांगेवाल्याला विचारतांच तो म्हणाला, "साहेब, वर्तमान पत्राचा जादा अंक निघालेला दिसतोय."

"असं ? मग बोलाव त्या पोऱ्याला."

तांगेवाल्यानें धांवपळ करणाऱ्या एका पोऱ्याला हांक मारली. तो जवळ येऊन अरविंदाला घाईघाईनें म्हणाला, "काय साहेब, अंक पाहिजे ? मोठी लढाई सुरू झाली." त्याच्या धांवपळीचें आणि गंभीर चेहेऱ्याचें अरविंदला त्याहि स्थितींत हंसू आल्यावाचून राहिलें नाहीं. अंकाची किंमत विचारतांच तो पोऱ्या म्हणाला, "एक आणा साहेब!" तांगेवाल्यानें मध्येंच त्याला दरडावून म्हटलें, "एक पैसा असेल. एक आणा कुठला ?"

यावर तो पोऱ्या मोठ्या अजीजीच्या स्वरांत अरविंदाकडे बघून म्हणाला, "साहेब, खरी किंमत पैसा आहे. पण पैसे मिळविण्याची हीच वेळ असते आमची तुम्ही कांहींहि द्या

अरविंदानें हसून त्याच्या हातावर एक आणा ठेवल्यावर तांगा चालू झाला. त्या जादा अंकाच्या अगदीं वरच्या बाजूला मोठ्या टाईपात लिहिलें होतें,

"**लोकशाहीचा विजय असो** " आणि त्याच्या खालींच मध्यम टाईपांत म्हटलें होतें,

"अखेर शांततेच्या प्रयत्नांची कसूर करून लोकशाहीच्या रक्षणासाठीं आणि झोटिंगशाहीच्या नाशासाठीं इंग्लंडला युद्धाच्या होमकुडांत उडी घ्यावी लागत आहे. जर्मनीशीं आज आम्ही युद्ध पुकारीत आहोंत ईश्वर आम्हाला आमच्या पवित्रकार्यांत यश देवो."

मध्येंच तांगेवाल्यानें त्याला विचारलें, "साहेब, लढाई सुरू झाली?"

"हूं."

"मग आपल्या सरकारचा जय होईल का ?"

"हूं."

"मग आपला हिंदुस्थान स्वतंत्र होईल ?"

"अरे त्याचं मी काय सांगू ? आत्तांशी कुठे लढाई सुरू झाली आहे बघूं पुढें काय होईल तें !"

त्याचा स्वर जरा चिडका आल्यामुळें तांगेवाला गप्प बसला खरा. पण त्याचें मन मात्र त्याला याचप्रमाणें अनेक प्रश्न विचारीत होतें.

—ही लढाई सुरू झाली खरी पण ती संपणार केव्हां ?

—या लढाईंत कोणाचा विजय होणार ?

—आपला हिंदुस्थान स्वतंत्र होईल काय ?

याप्रकारचे अनेक प्रश्न त्याच्या मनानें त्याच्यापुढें उभे केले. वास्तविक तीन सप्टेंबरला इंग्लंडनें जर्मनीच्याविरुद्ध जेव्हां रणशिंग फुंकलें त्यासुमारास या देशांतील प्रत्येक मनुष्याची अरविंदाप्रमाणेंच साशंक स्थिति झाली होती. प्रत्येकाला वाटे कीं पृथ्वीच्या पाठीवर हें रणकुंड पेटलें असतांना आपलें कर्तव्य कोणतें ? आपण नुसतें गप्प बसून एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणें या महायुद्धाकडे पाहू शकूं काय ? जगांतील लोकशाहीच्या रक्षणार्थ आपण आपल्या प्राणांची आहुती द्यायला नको काय ? आणि त्याचा मोबदला म्हणून आपल्याला स्वातंत्र्याचें दान मिळणें इष्ट नाहीं काय ? याप्रमाणें अनेक प्रश्न प्रत्येकाच्या मनापुढें उभे ठाकले होते आणि त्यांपैकीं प्रत्येकजणाला वाटत होतें कीं आपण या काळांत कांहींतरी केलें पाहिजे पण मौज ही कीं काय केलें पाहिजे हें मात्र त्यांपैकीं कोणालाच कळत नव्हतें. पण अरविंदाच्या मनांत हे प्रश्न येतांच त्याच्या डोळयांसमोर त्याचें ध्येय उभें राहिलें. मजुरांची उन्नती करण्याची जी आकांक्षा त्यानें अगदीं बालपणापासून उराशीं बाळगली होती त्या आकांक्षेला आतां आपण कांहींतरी निश्चित स्वरूप दिलें पाहिजे असें त्यानें मनाशीं ठरविलें. एखाद्या अनिश्चित स्थितींत मनुष्याला निश्चित मार्ग सांपडल्यानंतर त्याला जो एक अवर्णनीय आनंद होतो तसा आनंद अरविंदाला यावेळीं झाला. त्याला वाटलें आपलें ध्येय आपल्याला सांपडलें. त्या ध्येयाकडे आपण आतां धांव घेतली पाहिजे. आणि त्या ध्येयाची पहिली पायरी म्हणजे मुंबईला

जाऊन नोकरीवर रुजू होणें आणि मजुरांची शक्य तितकी सेवा करणें ! बस्स, ठरलें ! उद्यां मुंबईला जायचें !

याप्रमाणें मनाशीं निश्चय करीत असतांनाच तांगा थांबला. तांगेवाल्यानें विचारलें, "साहेब, हाच बंगला ना ?" तो विचारतंद्रींत असल्यामुळें गडबडून म्हणाला, "अं ? काय ?"

"साहेब, बंगला कोणता ?"

"हा नाहीं. तो पलीकडचा."

'विजय व्हिला' समोर तांगा थांबतांच तो तांग्यांतून उतरला आणि तांगेवाल्याला त्यानें पैसे दिले तांगेवाला तांग्याची मागची गादी नीट करीत असतांना म्हणाला, "साहेब, हा जादा अंक इथेच राहिला"

अरविंदाने बंगल्यांत शिरतांना त्याच्याकडे वळून म्हटलें "राहूं दे वाच तू"

तांगेवाल्यानें अदबीनें सलाम करून सिनेमांतील एक गाणें म्हणत तांगा हाकारला.

अरविंदाला बघतांच बागेंत बसलेल्या उमाबाईनें विचारलें, "काय रे, गगू येणार म्हणाली का ?"

"हे ! ती म्हणाली, माझ्याकडे उद्यां पाहुणे येणार आहेत. तेव्हा जेवायला येतां येणार नाहीं." असें म्हणून ज्याठिकाणीं उमाबाई आणि नीला बसली होती त्याठिकाणी अरविंद जाऊन बसला. बसतांच उमाबाईना तो म्हणाला,

"उमामावशी, मोठी लढाई सुरू झाली !"

"झाली का ? हा हिटलर मेला माजलाच आहे. मग आतां किती दिवस चालेल ही लढाई ?"

"त्याचं काय सांगावं ? मागची पांच वर्षं चालली. हीं तर त्याहूनहि मोठी आहे."

"अरे बापरे! मग आतां चहासाखर वगैरे जिन्नस तोंपर्यंत महाग होतील तर!" आणि नीलेकडे वळून त्या म्हणाल्या, "मागच्या लढाईच्यावेळीं एक रुपया शेर साखर झाली होती."

अरविंदाला उमाबाईच्या बोलण्याचें हसू आलें. जगात एवढें मोठें घनघोर युद्ध सुरू झालें असताना उमाबाईनें फक्त चहासाखरेच्या महागाईचा विचार करावा याबद्दल त्याला हसू येणें सहाजीकच होतें. नतर उमाबाई म्हणाल्या, "अरविंद, जेवायचं झाल आहे. कपडे काढा." मग नीला जागची उठून म्हणाली "चला, पाटभाडीं करावींत."

उमाबाईनें तिला थाबवून म्हटलें, "थांब, आधीं विजयला जाऊन विचारतें. मघाशीं म्हणत होता कीं जेवायच नाहीं त्याला विचारून मी तुम्हाला हाक मारतें."

उमाबाई गेल्यानंतर नीलेनें अरविंदाला विचारलें,

"आजचा 'ज्ञानप्रकाश' वाचला का ?"

"का ? काहीं लढाईची बातमी ?"

"लढाईची असेल. पण परवा त्या कॉलेजात घटस्फोटाची चर्चा झाली ना ? ती तशीच्या तशी छापून आली आहे आज !"

"अस्स ?"

"होय." आणि थोडावेळ थाबून तिनें म्हटलें,

"काय हो भावोजी, तुमच काय मत आहे या घटस्फोटाबद्दल ?"

"माझं मत ? वहिनी, माझं अजून लग्न झालं नाहीं तर घटस्फोटाबद्दल मी काय मत देणार ?"

"इश्श्य ! कांहींतरीच तुमचं. सांगा कीं पण !"

अरविंदाला नलिेच्या त्या प्रश्नाबद्दल कांहींसें आश्चर्यच वाटलें. वास्तविक असा काळ आला होता कीं, अशावेळीं कोणत्याहि व्यक्तीनें वैयक्तिक विचार सोडून आपल्या देशाबद्दलच्या विचारांशीं समरस

व्हावें ! पण अरविंदाला वाटलें—नव्हे त्याची खात्री झाली कीं कांहीं झालें तरी स्त्री वैयक्तिक विचारापलीकडे केव्हांच जाऊं शकत नाहीं. सर्व विश्वाला घर मानण्याऐवजीं ती आपल्या घरालाच विश्वाचें स्वरूप देते. हे विचार येतांच त्याला नीलेच्या वरील प्रश्नाचें कांहींच आश्चर्य वाटलें नाहीं तिच्या प्रश्नाला कांहींतरी उत्तर दिलेंच पाहिजे म्हणून तो म्हणाला, " वहिनी, सध्यां कोणकोणतीं राष्ट्रं कुणाशीं लग्न करतात आणि कोणकोणतीं राष्ट्रं कुणाशीं घटस्फोट घेतात इकडे माझं सर्व लक्ष लागल आहे. आणि... "

पण नीला त्याला मध्येंच थांबवून म्हणाली, " तुमच कांहीं असो पण मला वाटत कीं घटस्फोटामुळें स्त्रिया अधिक सुखी होतील "

हें वाक्य उच्चारतांना नीलेचा जो एक निश्चयात्मक स्वर आला तो कळून येतांच अरविंदाच्या मनांत एक नवीनच भीति निर्माण झाली. आपली नीला वहिनी घटस्फोटाबद्दल एवढा विचार कां करते आहे ? तिच्या मनांत आहे तरी काय ?

उमाबाईची हांक येतांच नीला उठून आंत गेली तोहि तिच्या मागोमाग आंत गेला पण एखाद्या भविष्यवाद्यानें एखादें भविष्य सांगावें आणि तें सारखें मनांत घोळत राहावें त्याप्रमाणें नीलेचें शेवटचें वाक्य अरविंदाच्या मनांत बराच वेळ सारखें घोळत होतें.

जेवण झाल्यानंतर सर्वजण विजयच्या खोलींत गप्पा मारीत बसले असतांना अरविंद उमाबाईना म्हणाला,

" मावशी, मला उद्यां मुंबईला गेलंच पाहिजे. "

" इतक्या लवकर ? "

" अग मला येऊन एक महिना झाला ! काय म्हणतील आप्पासाहेब ? "

" मला वाटल, तूं एवढी दिवाळी करून जाशील."

" छे ! तें शक्य नाहीं. तिकडे ते माझी अगदीं वाट बघत असतील. "

" कोण ? आप्पासाहेब का दुसरं कुणी ? "

उमाबाईंच्या या प्रश्नासरशीं अरविंदाला निर्मलेच्या पत्राची आठवण झाली. तिनें त्याला पाठविलेल्या पत्रांत विजयच्या प्रकृतीबद्दल चौकशी केली होती. आपल्या कॉलेजच्या अनेक गमती लिहिल्या होत्या आणि शेवटीं म्हटलें होतें, " तुम्हाला जाऊन एक महिना झाला. पण आपलं एकहि पत्र नाहीं ! रोज आप्पासाहेब घरांत माझ्याजवळ आपल्या पत्राची चवकशी करतात. मग मला रोज रोज नाहीं म्हणण्याचा अगदीं कंटाळा येतो आज पत्र नाहीं, निदान आपणच याल म्हणून आम्ही रोज तुमच्या येण्याचीच वाट बघत असतों. तेव्हा आतां या पत्राच उत्तर पाठविण्याच्या भानगडींत न पडतां स्वतःच या पाहूं कसे ! "

उमाबाईंच्या वरील प्रश्नाला अरविंदानें मनांत उत्तर दिलें, " बघा आता माझी कोण वाट बघत आहे तें ! " पण हें उत्तर त्याच्या मनांतच राहिलें. आणि त्यानें उमाबाईंना उघड रितीनें उत्तर दिलें. "दुसरं कोण वाट बघणार ? नोकरी माझी सारखी वाट बघत आहे "

" मग यदा दिवाळी तिकडे करणार तर ! "

असें उमाबाईनें म्हणतांच तो म्हणाला, " छे ! तसं कांहीं नक्की नाहीं. कदाचित् त्या वेळेला मी पुण्यालाहि येईन. "

यावर इतका वेळ गप्प असलेला विजय म्हणाला,

" आई, अरविंदाला नेहमीं नेहमीं पुण्याला आणण्याची एक युक्ति आहे. त्याची सासुरवाडी येथें झाली म्हणजे येईल मग सारखा सारखा पुण्याला. "

" अरे, तें कांहीं अवघड काम नाहीं. आपल्या शेजारचे भट आहेत ना ? ते मला त्यांच्या कुसूमबद्दल विचारीत होते. "

हें बोलल्यानंतर मात्र उमाबाईंना कांहीं काळ वांटलें कीं आपण हा विषय काढला नसता तर ठीक झालें असतें ! कारण मागें पुष्कळ वेळां या बाबतींत अरविंदानें त्यांना तुसडेपणाचीं उत्तरें दिलीं होतीं. त्यामुळें

या बाबतींत त्याच्याशीं फारसें बोलायचें नाहीं असा निश्चय त्यांनीं पूर्वींच करून टाकला होता. पण लग्न हा असा एकच विषय आहे कीं स्त्री त्या बाबतींत सहसा कधींच गप्प बसू शकत नाहीं. तेव्हां तो विषय निघतांच उमाबाईनें आपलें बोलणें सहाजीकच अगदीं न कळत सुरू केलें होतें. परतु अरविंद त्या बाबतींत आपल्याला पुन्हा कांहींतरी दुरुत्तर देईल ही त्यांची भीतीसुद्धां अगदींच निराधार ठरली नव्हती; आणि अरविंद पुढें तसें म्हणालाच.

" मावशी, दुसरा काहीं विषय काढा की ! "

यावर उमाबाई चपापून गप्प बसल्या खऱ्या. पण नीलेला त्याच्या बोलण्याचा खरा अर्थ न कळून ती म्हणाली, " दुसरा विषय कशाला ? हा विषय जसा कांहीं आवडतच नाहीं ! "

वहिनी, या बाबतींत न बोललं तर नाहीं का चालणार ? जगात लग्नाशिवाय दुसरे विषय काय थोडे आहेत ? आज पृथ्वीच्या पाठीवर मोठें युद्ध सुरू झालें आहे. त्याचा काहींच विचार तुमच्या डोक्यांत येत नाहीं ? "

तो खरोखरच गंभीरपणानें बोलत आहे, हें कळल्यानंतर नीलाहि गप्प बसली. नंतर बराच वेळ त्यांच्या निरनिराळया गप्पा झाल्या. आणि अरविंदाचें दुसरे दिवशीं मुंबईला जाण्याचें त्याच बैठकींत नक्की ठरलें.

त्या रात्रीं अकराचे टोल पडले तरी अरविंदाला कांहीं केल्या झोप येईना. उमाबाईंना आपण तुसडेपणानें बोललों याबद्दल त्याला खरोखरच मनस्वी दुःख होत होतें. त्याच्या मनानें विचार केला कीं त्या माउलीनें आपल्याला लग्नाच्या बाबतींत विचारलें यांत तिची काय चूक झाली ? आपल्या आईच्यामागें तिनें आपल्याला अगदीं पोटच्या मुलाप्रमाणें वागविलें आहे ! अशा स्थितींत आपल्या लग्नाबद्दल तिला उत्सुकता वाटावी यांत वावगें काय झालें ? आपली आई असती तर तिनें आपल्याला हाच प्रश्न विचारला नसता काय ? आणि उमाबाईप्रमाणें आपण तिला तुसडेपणानें उत्तर दिलें असतें तर तिला काय वाटलें असतें ?

अशा प्रकारच्या नाना प्रश्नांनीं त्याच्या मनांत मोठा गोंधळ उडवून दिला होता त्याला कधीं नव्हती इतकी आईची आज आठवण झाली. तसें पाहिलें असतांना त्याच्या स्मृतींत आईची अगदीं अंधुक अशी आठवण राहिली होती. तो पांच वर्षांचा असतांनाच त्याची आई त्याला कायमची सोडून गेली होती अखेरच्या घटकेला तिनें उमाबाईंना जवळ बोलावून सांगितलें होतें, "उमा, मी आतां जाणार अरूचा सांभाळ तू कर माझ्यामागें तूंच त्याची आई आहेस."

रुग्ण शय्येवर अखेरच्या घटकेला अडखळत अडखळत उच्चारलेलीं हीं वाक्यें जरी त्याच्या स्मृतींत नसलीं तरी उमाबाईंच्या तोंडांतून अनेकवार त्यानें तीं ऐकलीं होतीं त्याच्या आईचें असें एकच मौल्यवान स्मृतिचिन्ह त्यानें जतन करून ठेवलें होतें. तें म्हणजे त्याच्या आईनें मृत्युसमयीं त्याच्यासाठीं ठेवलेलें पत्र! आपला मृत्युकाळ समीप आला आहे असें जेव्हां तिला कळलें तेव्हां तिनें अरविंदाला पुढें देण्यासाठीं म्हणून एक पत्र लिहिलें होतें आणि तें उमाबाईंच्या जवळ देऊन ठेवलें होतें. एखाद्या नाविकाला ज्याप्रमाणें दीपगृहाचा मार्गदर्शनाच्या दृष्टीनें उपयोग होतो त्याप्रमाणें अरविंदाला आपल्या मातेच्या पत्राचा उपयोग होत होता आणि पुढें तर एका मोहाच्या अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं त्या पत्रानेंच त्याला तारलें होतें. त्याच पत्रांत उमाबाईंना आपल्या आईप्रमाणेंच मानण्याची त्याला आज्ञा केली होती आणि म्हणूनच उमाबाईंना आपण विनाकारण दुखवून एकप्रकारें आईच्या आज्ञेचा भंग केला आहे असें त्याला सारखें वाटू लागलें. शेवटीं त्यानें निश्चय केला कीं उद्यां जातांना उमाबाईंची त्याबद्दल आपण क्षमा मागायची! आणि हा निश्चय जेव्हां त्याच्या मनानें केला तेव्हांच त्याला शांत झोप लागली.

आणि खरोखरच दुसरे दिवशीं जातांना तो उमाबाईंना म्हणाला, "मावशी, माझं कालचं बोलणं मनावर घेऊ नका, मी मुंबईला गेल्यावर तुम्हांला माझ्या लग्नाचा विचार कळवीन."

अरविंदानें असें म्हणतांच उमाबाईंना गहिंवर आल्यावांचून राहिला नाहीं पदरानें डोळे पुसत त्या म्हणाल्या, " छे ! मी मनावर घेईन अस वाटलं का तुला ?"

मग बराच वेळ त्यांना कांहींच बोलतां आलें नाहीं. अरविंदाच्या-बद्दल त्यांच्या मनांत जी थोडीशी अढी निर्माण झाली होती ती एकदम नाहींशी झाली आपल्या थोरल्या बहिणीनें मृत्युसमयीं अरविंदाला आपला मुलगा मानण्याची जी आज्ञा केली होती ती त्यांना आठवली. आणि त्या मनात पुन्हा म्हणाल्या "अरविंद माझा मुलगा ना ? मुलाचं बोलण आईन कधीं मनावर घ्यायच असतं का ?"

अरविंदानें विजयचा निरोप घेतला त्याचा निरोप घेताना त्याला गहिंवरून आलें कसेंतरी तो विजयला म्हणाला,"विजय, मला केव्हांहि बोलाव मी तुझ्या हांकेसरशी इथे येईन "

विजयनें मोठ्या कृतज्ञतेनें त्याच्याकडे नुसतें बघितलें. आणि त्याच्या खोलीतून अरविंद त्याचा निरोप घेऊन जरी बाहेर पडला तरी पुनः पुन्हा मान वळवून विजयकडे बघण्याचा मोह त्याला आवरता आला नाहीं

बाहेर येऊन उमाबाईंना नमस्कार करताच त्या म्हणाल्या, " मग दिवाळीला येणार ना ? तस पत्र त्यावेळीं मी पाठवीनच !"

नीला त्याला स्टेशनवर पोंचविण्यासाठीं जाणार होती. विजय जवळ कोणीतरी पाहिजे म्हणून उमाबाईंना अर्थात् घरूनच त्याचा निरोप घ्यावा लागला तो आणि नीला टांग्यात जरी बसलीं तरी उमाबाई पुनःपुन्हा म्हणत होत्या, " दिवाळीला ये बरं चुकू नकोस." आणि टांगा सुरू झाल्यानंतर गेल्याबरोबर पत्र पाठव बर का ?" असें त्याला बजावण्या-सहि त्या विसरल्या नाहींत.

पुण्याहून दुपारीं साडेतीनच्या सुमारास ज्यावेळीं एक्सप्रेस निघते त्यावेळीं गडबडीचें आणि धांदलीचें जें एक चित्र दृष्टीस पडतें तें मोठें मनोहर वाटतें. प्रत्येकजण आपापल्या नादांतच असतो. जाणाऱ्या प्रत्येक

माणसाची उत्तम जागा मिळावी म्हणून धांवपळ चाललेली असतेच. शिवाय पोंचविणाऱ्या माणसांचीसुद्धां आपापल्या लोकांना उत्तम जागा मिळवून देण्यासाठीं चाललेल्या खटपटीची त्याच्यामध्यें भर पडते. याशिवाय चहा आणि पानपट्टी सिगारेट विकणाऱ्या पोरांचे आवाज, फेरीवाल्याचें विचित्र ओरडणें, हमालाचे हेल वगैरे आवाजांची जी त्या गडबडींत भर पडते ती निराळीच ! यांतून मार्ग काढीत अरविंद आणि नीला जेव्हां आली तेव्हां हमालानें एका डब्याकडे बोट करून म्हटलें, " साहेब, तो डबा जरा मोकळा आहे "

नीलेनें त्याला म्हटलें, " अरे, पुढें चल. त्या डब्यांत तर खूप गर्दी आहे. "

" बाईसाहेब, पुढें तर फारच गर्दी आहे. " असें म्हणून तो हमाल त्याच डब्यांत शिरला. त्याच्या पाठीमागून अरविंदानें आणि नीलेनेंहि प्रवेश केला अरविंदानें डब्यांत चोहोकडे नजर टाकून एका बाकाकडे बोट केलें त्याठिकाणीं सामान ठेवल्या नंतर हमालाला त्यानें पैसे दिले. यावर त्याच्याकडे मोठ्या केविलवाण्या नजरेनें पाहून तो हमाल म्हणाला,

" साहेब, काम बघून द्या पैसे "

" अरे, काम बघूनच दिले आहेत. उगाच कोण फुकट देतो ? " असें म्हणून अरविंद हंसला. पण त्यानें खिशांतून आणखी अर्धा आणा काढून त्याच्या हातावर ठेवला. हमाल त्याला रामराम करून मोठ्या समाधानानें निघून गेला. तो गेल्यावर नीला म्हणाली,

" या लोकांचं कध्धीं समाधान होत नाहीं. "

" गरीब असतात बिचारे. आशा असते त्यांना; असंच असत प्रत्येक मनुष्याचं ! समाधानी तो कधींच नसतो. " अरविंद कोणत्या हेतूनें असें म्हणाला हें तिला कळलें नाहीं. तिनें तो विषय तितक्या पुरताच ठेवून म्हटलें ? " मग दिवाळीला येणार ना नक्की ? याच ! "

" मी आतां माझा मालक नाहीं. सुट्टी मिळाली तर येईन. "

" दिवाळीचीसुद्धां सुट्टी नसेल का ? "

" मला कांहींच कल्पना नाहीं असली तर अवश्य येईन. "

" पण सुट्टी नसेल तर रजा काढून तरी याच ! "

" बरं बघूं काय होईल तें "

इतक्यात गार्डची शिटी ऐकू आली मग अरविंद तिला म्हणाला, ' तुम्ही आतां खालीं उतरा गाडी सुटायची वेळ झाली. "

असें म्हणून तो उभा राहिला आणि तिच्या मागोमाग दारापर्यंत गेला मग कांहींवेळ दाराशीं तो तिच्याबरोबर बोलत उभा होता. नीला त्याला म्हणाली, " मी भांबुर्ड्याचं तिकीट काढलं असतं तर बर झालं असत. तिथपर्यंत तरी मी तुमच्याबरोबर आलें असतें. "

" पण तेथेंतरी निरोप घ्यावा लागणार ना ? केव्हातरी निरोप घ्यायचा ! मग इथे काय नि तिथे काय ? "

" तरीपण ....... " इतक्यात गार्डीनें मोठ्यानें भोंगा दिला आणि तिचे पुढचे शब्द त्याला ऐकूं आले नाहींत मग तो आपल्या जागेवर येऊन बसला. नीला नतर त्या ठिकाणीं बराच वेळ उभी होती स्टेशनवर तिच्याप्रमाणेंच अनेक लोक थांबले होते. त्यांपैकीं पुष्कळजण आपले हातरुमाल उंच करून हालवीत होते. पण त्या दृश्याकडे तिचें लक्ष नव्हतें ती अजून गेलेल्या गाडीकडेच बघत होती. जेव्हां गाडीनें वळण घेऊन ती दृष्टीआड झाली तेव्हा ती जागची हालली.

अरविंद डब्यांत आपल्या जागेवर येऊन बसला तरी त्याला गाडी-च्या भोंग्याच्या आवाजांत विरलेल्या नीलेच्या वाक्याचा कांहींच तर्क करतां येईना. ती आपल्याला पुढें काय म्हणणार होती ? त्यानें आपल्या मनासमोर अनेक वाक्यें उभीं केलीं. पण त्याचें समाधान कांहीं केल्या होईना. मग त्यानें तो नाद सोडून दिला आणि ओळख काढून कुणाशीं तरी बोलण्याच्या उद्देशानें तो जवळ बसलेल्या गुजराथी इसमाला म्हणाला, " तुम्हांला कुठे जायच ? "

“ तळेगांवला !— ”

“ आपण तेथें असतां वाटतं ? ”

“ नाहीं मी कालटेक्स कंपनीचा फिरता एजंट आहे. ”

“ मग तळेगावला कांही काम ? ”

“ हो तिथें थोड काम आहे. तें करून नतर मग मुबईला जाणार ” याप्रमाणें अरविंदानें बोलण्याला सुरवात करून आपलें मन निराळयाच विषयांत गुतविण्याचा प्रयत्न केला त्या गुजराथी इसमाला उत्तम मराठी बोलतां येनें याबद्दल त्याला कौतुक वाटलें आणि त्याप्रमाणें त्यानें बोलूनहि दाखविलें. “ तुम्हांला मराठी मोठ चागल बोलतां येत ! ”

“ हो. आमचा सर्व वापर तुमच्या लोकांतच आहे तेव्हां पुष्कळ संवय आहे ”

नंतर त्यानें आपल्या धंद्याविषयीं अरविंदाला पुष्कळच माहिती सांगितली शेवटीं आपल्या धद्याविषयीं बोलतांना तो म्हणाला,

“ पण आमच्या धंद्यांत तुमचे लोक फार कमी आहेत ”

“ असं कां ? ”

“ बाकी तुमचे लोक कोणताहि धंदा करण्यास फार भितात. ”

“ तें थोड खरं आहे. पण त्याचं कारण म्हणजे धद्याला लागणारं भांडवलच आमच्या लोकांजवळ नसतं. ”

“ अहो, आमच्या लोकांच्याजवळ पांच रुपये असले तर आम्ही त्याचे पंचवीस करूं. पंचवीस असले तर पांचशें करू. पण तुमच्या लोकांत ती धमकच नसते. तुम्ही म्हणतां, भांडवला खेरीज धंदा नाहीं. पण मी म्हणतों कीं धंद्याखेरीज भांडवल नाहीं. ”

त्याच्या बोलण्याचें अरविंदाला हसूं आलें शेवटीं ‘देहुरोड’ हें स्टेशन जेव्हां आलें तेव्हां त्या गुजराथी इसमानें माहितीदाखल

अरविंदाला विचारलें, "मघाशीं पुण्याच्या स्टेशनवर ज्या बाई आल्या होत्या त्या आपल्या पत्नी वाटतं ?"

"छे! त्या माझ्या वहिनी होत्या."

"माफ करा. मला तस वाटल"

अरविंद यावर "अहो, त्यात काय ?" असें जरी म्हणाला तरी त्याला त्या प्रश्नाचा जरा रागच आला. मग तळेगांव स्टेशन येई-पर्यंत तो त्या गृहस्थाशीं फारसा बोलला देखील नाहीं. आणि तो जेव्हां तळेगाव स्टेशनवर उतरला तेव्हां त्यानें डाव्या बाजूला सोड-लेल्या धोतराच्या सोग्याचा, त्याचप्रमाणें त्याच्या काळया आणि अपुऱ्या टोपीचा त्याला उगीचच राग आला. आणि आपण त्याचें नावदेखील विचारण्यास कसें विसरलों याबद्दल त्याला प्रथम जो स्वतःचा राग आला होता तो त्याच्या मनातून पार निघून गेला.

जे अप्रिय विचार टाळण्याचा त्यानें एवढा प्रयत्न केला तो त्या माणसाच्या एका प्रश्नासरशीं एकदम निष्फळ ठरला. आणि ज्या विचारांपासून बुद्धिपुरस्सर दूर राहण्याचें त्यानें ठरविलें होतें तेच विचार नेमके त्याच्या मनात पुनः पुन्हा उभे राहूं लागले. बंडखोर घोड्याचा लगाम खूप खेंचून धरून त्याला आवरण्याचा प्रयत्न केल्या-नंतर सुद्धा जर तो घोडा आवरत नसेल तर त्यावरील स्वार चिडून त्या घोड्याची खरडपट्टी काढण्याच्या उद्देशानें तो लगाम मुद्दाम सैल सोडतो व घोड्याला सैरावैरा पळण्यास परवानगी देतो त्याप्रमाणें अरविंदानें आपल्या मनातील विचाराना पहिल्याप्रथम आवरण्याचा खूप प्रयत्न करून पाहिला. पण त्याचें बंडखोर मन जेव्हां ऐकेना तेव्हा जिकड भटकेल तिकडे भटकण्याची त्यानें त्याला मुभा दिली; आणि सयमाचा लगाम दूर केला. त्याच्या मनांत नीलेसंबंधी नाना विचार आले. ते नक्की कोणत्या स्वरूपाचे होते हें त्यालाहि कळत नव्हतें. पण सिनेमागृहांत अंधार झाल्यानंतर पहिल्याप्रथम प्रेक्षकांना पडद्यावर कोणत्यातरी जाहिरातींचीं अक्षरें ज्याप्रमाणें स्पष्ट दिसतात.

त्याप्रमाणें त्या विचारांच्या मधून नीलेचें कालचें एक वाक्य अरविंदाला स्पष्ट दिसत होतें. ते वाक्य म्हणजे "पण मला वाटतं कीं घटस्फोटा-मुळें स्त्रिया अधिक सुखी होतील!"

त्याला या तिच्या वाक्याचा कांहींच अर्थ लागला नाहीं. पण त्यांत कांहींतरी भयंकर अर्थ भरला आहे असें त्याला उगीचच वाटलें, आणि त्या अर्थाची अज्ञात भीषणता लक्षांत येऊनच कीं काय तो मनांत म्हणाला, "स्त्री हें एक अगम्य कोडं आहे यांत कांहीं संशय नाहीं."

---

## प्रकरण ६

आपलें काम संपवून अरविंदानें समोरच्या घड्याळाकडे बघितलें. त्यांत साडेचार वाजलेले बघतांच तो मनाशीं म्हणाला, "छे! अजून अर्धा तास अवकाश आहे. आपण निर्मलेला साडेचारची वेळ दिली असती तर ठीक झालें असतें!" आणि मग तो अर्धा तास त्याला अर्ध्या युगाप्रमाणें वाटला. अलीकडे अरविंद पुण्याहून आल्यापासून त्याचा आणि निर्मलेचा रोज एकत्र फिरायला जाण्याचा कार्यक्रम अव्याहतपणें चालू होता त्याच्या रोजच्या कामाचा नेमानेम नसल्याकारणानें तो तिला आदले दिवशीं दुसऱ्या दिवसाच्या कामाच्या अंदाजावरून नक्की वेळ सांगत असे, आणि नेमकी त्या वेळेला निर्मलेची मोटार "विलास मिल्स"च्या गेटापाशीं येऊन उभी राहात असे. त्याप्रमाणें त्यानें तिला आज पांच वाजतां येण्यास सांगितलें होतें. पण बरोबर साडेचारच्या

ठोक्याला आज त्याचें काम संपलें होतें. तेव्हां त्याला तो राहिलेला अर्धा तास अध्यर्या युगाप्रमाणें वाटावा हें सहाजीकच होतें मग वेळ काढण्याच्या उद्देशानें त्यानें हातांत एक पुस्तक घेतलें व तें तो वाचूं लागला इतक्यांत हरिबा मुकादम आंत येऊन म्हणाला, "साहेब, बाहेर ताईसाहेब आल्या आहेत" त्यानें आश्चर्यानें विचारलें, "कोण ताईसाहेब ?"

"निर्मलाताईसाहेब"

अरविंदाला तिच्या आत येण्याचें आश्चर्यच वाटलें. कारण रोज ती स्वतः बाहेर मोटारींत बसून शंकरला आंत पाठवीत असे. पण स्वतः निर्मलाच जेव्हां खोलीच्या दाराशीं उभी राहून म्हणाली, "May I come in Sir ?" ("मी आंत येऊ का ?") तेव्हां त्याचें आश्चर्य कोठल्या कोठे मावळलें व तो म्हणाला, "yes, By all means." ("या ! या कीं !")

ती आत येतांच समोरच्या खुर्चीकडे बोट करून तो म्हणाला, "बसा."

निर्मला खुर्चीवर बसताच त्यानें म्हटलें, "आज आमच घड्याळ जरा माग दिसतंय"

यावर निर्मलेनें तिच्या नेहमींच्या स्वभावानुसार काहींतरी विनोदी उत्तर द्यायला हवें होतें. पण अजून ती गप्पच होती.

"आज सोमवार म्हणून मौनव्रत धरलं आहे वाटत ?" या अरविंदाच्या बोलण्यावर मात्र तिला आपलें हसूं आवरतां आलें नाहीं. मग कांहींसा गंभीर चेहरा करून ती म्हणाली, "अजून वीस मिनिट मला तुमच्याशीं बोलण्याची परवानगी नाहीं" असें म्हणतांच तिनें समोरच्य घड्याळाकडे कां बघितलें हें अरविंदानें तात्काळ ताडलें. कारण काल त्यानें तिला नक्की पांच वाजतां येण्यास सांगितलें होतें. तोंपर्यंत आपल्याला फार काम आहे असें सांगतांना तो तिला काल म्हणाला होता, "पांच वाजेपर्यंत मला कोणाशीं बोलायला देखील सवड होणार नाहीं."

या आपल्या बोलण्याला उद्देशून निर्मलेनें वरील वाक्य उच्चारलें

आहे हें लक्षांत येताच त्यालाहि हसू आलें मग हंसतच त्यानें तिला विचारलें, " पण मी नक्की पांच वाजतां यायला सांगितलं होतं. मग वीस मिनिटं आधीं कां आलात ? माझा इतका वेळ घेतल्याबद्दल कांहीं तरी नुकसान भरपाई पाहिजे." निर्मलेनें त्याला मध्येंच थांबवून म्हटलें " वा ! तुम्ही तर कोर्टाची भाषा बोलायला लागलांत ! "

" मग नको का बोलायला ? जें माणूस कायद्यान वागतं त्याला कायदाच दाखवायला पाहिजे "

निर्मलेनें हसून म्हटलें, "बर, बोला काय नुकसान भरपाई पाहिजे ?"

"एक म्हणजे तुम्ही आपल मौनव्रत सोडून माझ्याशीं बोलल पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे......" इतकें बोलून तो थांबला निर्मलेनें " आणखी दुसरी कोणती ? " असें विचारतांच तो म्हणाला, " थांबा सांगतोंच." असें म्हणून त्यानें आपल्या टेबलावरच्या कामाची आवरा-आवर केली. नंतर कपाट उघडून त्यानें ते सर्व कागद एका कप्प्यात ठेवून कपाट लावून घेतलें आणि मग तो म्हणाला, " हं, चला ! "

निर्मला त्याच्या मागोमाग चालू लागली ती गिरणी सुटण्याची वेळ असल्यामुळें बाहेरच्या आवारात मजुराचे जमाव ठिकठिकाणीं जमले होते. त्यापैकीं कोणी नळावर भराभर पाण्याच्या बादल्या अंगावर ओतून घेत होते, तर कोणी अघोळी करून आपले कपडे धुण्यात गुंतले होते. कांहींजण कामाचा ताण असह्य झाल्यामुळें " हुश्श्य " करीत नुसते बसले होते आणि तो ताण कांहींअंशीं कमी करण्याकरितांच कीं काय त्यांपैकीं कांहींजण आपल्या चिलमी शिलगावून एकमेकांना देऊन धुम्रपान करण्यांत गुंतले होते. एके ठिकाणीं तर मोठ्यांदा कांहींशा भांडणाच्या स्वरूपांत बोलणीं चाललीं होतीं. त्या लोकांपैकीं एकजण म्हणत होता, " आपलं तर मरणच ओढवलं आहे. साखऱ्या तर लई महाग झालाय. आणि चहाबिगर तर आपल्याला होत नाहीं." यावर दुसरा म्हणाला, " मरूं दे लेका तुझा चहा. पोटांत दाणा नाहीं आणि चहा

पितोय ! दाणा सस्ति होऊं दे म्हणजे झालं" यावर सर्वजण एकदम म्हणाले, "हां गड्या, लई अक्षी खरं बोललास."

पुढें गेल्यामुळें निर्मलेला त्यांचा पुढील संवाद ऐकूं आला नाहीं. वास्तविक आज बघितलेलीं हीं सर्व दृश्यें तिला अगदीं नवीनच होतीं. कारण आतापर्यंत तिनें स्वतःच्या गिरणींत पाऊलदेखील टाकलें नव्हतें. आप्पासाहेबांनीं सहेतुकपणें तिला या जगापासून दूर ठेवलेलें होतें. त्यामुळें त्या मजुराचा वरील संवाद ऐकून किंवा त्यांचे फाटके आणि मळके कपडे बघून किंवा प्रत्येकाच्या तोंडावरचा श्रमाचा निथळता घाम बघून तिच्या मनात नक्की कोणते विचार उभे राहिले असतील हें सांगणें कठीण आहे पण एवढें मात्र खरें कीं तिला आपण आज कोणत्यातरी नवीन जगात पाऊल टाकलें आहे असें सारखें वाटत होतें एखाद्या बालकानें कोणतीहि नवीन वस्तू बघतांच त्याच्याकडे कांहींशा कुतुहलानें बघावें आणि गोंधळून जावें त्याप्रमाणें ती तेथील प्रत्येक दृश्याकडे बघत होती आणि कांहींशीं गोंधळून गेली होती तिची ही गोंधळलेली मनःस्थिति अरविंदाच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाही. पण तोहि त्यावेळीं कांहीं बोलला नाही किंबहुना त्यानें तिला तीं दृश्यें बघण्यास आणि त्यावर कांहींतरी विचार करण्यास मुद्दामच अवसर दिला होता.

तें आवार सपतांच रस्त्याला लागूनच तेथील लोकांसाठीं जें विश्रांतिगृह आहे त्यामध्यें त्या दोघांनीं प्रवेश केल्यावर एका टेबलासमोर तीं दोघें बसलीं बसल्यावर अरविंद निर्मलेला हंसत म्हणाला, "आणि दुसरी गोष्ट म्हणजे आम्हीं दिलेला चहा घेतला पाहिजे." यावर निर्मलेनें म्हटलें, "वा ! ही छान नुकसान भरपाई आहे !"

त्यांचें चहापान लवकरच आटोपून तीं बाहेर पडलीं. मोटारीजवळ येतांच निर्मलेनें विचारलें, "कोठे जायचं ?"

"माझी इच्छा आहे कीं आपण आज मलबार हिलवर जाऊं."

"अरे बापरे ! मग उद्यांच परत यायला हवं." यावर हंसून जेव्हां तो म्हणाला, "छे ! आपण दोन तासांत सहज परत येऊं. आत्तांशा

कुठे पांच वाजले आहेत." तेव्हां ती शंकरला म्हणाली, " बरं शंकर, चल मलबार हिलकडे."

मोटार सुरू होतांच निर्मलेनें एक सुटकेचा निःश्वास टाकून म्हटलें, "सुटलें बाई त्या घाणींतून. किती घाणेरडे लोक असतात!"

"त्याना घाणेरडं राहायची हौस असते वाटतं?"

"पण मी म्हणतें, महिन्यांतून साबणाकरितां यांना एक आणादेखील खर्च करतां येणार नाही?" यावर कांहींशा विषादानें हसून अरविंदानें म्हटलें, "तुम्हांला कल्पना नाहीं. पण त्याच्यापैकी कित्येक लोक रोज अर्धपोटीं असतात. मग अशा स्थितींत ते प्रथम कपड्याकडे बघतील कीं आपल्या पोटाकडे?"

यावर निर्मलेनें कांहींच उत्तर दिलें नाहीं किंबहुना तिच्या उत्तराची अरविंदानें अपेक्षाच केली नव्हती मग तो विषय बदलण्याच्या हेतूनें त्यानें निर्मलेला विचारलें, "आज कॉलेजमधून तुम्ही लवकर कशा आलांत?"

"मी होय? मी आज नेहमींप्रमाणें लायब्ररींत न बसतां लवकर घरीं गेलें. पण घरीं आईनें सांगितलं की विद्याधर माझ्याकडे पांच वाजतां येणार आहेत. म्हणून मग घरूनहि चार वाजतांच काढता पाय घेतला!"

"असं कां बरं केलत? विद्याधर तुम्हांला भेटण्यासाठीं येणार होते मग तुम्ही इकडे निघून कां आलांत? आपला फिरण्याचा कार्यक्रम एक दिवस बुडला असता तर कांहीं हरकत नव्हती."

"त्यांच्याशीं बोलायचा हल्लीं मला कंटाळा येतो. नेहमीं त्यांचा एकच विषय."

"एक म्हणजे कोणता?"

अरविंदानें हा प्रश्न विचारतांच निर्मला क्षणभर गप्प बसली. आपण जें बोलायला नको होतें तें बोलून गेलों याबद्दल तिचा तिळाचा राग

आला. पण अरविंदाला काहींतरी उत्तर द्यायला पाहिजे; म्हणून ती एवढेंच म्हणाली, " अहो, त्यांच्या बोलण्याला विषयच नसतो. कांहीं-तरी बोलतात, आणि मग त्यांचा मला भारी राग येतो "

निर्मलेनें आपला प्रश्न टाळून उत्तर दिलें आहे हें जाणण्यास अर-विंदाला एक क्षणाचाहि अवधी लागला नाहीं मग तिच्या बोलण्यावर म्हणून त्यानें म्हटलें, "उगाच एखाद्या चांगल्या माणसावर राग करणं बर नाहीं "

अरविंदाच्या या बोलण्यावर आतापर्यंत गप्प बसलेला शंकर उपा-हासानें हसून म्हणाला, " विद्याधर ना ? फार चांगला माणूस! फार गुण आहेत त्याच्या अगांत ! मी सांगू का एक एक ? दारू पिणें, रेसेस खेळणें आणि...." पण त्याला मध्येंच थांबवून निर्मला म्हणाली, " खरच शंकर, विद्याधर दारु पितात ? मला नव्हतं माहीत ? "

" आणि तुमच्या घरात कुणाला माहीत आहे ? पण या पठ्ठ्याला बित्तं बातमी ! मला विचारा एक एक गमती ! " असें म्हणून त्यानें आपलें विद्याधर पुराण सुरू केलें तो रेसेस केव्हा खेळायला जातो, तेजीमंदी व्यवहारात तो कसा मुरलेला आहे, मुंबईत दारुबंदी झाल्या-वर कल्याणला आठवड्यातून एकदां तरी जाऊन तो कशी दारू पिऊन येतो वगैरे माहिती त्यानें देऊन टाकली. बराच वेळ चाललेलें त्याचें आख्यान ऐकल्यानतर निर्मला म्हणाली, " काय तरी बाई एक एक माणस असतात. आम्हांला कुणालाच कल्पना नव्हती. "

एखाद्या व्यक्तीविषयीं मनुष्याचें मन एकदां कलुषित झालें म्हणजे त्या व्यक्तीविषयीं वाईट गोष्टी ऐकण्यांतच त्याला मोठी गमत वाटत असते. अलीकडे निर्मलेचें मन विद्याधरविषयीं पूर्ण प्रतिकूल होत चाललें होतें. त्यांत शंकरनें सांगितलेल्या हकीकतीची अधिकच भर पडली आणि त्यामुळें त्याच्याविषयीं बोलतांना तिनें वरील उद्गार काढले असल्यास त्यांत कांहींच नवल नव्हतें. पण शंकरची माहिती ऐकून अरविंद निर्मलेला हळूच म्हणाला, " तुम्ही शंकरचं काय ऐकतां ? एक हात

लांकूड तर दहा हात ढलपी! आणि मी म्हणतों,....'' पण तेवढ्यांतच अरविंदाचें बोलणें ऐकून शंकर म्हणाला, " साहेब, तुम्हांला वाटत असेल मी थापा मारतों. पण पुरावा देऊन सिद्ध करीन. "

त्याची ती वकीली ऐट बघून दोघांनाहि हंसू आल्यावाचून राहिलें नाहीं. पुढें तो विषय तितक्यावरच थाबला. कारण मोटार मलबार हिलच्या पायथ्यापाशीं येऊन थाबली होती.

बागेंत प्रवेश केल्यानतर अरविंदाला वाटलें कीं आपण बरेच वर्षांनीं आपल्या प्रिय ठिकाणीं पुन्हा आलों आहोंत. तो गिरगावात हेमराज-वाडींत राहात असताना नेहमीं मलबार हिलवर फिरायला येत असे. पण दादरला राहायला गेल्यापासून तो या सुखाला बरेच दिवस अतरला होता. अतरित झालेलें सौख्य पुन्हा नव्यानें मिळालें असताना मनुष्याला जो एक अवर्णनीय आनद होत असतो तसा आनंद त्याला आज झाला होता. आणि दुधात साखर पडावी त्याप्रमाणें निर्मलाहि आज त्याच्याबरोबर होती. तेथील नानाप्रकारचीं फुलझाडें आणि रंगीबेरगी गवताचे निरनिराळ्या तऱ्हेनें कातरलेले पृष्ठभाग आपण अगदीं नव्यानें बघत आहोंत असें त्याला वाटत होतें. आणि मौज ही कीं त्या बघ-ण्याच्या नादांत आपल्या शेजारीं असलेल्या निर्मलेचें अस्तित्वहि तो पार विसरून गेला! तीच जेव्हा त्याला म्हणाली," तो बेड बघा. किती सुंदर आहे! तांबड्या आणि हिरव्या गवताचा मिलाफ किती मनोहर वाटतो!" तेव्हा तो आपल्या समाधींतून जागा झाला आणि म्हणाला, " तो बेडच काय, पण मला येथील प्रत्येक गोष्ट आवडते. मी पूर्वीं नेहमीं इथे येत असें. या ठिकाणीं आलं कीं मनुष्याचें कोणतेंहि दुःख नाहींसं व्हावं असंच हें ठिकाण आहे. तुम्हांला नाहीं वाटत ? "

" खरंच, आपण रोज इथेच येत जाऊं. "

" छे ! उद्यांपासून मला तुमच्याबरोबर येतां येणार नाहीं.

" कां ? "

" या फिरण्याच्या कार्यक्रमासाठीं तुमच्या महत्त्वाच्या कामांत व्यत्यय येतो. "

" कसला व्यत्यय ? मला नाहीं कळलं. "

" आजच पहा. विद्याधर तुमच्याकडे मुद्दाम येणार होते. पण तुम्ही फिरण्यासाठीं त्यांना टाळलेंत. हें बरं नाहीं. "

" ते सोडून तुम्ही दुसरं बोला त्यांचा विषयच नको. मला शकरनें ती हकीकत सांगितल्यापासून तर त्यांचा भारी तिटकारा आला आहे."

" शकरचं राहू द्या. मला वाटत नाहीं विद्याधर तसे असतील पण शिवाय तुमच्या आईला आपलं फिरणं कितपत आवडेल याची मला शंका वाटते. "

" परंतु आईला याचा मी पत्ताच लागूं देत नाहीं. "

" पण मोटार नेलेली आईला नाहीं वाटत कळत ? "

" मी घरीं सांगतें कीं मला मैत्रिणीकडे अभ्यासाला जायच आहे. माझी सहामाही परीक्षा जवळ आली आहे. आईला तें खर वाटतं आणि आप्पा मला मोटार देतात. "

आपल्या या युक्तीबद्दल अरविंद आपल्याला मोठी शाबासकी देईल असें निर्मलेला वाटलें होतें पण उलट तो म्हणाला, " हें चांगलं का ? आई वडिलांना फसवण इष्ट आहे काय ? "

मग ती जराशी चिडूनच म्हणाली, " मग मी काय माझ्या मनाला फसवूं ? "

यावर अरविंद गप्प बसला खरा. पण त्याला न कळत निर्मलेनें केलेली युक्ती त्याला खास आवडली नाहीं मग बागेच्या कडेपर्यंत तो तिच्याशीं मुळींच बोलला नाहीं. आणि त्या ठिकाणीं आल्यानंतर त्याचें लक्ष पश्चिम क्षितिजावर टेंकलेल्या सूर्यावर खिळून राहिलें. समोर पसरलेल्या समुद्राचें पाणी दूरवर क्षितिजापर्यंत दिसत होतें आणि फक्त त्या ठिकाणचेंच पाणी मावळत्या सूर्याच्या किरणामुळें सोनेरी भासत

होतें. त्यामुळें एखाद्या काळ्या कापडाच्या कडेला सोनेरी रंगाची झिलई लावल्याचा भास सहज निर्माण होत होता. त्या दृश्यावर जेव्हां अरविंदाची नजर स्थिर झाली तेव्हां त्याला वाटलें कीं जगांत सज्जनांच्या सहवासानें दुर्जनांच्यावर सद्‌गुणांचा मुलामा याच-प्रमाणें का चढूं नये ? आणि हा विचार त्याच्या मनांत येताच विद्याधर आणि निर्मला यांची जोडी त्याच्या डोळ्यांसमोर उभी राहिली निर्मलेच्या सहवासानें विद्याधरला गुणांचा उजाळा मिळेल काय ? इत-क्यांत पश्चिम क्षितिजावर टेकलेला सूर्य समुद्रांत बुडाला आणि क्षितिजाखालीं पाण्यावर पसरलेली सोन्याची कांतीहि नष्ट झाली. लगेच तो मनांत म्हणाला, " छे ! दुर्जन ते दुर्जनच ! मग त्यांना सज्जनांचा सहवास मिळो अगर न मिळो तात्पुरता त्याच्यांत फरक पडेल तेवढाच ! " अशा गभीर विचारांत तो गढला असतानाच निर्म-लेनें त्याला हाक मारली. " अरविंद, " एखाद्या स्वप्नांतून जागा झाल्याप्रमाणें तो उद्गारला

" अं ! काय ? " कांहींकाळ थांबून निर्मला म्हणाली, " अरविंद, तुम्हांला आई आठवते आपली ? "

" आईची पुसट आठवण आहे मला. पण कां ? माझ्या आईची तुम्हांला आठवण कां झाली ? "

" तुमच्या आईचं माझ्यावर भारी प्रेम होत म्हणून ! "

" होय. आप्पासाहेब तस म्हणत होते खरें."

मग बराच वेळ ती कांहीं बोलली नाहीं. तिच्या बोलण्याचा रोख मुळींच न कळल्यामुळें अरविंदही गोंधळून गप्प बसला. त्याचें कुतुहल प्रत्येकक्षणीं वाढत होतें. उलट निर्मलेच्या मनांत एकप्रकारची भीति वाढत होती. पण कांहीं झालें तरी ही संधी आपण दवडतां कामा नये असें तिला सारखें वाटत होतें. अखेर धीर करून ती बोललीच.

"अरविंद, तुमच्या आईला जें प्रेम माझ्यावर करता आलं तें तिच्या मुलाला करतां येणार नाहीं काय ?"

हें बोलल्यानंतर तिला वाटलें आपण उगाच बोललों पण तें क्षण-भरच ! उत्तराच्या अपेक्षेनें तिचे कान अरविंदाच्या बोलण्याकडे लागले होते आणि अरविंदाचें उत्तर येण्यास जो कांहीं थोडा अवधि लागला तो तिला एका युगाप्रमाणें भासला आपण सध्यां एका उच्च शिखरा-वर बसलों आहोंत असा तिला भास झाला आणि अरविंदाचें अनुकूल उत्तर जर आपल्याला मिळालें नाहीं तर आपण त्या उच्च शिखरावरून एखाद्या दरींत कोसळून पडूं असें तिला वाटूं लागलें उलट अरविंदाला त्या तिच्या प्रश्नाचें मुळींच आश्चर्य वाटलें नाहीं केव्हां ना केव्हां तो प्रश्न आपल्याला विचारला जाणार हें तो पूर्णपणें ओळखून होता. आणि त्या प्रश्नाचें उत्तरहि त्यानें मनाशीं पूर्णपणें ठरवून ठेवलेलें होतें तेव्हा तो प्रश्न येतांच त्यानें अगदीं शांतपणानें उत्तर दिलें. "निर्मलाबाई, का नाही येणार ? माझं आईवर फार प्रेम आहे आणि माझ्या आईचं तुमच्यावर भारी प्रेम होत. मग मलाहि तुमच्यावर प्रेम करतां येणार नाहीं काय ? पण......"

अरविंदाचें 'पण' पुढील बोलणें तिला ऐकूं आलें नाहीं त्याच्या प्रेमाचा प्रत्यय येतांच तिला वाटलें आपल्या शरिरांतून एखादी वीज चमकून गेली आहे. आपले कान बधिर झाले आहेत. आपल्या डोळ्यांवर एक प्रकारची गोड ग्लानी आली आहे आणि आपलें मन सुखसंवेदनेनें सुद झालें आहे. मग बराच वेळ ती त्या मधुर संवेदनेच्या स्थितींत होती. प्रेमाचा पहिला अनुभव येतांच प्रत्येक प्रणयिनीची हीच स्थिती होत असावी हें अरविंदानें ताडलें. पण फार वेळ तिला त्या स्थितींत ठेवणें शक्य नव्हतें कारण बराच अंधार पडून बहुतेक लोक निघून गेले होते. तेव्हा तो तिला म्हणाला,

"चला आपण जाऊं या."

पण अजून ती जागची न हाललेली बघतांच तो पुन्हा म्हणाला, " उठा लवकर. तुमची घरीं वाट बघत असतील."

मग ती प्रणयिनीच्या रुसव्यांत म्हणाली, " माझी एक गोष्ट ऐकली पाहिजे."

" कोणती ?"

" ऐकाल तर सांगतें."

" सांगा कीं ! माझे कान उघडे आहेत."

" इश्श्य ! तसं नाहीं. ऐकून त्याप्रमाणें केलं पाहिजे. "

" बर. सांगा तर खरी."

मग हळूच स्वरांत ती म्हणाली, " आजपासून मला एकेरी नांवान हांक मारायची. ' अहो ' नाहीं म्हणायचं."

" बर कबूल. आतां तरी उठा."

" छे ! आत्तां त्याची अमलबजावणी झाली पाहिजे तरच मी उठेन "

आणि मग एखाद्या सिनेमा कंपनींतील डायरेक्टराप्रमाणें तिनें त्याच्याकडून म्हणून घेतलें " निर्मले, ऊठ !"

नतर घरीं येईपर्यंत अरविंदाचा तो एकेरी शब्द तिच्या कानांत सारखा घुमत होता आणि त्या उन्मादकारक आनदातच तिनें घरीं पाऊल टाकलें. पण घरीं निराळीच घटना घडत होती.

ठरल्याप्रमाणें पांच वाजतां विद्याधर घरीं येऊन बसला होता. निर्मला घरीं नाहीं असें रमाबाईनें सांगतांच त्यानें विचारलें, " कोठें गेली आहे ?"

" ती रोज तिच्या मैत्रिणींकडे आभ्यासाला जाते. तिची सहामाही परीक्षा जवळ आली आहे."

मग रमाबाईनें " वर या ना. " म्हणण्याच्या आधींच तो आंत गेला. त्यानें मनाशीं कांहींतरी विचार केला. आणि मग अत्यंत गंभीरपणानें तो म्हणाला, " कसला अभ्यास चालला आहे एवढा ?"

रमाबाई हसून म्हणाल्या "मला, बाई काय माहीत तिचा आभ्यास?"

"पण मला मात्र पूर्ण माहीत आहे तिचा अभ्यास." हे शब्द त्यानें आपल्या मुखांतून इतक्या घाईनें बाहेर टाकले कीं जणूं काय थोडा विलंब झाला असता तर ते त्याच्या मुखांतून बाहेर पडले असते किंवा नाहीं अशी भीति त्याला वाटली असावी. त्याचा स्वर ओळखून रमाबाईंना भीति वाटल्याशिवाय राहिली नाहीं त्या कांहींशा काळजीच्या स्वरातच म्हणाल्या, "काय? कसला अभ्यास?" आणि आतां आपल्याला कांहींतरी भयंकर ऐकावें लागणार यांसाठीं त्यांनीं आपल्या मनाची तयारी करून ठेवली. मग एखाद्या पालीनें गरळ ओकावी त्याप्रमाणें विषयुक्त शब्द त्याच्या मुखांतून बाहेर पडले, "ती रोज अरविंदाबरोबर फिरायला जाते काल मी त्या दोघांनां बघितल. मला निराळीच शंका येते."

"खर! देव करो नि तस न घडो." असें म्हणून रमाबाईनें आपले दोन्ही हात कानावर ठेवले आपलें सावज आपल्या पूर्णपणें ताब्यांत आलेलें बघतांच त्यानें पुढें म्हटलें, "म्हणून म्हणतों, आतां शक्य तितक्या लवकर लग्न उरकून ध्याव हें बर माझे बाबा यंदाच माझ लग्न करण्याच्या विचारांत आहेत."

रमाबाईनें त्याच्या आणि निर्मलेच्या विवाहाची इच्छा पूर्वीपासूनच मनाशीं बाळगली होती. आणि ती बाळगताना त्यांची सर्व नजर त्याच्या गुणापेक्षां त्याच्या सपत्तीकडेच अधीक होती. विद्याधर एका मोठ्या जमीनदाराचा मुलगा आहे ही एकच गोष्ट तो निर्मलेचा पति होण्यास त्यांना पुरेशी होती. परंतु अलीकडे तिच्या एकंदर वर्तनावरून आपल्या इच्छेला मूर्त स्वरूप येईल किंवा नाहीं याबद्दल त्यांचें मन साशंक बनलें होतें. आणि त्यामुळें हें लग्न लवकर उरकून घ्यावें असें त्यांनाहि वाटूं लागलें होतें. त्यामुळें लग्नाचा विषय स्वतः विद्याधर-कडून निघतांच त्या म्हणाल्या, "मलाहि तसंच वाटत. आतां हे आले म्हणजे मी तुमच्या देखतच गोष्ट काढतें."

पण आप्पासाहेबांची फारशी वाट त्यांना बघावी लागली नाहीं. जवळच कोठेंतरी गेलेले आप्पासाहेब जेव्हां लवकरच घरीं आल तेव्हां रमाबाई त्यांना म्हणाल्या,

"ऐकलं का हे काय सांगतात तें ?" असें म्हणून जेव्हा त्यांनी विद्याधरकडे बोट केलें तेव्हां आप्पासाहेबांनीं त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनें बघितलें. पण पुन्हा रमाबाईनेंच बोलण्यास सुरवात करून थोडक्यांत काय ती हकीकत त्यांना निवेदन केली. परतु आप्पासाहेबाना त्या हकीकतीचें आपल्या इतकें महत्त्व वाटलें नाहीं हें कळून येतांच त्यांना मोठें आश्चर्य वाटलें पण जेव्हां रमाबाई म्हणाल्या, "तिच लग्न लवकर उरकून टाकाव हें बर" तेव्हा ते एवढेंच म्हणाले, ' सर्व गोष्टी सावकाशीनें केलेल्या बऱ्या असतात "

विद्याधरला आपला जांवई करून घेण्याबद्दल रमाबाईनें त्याच्यामागें अलीकडे बरेंच टुमणें लावलें होतें आणि विद्याधर आप्पासाहेबांना पसत नव्हता असेंहि नव्हतें. पण या विवाहाला निर्मलेची समति ही अधिक महत्त्वाची गोष्ट आहे हें ते जाणून होते. उलट रमाबाईना त्या गोष्टीची यत्किंचितहि जाणीव नव्हती हट्टानें आपला पगडा पतीवर बसविणाऱ्या ज्या स्त्रिया असतात त्या वर्गातल्या रमाबाई असल्यामुळें आप्पासाहेबाचें त्याच्यापुढें क्वचितच चाले. आताहि तसेंच झालें. रमाबाईनें जेव्हां त्यांना सांगितलें कीं निर्मलची त्यांनीं चांगली कानउघाडणी करून तिला लग्नाला तयार केली पाहिजे; तेव्हां ते नाइलाजानें म्हणाले, "बर. मी सांगतों तिला."

निर्मला आणि अरविंद मलबार हिलवर एकमेकाना आपापल्या प्रेमाची ओळख परस्परांना जेव्हां देत होते त्यावेळीं घरीं वरील गोष्टी घडत होत्या. तेव्हां निर्मला आतां घरीं येतांच आप्पासाहेबांनीं तिला दिवाणखान्यांत बोलावून घेतलें. कांहींतरी विचित्र गोष्ट घडली आहे हें तेथील एकंदर देखाव्यावरून तिनेंहि जाणलें. ती बसतांच अपापसाहेबांनीं तिला विचारलें, "कुठे गेली होतीस ?"

" फिरायला ! "

" बरोबर कोण होतं ? "

" अरविंद ! "

विद्याधरला प्रथम वाटलें होतें कीं ती उत्तर देतांना लपवाछपवी करील. म्हणून तिचें उत्तर येतांच त्याला आश्चर्यच वाटलें – नव्हे, निर्मलेला स्वतः तिनें दिलेल्या उत्तराचें आश्चर्य वाटल्यावाचून राहिलें नाहीं आपल्या अंगात कोणत्यातरी दिव्य शक्तीनें प्रवेश केला असून ती शक्तीच अपल्या तर्फे बोलत आहे असा भास तिला होत होता पण रमाबाईंना तिचा मनस्वी राग आला आणि त्या तिला म्हणाल्या, " हाच तुझा अभ्यास वाटत ? किती खोट बोललीस माझ्याशीं ? "

रमाबाईंचा रागाचा स्वर ओळखून सुद्धां तिनें म्हटलें, " आई, माणूस उगाच नाहीं खोट बोलत खोटं बोलण्यास तू मला भाग पाडलस. "

तिच्या या बोलण्यावर रमाबाईनें तिची चांगली कान उघाडणी करण्यास कमी केलें नसतें पण मध्येंच आप्पासाहेबांनीं म्हटलें, " निमाताई, तू गप्प बस " आणि नतर ते विद्याधरकडे वळून म्हणाले " विद्याधर मी नीटपणानें तिच्याशीं बोलेन. कोणतीच गोष्ट घाईनें करूं नये " असें म्हणून ते निर्मलेला घेऊन आंतल्या खोलींत गेले विद्याधरच्या मनांत या प्रसंगानें कांहींसा विषाद निर्माण झाल्याशिवाय राहिला नाहीं. आपणच या प्रसंगाला कारणीभूत आहोंत हा विचार त्याच्या मनांत येऊन क्षणभर त्याला वाईट वाटलें. पण निर्मलेवरच्या केवळ उत्कट प्रेमामुळेंच आपण ही गोष्ट केली आहे हा विचार मनांत येतांच त्याला त्याबद्दल अभिमानच वाटला शेवटीं बराच वेळ त्यांची वाट बघून तो रमाबाईचा निरोप घेऊन निघून गेला. जातांना सर्व गोष्टी नीट करण्याबद्दल रमाबाईचें आश्वासन घेऊन जाण्यास तो विसरला नाहीं.

खूपवेळ आप्पांसाहेबांच्या आणि निर्मलेच्या कानगोष्टी चालू होत्या. पण त्या गोष्टी संपल्यानतर जेव्हां निर्मला खोलीच्या बाहेर आली तेव्हां तिच्या मुखावर परमावधीचा आनंद नाचत होता. आणि मनांत ती सारखी म्हणत होती, "माझे आप्पा कित्ती चांगले आहेत!"

———

# प्रकरण ७

उमाबाईच्या पत्राप्रमाणें दिवाळींत पुण्याला आल्यानंतर अरविंदाला अनेक गोष्टींनीं वाटू लागलें कीं आपण पुण्याला येण्यात मोठी चूक केली. प्रथमच तांग्यांतून घरांत पाऊल टाकल्यानंतर आपल्या वडिलांचें दर्शन होतांच त्याला तो मोठा अपशकूनच वाटला. त्यांच्या दर्शनाचा त्याला अपशकून वाटावा असेंच नातें त्या दोघांच्यामध्यें निर्माण झालें होतें. या गोष्टीला कारणेंहि पुष्कळ होतीं. आणि तशीं कारणें त्याच्या बालपणा पासून हळू हळू घडत आलेलीं होतीं. त्याच्या आईच्या मृत्यूनतर त्याला आपल्या वडिलांची माया केव्हांच लाभली नव्हती; आणि विशेषतः त्यांनीं दुसरें लग्न केल्यापासून तर पितृप्रेमाच्या अभावाचीं चिन्हें त्याला स्पष्टपणें दिसुं लागलीं होतीं आपल्या पूर्व वयांतील एक एक प्रसंग आठवून त्याला त्याबद्दल अजूनहि चीड येत असे. दुसरें लग्न झाल्या-नंतर त्याच्या वडिलांना लवकरच एक मुलगा झाला. त्याचें कोड-कौतुक पुरविण्यांत त्या दोघांचें आपल्याकडे पूर्णपणें दुर्लक्ष होत आहे. याची जाणीव जेव्हां जेव्हां त्याच्या मनाला होई तेव्हां तेव्हां त्याला

त्याबद्दल परमावधीचें दुःख होत असे. एकदा कांहीं कारणावरून त्याचें आणि त्याच्या सावत्र भावाचें भांडण झालें होतें. वास्तविक अधिक चूक त्याच्या भावाचीच होती; पण त्याच्या नवीन आईनें आपल्या मुलाची बाजू घेऊन आबासाहेबाकडे त्याची चहाडी केली. आणि अरविंदाला त्यांच्या हातचा बेदम मार खावा लागला होता. आपली आई असती तर हा प्रसंग आपल्यावर खचित आला नसता असें त्याहि वयात त्याला वाटल्यावाचून राहिलें नव्हतें.

नंतर दुसरा प्रसंग तो मॅट्रिक झाल्यानंतरचा होता. मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर आबासाहेबांनीं त्याला बोलावून घेऊन म्हटलें होतें, "अरू, तू आता पुढें काय करणार? मला वाटतं तू हॉयकोर्ट वकीलीची परीक्षा दे. कॉलेजमध्यें जाण्यात काहीच अर्थ नाहीं माझी वकीली आहेच तुला तेव्हा कॉलेजच्या शिक्षणाचीं वयाचीं जास्त वर्षं न घालवणंच बरं तुला काय वाटतं?"

या त्याच्या बोलण्यांत वरवर पित्याचा जिव्हाळा जरी दिसत होता तरी अरविंदानें ताडलें होतें कीं आता आपल्या वडिलाची आपल्यावर जास्त खर्च करण्याची इच्छा नाहीं. कारण अदलेच दिवशीं आपल्या सावत्र आईचा आणि आबासाहेबाचा झालेला संवाद त्यानें ऐकला होता. त्याची सावत्र आई म्हणत होती, "अरू पास झाला. आता त्याला कॉलेजात का घालणार? मला नाहीं वाटत तो पुढें शिकेल त्याचं डोकं जरा कमी आहे. आपला सुधा त्याच्यापेक्षा जास्त हुषार आहे, नाहीं का? माझी तर त्याला I. C. S. करण्याची इच्छा आहे. म्हणूनच आतां फारसा खर्च करू नये. सुधालाच खूप पैसा लागेल."

यावर आबासाहेब नुसते 'हो, हो' करीत होते ते. किंबहुना तसें करण्याशिवाय त्यांना गत्यंतरच नव्हतें. कारण मथुराबाईनें घरांत आल्या पासून त्यांच्यावर आपला पगडा पूर्णपणें बसविला होता.

असे एक ना दोन! आपल्या पूर्व आयुष्यांतील अनेक प्रसंग

त्यानें आपल्या स्मृतीच्या भांडारांत सांठवून ठेवलेले होते आणि तें भांडार कांहीं कारणामुळें जेव्हां जेव्हां खुलें होई तेव्हां तेव्हां ते प्रसंग खडबडून जागे होत आणि त्याच्या मनाला क्लेश देत. अशावेळीं त्याला आपल्या वडिलांच्या बाईलबुद्धीची अनावर चीड येई मग मनाच्या अशास्थितींत त्याच्या डोळ्यासमोर त्याच्या आईची प्रेमळ-मूर्ती उभी राहून त्याला जणूं सांगत असे, " अरू, मी सदैव तुझ्या पाठीमागें आहें " आपल्या मातेच्या या स्मृतीवर तो जगला होता किंबहुना त्या स्मृतीचा आधार जर त्याच्या आयुष्यांत नसता तर त्याच्या आयुष्याचें तारूं भटकत भटकत कोणत्या तीराला लागलें असतें कोणास ठाऊक!

तेव्हां एकदर अशा परिस्थितींत आपल्या वडिलांच्या विषयीं त्याच्या मनांत एकप्रकारची अढी निर्माण व्हावी आणि त्यांच्या दर्शनाचा त्याला अपशकून वाटावा यांत अस्वाभाविक असें कांहींच नव्हतें. पण केवळ कर्तव्य म्हणून त्यानें यावेळीं त्यांना वाकून नमस्कार केला आणि म्हटलें "केव्हा आलांत ?"

" कालच आलों मी, कांहीं काम होतं. उद्या गेलच पाहिजे मला नागपूरला. तुझा किती दिवस मुक्काम आहे ?"

" मी तीन चार दिवस राहीन म्हणतों "

" अरे हो! तुला नोकरी लागल्याचं उमाबाईन सांगितल. मग मला नाहीं कळवलंस ? "

" नक्की नव्हत म्हणून नाहीं कळवलं. "

" आप्पासाहेब पुरंदऱ्यांच्या गिरणींत नाहीं का ?"

" होय त्यांची नि तुमची फार ओळख आहे ना ? "

" अरे बाबा, माझा जानी दोस्त आहे तो आणि त्याला एक मुलगी आहे ना ? काय बरं तिचं नांव ?...हो ! आठवलं ! निर्मला नव्हे का ? मोठी हुशार पोरगी आहे, काय करते रे ती आतां ? "

" ज्यूनीयर बी.ए.ला आहे "

" अस का ? मग बरीच मोठी झाली असेल ! "

" मग मुंबईला जाऊन भेटून कां नाहीं येत त्या मंडळींना ? "

" छे बाबा, मला फार काम आहे उद्यां गेलंच पाहिजे तूच चल नागपूरला आहे तुला वेळ ? "

" नाही मला दोन तीन दिवसांनीं कामावर रुजू झालच पाहिजे."

मग त्यांनी त्याला फारसा आग्रह केला नाहीं. अर्थात् अरविंदाला तें बरेंच वाटलें

नंतर त्याच दिवशीं दुपारची गोष्ट ! उमाबाईनीं बरेच दिवसांपासून अरविंदाच्या लग्नाचा हेतू मनाशीं बाळगला होता तो हेतू सफल होण्याला आता अनुकूल संधी प्राप्त झाली आहे असें वाटून त्यांनीं कालच आबासाहेबाच्यापाशीं अरविंदाच्या लग्नाची गोष्ट काढली होती आणि भटांच्या कुसूमबद्दल सुचविलें होतें इतकेंहि करून त्या थांबल्या असत्या तर ठीक झालें असतें ! पण आबासाहेबांच्या अनुमतीनें आज वधूपरीक्षेचा फार्सहि उरकून घेण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. ही गोष्ट अरविंद येण्याचे आधीं ठरली असल्याकारणानें त्यात अर्थात् त्याच्या संमतीचा भाग मुळींच नव्हता त्याचदिवशीं दुपारीं जेंव्हा त्याला त्या गोष्टी-बद्दल सांगण्यात आलें तेंव्हां धड त्याला आपला नकारहि दर्शवितां येईना आणि त्या प्रसंगाला त्याचें मनहि तयार होईना आणि मनाच्या अशा द्विधा स्थितीतच त्याला त्यादिवशीं दुपारीं भटांची कुसूम नजरे-खालून घालावी लागली.

त्यानंतर दुसरे दिवशीं एक जरा चमत्कारिकच गोष्ट घडली दुपारचें जेवण आटोपून तो बाहेरच्या दिवाणखान्यांत 'टाईम्स' वाचीत बसला होता. तो त्याठिकाणीं एकटा आहे असें बघून नीला त्याठिकाणीं आली. तो वाचण्यांत गर्क असल्यामुळें प्रथम त्याचें लक्ष तिच्याकडे गेलें नाहीं. मग नीलाच म्हणाली, "काय बातमी आहे युद्धाची ?" 'टाईम्स' वरील नजर काढून तो म्हणाला, "हें युद्ध पेटणार यांत कांहीं संशय नाहीं "

"पण तुम्हांला काय वाटतं ? अखेर कोणाचा विजय होईल ?"

"तसं जरी नक्की सांगतां आलं नाहीं तरी लोकशाहीचा विजय व्हावा ही तर माझी इच्छा आहेच. पण त्यामुळें अखेरीस आपल्या देशाचा मात्र अवश्य फायदा झाला पाहिजे तरच या युद्धात आमचा कांहींतरी भाग आहे असं आम्ही समजू"

नंतर नीलेनें त्याला युद्धासंबधीं पुढें फारसें विचारलें नाहीं किंबहुना वरील प्रश्न केवळ संभाषणास तोंड पाडण्याच्या उद्देशानें तिनें विचारले असावेत असें तिच्या मुखावरून सहज वाटण्याजोगें होतें. ती अरविंदाला कांहींतरी निराळेंच विचारणार होती परंतु सुरवात कशी करावी हें तिला समजत नव्हतें किंवा असेंहि म्हणा कीं, अरविंदाला ती जें काय विचारणार होती तें कितपत योग्य आहे, तें त्याला आवडेल किंवा नाहीं आणि न आवडलें तर त्याचा काय परिणाम होईल या गोष्टींबद्दल तिचें मन जरा—नव्हे बरेंच—साशंक झालें होतें अरविंद पुन्हा वाचनांत गर्क झाल्यामुळें तिच्या मुद्रेवरील हे भाव त्याला कळणें शक्य नव्हतें. परंतु नीलेनें जेव्हां म्हटलें, "अरविंद भावोजी, मला तुम्हाला कांहींतरी विचारायचं आहे." तेव्हा दचकून त्यानें तिच्याकडे नुसतें बघितलें. ती अजूनहि गप्प असलेली बघतांच तो म्हणाला,

"वहिनी, मला काय विचारणार आहांत ?" त्यावेळीं अरविंदाला तिच्या मुद्रेवर इतकी खळबळ दिसली कीं, त्याला वाटलें, आपल्याला आतां कांहींतरी भयकर ऐकावें लागणार आहे. पण लगेच क्षणात ती सारी खळबळ तिच्या मुद्रेवरून नाहींशी झाली आणि नंतर जरा ओशाळगत स्वरांतच ती म्हणाली, "छे ! मी कांहीं विचारणार नाहीं. मी तसं उगाच म्हटलं." असें म्हणून ती उठून एकदम बाहेर निघून गेली. अरविंद तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे नुसता बघत राहिला. एखाद्या धरणीकंपाच्या धक्क्यानें धडाधड घरें कोसळून जावींत त्याप्रमाणें त्या प्रसंगानें अरविंदाच्या मनाची शांति एकदम कोलमडून पडली आणि रात्रींच्या वेळीं विजेच्या एका चमकीनें काळ्याकुट्ट आकाशाचा

भाग स्पष्ट दाखवावा त्याप्रमाणें त्याच्या नजरेसमोर भीषण भविष्यकाळ त्या गोष्टीनें दिसूं लागला.

तेथून उठून तो बाहेरच्या पडवींत येऊन बसला पण त्याला आपले विचार मागें टाकतां आले नाहीत वास्तविक दिवाळीचे चार दिवस सर्व मंडळींच्या सहवासांत आनदानें घालविण्याच्या इराद्यानें तो पुण्यास आला होता पण त्याच्या दैवानें सकल्पच केला होता कीं काय कोणास ठाऊक ! प्रत्येक दिवशीं अशी कांहींतरी गोष्ट घडत होती कीं त्यामुळें आपण येथें उगाच आलों असें त्याला सारखें वाटत होतें आणि आतांसुद्धा बाहेर पडवींत बसल्यानतर 'लॉ कॉलेजच्या' टेकडीकडे बघत असताना त्याच्या मनांत असलेच काहींतरी विचार चालले होते. परतु इतक्यात पोष्टमन आत आला आणि त्यानें त्याच्या नांवाचें एक पत्र हातांत दिलें पाकिटावरच्या अक्षराकडे न बघताच त्याची खात्री झाली कीं तें पत्र निर्मलेचेंच असलें पाहिजे कारण मुंबईहून पुण्याला येण्याचे अदले दिवशीं तीं दोघें अरविंदाच्या खोलींत बोलत बसलीं होतीं निर्मलेनें दिवाळींत मुबईला राहण्याचा जेव्हा त्याला खूप आग्रह केला तेव्हां तो म्हणाला होता, "छे ! मला पुण्याला गेलच पाहिजे. माझ्या मावशींनीं मला खूप आग्रहानं बोलावल आहे" यावर निर्मला म्हणाली होती, "आमच्या पण मावशींनीं मला आग्रहाचं आमत्रण दिल आहे"

"तुला मावशी आहे ?"

"हो; लोणावळयाला असते ती."

"अस्सं ? मला नाहीं कधीं बोललीस ?"

"इश्श्य ? बोलायचं काय त्यांत ? विषयच निघाला नव्हता. बरं तें जाऊं दे. पण मग दिवाळींत पुण्याला नाहीं जायच गडे."

"छे ! तें शक्य नाहीं. मावशी माझ्यावर उगाच रागवेल."

"नाहींतर आपण अस करूं पुणंहि नको नि मुंबईहि नको. आपण दोघं लोणावळयालाच जाऊ. येतां ? खूप गमत येईल."

असें म्हणून किती उत्सुकतेनें तिनें अरविंदाकडे बघितलें होतें. परंतु अरविंदाला अखेरीस तिची निराशाच करावी लागली होती. शेवटीं रडकुंडीला येऊन तिनें म्हटलें होतें, "बरं, निदान पत्र तरी पाठवीत जा. नाहीतर जाल लाडू करज्यांत गर्क होऊन! हो. तुम्हाला काय आमची आठवण राहणार? तुमची प्रेमळ मावशी आहे आणखी..." यावर अरविंदानें तिच्या बोलण्यांतील रागाचा स्वर ओळखून म्हटलें होतें, "बर कबूल, अगदीं रोज एक पत्र पाठवीन. पण तुलाहि ही अट लागू आहे बर का?"

तेव्हां तें पत्र निर्मलेचेंच असलें पाहिजे यात काहीं सशय नव्हता. ठरल्याप्रमाणें त्यानें एकहि पत्र न धाडल्याबद्दल त्याची हजेरी घेऊन तिनें पुढें लिहिलें होतें.

"रोज तुमच्या पत्राची वाट बघून निराश झालेल्या मनाला तुमची तीव्रतेनें आठवण येते. एखादे वेळीं असं सुद्धां वाटतं कीं एकदम उठून पुण्याला जावं, आणि आपली भेट घ्यावी. त्यामुळें दिवाळींत माझं कशांतच मन नव्हतं. तुम्ही इथून गेल्यानंतर त्याच दिवशीं मी इतर बायकांबरोबर फराळाचे पदार्थ करण्यास बसलें होतें करंज्यांत सारण भरून तळण्याचं काम माझ्याकडे होतं पण एक करजी मी सारण भरल्याशिवायच तळून काढली. करंजी तळून बाहेर काढतांच सर्व बायका हंसायला लागल्या. मग आई म्हणाली, 'निमाताई, तुझं लक्ष नाहीं का?' मग कांहींतरी सबब म्हणून मी म्हटलं, "आई, माझं डोकं दुखत आहे" ती थाप पचून मी माझ्या खोलींत जाऊन स्वस्थ पडून राहिलें.

काल आमच्या घरच्या सर्व मंडळींना विद्याधरनीं चहाफराळासाठीं आमंत्रण दिलं होतं. पण प्रकृति बरी नसल्याच्या सबबिवर मीं घरींच राहिलें. मग संध्याकाळीं घरीं येऊन मला म्हणतो कसा, 'आतां काय तुम्ही ॲसिस्टंट मॅनेजरीणबाई झालांत. आतां कशाला याल आमच्या गरिबाच्या घरीं?' या बोलण्यावर मीं त्यांची खूप खरडपट्टी काढली. आपलं जें नातं त्यांनीं जोडलं त्यांत मला

केव्हांहि अभिमानच आहे पण त्याच्या उच्चाराबरोबर तें नात जणू काय विटाळेल या भावनेनं मी त्याला बोललें. कारण अलीकडे त्यानीं केलेली कोणतीच गोष्ट मला आवडत नाहीं आपण मलबार हिलवर ज्या दिवशीं फिरायला गेलों होतों त्या दिवशीं त्यांनीं आपली चहाडी केल्यापासून माझ्या मनांतून तो पूर्णपणें उतरला आहे. तेव्हां त्याची कोणतीच कृति मला आवडू नये यांत माझा दोष आहे का !

माणूस जवळ असतांना त्याची खरी किंमत कळत नाहीं तें दूर गेलं म्हणजेच त्या माणसाची खरी किंमत कळू लागते यांत कांहीं खोटं नाहीं. आपण पुण्याला गेल्यापासून या गोष्टीचा मला सारखा अनुभव येत आहे अरविंद, आपणांस आपल प्रेम अजून किती दिवस अज्ञातवासात ठेवावं लागणार आहे कुणास ठाऊक ! माझ्या अलीकडे पुष्कळ वेळां मनांत येत कीं आपल्या प्रेमाची परिस्फुटता सर्वांच्यापुढें करून टाकावी पण मला आईची भारी भीति वाटते तिची सर्व नजर विद्याधरवर खिळून आहे आपल्या प्रेमाचा पुसट सशय तिला नाहीं अस नाहीं. पण तिची तशी खात्री होतांच एखाद्या वाघिणीसारखी ती माझ्यावर तुटून पडल्याखेरीज राहणार नाहीं. आपल्या आईला वाघिणीची उपमा दिल्याबद्दल तुम्ही मला खचित दोष द्याल पण त्यामुळें सत्य थोडंच लपणार आहे ? या बाबतींत आप्पांचीच मला मदत झाली तर होईल. पण आईच्यापुढें आप्पांच कितपत चालू शकेल याची मला शंकाच वाटते आप्पांना संदिग्ध स्वरूपांत मीं खूप गोष्टी सांगितल्या आहेत. त्यावर ते म्हणाले सुद्धां आहेत कीं....छे! पण ते काय म्हणाले हें सध्यां नाहीं मी सांगणार

तेव्हां अशा स्थितींत माझा मलाच जोर धरला पाहिजे आणि आपल्या प्रेमाची पूर्ती करण्यासाठीं मला तें केलच पाहिजे " आणि अखेर पत्राच्या शेवटीं तिनें म्हटलें होतें, " अरविंद, रोज पत्र पाठविण्याच अश्वासन देऊन एकहि पत्र न धाडल्याबद्दल मी तुमच्यावर खूर रागावलें आहे. त्याबद्दल इथे आल्यानंतर मी तुमची खाशी हजेरी

घेईन. पण हो ! असं म्हटल्यानंतर तुम्ही लवकर येणार नाहीं. छे ! मी तुमच्यावर मुळींच रागावलें नाहीं. तुमची रोज किती किती वाट बघत आहें. लवकरच या. ”

अरविंदानें हें पत्र जवळजवळ तीनदां वाचलें. पण तरीसुद्धां त्याचें समाधान झालें नाहीं शेवटीं पत्र वाचून पाकिटांत ठेवतानासुद्धां पत्रा-आरंभी असलेल्या “ प्रिय अरविंद, ” आणि पत्राशेवटीं असलेल्या “ आपलीच निर्मला ” या अक्षरांवर पुनः पुन्हा नजर टाकण्यास तो विसरला नाहीं. पाकिटांत पत्र ठेवतांनाच उमाबाई आपलें सर्व काम आटोपून बाहेर आल्या आणि त्याच्या शेजारी बाकावर बसतांना म्हणाल्या,

“ कुणाच रे पत्र ? ”

पाकीट आपल्या शर्टच्या खिशांत ठेवतांना त्यानें उत्तर दिलें. “ आप्पासाहेबांचं ! ”

“ काय आहे ? ”

“ मला लवकर बोलावलं आहे ”

“ कधीं ? ”

“ उद्यांच ! ”

त्यानंतर जरा वेळ तो गप्प बसला. जणूं काय उमाबाईशीं आपण खोटें बोललों याच्या निषेधार्थ त्यानें थोडा वेळ गप्प राहण्याचें ठरविलें होतें ! मग उमाबाईच त्याला म्हणाल्या, “ उद्यां तुला कामच असेल तर जा. पण जातांना कुसूमबद्दल आपली पसती नापसंती सांगून जा. आज सकाळीं त्यांनीं मला विचारलं आहे. ”

यावर खिशांत ठेवलेलें पत्र त्यानें चांपसून बघितलें. जणूं काय उमाबाईच्या त्या प्रश्नासरशीं तें पत्र आणि त्याबरोबरच त्या पत्रांतील निर्मलेचें प्रेम एकदम नाहींसें होईल अशी भीति त्याला वाटली असावी. उमाबाई उत्तराच्या अपेक्षेनें त्याच्याकडे बघत होत्या. भटांची कुसूम इतकी सुंदर होती कीं ती अरविंदाला नापसंत असणें शक्यच नाहीं

असें त्याना वाटत होतें इतकेंच नव्हे तर तिच्या वडिलांना कालच त्यानीं अर्धवट तसें अश्वासनहि देऊन ठवलें होतें त्यामुळें आपल्या प्रश्नाला उत्तर देण्यास तो एवढा विलब कां लावीत आहे याबद्दल उमा-बाईना काहीच कल्पना करतां येईना आणि त्यांच्या प्रश्नाला काय उत्तर द्यावें हें अरविंदालाहि सुचेना

—:०:—

# प्रकरण ८

प्रेमाच्या मार्गांत अडथळे आले नाहींत तर तें प्रेमच नव्हे असें जें कुणी म्हटलें आहे तें कांहीं खोटें नाहीं अमक्या दिशेनें आपल्यावर सकट येईल म्हणून मनुष्यानें त्या दिशेचा कडेकोट बदोबस्त करून ठेवावा आणि नेमकें दुसऱ्याच दिशेनें अनपेक्षित संकट त्याच्यावर येऊन कोसळावें अशी स्थिति सध्यां निर्मला आणि अरविंद यांच्या प्रेमाच्या बाबतींत झाली होती वास्तविक त्यांच्या मार्गांत विद्याधर हा एकच मोठा अडथळा होता. पण सध्यां दुसरें एक नवीनच संकट त्यांच्या प्रेम-आकाशाच्या क्षितिजावर डोकावू पहात होतें.

महायुद्धाचें रणशिंग ऐकल्यापासून अरविंदाच्या मनाची स्थिति मोठी चमत्कारिक बनली होती. आपल्या देशासाठीं आपण कांहींतरी केलें पाहिजे असें त्याच्या मनांत पुनः पुन्हा येत होतें. तशी वेळ आतां प्राप्त झाली होती. वटहुकूम काढून व कांग्रेस मंत्रिमंडळाच्या राजिनाम्याची पर्वणी साधून हातीं घेतलेल्या सर्वाधिकाराच्या जोरावर ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानांत रंगरूट भरतीची मोहीम जोरानें सुरू केली होती. युद्धोपयोगी मालाला अफाट मागणी येऊं लागल्यामुळें व्यापार-

धंद्याला फार तेजी होती आणि धान्याचे व इतर सर्व वस्तूचे बाजार कडाडल्यामुळें गरीब वर्गाचे कल्पनातीत हाल होत होते ठिकठिकाणीं कामगार - किसानाच्या महागाई विरुद्ध परिषदा भरत होत्या मुंबईच्या कामगारांनी या बाबतींत पुढाकार घेऊन डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात एक प्रचंड परिषद भरविली होती. हजारों कामगारांनीं या परिषदेला पैपैशाची मदत करून पगारात चाळीस टक्के वाढ जर ताबडतोब करण्यात आली नाहीं तर सार्वत्रिक संप घडवून आणू, अशी सरकारला ताकीद दिली होती. सन १९१४ व १९३९ या सालातील परिस्थितीचा हा फरक लक्षांत ठेवण्यासारखा होता. गेल्या महायुद्धाचे वेळीं वस्तूंचे भाव शेंकडा दोनशें टक्के वाढले होते परंतु कामगारांची हूं कीं चू करण्याची त्याकाळीं हिंमत नव्हती. आपले हाल मुकाट्यानें ते सहन करीत होते. या वेळचे कामगार इतक्या लढाऊ वृत्तीचे झाले होते कीं त्यांच्या मागण्या पुऱ्या न करण्याची हिंमत भांडवलवाल्याना किंवा सरकारला होईल असें मुळींच वाटत नव्हतें. महागाईवर तोडगा म्हणून सरकार जिन्नस व धान्य यांच्या भावावरच नियंत्रण घालण्याचें ठरवीत होतें. युद्धाच्या संधींत शेतकऱ्याना आपल्या मालाला भाव येत असला तर तो सरकारनें अशा तऱ्हेनें नियंत्रित करावा हें उचित नव्हतें. सट्टेबाजी स्वरूपाच्या नफेबाजीवर नियंत्रण घालणें हें योग्य होईल व त्याबरोबरच कामगारांना महागाईभत्ता मिळण्याची योजना अमलात आणावी अशा प्रकारच्या सूचना सरकारला मिळूं लागल्या होत्या.

तेव्हां अशा स्थितींत आपल्याला गप्प बसतां येईल असें अरविंदाला केव्हांच वाटलें नाहीं. त्यानें या बाबतींत आपला मार्ग आखला आणि डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत भरलेल्या परिषदेला तो हजर राहिला. आप्पासाहेबांना ही गोष्ट अर्थात् कळली नाहीं. पण नेहमीं त्याच्या पाळतीवर असलेल्या विद्याधरला ती कळल्याशिवाय राहिली नाहीं. अरविंदाच्या प्रत्येक बाबतींत चहाडी करण्याचें जें कार्य त्यानें

अलीकडे बरेच दिवस आरंभिलें होतें त्याला अनुसरून याहि बाबतींत आप्पासाहेबांकडे चहाडी करण्यास तो विसरला नाहीं. या त्याच्या उपक्रमानें तो रमाबाईच्या आणि काहीं अंशी आप्पासाहेबाच्या मनात जास्त जास्त भरत चालला असला तरी निर्मलेच्या मनांतून तो पूर्णपणें उतरत चालला होता परंतु अरविंदाच्या द्वेषानें आणि निर्मलेच्या प्रेमानें अंध झालेल्या विद्याधरला ही गोष्ट मुळींच कळत नव्हती. तेव्हा या बाबतींत चहाडी करताच आप्पासाहेब त्याला म्हणाले, " तो परिषदेला हजर राहिला असेल अस मला वाटत नाहीं. "

" मीं प्रत्यक्ष डोळयांनीं बघितल. मग आणखी कोणता पुरावा पाहिजे ? "

यावर रमाबाई म्हणाल्या, " खरच असल पाहिजे याना खोटं सागून काय मिळणार आहे ? "

निर्मलेला या गोष्टीची काहींच कल्पना नव्हती. त्यामुळें तिला गप्प बसणेंच भाग होतें पण जेव्हां रमाबाई आप्पासाहेबांना म्हणाल्या, " मला वाटत तो आपल्या नोकरीवर नसलेला बरा. हें काय भलतंच ? एखाद्या घरचं अन्न खायचं आणि त्याच घरचे वासे मोजायचे ! " तेव्हा तिला आपल्यावर कांहींतरी संकट येणार आहे असें वाटल्या-शिवाय राहिलें नाहीं. मग आप्पासाहेबानीं म्हटलें, " बघू काय भान-गड आहे ती !

त्यालाच विचारूं आल्यावर ! "

ती त्याची नेहमींची घरीं येण्याची वेळ असल्यामुळें त्यांना त्याची फार वेळ वाट बघावी लागली नाहीं. तो घरीं येतांच आप्पासाहेबांनीं त्याला दिवाणखान्यांत बोलावून घेतलें. तो एका खुर्चीवर बसतांच आप्पासाहेब म्हणाले, "काय अरविंद, हे विद्याधर म्हणतात तें खरं का ?"

विद्याधरकडे बघून अरविंदानें विचारलें, " काय ?" पण विद्याधर कांहींच बोलला नाहीं. मग आप्पासाहेबांनींच पुढें बोलण्यास सुरवात

ळी, "आपण काल कामगार परिषदेला हजर राहिलांत ही गोष्ट खरी का?"

"अगदीं खरा!"

"कां? आपणाला तें योग्य वाटतं का?"

"त्यात अयोग्य काय आहे?"

"राज्यांत राहून राजाविरुद्ध बंड पुकारायचं?"

"अवश्य! राजा जर अन्यायी असेल तर त्याच्या अन्यायाविरुद्ध बंड पुकारणं हेंच प्रजेचं खरं कर्तव्य आहे."

"पण आम्ही मालकांनीं मजुरांच्याविरुद्ध कोणता अन्याय केला आहे?"

"त्यांना महागाईभत्ता मिळणं अवश्य नाहीं? आवश्यक वस्तूंचे भाव केती कडाडले आहेत याची आपणांस कल्पना आहे काय?"

"होय. म्हणूनच आम्ही त्यांना धान्य स्वस्त मिळावं अशी व्यवस्था केली आहे."

"त्यामुळें कामगार वर्गाचें थोडेसें हित करीत आहांत ही गोष्ट खरी. पण तेवढ्यानेंच त्यांच्या सर्व गरजा भागतील काय?

"मग आम्हीं आणखी काय करावं असं आपलं म्हणणं आहे?"

"महागाईभत्ता वाढवा. त्यामुळें कामगार सुखी होतील."

यावर आप्पासाहेबांना अर्थात् गप्प बसणें भाग होतें परंतु गप्प बसल्यास पर्यायानें आपण आपला पराभव कबूल करीत आहोंत असें होईल; म्हणून ते म्हणाले, "अरविंद, तुम्हांला अजून त्यातलं गम्य नाहीं. तुम्हीं फक्त वरवर विचार केलेला आहे. उलट आम्हीं मालकांनीं त्यावर खूप विचार करून गोष्टी ठरविल्या आहेत."

"पण बहुजन समाजाला पटेल तोच विचार नव्हे काय? आपला विचार सर्वांना पटण्यासारखा आहे काय? मग तो विचार कीं अविचार?"

या अरविंदाच्या बोलण्यावर आप्पासाहेब जरासे चिडूनच म्हणाले, "अरविंद, तुमच्याशीं वादविवाद करण्याची माझी इच्छा नाहीं. पण एक गोष्ट खरी कीं नोकरीवर राहून तुम्हांला हे उद्योग करतां येणार नाहींत"

"पण नोकरीवर राहिलेंच पाहिजे असा कांहीं माझा आग्रह नाहीं तुम्ही मालक आहांत मी अगदींच मजूर नसलों तरी आपला नोकर आहें मला तुम्ही केव्हांहि नोकरीवरून दूर करूं शकतां"

हें बोलताना त्याची ध्येयाविषयीं कळकळ, मजुराविषयीं जिव्हाळा, नोकराच्या गुलामगिरीबद्दल तिरस्कार आणि लाचारी सोडून स्वतःच्या स्वाभिमानाला जागण्याची दक्षता ह्या गोष्टी निर्मलेला त्याच्या बोलण्यांत दिसल्यावाचून राहिल्या नाहींत आणि त्याचबरोबर तिला वाटलें कीं तो हें सर्व बोलला नसता तर ठीक झालें असतें. आतां त्याच्या बोलण्यावर आप्पासाहेब काय उत्तर देतात इकडे तिचें लक्ष लागलें होतें. आप्पासाहेब वरवर शांतपणाचा आव आणून म्हणाले, "अरविंद, मला वाटतं अशा स्थितींत आपलं नोकरीवर निभणार नाहीं."

"कांहीं हरकत नाहीं मी आत्तां राजिनामा देतों." असें म्हणून तो जागचा उठला, आणि दाराकडे जाण्यास निघाला. त्याला थांबवून आप्पासाहेब म्हणाले, "आज रात्रभर नीट सर्व विचार करून काय तें ठरवा."

पण याला त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं तो सहजासहजीं राजिनामा देण्यास तयार होईल असें आप्पासाहेबांना मुळींच वाटलें नव्हतें. आणि त्याचा निश्चयात्मक स्वभाव त्याच दिवशी निर्मलेला कळून आला तिला तो प्रसंग अगदींच अनपेक्षित असा होता. चांदण्यारात्रीं सहल करण्यास निघावें आणि आकाश अगदीं निरभ्र असतांना कोठून-तरी भराभर ढग जमा व्हावेत आणि विजांचा कडकडाट होऊन प्रचंड जलवृष्टि व्हावी त्याप्रमाणें तिची स्थिति झाली होती. काय करावें हें तिच्या गांगरलेल्या मनाला मुळींच सुचेना. परंतु या बाबतींत आपण

कांहींतरी केलें पाहिजे हें ती जाणून होती. आणि त्याच रात्रीं तिनें अरविंदाच्या खोलींत प्रवेश केला अरविंद कॉटवर पडून होता. टेबलाचा दिवा तसाच जळत होता. तिला त्या दिव्याचा प्रकाश उगाचच जास्त रखरखीत वाटला. खुर्ची ओढून ती त्याच्या कॉटजवळ जाऊन बसली. आणि हळूच तिनें त्याला हाक मारली " अरविंद, "

" कोण ? निर्मला ?"

" होय. मीच आहें."

" निर्मले, का आलीस ? यावेळीं तूं येथें यायला नको होतंस."

" कां ?"

" यापुढें आपली कायमची ताटातूट होणार आपण आतां एकमेकां-पासून दूर राहायला शिकलं पाहिजे "

"पण मी म्हणतें, आपली ताटातूट टाळता येणं शक्य नाहीं काय ?"

" छे ! तें मला शक्य दिसत नाहीं "

" आहे शक्य. आपण यापुढें मजुराच्या चळवळींत न पडण्याची शपथ घेतलीत तर आप्पा तुम्हाला अजूनहि क्षमा करतील आणि मग..."

पण मध्येंच तिला थांबवून बऱ्याच चिडक्या स्वरात तो म्हणाला, " मी माझ्या पवित्र ध्येयापासून परावृत्त होऊन लाचार कधींच होणार नाहीं."

" आणि मी आपल्यापासून कधींच दूर राहू शकणार नाहीं. तेव्हां आपल्या प्रेमासाठीं तुम्हाला तसं करायला काय हरकत आहे ?"

" निर्मले, मी प्रेमासाठीं वाटेल तें करीन. पण अपमान कधींच सहन करणार नाहीं. मला प्रेम हवं आहे. पण तें उच्च स्थितींत राहून पाहिजे आहे. प्रेमासाठीं मी खालीं कधींच बघणार नाहीं."

" तुमचं ठीक आहे. पण मी काय करूं तें सांगा ?" या तिच्या प्रश्नाला त्याला कांहींच उत्तर देतां आलें नाहीं. तो वेड्यासारखा तिच्या-

कडे नुसता बघत राहिला. मग जागेवरून उठून जवळ जवळ ओरडूनच तो तिला म्हणाला, " निर्मले, तूं बाहेर हो. मला मोह पाडून माझ्या ध्येयापासून मला परावृत्त करू नकोस. तू कांहींही कर. पण येथून बाहेर हो. ऊठ एका क्षणाचाहि विलंब मला सहन होणार नाहीं." त्याच्या बोलण्यांतील तो आवेश बघून निर्मला भयभीत होऊन जागेची उठली आपल्या विनवणीचा त्याच्यावर कोणत्याहि प्रकारचा परिणाम झाला नाहीं याबद्दल तिला परमावधीचें दुःख झालें आणि त्याच्या शेवटच्या बोलण्यानें त्या दुःखाचा कडेलोट होऊन आपल्याला रडू कोसळतें कीं काय अशी तिला भीति वाटू लागली. ती उठून बाहेर दारापाशी आली आणि जवळजवळ रडक्या स्वरातच त्याला म्हाणाली, " अरविंद, तुम्ही नोकरी सोडून जाणार कुठे हें तरी मला सांगा. नाहीं म्हणू नका "

यावर तो म्हणाला, " परत पूर्वीच्या ठिकाणीं ! हेमराज वाडींत !" या त्याच्या बोलण्यावर ती फक्त एवढेंच म्हणाली,

" अरविंद, मला विसरू नका."

पण तिला उत्तर न देता धाडदिशीं त्यानें दार लावून घेतलें ती गेल्यानंतर मात्र त्याला वाटू लागलें की, आपण तिला असें म्हटलें असतें तर ठीक झालें असतें कीं "निर्मले, मी तुला केव्हांहि विसरणार नाहीं " परतु हा विचार फक्त क्षणभरच त्याच्या मनांत टिकला पुन्हा त्यानें विचार केला की झालें तें ठीकच झालें ! आपण आपल्या प्रेमाच्या भावनेवर केव्हांहि विजयच मिळविला आहे ! ध्येय आणि प्रेम यांच्या-मध्यें आपण ध्येयाचीच कास धरून उचित अशीच गोष्ट केलेली आहे ! एकीकडून या त्याच्या विजयाबद्दल स्वतःचें त्याला मनस्वी कौतुक वाटलें पण जेव्हां त्याचें प्रेमी मन जागें झालें तेव्हां तें आपली सारखी अवहेलना करीत आहे असा भास त्याला रात्रभर होत होता. सकाळ झाल्यानंतर निर्मलेची माफी मागून आपण पुन्हा तिचें प्रेम

संपादन करावें असाहि विचार पुष्कळवेळां त्याच्या मनांत येऊन गेला. पण सकाळ झाल्यावर त्याच्या हातून निराळीच गोष्ट घडली.

प्रातर्विधि आटोपून आप्पासाहेब दिवाणखान्यांत नुकतेच येऊन बसले होते. अदले दिवशीं रात्रीं विद्याधर घरीं गेला नव्हता. तेव्हां तोहि त्याठिकाणीं आप्पासाहेबाशीं बोलत बसला होता. निर्मला अजून उठलीच नव्हती. सबंध रात्रभर विचाराचा ताण असह्य झाल्यामुळें तिला रात्रभर झोप लागली नव्हती. शेवटीं खूप विचार करून जेव्हां तिचें मन थकलें तेव्हां पहाटेच्या सुमारास तिचा थोडासा डोळा लागला होता त्यामुळें ती वरच आपल्या खोलींत बिछान्यावर पडून होती. अशावेळीं अरविंदानें एक राजिनामा लिहून तयार केला आणि दिवाणखान्यांत बसलेल्या आप्पासाहेबांना नेऊन तो सादर केला

त्यावेळीं त्यांनीं अरविंदाला पुन्हा म्हटलें, "अरविंद, तुम्ही पुन्हा विचार करा मनुष्यानें कोणतीच गोष्ट अविचारानें करू नये."

यावर अगदीं शांतपणानें तो म्हणाला, "आप्पासाहेब, तुमच्या सल्ल्याबद्दल मी तुमचा आभारी आहें पण मीं सर्व बाजूनें नीट विचार केलेला आहे."

"मग कांहीं हरकत नाहीं. आपली मर्जी !"

नंतर स्वयपाकघरांत जाऊन त्यानें रमाबाईना वांकून नमस्कार करून म्हटलें, "बर मी येतों."

यावर जणूं खऱ्याखुऱ्या आश्चर्यानेंच त्या उद्गारल्या !

"हें काय ? मला नव्हत माहीत तुम्ही लगेच निघालांत ?"

"होय." आणि नंतर कांहीं विचार करून तो पुढें म्हणाला, "निर्मलाताईना सांगा मी गेलों म्हणून !"

"अजून ती उठली नाहीं का ? थांबा हं, बघतें. वामन, बघ वर निमाताई उठली का ?"

"नको; त्याना उठविण्याची गरज नाहीं मी येतों" असें म्हणून तो पुन्हा दिवाणखान्यांत आला बाहेर जातांना विद्याधर त्याला म्हणाला, "वर ओळख ठेवा आमची." यावर "तुमची तर चागलीच ओळख राहील!" असे तो मनांत खचित म्हणाला असेल. पण वर वर मात्र त्याला निराळेंच म्हणणें भाग होतें त्यानें म्हटलें, "हो तर. ओळख का नाहीं ठेवणार?"

दाराच्या बाहेर पडतांना त्याला वाटलें आपली आणि निर्मलेची गाठ झाली नाहीं हें एक प्रकारें ठीकच झालें! पण हा विचार त्याच्या मनात ज्यावेळीं येत होता त्याचवेळीं आपल्या बिछान्यावर पडलेल्या निर्मलेला निराळेंच स्वप्न पडत होतें. ती आणि अरविंद एका अत्यत सुदर रस्त्यावरून फिरत चाललीं होतीं प्रेमाच्या गप्पागोष्टी बोलत-बोलत तीं त्या रस्त्यावरून खूपच दूरवर गेलीं पण पुढें तो सुदर रस्ता सपून एकदम एका मोठ्या भयंकर अरण्याला सुरवात झाली निर्मलेनें घाबरून जाऊन सभोवार बघितलें. पण तिला कळून आलें कीं अरविंद सुद्धा तिच्या जवळून कोठेतरी नाहींसा झालेला आहे आणि मग भीतीनें गागरून जाऊन ती खूप मोठ्यानें ओरडणार होती पण तिला धड ओरडताहि येईना. अशा स्थितींत ती जागी झाली आपल्याला काहीं-तरी वाईट स्वप्न पडलें आहे हें तिनें जाणलें कारण डोळे उघडून बघ-नाच पूर्वेला सूर्याची कोंवळी किरणें आंत खोलींत पसरलेलीं तिला दिसलीं. मग मनाशींच "काय बाई उशीर झाला!" असें म्हणत ती उठली आणि खाली गेली तोंड धुतानासुद्धा त्या स्वप्नाची भीति तिच्या मना-तून निघून गली नव्हती. वाईट स्वप्न दुसऱ्याला सांगतांच त्याचा परिणाम नाहींसा होतो असें तिनें कुठेंतरी ऐकलें होतें. त्यामुळें चहा घेण्यासाठीं पाटावर बसतांच अगावर शहारे आल्यासारखें करून ती रमाबाईंना म्हणाली, "आई, मला भयंकर स्वप्न पडलं!"

"कसलं ग?"

"स्वप्नांत मला एक मोठं अरण्य दिसलं त्याठिकाणीं फक्त मी

एकटीच होतें. मग मला भयकर भीति वाटली!" स्वप्न सांगतांना अरविंदाचा उल्लेख तिनें मुद्दामच टाळला. स्वप्न ऐकून रमाबाई म्हणाल्या,

"अग, खूप पडतात असलीं स्वप्नं!"

"पण आई, खरीं होतात का ग तीं?"

"छे ग! दिवसा आपल्या मनांत कांहींतरी विचार येतात. आणि मग रात्रीं त्यांचींच स्वप्नं पडतात."

तिचें चहापान झाल्यानंतर रमाबाई तिला म्हणाल्या, "निमाताई तुला कळलं का?"

"काय?"

"अरविंद सकाळीं राजीनामा देऊन निघून गेले."

"खरच!" हा एकच उद्गार तिनें तोंडावाटे बाहेर काढला आणि तिनें मनांतल्या मनांत म्हटलें,

"अखेर माझ स्वप्न खरंच ठरलं तर!"

---

## प्रकरण ९

अरविंद गेल्यापासून निर्मलेची स्थिति मोठी केविलवाणी झाली होती. एखाद्या यंत्रामधून अगदीं आवश्यक भाग नाहींसा झाला म्हणजे त्या यंत्राला जशी शिथिलता प्राप्त होते त्याप्रमाणें निर्मलेच्या प्रत्येक हालचालीमध्यें एकप्रकारची शिथिलता निर्माण झाली होती तिचें मन कशांतच रमत नव्हतें. अरविंदाबद्दल ती वेड्यासारखे विचार करी आणि त्याच विचारांत तिचे तास न् तास रोज खर्च होत.

आपल्या प्रेमाला मूर्त स्वरूप केव्हांच येणार नाहीं याबद्दल आतां तिला फारशी शंका उरली नव्हती कारण रमाबाई आपल्या लग्नाला समति देणार नाहींत याची तिला खात्री पटली होती. तिला आतां-पर्यंत आप्पासाहेबांचा मोठा अधार वाटत होता. आणि त्यांच्या सहाय्यानें आपण आपल्या प्रेमाला केव्हां ना केव्हां तरी मूर्त स्वरूप आणू शकूं असें तिला वाटत होतें परतु अरविंदानें मजुरांची बाजू घेऊन मालकांच्या विरुद्ध बड पुकारण्याची जेव्हां सिद्धता केली तेव्हां तिची तीसुद्धा आशा नष्ट झाली होती. इतकेंहि करून जर अरविंदानें जोर धरला असता तर आपल्या आईवडिलांच्यां मनाविरुद्ध जाऊन तिनें आपला हेतू तडीस नेण्यास कमी केलें नसतें. पण नोकरी सोडून जाण्याच्या आदले दिवशीं त्यानें तिच्याशीं जें तुटक वर्तन केलें होतें त्यावरून तिनें त्याहि मार्गाची आशा सोडली होती तेव्हां आपण आता आपल्या प्रेमाला कायमची तिलांजली दिली पाहिजे याची तिला पूर्ण जाणीव झाली अशा स्थितींत तिच्यापुढें एकच उपाय शिल्लक उरला होता आणि तो म्हणजे अरविंदाला कायमचें विसरणें हा होय! आणि त्या अनुरोधानेंच अलीकडे तिनें आपले प्रयत्न चालविले होते. पण एखादे वेळीं अशी कांहींतरी गोष्ट घडे कीं त्यामुळें त्याला विसरण्या-बद्दलचा तिचा निश्चय एकदम ढासळून जाई व मग स्वतःवरच खूप चिडून पुन्हा नव्यानें ती आपल्या प्रयत्नाला लागे

आलीकडे तिचें जेवण बरेंच कमी झालेलें बघून एकदां रमाबाई तिला म्हणाल्या, "निमाताई, आतांशीं किती ग थोडं जेवतेस? त्यामुळें किती वाळलीस बघ! मनुष्यांनीं चांगल भक्कम जेवावं."

ती मनांत म्हणाली, 'नुसतं भक्कम जेवून मनुष्य सुधारत नसतो. त्याच्या मनाच्या भुकेचं सुद्धां समाधान व्हाव लागत." पण मनांत आलेले हे विचार रमाबाईच्यापाशीं उघडपणानें बोलणें तिला शक्य नव्हतें. ती फक्त एवढेंच म्हणाली.

"अग, न जेवायला काय झाल? मैत्रिणीकडे कांहींतरी खाणं होतं. मग जेवण जात नाहीं"

"रोज बऱ्या तुझ्या मैत्रिणी तुला खायला देतात! त्याना सक्त ताकीद दिली पाहिजे."

या त्यांच्या बोलण्यावर ती फक्त हसली. पण त्या हसण्यांत मोकळेपणा मुळींच नव्हता. आपलें जेवण कशानें कमी झालें आहे हें तिला माहीत होतें. पण आपल्या आईला त्याबद्दलची शंका शक्य तो येऊ नये म्हणून तिनें वरकरणी तसें हास्य केलें होतें. आता रमाबाईना तिच्या स्थितीची पूर्ण कल्पना होती ही गोष्ट निराळी! त्याना वाटत होतें कीं आतां अरविंद तिच्या दृष्टीआड गेलेला आहे. तेव्हा ती त्याला लगेच विसरून जाईल आणि विद्याधरबद्दल हळू हळू बोलणें काढून तिचें मन आपण आतां तेव्हाच जिंकू शकूं याबद्दल त्याना विश्वास वाटत होता. तसा प्रयत्न त्या रोजच करीत. आतासुद्धा कांहींकाळ गेल्यानंतर त्या तिला म्हणाल्या, "निमाताई, एक गोष्ट तुला बरेच दिवस विचारीन म्हणतें." असें म्हणून त्या आणखी कांहींवेळ थांबल्या. निर्मलेनें प्रश्नार्थक मुद्रेनें त्याच्याकडे बघताच त्यानी म्हटलें, "तुझ्या लग्नाबद्दलची! विद्याधरनां किती दिवस वाट बघत ठेवणार?"

हे शब्द त्याच्या तोंडांतून बाहेर पडतांच निर्मला कांहींशी गोंधळली. आपली आई आपल्याला हा प्रश्न अगदीं सरळ तऱ्हेनें विचारील असें तिला कधींच वाटलें नव्हतें. रमाबाईनें तिच्याकडे उत्तराच्या अपेक्षेनें इतकें रोखून बघितलें कीं त्या बघण्यांत आतापर्यंत त्यानीं मनाशीं धरलेल्या आशेचें स्पष्ट प्रतिबिंब निर्मलेला दिसल्यावाचून राहिलें नाहीं. आणि त्या आशेला एकदम धक्का देणें बरें नाहीं असें वाटूनच कीं काय, ती फक्त एवढेंच म्हणाली, "आई, आतांच काय त्याचं? मी पुन्हां केव्हांतरी सांगेन."

या तिच्या उत्तरानें रमाबाईना हायसें वाटलें. मनुष्य जेव्हां एखादी उत्कट आशा उराशीं बाळगतो तेव्हां त्या आशेला एकदम बसलेला धक्का त्याला केव्हांच सहन होत नाहीं. निर्मलेनें त्यांच्या

आशेचें स्वप्न जर एकदम नष्ट करून टाकलें असतें तर त्यांना तसा धक्का खचित बसला असता. पण निर्मलेच्या उत्तरांत त्याना आशेचा अकूर दिसल्याशिवाय राहिला नाहीं; आणि मौज ही कीं, त्यांनीं त्या उत्तराचा आपल्याला अनुकूल असाच अर्थ लावून घेतला व पुढें त्या-बद्दल त्यानीं तिला कांहींच विचारलें नाहीं. आज ना उद्यां ती आपल्याला अनुकूल उत्तर देईल ही त्याची खात्री झाली. पण निर्मलेची मात्र निराळीच स्थिति झाली होती. वरीलप्रमाणें उत्तर देऊन तिनें आईचा प्रश्न तात्पुरता बाजूला सारला होता पण आज टाकलेल्या प्रश्नाला केव्हां ना केव्हां तरी आपल्याला उत्तर द्यावें लागेल हें ती जाणून होती, आणि त्या बरोबरच अरविंदाची मूर्ति तिच्या मनःचक्षूसमोर उभी राहिली, व मनांत तिनें त्या मूर्तीलाच जणू उद्देशून म्हटलें, " अरविंद, मी पुढें आईला काय उत्तर देऊ?"

एके दिवशीं संध्याकाळीं जेव्हां तिचा वेळ जाईना तेव्हा आप्पा-साहेबाच्या बरोबर ती 'कंगन' हा हिंदी चित्रपट बघण्यास गेली होती त्यामधील नायक आणि नायिका यांची ताटातूट होते त्याठिकाणीं तिला अत्यत धक्का बसला होता, आणि चित्रपटाच्या अखेरीस जेव्हा त्या दोघांचें पुनर्मीलन होतें तेव्हां थीएटरमधून घरीं परत येताना ती मनाशीं सारखी म्हणत होती, " अरविंदाचें आणि माझें याप्रमाणें पुनर्मीलन केव्हांच होणार नाहीं काय?" आणि त्याचवेळीं तिला कळून चुकलें होतें कीं त्याला विसरणें ही साधी गोष्ट नव्हे!

पण मौज ही कीं त्याला विसरण्याचा प्रयत्न तिनें केव्हांच सोडला नाहीं आणि तिचें मन इतकें हटवादी होतें कीं त्यालाहि अरविंदाची विस्मृति केव्हांच पडली नाहीं.

आज तर एकामागून एक असे अनेक प्रसंग जमून आले; आणि त्यांनीं तिचा प्रयत्न धुळीस मिळविला.

अलीकडे कॉलेजमध्यें ती फारशी कोणाशींच बोलत नसे. एरवीं

तिच्यासारखी बोलणारी मुलगी क्वचितच आढळली असती. त्यामुळें तिच्या या गंभीर वृत्तीचें तिच्या मैत्रिणींना आश्चर्य वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. आज कॉलेजमध्यें गेल्यावर पंडितांची सुमन तिला म्हणाली, " निमा, अलीकडे फारच गंभीर झालेली दिसतेस ? "

लगेच कमल गुप्तेनें म्हटलें, " बरोबरच आहे. ज्यूनीयरचं वर्ष संपत आल आहे. तेव्हां तिला आतां गंभीर झालच पाहिजे. "

यावर आतापर्यंत गप्प बसलेली मालिनी कीर्तने मिस्किलपणानें हंसत म्हणाली, "छे ग ! तिच्या गंभीरपणाच कारण मी सांगू का ?" मालिनीनें असें म्हणतांच सर्वजणी एकदम ओरडल्या, "कसल कारण ? सांग कीं मग ! " मग पुन्हा तिनें सुरवात केली, " परवां मी तिच्या घरीं गेलें होतें. तिथें मला नवीनच बातमी कळली. निमाताई लवकरच चतुर्भुज होणार आहे. तिच्या आईनीं मला सर्व हकीकत सांगितली. मोठ्या जमीनदाराच्या चिरंजिवाशीं बाईसाहेबांच लग्न होणार आहे बरं का ? "

नंतर जमलेल्या मैत्रिणींनीं एकदम एकच गिल्ला करून म्हटलें, "वा! जमीनदारीणबाई ! मग आम्हांला लाडू केव्हां देणार ? "

यानंतर निर्मलेला अर्थात् गप्प बसणें शक्य नव्हतें. ती त्यांच्यावर अतिशय चिडली. आणि त्याचबरोबर तिला रमाबाईचाहि राग आल्याशिवाय राहिला नाहीं. कारण तिच्या मैत्रिणींच्या तसल्या बोलण्याला अप्रत्यक्षपणें रमाबाईच कारणीभूत झाल्या होत्या. तेव्हां घरीं गेल्यावर त्यांची चांगलीच हजेरी घेण्याचा विचार तिनें मनांत कायम केला पण मनुष्याचा राग एकदां अनावर झाला म्हणजे तो आपला राग कोणावर काढील याचा कांहीं नियम नसतो. वास्तविक तिच्या आईनें सांगितलेल्या माहितीवरून तिच्या मैत्रिणींनीं तिची त्याप्रमाणें थट्टामस्करी करावी यांत वावगें असें कांहींच नव्हतें. पण तिला न आवडणाऱ्या गोष्टींचा त्यांच्याकडून उल्लेख होतांच तिलाहि चीड येणें स्वाभाविकच होतें. आणि इतक्यांत वर्गांत जाण्याची घंटा भर झाली

नसती तर ती आपल्या मैत्रिणींना चिडून काय बोलली असती हें सांगणें कठीण होतें. मग वर्गांत इंग्रजीचा तास सुरू झाला तरी तिचें लक्ष तिकडे लागलें नाहीं. तिला बी.ए.ला शेलेच्या काव्याचें पुस्तक होतें. तिच्या प्रोफेसरनें पुस्तक उघडून " Love's Philosophy " ही छोटी कविता शिकविण्यास सुरवात केली· निर्मला पुस्तक उघडून त्या कवितेकडे शून्य मनानें नुसती बघत राहिली. परंतु मधूनच तिचें लक्ष एकदम त्या कवितेमधील खालीवर ओळींवर स्थिर झालें.

" Nothing in the world is Single
All things by a law divine
in one spirit meet and mingle
why not I with thine ? "

या ओळींवरून नजर फिरतांच तिच्या मनांत विचार सुरू झाले. मीलन हाच सृष्टीचा मुख्य हेतू नव्हे काय? अस असतांना मी अरविंदाना विसरण्याचा प्रयत्न कां करावा? तसा प्रयत्न करणं म्हणजे आपल्या पवित्र प्रेमाची प्रतारणाच करणं नव्हे काय? छे! मी फिरून तसा प्रयत्न कदापिहि करणार नाहीं.

याप्रमाणें तिचे विचार चालले असतांनाच ती कविता सपून पुढील कविता सुरू झाली. तरी तिचें लक्ष त्या चार ओळींवरच खिळून राहिलें होतें. ही गोष्ट प्रोफेसरांच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नाहीं. मग त्यांनीं विचारलें

" तुमचं लक्ष दिसत नाहीं?"

निर्मला विचारांतून जागी होऊन बावचळून म्हणाली,

" अं? काय म्हणालांत?"

पुन्हा प्रोफेसर म्हणाले, " तुमच लक्ष दिसत नाहीं!"

" छे, नसायला काय झालं?"

" मग सांगा बरं कोणती कविता चालली आहे ती?"

—" Love's Philosophy!"

सर्व वर्गात एकच हंशा पिकला. आणि मग सर्व मुलांनीं जेव्हां आपले हात जोरजोरानें पुढील डेस्कवर आपटले, तेव्हां तिला आपली चूक कळून आली आणि लाजून ती खालीं बसली. नंतर कॉलेजमधून ती घरीं आली तरी वर्गांत सर्वांसमक्ष झालेला अपमान ती विसरूं शकली नाहीं.

वास्तविक घरीं आल्यानंतर आपल्या आईची चांगली हजेरी घेण्याच्या इराद्यानें तिनें घरांत प्रवेश केला; पण रमाबाई ती घरीं येण्यापूर्वीच कांहीं कामाकरिता बाहेर गेल्या होत्या. त्यामुळें चरफडतच ती आपल्या खोलींत गेली आणि आपल्या आईऐवजीं तिनें आपल्या हटवादी मनाचीच चांगली हजेरी घेतली;आणि त्याला स्पष्ट बजावून सागितलें कीं,तुला आतां अरविंदाला पूर्णपणें विसरलेंच पाहिजे. नाहींतर यापुढें तुझ्या फजितीला पारावार उरणार नाही. तिचा हुकूम तिच्या मनानें मान्य केला किंवा नाहीं कोणास ठाऊक!

ती याप्रमाणें आपल्या विचारांत गढली असतानाच विद्याधरनें तिच्या खोलींत प्रवेश केला अरविंद गेल्यापासून आपल्या प्रेमाच्या मार्गांतील एक मोठी अडचण दूर झाली असें विद्याधरला वाटत होतें. त्याच्या समजुतीप्रमाणें त्याच्या प्रेमाचा मार्ग निष्कंटक बनला होता. आणि त्याच्या बहकलेल्या प्रेमवृक्षाला पुन्हा नव्यानें पालवी फुटूं लागली होती. रमाबाईंचें त्याला या बाबतींत अर्थात् पाठबळ होतेंच. त्यांना तिच्याबद्दल अलीकडे आशा वाटूं लागली होती. आणि लग्नाला तिची संमति मिळविण्यास हीच वेळ योग्य आहे असें वाटून त्यांनींच त्याला निर्मलेकडे धाडला होता. विद्याधर आंत येतांच खुर्चीकडे बोट दाखवून निर्मला म्हणाली, "बसा कीं!"

बसल्यावर कांहींतरी विचारायचें म्हणून त्यानें विचारलें,

"आज कॉलेज लवकर सुटलं वाटतं?"

"छे! नेहमींच्याच वेळीं सुटलं."

"असं का? मग मला उगीचच तसं वाटलं."

यावर निर्मला थोडीशी हंसली. मग बराच वेळ ती गप्प होती. आज ती आपल्या विचारांत इतकी गढली होती कीं तिला त्यावेळीं एकांतवासाची अत्यंत आवश्यकता होती. मनुष्य जेव्हां स्वतःविषयीं विचार करीत असतो तेव्हां त्या विचारामध्यें त्याला मुळींच अडथळा नको असतो. आतांसुद्धां निर्मला स्वतःविषयींच्या विचारांत गढून गेली होती, विद्याधरचें येणें यावेळीं तिला मुळींच आवडलें नाहीं परंतु त्याच्याशीं कांहींतरी बोलणें जरूर होतें म्हणून तिनें विचारलें, " यदा परीक्षेला बसणार का ? "

" आतांच कांहीं नक्की सांगतां येत नाहीं. मन स्वस्थ असेल तर बसेनहि कदाचित्."

" मन स्वस्थ नसायला काय झाल ? "

मग आपली नजर तिच्या नजरेला लावीत तो म्हणाला,

" त्याला अनेक कारणं आहेत."

" मनुष्यांनीं आपल मन आपल्या ताब्यांत ठेवलं पाहिजे."

" पण तें दुसऱ्याच्या ताब्यांत गेलं असेल तर ? "

" बरंच पळपुट दिसतय आपल मन ? "

असें म्हणून ती मनसोक्त हंसली. जणू त्या हसण्यानें आतांपर्यंत तिच्या मनाला बसलेला ताण तिला मोकळा करायचा होता.

विद्याधरला बराच वेळ आपल्या विषयाला कशी सुरवात करावी हें कळेना. मग जरा वेळानें मैनाशीं कांहींतरी निश्चय केल्यासारखी मुद्रा करून त्यानें म्हटलें, " मी उद्यां नागपूरला जाणार "

" कां ? मधेंच एकदम ? "

" अलीकडे बाबांची प्रकृति बरी नसते. त्यांना मदतीला कोणीतरी पाहिजे. म्हणून मी उद्यां जात आहें."

" मग पुन्हा इंकडे येणार नाहीं का ? "

" छे ! त्याचा कांहीं नेम नाहीं. म्हणून तर आज मी नक्की गोष्टी करून जाणार आहें. "

निर्मलेनें एकदम चमकून विचारलें "कसल्या गोष्टी?" विद्याधर लाडिकपणानें तिच्याकडे बघत म्हणाला, "सांगायला का पाहिजे? तुला माझ्या तोंडातून वदवायचं आहे वाटतं? स्त्रिया नाहींतरी या बाबतींत मोठ्या चतुर असतात." असें म्हणून त्यानें निर्मलेवर आपली लाडिक नजर आणखी जास्तच रोखून धरली. यावर जणूं काय आपल्याला कांहींच कळलें नाहीं या अविर्भावानें निर्मला म्हणाली,

"मला बाई कांहींच अंदाज लागत नाहीं तुमच्या बोलण्याचा"

"मग स्पष्टच सागतों तर, यंदा बाबा माझं लग्न उरकून टाकण्याच्या विचारांत आहेत. त्याचं झालं आहे वय अलीकडे नेहमींच ते आजारी असतात. तुझ्याबद्दल मी त्यांना मागच सांगून टाकलं आहे, त्यांना पसंत आहे तेव्हा..."

पण त्याला मध्येंच थांबवून निर्मला म्हणाली, "विद्याधर, माफ करा, मला. मला इतक्यांत लग्नच करायचं नाहीं."

"मग केव्हां करणार?"

"बी. ए झाल्याशिवाय नाहीं."

"काहीं हरकत नाहीं. तिथपर्यंत मी थांबेन."

"छे! माझ्यासाठीं कोणी थांबण्याची जरूरी नाहीं"

"म्हणजे ठरलेल्या गोष्टी तुला पसंत नाहींत तर!"

"कोणत्या गोष्टी? आणि कोणीं ठरवल्या?"

"तुझ्या आई वडिलांनीं आपलं लग्न केव्हांच ठरवून टाकलं आहे"

"आणि माझी संमति?"

"निर्मले, मी तुला पसंत नाहीं का?"

"विद्याधर, उगाच कशाला वाढवतां या गोष्टी? मला सध्यां लग्न करायचं नाहीं एवढ निश्चित!"

"मला माहीत आहे तूं कुणाशीं लग्न करणार आहेस तें!"

"झाल तर मग. गोष्टी माहीत असून पुन्हा विचारण्यांत काय अर्थ आहे?"

" निर्मले, तुला वाटतें इतकी ती गोष्ट साधी नाहीं. अरविंद आज बाहेर आहे. उद्यां कदाचित् तो तुरूंगातहि जाईल. अशा स्थितींत त्याच्या आशेवर तूं किती दिवस राहाणार ? तुरुंग हेंच त्याच घर. तेव्हां त्याच्याशीं लग्न करण्यांत खास अकल्याण आहे."

विद्याधरच्या या बोलण्यासरशीं तिनें मनावेगळी केलेली अप्रिय आठवण ताजीतवानी झाली. आणि त्याचवेळीं तिला कळून आलें कीं त्या अप्रिय आठवणीपासून अलिप्त राहाणें तिला शक्य नाहीं. अरविंदाला विसरण्याबद्दल तिला वाटत असलेला अभिमान क्षणात ढासळून गेला. ती त्यामुळें जशी विद्याधरवर चिडली तशी स्वतःवरहि चिडली आणि त्या चिडण्याचा राग तिच्या पुढील बोलण्यात प्रतीत झाल्याविना राहिला नाहीं. ती चिडूनच त्याला म्हणाली, "तुम्ही नको मला कल्याणाच्या गोष्टी शिकवायला माझी मी समर्थ आहें." आणि यावर त्याला बोलण्याला क्षणाचाहि अवधि न देता तिनें पुढें म्हटलें, " विद्याधर,आपण आतां माझ्याबरोबर न बोलाल तर बरं होईल. माझ्या तोंडातून कांहीं अपमान कारक शब्द गेले तर उगाच तुम्हाला लागेल."

यानंतर विद्याधर काहीं बोलला तर नाहींच. पण त्यापुढें तिथें थांबणेंहि त्याला अशक्य झालें तो जाण्याच्या तयारीनें उठला परंतु जाताना दाराशीं थबकून म्हणाला, " बर. जातों मी निर्मले ! यापुढें कदाचित् मी तुला कधींहि भेटणार नाही. पण एक गोष्ट मात्र लक्षांत ठेव कीं माझ्या सुखाआड जे जे लोक आले त्यांचा सूड घेतल्याखेरीज मी कधींच राहणार नाहीं."

त्याचें हें बोलणें ऐकतांच निर्मलेनें त्याच्याकडे अगदीं रोखून बघितलें पण क्षणभरहि न थांबता धाड धाड जिन्याच्या पायऱ्या उतरून तो तिच्या दृष्टिआडहि झाला. निर्मला कांहींकाळ जागेवर खिळून राहिली. एकदम एखादी वीज कोसळून तिच्याखालीं घरेंच्या घरें भस्मसात व्हावींत अशाप्रमाणें तिला वाटलें. नक्की काय झालें हेंहि तिला कळेना. ती मनाशींच फक्त पुटपुटली, "हा सूड घेणार म्हणजे काय?

मग बराच वेळ ती आपल्या खोलीच्या खिडकीशीं उभी होती. केव्हां ना केव्हां तरी असला हा प्रसंग घडणार याबद्दल तिला खात्री होती. आणि इतके दिवस जणूं वाट बघत बसलेला प्रसंग घडून त्याचा सोक्षमोक्ष झाल्याबद्दल तिला जरी एकीकडून समाधान वाटत होतें तरी त्या प्रसंगानें तिच्या मनांत एकप्रकारची नवीनच भीति निर्माण केली होती यांत संशय नव्हता.

बाहेर सोसाट्याचा वारा सुटला होता आणि समोर असलेल्या समुद्रांत लाटांचा धिंगाणा चालला होता. त्या समुद्रांतच एक मनुष्य आपली बारीक होडी भराभर वल्हें मारून जमिनीच्या दिशेनें हांकारीत होता। तिची दृष्टी जेव्हां त्या दृश्यावर स्थिर झाली तेव्हां तिला क्षणभर वाटलें कीं आपण त्या खोलींत नसून त्या बारीक बोटींमध्यें बसलों आहोंत. आणि नुसतें आपल्या मनांतच नव्हे तर सर्व सृष्टीवरहि एक प्रकारचें वादळ निर्माण झालें आहे आपली चिमुकली बोट त्या वादळांत सांपडलेली आहे. आपण मदतीसाठीं म्हणून ओरडतांच आपल्याला कळून चुकलें आहे कीं आपल्या भोंवतालचे लोक केव्हांच निघून गेले आहेत व त्यामुळें आपली मदतीची अपेक्षा व्यर्थ आहे. इतक्यांत आपली बोट त्या तुफान दर्यांत पालथी होऊन.........

तिनें अंगावर शहारे आल्याप्रमाणें केलें. पुढें तिच्याच्यानें कल्पना करवेना. तिचें मन सुंद झालें. आणि त्या कल्पनेपासून दूर राहण्यासाठीं म्हणूनच कीं काय झदिदिशीं तिनें त्या खिडकीची दारें बंद करून घेतलीं. यापुढें आपला हुंदका आवरणें तिला अशक्य झालें. सारी पृथ्वी आपल्या भोंवती गरागर फिरायला लागली आहे असें वाटून तिनें कॉटवर अंग टाकून कॉटचा जो आधार घेतला तो आतापर्यंत मोठ्या प्रयासानें रोखून धरलेले अश्रू जणू आधाराच्या अभावीं घळाघळ तिच्या डोळ्यांतून ओघळून कॉटवर पडले.

—:०:—

# प्रकरण १०

मनुष्य एकदां कोणताहि प्रयत्न मनःपूर्वक करूं लागला म्हणजे त्यांतील यशापयशाची छाननी तो मनाशीं कधींच करीत नाहीं. किंबहुना आपण करीत असलेल्या प्रयत्नांत आपल्याला हमखास यश मिळेलच ही त्याची खात्री असते. निर्मलेनेंही अरविंदाला विसरण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करून बघितला त्या प्रयत्नामध्यें आपल्याला यश मिळालेंच पाहिजे ही खात्री तिनेंहि बाळगली परतु दोन महिन्यांनतर तिला कळून चुकलें कीं त्याला विसरण्याचा आपला प्रयत्न व्यर्थ होय मग मात्र तिला आत्मवंचनेचा मनस्वी कंटाळा येऊन तिचे विचार उलट दिशेनें वाहू लागले आणि अरविंदाचा सहवास तिला पुन्हा हवासा वाटूं लागला तो आपल्याला विसरला असेल असें तिला केव्हांच वाटलें नाहीं परंतु तिला त्याच्या मानी स्वभावाची पूर्ण कल्पना आलेली होती आणि त्यामुळें तो आपली इच्छा पूर्ण करू शकेल किंवा नाहीं याबद्दल तिचें मन साशक बनलें होतें. तथापि आपण त्याची एकदां गांठ घेऊन त्याला आपल्या मनःस्थितीची जाणीव करून द्यावी असें तिला अलीकडे राहून राहून वाटत होतें. अरविंद हेमराज वाडींत पूर्वीच्या ठिकाणींच राहात होता. शंकरला तो पत्ता माहीत होताच. तेव्हां शक्य तितक्या लवकर त्याची गांठ घेण्याचें तिनें मनाशीं ठरविलें.

त्यावेळीं अरविंद संपाच्या धामधुमींत गुंतला होता. चार दिवसावर संप येऊन ठेपला असल्यामुळें कामगार कार्यकर्ते संपाची तयारी करण्यांत दंग होऊन गेले होते. सार्वत्रिक संपाची तारीख जव्हां जवळ जवळ येऊं लागली तेव्हां काय होणार इकडे सर्वांचे डोळे

लागून राहिले होते. संप होणार कीं अजून कांहीं तडजोड होणार, संप झाला तर तो किती दिवस टिकणार व बरेच दिवस टिकला तर कामगार तितके दिवस टिकाव धरू शकतील किंवा नाहीं याविषयीं ठिकठिकाणीं चर्चा चालू असलेली ऐकूं येत होती. मालक व कामगार याच्यामध्यें सन्मान्य समेट व्हावा म्हणून आजपर्यंत अनेक प्रयत्न झाले होते. परंतु ते सर्व निष्फळच ठरले होते संपाचा प्रसंग टाळण्यासाठीं कामगार व मालक यांजमध्यें मध्यस्थी करण्याचा प्रयत्न सरकारकडून अखेरच्या घटकेला होईल असें वाटत होतें. परंतु अखेर त्याला यश आलें नाहीं. कामगारांचीं मनें वळवून त्यांच्याविरुद्ध संपविरोधी वातावरण निर्माण करण्यासाठीं कामगार भागांत मालकाकडून पत्रकाचा सारखा वर्षाव चालू होता. परंतु कामगारांचा आणि कामगार कार्यकर्त्यांचा याबाबतींत इतका दृढ निश्चय झालेला दिसत होता कीं सपविरोधकाच्या प्रचाराला यश येणें मुळींच शक्य नव्हतें.

सोमवार ता ४ रोजीं संप सुरू व्हावयाचा असल्यामुळें त्या बाबतींतील सर्व गोष्टीचा विचार करण्यासाठीं आदले दिवशीं रात्रीं गिरणी-कामगार–युनियनच्या मॅनेजिंग कमिटीची बैठक भरली होती. महागाई-भत्ता म्हणून २५ टक्के वाढ व्हावी, अशी मागणी करणारा एक ठरावहि त्याच बैठकींत करण्यात आला, आणि त्याचवेळीं संपावर देखरेख करण्यासाठीं एक सप कमेटी नेमण्यांत आली होती. या कमेटींत निमकर, डांगे, रणदिवे वगैरे कार्यकर्ते होते. अरविंदाचाहि त्या कमेटींत समावेश करण्यात आला होता.

संपाच्या आदले दिवशीं पाऊण लाख कामगाराचा प्रचंड मेळावा कामगार मैदानावर जमला होता. सभा झाल्यावर कामगार घरोघरीं गेले. परंतु स्वस्थ झोपा न काढतां चोरून कामावर जाणाऱ्या कामगारांवर पहारा करण्याचें काम त्यांनीं केलें.

मुंबईंतील गिरण्यापैकीं कांहीं सकाळीं सहा वाजतां व कांहीं साडे-

सात वाजता सुरू होतात. गिरणगावांतील रोजचें दृश्य म्हणजे गिरणीची वेळ साधण्यासाठी आपल्या खुराड्यांतून बाहेर पडलेल्या कामगारांच्या धावपळीनें भरलेले रस्ते आणि गिरण्यांच्या चिमण्यामधून बाहेर पडणाऱ्या धुरामुळें कुद झालेलें वातावरण असें असतें परतु आजचें दृश्य कांहीं निराळेंच होतें. आज कामावर जायचें नाहीं असें ठरविलें असल्यामुळें कित्येक कामगार साडेसात वाजले तरी अंथरुणांतच पडून निद्रासुखाचा अनुभव घेत होते, तर बाकीचे रस्त्यांच्या फूटपाथवर उभ राहून सपाच्या परिस्थितीचें अवलोकन करीत होते. कांहीं अपवाद सोडून दिले तर बहुतेक कोणत्याहि गिरणीवर पिकेटिंग करण्यासाठीं स्वयसेवक ठेवलेले नव्हते आणि याचें कारण म्हणजे सप करण्याची कामगाराची मनापासूनची इच्छा हें होय. अखेर ता. ४ मार्च पासून एक लाख साठहजार गिरणी कामगारांच्या शांततापूर्ण संपाची उत्साहा सुरवात झाली.

आणि त्याचदिवशीं दुपारीं निर्मला हेमराजवाडींत अरविंदाच्या खोलींत त्याची गाठ घेण्याच्या उद्देशानें गेली. तो नुकताच जेवण करून कॉटवर पडला होता. सकाळपासून सपाची पहाणी करून तो थकला असल्यामुळें त्याला थोडावेळ विश्रांतीची अत्यत जरूरी होती. म्हणून दारावर थाप बसतांच त्यानें चिडूनच दार उघडलें. दारांत निर्मलेला बघताच क्षणभर तो गोंधळून गेला आपण झोपेंत तर नाहीं ना म्हणून त्यानें आपले डोळे चोळून पुन्हा बघितलें. पण छे! ती खरोखरीच निर्मला होती. खुर्चीवर बसताच ती म्हणाली, "मी तुम्हांला एक विनंती करण्यासाठीं आलें आहे."

त्यानें फक्त प्रश्नार्थक मुद्रेनें तिच्याकडे बघितलें. मग ती पुढें म्हणाली, "तुम्ही माझ्यासाठीं एक गोष्ट कराल का?"

"हो! करण्यासारखी असेल तर एक सोडून दोनसुद्धां करीन." निर्मला थोडीशी हंसली. पण कांहींशा विषादानेंच! नंतर क्षणभर थांबून तिनें म्हटलें, "अरविंद, तुम्ही सपांतून आपलं अग काढून

घेतलं तर नाहीं का चालणार ? मला तुमच्याशिवाय जगतां येणं शक्य नाहीं. आणि हा उपक्रम तुम्ही सोडल्याशिवाय मीहि तुमची होणं शक्य नाहीं. तेव्हां...." तिला मध्येंच थांबवून तो म्हणाला, "किती अशक्य गोष्ट बोलते आहेस ?"

"मनुष्याच्या मनांत असलं म्हणजे अशक्य गोष्टीसुद्धां शक्य होतात"

"पण मला अशक्य गोष्टी करायला लावायचा एवढा तुझा अट्टाहास कशासाठीं ?"

"प्रेमासाठीं !"

"प्रेमाशिवाय आयुष्यांत दुसरं ध्येय नाहींच वाटतं ?"

"छे ! निदान स्त्रियांना तरी नाहीं. तुम्हां पुरुषांना अनेक ध्येयं असतात. म्हणून तुम्हांला प्रेम गौण वाटतं. पण आमची स्थिति तशी नसते. "प्रेम हेंच आमच सर्वस्व असतें"

आपली विचारसरणी त्याला बिनतोड पटेल या आत्मविश्वासानें तिनें शेवटचें वाक्य उच्चारलें. आणि खरोखरच अरविंदाच्या मनावर त्याचा थोडासा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं परंतु कांहीं वेळानें तो आपल्या नेहमींच्या गभीर पद्धतीनें म्हणाला, "निर्मले, आयुष्यांत स्त्रियांना प्रेम हेंच एक ध्येय असतं हें मला कबूल आहे. पण त्या ध्येयाकरतां त्यांनीं कांहींतरी त्याग केला पाहिजे. (मनुष्याला जगांत आपल्या ध्येयासारखं पवित्र असं कांहींच नाहीं. मग त्याला आपण आपल्या त्यागाची किंमत नको का द्यायला ?"

अरविंदाचें हें बोलणें तिच्या जिव्हारीं लागल्याशिवाय राहिलें नाहीं. आाणि त्याबद्दलचा सताप अनावर होऊनच कीं काय ती मोठ्यानें ओरडून म्हणाली, "त्याग ! त्यागाच्या गोष्टी फक्त बोलण्यासाठींच असतात. त्यागाच्या नांवाखालीं मनुष्य आपली नेहमीं आत्मवंचना करीत असतो !" ती थांबली. किंबहुना भावनेचा भर इतका वाढला कीं त्यामुळें तिला थांबावें लागलें. अरविंदाला तिचें म्हणणें पटलें म्हणा अगर तिच्या

भावनेच्या उद्रेकांत व्यत्यय नको म्हणून म्हणा, तोहि बराच वेळ स्तब्ध बसला. नतर आपला उजवा पंजा डोक्याच्या केंसात कंगव्याप्रमाणें फिरवून त्यानें अगदीं खालच्या आवाजांत पण तितक्याच निश्चयानें बोलण्यास सुरवात केली. त्यानें म्हटलें, "निर्मले, तुला माझ्या त्यागाच्या गोष्टी पसंत पडत नसतील तर सोडून दे. तुझं प्रेम मला अगदींच तिरस्करणीय वाटतं अस नाहीं कोणास ठाऊक पुढें कदाचित् मला त्या प्रेमाचा स्वीकारहि करावा लागेल. पण ती वेळ सध्यां खचित नाहीं आज ज्या पवित्र कार्याला मी सर्वस्वीं वाहून घेतलें आहे. त्या कार्याशिवाय माझ्यापुढें आता दुसरी कोणतीच पवित्र गोष्ट नाहीं. छे! तुझ प्रेमसुद्धां नाहीं. वैयक्तिक सुखाकडे सध्यां मीं कानाडोळाच केला पाहिजे. ज्या कार्यांत मीं उडी घेतली आहे त्या कार्याकडे तूं आपली थोडी जरी नजर लावलीस तरी तुला कळेल कीं, मला त्यामधून आपलं अग काढून घेता येणं शक्य नाहीं. आणि तूहि मला त्यापासून खचित परावृत्त करणार नाहींस! आजच संप सुरू झाला आहे नुसत्या आजच्या दिवसाकडेच बघ माझे कामगार बांधव आज आपल्या रक्ताचं मोल देऊन या पवित्र कार्याला नेट लावीत असताना मी त्यांच्यापासून दूर राहू? आज सर्व दिवसभर याच पवित्र कार्यानें प्रेरित झालेल्या माझ्या भगिनींच्यावर एकसारखे अमानुष लाठीहल्ले होत असतांना मी त्याच्यामधून आपलं अंग काढून घेऊ? कां तर, माझ्या वैयक्तिक सुखासाठीं? काय म्हणतील माझ्या बधुभगिनी? प्रेमाकरतां आपल्या पवित्र कार्याकडे पाठ करणारा भेकड! असेंच ना? निर्मले, या सर्व गोष्टींचा नीट विचार कर. डोळ्यांना पाणी आणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. प्रेमासाठीं मनुष्यानं लढलं पाहिजे. रडणारं प्रेम नेहमींच दुबळ असतं. प्रेमाच्या शक्तीची तुला कल्पना नाहीं. आणि आज मला माझ्या पाठीमागें तीच शक्ति हवी आहे. त्याच शक्तीच्या जोरावर मी माझा लढा लढेन. आणि विजय मिळवून त्या विजयाच्या उन्मादांतच मी तुझा स्वीकार करीन."

बोलतांना जणूं एखाद्या पट्टीच्या वक्त्याचा जोर त्याच्या अंगांत

संचरला होता. आणि त्याचा निर्मलेवरहि योग्य तोच परिणाम झाला. तिच्या मुद्रेवर तसा परिणाम दिसून येतांच वक्त्याच्या मुखावर आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर सभा जिंकल्याचा जो आनंद उमटतो तसाच आनंद अरविंदाच्या मुखावर उमटला आणि तो मनाशीं म्हणाला, "आज सायंकाळीं कामगारांच्या सभेंत माझ्या वक्तृत्वाचा असाच परिणाम झाला तर काय बहार होईल!" आणि त्याचवेळीं निर्मलेच्या मनांत विचार आला कीं, "खरंच, माझे अरविंद साधेसुधे नाहींत! आणि माझं प्रेमहि सामान्य नाहीं!"

रात्रीं सर्वत्र अंधार पडलेला असतांना एकदम डोंगराआडून हळूच चंद्रानें डोकवावें आणि साऱ्या सृष्टीला उजाळा द्यावा त्याप्रमाणें निर्मलेच्या मनाची स्थिति झाली होती. तिच्या मनांतील सारे काळेकुट्ट विचार अरविंदाच्या त्या छोट्या भाषणानें एकदम नाहींसे झाले आणि त्याठिकाणीं निराळयाच विचारांची प्रतिष्ठा झाली, ती गप्प बसून अरविंदाच्या भाषणांतील प्रत्येक शब्द न् शब्द आठवून त्यावर विचार करीत होती. तिच्या मनाची ही अवस्था अरविंदाच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं. आणि आपल्या हातातील घड्याळाकडे जर त्याचें लक्ष गेलें नसतें तर तिच्या विचारांत त्यानें मुळींच व्यत्यय आणला नसता. घड्याळाकडे बघून तो म्हणाला, "पांच वाजले मला उठलच पाहिजे सहा वाजतां कामगार मैदानावर मोठी सभा आहे"

आपल्या डोळयांतील कडांना सांठलेली कांहीं आसवें आपल्या बारीक हातरुमालानें पुसून तिनें म्हटलें,

"आज तुम्ही बोलणार आहांत?"

"कां? माझं व्याख्यान मोठ कडू असत ना?"

"कडू औषधच गुणकारी असतं!"

"पण कांहीं रोग्यांना कडू औषध आवडत नाहीं"

"वेडे असले पाहिजेत ते रोगी!" असें म्हणून निर्मलेनें थोडेसें हास्य केलें आणि त्याचवेळीं अरविंद मनाशीं म्हणाला, "आणि

स्त्रियातरी काय कमी वेड्या असतात!" हा विचार त्याच्या मनांत येतांच तोहि थोडासा हंसला. निर्मलेनें त्याला विचारलें, "का हंसलांत?"

"तू कां हंसलीस? हंसणं हा सुद्धा संसर्गजन्य रोग आहे!" असें अरविंदानें म्हणताच तीं दोघेंहि मनःपूर्वक हसली. मग तो कपडे करीत असतांनाच ती सारखी त्याच्याकडे टक लावून बघत होती त्यानें नेहरू शर्टची परीट घडी मोडून तो अंगांत घातला त्यानें नेहरू शर्ट घातलेला तिनें पूर्वी कधींच बघितला नव्हता त्यामुळें तिला त्याची मान जरा अधीकच उंच भासली. पण त्या मानेचा गौर वर्ण त्या शर्टला जास्त खुलून दिसतो असेंहि तिला वाटलें. त्यानें आपले केंस कंगव्यानें नीट बसविले तरी केंसाची एक मोठी बट त्याच्या भव्य कपाळावर उतरली होती तिच्यावरहि तिचें लक्ष कांहींकाळ स्थिर झालें व मग पुन्हा मघांचा प्रश्न आठवून तिनें विचारलें, "मग तुम्ही बोलणार आहांत का आज?"

"हो, बोलणार आहें येतेस तूं माझ्याबरोबर? का तुला माझें भाषण आवडणार नाहीं?"

"छे! मला नाहीं चांगल भाषण आवडत! तरीपण मी येणार." यावर अरविंद खूप मोठ्यांदां हंसला. आणि मग खोलींतून बाहेर पडतांना एखाद्या मंत्रमुग्धाप्रमाणें ती त्याच्या पाठोपाठ चालूं लागली खोलीला कुलूप लावतांना त्यानें विचारलें, "पण तुझं येणं तुझ्या आप्पासाहेबांना पसत पडेल का? यापेक्षां तू नाहीं आलीस तरी चालेल."

"न पडेना. ज्यांना पसत पडायला हवं त्यांना पसत पडलं म्हणजे झाल." असें म्हणून तिनें अरविंदाकडे अशाकांहीं अभिप्रायानें बघितलें कीं तिला यापुढें नाहीं म्हणणें त्याला शक्यच नव्हतें.

त्या दिवशीं संपावर गेलेले एक लाख साठ हजार मजूर कामगार मैदानावर युद्ध मंडळाकडून संपासंबंधी पुढील सूचना घेण्यासाठीं जमले होते. ज्या शांततेनें आणि शिस्तीनें सकाळपासून संपाला सुरवात

झाली होती तीच शांतता आणि शिस्त यावेळीं सभेच्याहि ठिकाणीं दिसून येत होती. मैदानावर मुंगीलासुद्धां जायला रीघ नव्हती. आजूबाजूच्या इमारतींवरहि खूप लोक बसले होते त्या बसलेल्या लोकांची जेव्हा हालचाल होई तेव्हां जणूं काय त्या निर्जीव इमारतीसुद्धा आपल्या माना डोलावून त्या सपाला आपली समति दर्शवीत आहेत असा भास निर्माण होत होता " सार्वत्रिक सपाचा विजय असो!" "लालबावटे की जय!!" "पोलिसांची दडपशाही हाणून पाडा!!!" अशा घोषणा सर्वत्र निनादत होत्या

"इन्किलाब झिंदाबाद" हें क्रांति गीत म्हटल्यानतर सभेच्या कामाला सुरवात झाली.

पहिल्याप्रथम कॉ. रणदिवे याचें जोरदार भाषण झालें त्यानंतर कु. गोदावरी गोखले यानीं भाषण केलें त्या म्हणाल्या, "आमच्या स्त्री कामगारावर लाठीहल्ले करण्यापर्यंत सरकारची दडपशाही येऊन पोंहोंचली आहे" यावर 'शेम, शेम,' असा उच्चार सर्वत्र त्या प्रचड सभेंतून उच्चारला गेला. आणि "सरकारच्या या दडपशाहीला कामगारांना तोंड द्यावें लागेल" हें वाक्य जेव्हां त्यानीं उच्चारलें तेव्हां सभेंत टाळ्यांचा जो प्रचड गजर झाला तो कामगारांचा दुर्दमनीय उत्साह दर्शवीत होता. त्यानतर अरविंद उठला आणि त्यानें भाषणास सुरवात केली.

"कामगार बधूंनो,

'या जगात सर्वच मजूर आहेत.' हें लोकमान्य टिळकांचें वाक्य तुम्ही आपल्या हृदयांवर कोरून ठेवा." लोकमान्य टिळकांचें नांव निघतांच त्या प्रचंड लोकसमुदायांतून "लोकमान्य टिळक की जय! लोकमान्य टिळक की जय!! अशा गंभीर आरोळ्या सुरू झाल्या. त्या आरोळ्यांचा तो सामुदायिक गंभीर आवाज इतका मोठा होता कीं स्वर्गात तो लो. टिळकांना खचित ऐकूं गेला असेल! आणि प्रत्येकक्षणीं वाढणाऱ्या त्या आवाजासरशीं निर्मलेला वाटलें कीं हा आवाज

आतां केव्हाच संपणार नाहीं! किंबहुना तो जगाच्या अतापर्यंत सपूच नये अशी तिची इच्छा होती अरविंदाला सभेचें वातावरण शात होईपर्यंत थांबावें लागलें. मग सर्वत्र शांतता होतांच त्यानें पुन्हा आपल्या भाषणाला सुरवात केली जगांत मालक आणि मजूर हा भेदाभेद नाहींसा झाला पाहिजे, तो नाहींसा होण्यास उपाय कोणते आणि त्या उपायाचा आपण कसा अवलब केला पाहिजे या गोष्टींबद्दल आपल्या तडफदार वाणीनें, पण तितकेच पटावू दाखले देऊन त्यानें विवेचन केलें; आणि सरतेशेवटीं तो म्हणाला, "मालकानीं समजून उमजून नमतें घेतलें तर ठीकच! नाहींतर त्यांना नमते आणण्यास ज्या उपायाचा अवलंब आपणास करावा लागेल तो करण्यास आपण सज्ज झालें पाहिजे. क्वचित् प्रसंगीं आमचे मार्ग नीतिनियमांना धरून नसतील. पण बोलून चालून ज्या कार्यात आपण उडी घेतली आहे तें एक युद्ध आहे. आणि युद्धामध्यें सर्व काहीं क्षम्य असतें तेव्हां बंधूंनो, या लढ्याला तोंड देण्यास सज्ज व्हा आपल्या वाटेमध्यें अनेक अडचणी आहेत. पण कोणतेंहि महत् कार्य हातीं घेतल्या-नतर अडचणी या येणारच! परंतु हें पक्कें लक्षात ठेवा कीं हा अडचणींचा डोंगर चढून गेल्यानंतर पलीकडे आपल्याला यशाच्या सूर्याचें दर्शन होणार आहे मार्गात संकटें आलीं तरी तीं तात्पुरतींच! संकटाखेरीज मनुष्याला केव्हांच सौख्यप्राप्ति होत नसते. पायापुरत्या सुखाकडे बघू नका. एक मानवी कर्तव्य म्हणून ही गोष्ट करा कर्तव्याचा मार्ग जरी कठोर असला तरी कर्तव्यपालनाचा आनद अमोल असतो. त्या आनंदाला तरी पारखे होऊं नका. आज आपण सर्वजण एका पवित्र कर्तव्याच्या वेदीवर उभे आहोंत समोर होम पेटलेला आहे, त्या होमांत आम्ही आमचं सर्वस्व अर्पण करू अशी आज आपण सर्वांनीं शपथ घेतली पाहिजे. आणि ती शपथ घेतल्यानंतर आपण मालकांना आपल्या आत्मविश्वासानें सांगूं कीं आमची २५ टक्क्यांची मागणी जोंपर्यंत तुम्ही मान्य करणार नाहीं तोंपर्यंत आम्ही लढत राहणार. लढतांना आमचे देह जरी धारातीर्थी

पडले तरी आमचे आत्मे या पवित्र कार्याकडेच धाव घेतील आणि जेव्हां आमचा विजय होईल तेव्हांच आमच्या आत्म्यांना खरी शांति लाभेल. "

अरविंदाचें भाषण संपतांच टाळ्यांचा प्रचड गजर झाला. तुफान दर्या खवळला असतांनासुद्धां त्याच्या लाटांचा एवढा मोठा प्रचड ध्वनि होत नसेल! आणि नंतर "लाल बावटे की जय!" "इन्किलाब झिंदाबाद"!! या गगनभेदी उच्च आरोळ्यांनीं पुन्हा सारें वातावरण नुसतें दुमदुमून गेलें.

निर्मला अजून जागेवरच बसून होती. त्याच्या भाषणानें तिच्या वृत्ति बधिर झाल्या होत्या, व तिच्या मनावर एक प्रकारची गुगी आली होती. आणि मनाच्या त्या कांहींशा गोड अवस्थेत कांहीं काळ राहाणें तिला कदाचित् आवडलेंहि असतें परतु एकदम सभेंत मोठा गोंगाट सुरू होऊन लोक आपापसांत कुजबुजू लागले. त्यामुळें त्या गुंगींतून ती खडबडून जागी झाली तिला प्रथम वाटलें कीं बहुतेक सभा संपली आहे. तेव्हां सहाजीकच हा गोंगाट सुरू झाला असेल. अरविंदाची भेट घेण्यास आतां ती अगदीं उत्सुक झाली होती. आणि एवढ्या मोठ्या सभेंत परिणामकारक रितीनें बोलल्या-बद्दल त्याचें अभिनदन करतांना आपण प्रथम काय बोलावें याचाहि विचार तिच्या मनांत चालला होता आणि अरविंदाकडे जाण्यासाठीं एवढ्या गर्दीतून कशी वाट काढावी या विचारांत ती असतांना तिला शब्द ऐकूं आले "काय म्हणतां? पकडल?"

"होय बाबा! प्रथमच अपशकून झाला. चांगला पुढारी गेला."

यावर दुसरा एकजण मोठ्या तडफेनें म्हणाला, "पुढारी गेला पण त्याचे शब्द तर गेले नाहींत ना? त्याचा प्रत्येक शब्द हृदयावर कोरा; आणि लढा चालवा."

"कां नाहीं चालवणार?"

निर्मलेला काय झालें कांहींच कळेना. पुन्हा मोठ्या आरोळ्या

तिला ऐकूं आल्या. "लाल बावटे की जय!" "इन्किलाब झिंदाबाद!!" "कामगारांचा विजय असो!!!" आणि नंतर लवकरच तिला खरा प्रकार कळून आला. अरविंद पकडला गेला होता त्याला पाहाण्यासाठीं तिनें आपले पाय वर करून मान उंचावून बघितलें पण त्याच्याभोंवतीं सारा जमाव जमला होता. काय करावें हें तिला सुचेना. तिची भयकर केंविलवाणी स्थिति झाली. त्याठिकाणीं आपण अगदीं एकाकी आहोंत असेंहि तिला वाटलें आणि मनाच्या याच शोकविव्हल स्थितींत तिच्या तोंडांतून न कळत उद्गार बाहेर पडले, "अरविंद, तुम्ही मला पुन्हा भेटाल का?" परतु याचवेळीं पुन्हा लाल बावट्याचा जयघोष झाला आणि त्यांत तिचे शब्द पार विरून गेले; आणि तिच्या शरिरांतील साऱ्या शक्ति एकदम क्षीण होऊन ती जागच्या जागीं एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणें स्थिर झाली!

---

# प्रकरण ११

माणसाच्या भोंवतीं एकदां चीड आणणारी परिस्थिति निर्माण झाली म्हणजे त्या परिस्थितीवरचा राग तो कोणावर काढील याचा कांहीं नियम नसतो अरविंदाला "भारत सरक्षण" कायद्याखालीं अटक झाल्यापासून निर्मलेची हीच स्थिति झाली होती. त्याच्या प्रेमाचा पुनर्प्रत्यय येऊन त्यांची लगेच पुन्हा ताटातूट झाली याबद्दल तिला चीड येणें स्वाभाविकच होतें. परंतु या घटनेशीं रमाबाईचा कांहींएक सबंध नसतांना ती आपला सर्व राग त्यांच्यावरच वरचेवर व्यक्त करीत

असे. जणू काय रमाबाईच त्या दोघांच्या ताटातुटीला कारणीभूत झाल्या होत्या ! आजहि असेंच झालें. पोषाख करून ती बाहेर जाण्याच्या तयारींत असलेली बघून रमाबाईनीं विचारलें, " एवढ्या उन्हाची कुठे ग निघालीस ? " तिनें तुटकपणानें उत्तर दिलें " बाहेर माझं जरा काम आहे. "

" उन्ह खालीं गेल्यावर गेलीस तर नाहीं का चालणार ? "

" माझं आत्तांच काम आहे " असें म्हणून ती बाहेरील गेटापाशीं आली. रमाबाईनें तिला थांबण्यास सांगून म्हटलें, " निमाताई, मी नाहीं तुझ्या गमजा चालूं देणार ! एवढ्या उन्हाचं बाहेर जायचं नाहीं म्हणजे नाहीं. "

यावर आतांपर्यंत दाबून धरलेल्या आपल्या रागाला पूर्ण मोकळीक देऊन निर्मला म्हणाली, " मी जाणार म्हणजे जाणार! माझं महत्त्वाचं काम आहे आणि तें आत्तांच झालं पाहिजे "

तिचा रागाचा स्वर ओळखून रमाबाई थोड्या हलक्या स्वरांत म्हणाल्या, " कसलं महत्त्वाच काम ? मला सांगण्यासारखं नाहीं का?"

निर्मलेनें फक्त नकारार्थी मान हालवली. रमाबाईंना अर्थात् तो आपला अपमानच वाटला. कारण नेहमीं आपला शब्द खरा करण्याचा त्यांचा बाणा असल्याकारणानें त्यांच्या मानी मनाला तो धक्काच बसला. आणि तो अपमान असह्य होऊन त्या तिच्यावर ओरडून म्हणाल्या,

" मला कळतात तुझे बाहेर कसले धंदे चालतात ते. आम्हांला अब्रूनं राहूं द्यायचं तुझ्या मनांत दिसत नाहीं. पण मी जोंपर्यंत आहें तोंपर्यंत तुझे हे थेर चालूं देणार नाहीं. एवढ्या लवकर साफ बाहेर जायचं नाहीं. ये, परत ये. खबरदार एक पाऊल पुढें टाकलंस तर!" आपल्या अंगांतलि सारी शक्ति एकवटून त्या बोलत होत्या. त्यांचें सर्व शरीर रागानें कांपत होतें. निर्मलेला कांहीं काळ संभ्रम पडला. आपल्या आईच्या रागाची तिला भीति वाटली असें मात्र नव्हे. कारण तिनें अलीकडे आपल्या मनाशीं पक्कं ठरविलें होतें कीं एकवेळ जगां-

तील आपल्या अगदीं प्रिय माणसांना फसविण्याचा प्रसंग आला तरी हरकत नाहीं पण आपण आपल्या मनाला मात्र फसवितां कामा नये. आणि याच अनुरोधानें हल्लीं तिचें वागणें चाललें होतें. आणि म्हणून जणू काय आपल्या आईच्या रागाचा निषेध करण्यासाठींच तिनें आई-कडे पाठ वळवली आणि गेटाबाहेर एक पाऊल देखील टाकलें. इतक्यांत मोटारीचा पोंगा जोरानें वाजला आणि गार्डीला ब्रेक लावल्याचा कर्कश्श आवाज होऊन दारापाशीं मोटार थांबली. तो आवाज ऐकतांच दचकून तिनें मोटारकडे बघितलें. आप्पासाहेब मोटारींतून उतरतांना तिला दिसले. त्यांच्यामागून एक देखणा तरूण उतरतांनाहि तिनें पाहिला तिच्याकडे बघून आप्पासाहेबांनीं विचारलें, "कुठे निघालीस?" तिनें जरा चाचरतच उत्तर दिलें, " थोडी बाहेर जाऊन येतें. "

" कुठें जातेस एवढ्या उन्हाची ? त्रास नाहीं का होणार ? " आप्पासाहेबांच्या प्रश्नांतलि तो प्रेमळ स्वर ऐकल्यानंतर ऐन उन्हाच्या वेळीं कुठूनतरी थंड वाऱ्याची झुळूक येऊन आल्हाददायक वाटावें त्याप्रमाणें निर्मलेला क्षणभर वाटलें. पण त्यांच्या प्रश्नाला उत्तर देणें हें अगदीं सोपें काम नव्हतें. कारण हल्लीं निर्मलेनें आप्पासाहेबांच्या नकळत जें कार्य करण्याचें आरंभिलें होतें त्या कार्यांत त्यांची आपल्याला कदापिहि समति मिळणार नाहीं याबद्दल तिची खात्री होती. किंबहुना आपण करीत असलेल्या कार्याचा आप्पासाहेबांना थोडाजरी मागमूस लागला तरी ते त्याबद्दल आकाशपाताळ एक करतील याविषयीं तिला मुळींच संशय वाटत नव्हता खरोखर कोणता पिता आपल्या कन्येला आपल्या अगदीं विरुद्ध दिशेनें कार्य करण्याला आपली अनुमति देईल ? आणि अरविंदाला अटक झाल्यापासून निर्मलेनें तशाच प्रकारचें कार्य आरंभिलें नव्हतें काय ? त्या सुमारास अरविंदाप्रमाणेंच संपाचें इतर अनेक पुढारी अटकेंत पडले होते. म्हणून संपाचा जोर थोडाच कमी झाला होता ? उलट लोकांना चेव येऊन ते या पवित्र कार्यांत भराभर उड्या टाकीत होते. आणि नुसते पुरुषच नव्हेत तर सध्यां अनेक स्त्रियाहि

भराभर संपांत सामील होऊन आपला उत्साह प्रगट करीत होत्या. एल्फिन्स्टन रोडवर म्हैसूर ( मॉडर्न ) गिरणीवर ५० स्त्रियाचें पिकेटिंग चालू असतां एका स्त्रिला अटक केली. त्या बाईला अटक करण्यांत आली तेव्हां तेथें असलेल्या सर्व बाया " आम्हाला अटक करा " असें मांगू लागल्या. आणि या अटक झालेल्या बाईला जेव्हा लॉरींत बसविण्यात आलें त्यावेळीं तिनें इतर बायाना ओरडून सागितलें, " भिऊं नका. पिकेटिंग चालू ठेवा; आणि आपलें ब्रीद सोडू नका. " हें ऐकतांच त्या सर्व स्त्रियांनीं लालबावट्याचा मोठा जयजयकार करून म्हटलें, "आम्ही आमचें रक्त सांडू. पण माघार केव्हांच घेणार नाहीं " त्या स्त्रियांचा तो अपूर्व उत्साह बघून निर्मलेच्या अगावर एकप्रकारचे रोमांच उभे राहिले होते. ती स्त्रियाच्या या असल्या उत्साहाचीं आणि सहनशीलतेचीं दृश्यें रोजच बघत होती; आणि तिनें मनाशीं या कार्याला आपला कांहींतरी हातभार लावण्याचें ठरविलें होतें. तसें करतांना तिला त्या कार्याची जितकी महती पटत होती तितकेंच तसें केल्यानें आपण अरविंदावरचें आपलें प्रेम व्यक्त करीत आहोंत असेंहि तिला वाटत होतें. याच सुमारास कामगार स्त्रियानीं एका मोठ्या चळवळीला आरभ केला होता. अटक झालेल्या कामगार पुढाऱ्यांच्या सुटकेची मागणी करण्यासाठीं मुबईतील २५ हजार स्त्री कामगार सरकारकडे अर्ज करणार होत्या आणि १८ मार्च रोजीं या अटकेच्या निषेधार्थ हरताळ पाडण्याचा स्त्री कामगारानीं निश्चय केला होता. महात्मा गाधींना पकडलें म्हणजे जसा हरताळ पाडण्यांत येतो तसा हरताळ १८ तारखेला पाडून पुढाऱ्यांच्या अटकेबद्दल आपल्याला किती वाईट वाटत आहे हेंच सरकारला दाखविण्याचा त्यांचा इरादा होता ता. १४ मार्च रोजीं कामगार मैदानावर भरलेल्या सभेंत कु. गोदूबाई गोखले यांनीं मोठें सडेतोड भाषण केलें. त्यावेळीं त्या म्हणाल्या, " शेतकरी आणि कामकरी आतां जागे झाले आहेत. कामगारांना डांगे, रणदिवे वगैरे त्यांचे अटक झालेले पुढारी पाहिजे आहेत. संपाचें कारण सांगून पुढाऱ्यांना पकडलें तर तें चांगलें होणार नाहीं

असें सरकारला वाटलें म्हणून युद्धविरोधी प्रचार करण्याच्या आरोपा-वरून त्यांना पकडण्यांत आलें. अर्ज करून पुढाऱ्यांची सुटका झाली नाहीं तर दुसरे उपाय योजण्यात येतील " आणि तेव्हांपासून या अर्जावर बाई कामगारांच्या सह्या व अंगठे घेण्याचें काम जोरानें सुरू झालें होतें. याच कामांत सध्यां निर्मला गढून गेलेली होती आणि आतांसुद्धां ती एवढ्या उन्हाची जी बाहेर निघाली होती तें त्याच कामासाठीं ! तेव्हां आप्पासाहेबांच्या प्रश्नाला काय उत्तर द्यावें हें तिला मुळींच सुचेना. पण आपल्या मनाची ही स्थिति आप्पासाहेबांच्या लक्षांत येऊ नये म्हणून तिनें वरकरणी हंसून म्हटलें, " मी जरा माझ्या मैत्रिणीकडे जाऊन येतें. " हें उत्तर देतांना तिची नजर आप्पासाहेबांच्यापेक्षां त्यांच्याबरोबर आलेल्या तरुणाकडेच अधिक होती मग आप्पासाहेब तिच्याजवळ येऊन म्हणाले, " निमाताई, आज तर आपल्याला तुझ्या हातचा चहा घ्यायची लहर आली आहे. किती दिवसांत मिळाला नाहीं तुझ्या हातचा चहा ! नतर मैत्रिणीकडे गेलीस तर नाहीं का चालणार ? "

यावर तिला नाहीं म्हणणें शक्य नव्हतें. नाखुषीनें कां होईना, तिला मुकाट्यानें पुन्हा घरात जावें लागलें. मनुष्याच्या महत्त्वाच्या कार्यांत जेव्हां अडथळा येतो आणि त्याविषयीं त्याला आपला नुसता रागहि व्यक्त करता येत नाहीं तेव्हा त्याला मनांतल्या मनांत चिडण्या शिवाय दुसरें कांहींच गत्यंतर नसतें. निर्मलेनें याच चिडलेल्या मनः-स्थितींत स्टोवर चहाचें आधण चढविलें; पण चहा करतांना तिचें सर्व लक्ष कामगार मैदानाकडे लागलें होतें चहा झाल्यानतर एका ट्रेमध्यें दोन कप ठेवून ती दिवाणखान्यांत गेली आणि तिनें एका बारीक टेबलावर तो ट्रे ठेवून दिला. ती जेव्हां परत जायला निघाली तेव्हां आप्पासाहेबांनीं तिला हांक मारली आणि म्हटलें, " अग, एवढ्या कसल्या घाईंत आहेस ? बैस तर खरी. यांची ओळख करून देतों. "

निर्मलेनें त्या तरुणाकडे पुन्हा ओझरता दृष्टिक्षेप टाकला आणि

तेवढ्यांत तिला कळून आलें कीं तो बराच देखणा आहे. चहा घेतांना आप्पासाहेब तिच्याकडे बघून म्हणाले, " हे शामकान्त आपटे एम्.ए. आहेत. आणि अरविंदाच्या जागेवर मी यांची आजपासूनच नेमणूक केली आहे "

निर्मलेनें त्या तरुणाकडे बघून त्याला नमस्कार करून थोडे हंसल्या-सारखें केलें. त्या तरुणाची ओळख अजून जणूं काय पुरती झाली नाहीं अशा अविर्भावानें आप्पासाहेब पुन्हा बोलू लागले " यांचे वडील अहमदाबादच्या एका मोठ्या गिरणींत मॅनेजर आहेत त्यांच्या कारकीर्दीत खूप मोठे संप झाले पण हां हां म्हणतां ते संपाचा बीमोड करायचे. त्यांच्याच तालमींत हे तयार झाले आहेत. संप मोडणं म्हणजे यांच्या हातचा मळ आहे. खर कीं नाहीं ?" शेवटचें वाक्य उच्चार-तांना आप्पासाहेबांनीं शामकान्ताकडे हंसून बघितलें. मग एखाद्या कसलेल्या योद्ध्याचा आव आणून शामकांतानें म्हटलें, "अहो, आम्हांला माहीत असतात या मजुरांच्या नसा, त्या दाबल्या म्हणजे चट गप्प बसतात हे जेव्हां उपाशीं मरायला लागतात तेव्हांच पायावर लोळण घ्यायला येतात " आपल्या बोलण्याचा निर्मलेवर काय परिणाम होत आहे हें अजमांविण्यासाठीं शामकान्त सारखा तिच्याकडे बघूनच बोलत होता निर्मलेला त्याचें तें बोलणें सहन होणें शक्यच नव्हतें. परंतु आपण जर त्या बोलण्यावर उत्तर देण्यास सुरवात केली तर आपला तोल जाऊन आपल्या तोंडांतून कांहींतरी विचित्र उत्तरें बाहेर पडल्या-शिवाय राहणार नाहींत याबद्दल तिची तिलाच खात्री होती म्हणून आपला राग मनांतल्या मनांत गिळून ती त्या दोघांचा संवाद मुकाट्यानें ऐकत बसली. तो बोलतांना ती त्याच्या चेहऱ्याकडे सारखी न्याहाळून बघत होती. त्यावेळीं तिला सारखें वाटत होतें कीं या शामकान्ताचे डोळे विशाल आहेत पण त्याच्यामध्यें एकप्रकारची क्रूरता भरली आहे. याचें कपाळ भव्य आहे पण त्यामुळेंच तें अधिक भीषण दिसत आहे. आणि यांची जिव्हणी जरा अधिकच रुंद आहे व त्यामुळेंच तो एखाद्या

पिसाटासारखा बोलत आहे मानवी मनाची काय मौज आहे पहा कीं, ज्या शामकांताला तिनें प्रथम देखणा म्हणून मनाशीं ठरविलें होतें त्याच्याच सौंदर्याविषयीं क्षणांत तिचे विचार एकदम पालटले, आणि तो जेव्हा आप्पासाहेबांचा निरोप घेऊन निघून गेला तेव्हां ती मनाशीं म्हणत होती कीं तो सुदर आहे खरा, पण त्याच सौंदर्य भीषण आहे !

आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक देखण्या आणि श्रीमंत तरुणाकडे रमाबाई आपला जांवई या दृष्टीनें बघत असल्याकारणानें शामकान्तावर त्याची नजर गेल्याशिवाय राहिली नाहीं आणि तो निघून गेल्यावर त्या दिवाणखान्यांत आल्या, आणि त्यांनीं आप्पासाहेबांना विचारलें, " कोण आल होत ? "

आपल्या पत्नीकडे हंसत बघून आप्पासाहेब म्हणाले, "ते शामकान्त आपटे नांवाचे गृहस्थ होते "

" कशाला आले होते ? "

" अरविंदाच्या जागेवर त्यांना नेमलं आहें मी "

" अस का ? "

मग निर्मलेकडे वळून आप्पासाहेब म्हणाले, " काय निमाताई कसा काय आहे आमचा शामकांत ? "

" म्हणजे कोणत्या दृष्टीनें ? "

" एकंदर मनुष्य कसा आहे ? "

" दिसायला सुंदर आहे " आणि थोडावेळ थांबून ती म्हणाली, " पण वरून दिसतं तसं आंतून नसत ! "

" म्हणजे काय ? " आप्पासाहेबांनीं आश्चर्यानें विचारलें. कारण निर्मला असलें कांहींतरी बोलेल ही त्यांची मुळींच कल्पना नव्हती. किंबहुना शामकांताची तिच्यावर सहज मोहिनी पडेल असेंच त्यांना वाटलें होतें. निर्मलेनें अगदीं शांतपणानें पण तितक्याच निश्चयानें उत्तर दिलें, " चेहेऱ्यावरून मनुष्याचं अंतरग ताडून बघणं

म्हणजे केवळ मूर्खपणा आहे हा नवा धडा आज मी शिकलें. इतका भयंकर माणूस असेल असं प्रथम मला मुळींच वाटलं नव्हतं."

यावर आतांपर्यंत गप्प बसलेल्या रमाबाई म्हणाल्या, "तुला सार जगच भयकर दिसायला लागलं आहे ! फक्त अरविंदच काय तो तुला महात्मा वाटतो."

रमाबाईंचें हें बोलणें ऐकतांच इतका वेळ दबून बसलेला निर्मलेचा राग एकदम बाहेर पडला आणि त्या रागातच ती म्हणाली, "हो ! का नाहीं वाटणार ? खरोखरच अरविंद महात्मा आहेत."

"तुझ्या त्या महात्म्यानीं साऱ्या जगाच वाटोळ करायच ठरवलं आहे वाटत ? आणि मघांशीं उन्हाची त्याच्याकडेच निघाली होतीस ना ?"

"आई, त्याच्याकडे मला जाता आलं असत तर किती चागल झाल असत ! पण माझं नशीबच खोटं !"

"का ? मुंबईतून काळं तोंड घेऊन गेला वाटत ? बर झालं एकदांच.

"त्याना केव्हांच अटक करून तुरुगात ठेवलं आहे. आई, कशी जाऊ मी त्याच्याकडे ?" असें म्हणतांच निर्मलेला आपला हुंदका आवरणें अशक्य झालें. आणि आपल्या दोन्ही हातांनीं आपलें तोंड झाकून घेऊन ती स्फुदून स्फुदून रडूं लागली. आप्पासाहेबांना तो सारा प्रकार मोठा विचित्र वाटला. आपल्या समोर ज्यूनियर बी ए मध्यें असलेली आपली लाडकी कन्या निर्मला ही रडत आहे हें कांहींकाळ त्यांना खरेंच वाटेना. कारण एरवीं निर्मलेसारखी खिळाडू वृत्तीची मुलगी कांहींतरी दुःख झाल्याशिवाय एकाएकीं रडणार नाहीं ही त्यांची खात्री होती. तिच्या दुःखाची त्यांना कल्पना नव्हती असेंहि नव्हतें. परंतु त्या दुःखाचा परिहार कोणत्या उपायानें करावा हा प्रश्न त्याना सहजासहजीं सुटण्यासारखा नव्हता. किंबहुना निर्मलेचें तें दुःख बाजूला करणें हें त्यांच्या शक्तीबाहेरचें काम होतें. एखाद्या व्यक्तीवर मनुष्याचें जेव्हां मनोमय प्रेम असतें आणिं त्या व्यक्तीला होणारें

परमावधीचें दुःख जेव्हा त्याला दूर करता येत नाहीं तेव्हां त्या व्यक्तीची त्या दुःखाबद्दल नुसती कींव करण्यापलीकडे त्या मनुष्याच्या हातात दुसरें कांहींच नसतें.आताहि आप्पासाहेबाना निर्मलेच्या दुःखा-बद्दल तशाचि कींव येऊन ते म्हणाले, " निमाताई, पुष्कळ वेळा मनुष्यच स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेत असतो. अरविंदाला वास्तविक लपात सामील होण्याची काय गरज होती ? त्यानं तसं केलं नसत तर सर्व गोष्टी तुझ्या मनाप्रमाणें झाल्या असत्या."

आप्पासाहेबाच्या या बोलण्यावर निर्मलेला गप्प बसणें शक्यच नव्हतें कारण तिच्या मनावर अरविंदाच्या ध्येयवादी स्वभावाचा उत्तम पगडा बसला होता.मग ती गप्प तरी कशी बसेल ? ती म्हणाली, ' आप्पा, प्रत्येक माणसाला विशिष्ट ध्येय असत. निदान तसं असा-यला पाहिजे अरविंदाच ध्येय तुमच्यापेक्षा निराळ असलं म्हणून त्यांना नाव ठेवण्यात काय अर्थ आहे ! ज्याठिकाणीं ध्येयांतच इतकी तफावत आहे त्याठिकाणीं तें गांठण्यासाठीं निराळे मार्ग असले तर त्यांत नवल कसल ? आणि त्यांनीं पायावर धोंडा तो काय पाडून घेतला ? "

अरविंदाविषयींच्या उत्कट भक्तीनें ती बोलत होती. आणि त्या बोलण्याचा आप्पासाहेबांच्या मनावर हळू हळू परिणाम होत होता तिच्या बोलण्यांतील प्रत्येक शब्द न् शब्द त्यांनीं आपल्या विचारांच्या कसोटीवर घासून बघितला आणि अढळ सत्याशिवाय त्यामध्यें त्यांना कांहींच आढळलें नाहीं तिच्या बोलण्यावर काय उत्तर द्यावें हें न सुचून ते कांहींकाळ स्तब्ध बसले. नंतर एक लांबलचक उसासा टाकून ते म्हणाले, "निमाताई, तूंच सांग या परिस्थितींत मी काय करू तें ?"

खरोखरच त्यांना तसा प्रश्न पडावा हें सहाजीकच होतें. कारण त्या परिस्थितींत ते कांहींच करू शकणार नव्हते. पण निर्मलेला त्याच्या आश्वासनानें बराच धीर येऊन ती म्हणाली, " आज जरी नाहीं तरी पुढें केव्हांतरी तुम्हांला कांहींतरी करणं शक्य आहे."

"पुढचं पुढें. त्याचं आतां काय?" निर्मलेला आप्पासाहेबांचें एवढें आश्वासन सध्यां पुरेसें होतें.

इतक्यांत समोरच्या घड्याळांत चारचा ठोका पडला. घड्याळाकडे आप्पासाहेबांचें लक्ष जातांच ते कांहींसे मनाशींच म्हणाले, "अरे हो! मला आतां क्लबमध्यें गेलंच पाहिजे पुढच्या महिन्यांत आमच्या क्लबच्या टूर्नामेंटस् आहेत. त्यांची आज मीटिंग आहे." नंतर त्यांनीं निर्मलेला विचारलें,

"येतेस तूं बाहेर माझ्याबरोबर?"

तिनें होकारार्थी फक्त मान हालवली

क्लबसमोर मोटार थांबवांच आप्पासाहेब निर्मलेला म्हणाले, "तुला यायचं असेल क्लबमध्यें तर चल."

"नको. मी जरा फिरून येतें."

"बरं माझी कांहीं हरकत नाहीं. येतांना क्लबवरून ये म्हणजे झालं." असें म्हणून ते क्लबमध्यें शिरतांच तिनें शंकरला म्हटलें, "शंकर, चल मलबार हिलकडे." आणि थोडावेळ विचार करून ती म्हणाली, "जातांना मोटार थोडावेळ कामगार मैदानावर थांबव माझं जरा काम आहे."

मोटार चालत असतांना तिचें मन आप्पासाहेब आणि रमाबाई यांच्या तुलनेंत गुंतलें होतें. आपल्या वडिलांच्याविषयीं पूर्वीपासूनच तिला एकप्रकारचें गाढ प्रेम वाटत असे. आणि त्या प्रेमाचा प्रत्यय तिला वेळोवेळीं आला होता. आपल्या वडिलांना आपल्या मनाची पूर्ण जाणीव आहे याबद्दल तिला एकीकडून अभिमान वाटत होता तर याउलट दुसऱ्याच्या मनाची यत्किंचितहि पर्वा न करण्याची आपल्या आईची वृत्ति बघून तिला त्याबद्दल मनस्वी चीड येत होती. तिला आप्पासाहेबांचा एकच दोष ठळकपणानें दिसत होता. तो म्हणजे त्यांची कांहींशी बाईलबुद्धी वृत्ति! रमाबाई म्हणतील तें प्रमाण मानण्याची त्यांची वृत्ति तिला केव्हांच आवडली नव्हती. आणि पुढें-

सुद्धां कधींकाळीं आपल्या वडिलांनीं आपल्या आणि अरविंदाच्या लग्नाला संमति दिली तरी रमाबाई मध्यें अडथळा आणून अखेरीस आपला हेतू तडीस नेल्याशिवाय राहणार नाहींत ही तिची बालंबाल खात्री झाली होती. आणि रमाबाईनें तसें केल्यास आपण काय करायचें हा तिला मोठा प्रश्न पडला होता. या प्रश्नावर तिनें पूर्वी जसा पुष्कळदां विचार केला होता तसा ती आतांहि करीत होती. आणि त्या विचारांत ती गढली असतांना मोटारचा वेग हळू हळू कमी होऊन मोटार कामगार मैदानापाशीं येऊन दाखल झाली.

खालीं उतरतांच त्याठिकाणीं एक प्रक्षोभकारक दृश्य निर्मलेच्या दृष्टोत्पत्तीस आलें. एक हजार स्त्रियांचा जमाव तिला तेथें दिसला. चौकशीअंतीं तिला कळून आलें कीं सपफोड्या कामगारांना पश्चात्ताप व्हावा आणि त्यांनीं कामावर न जाण्याचें जाहीर करावें म्हणून एक हजार कामगार स्त्रियांनीं सकाळपासून कामगार मैदानावर अन्न-सत्याग्रह सुरू केला होता. जिवाची पर्वा न करता सारा दिवस त्या रखरखीत उन्हांत त्या बसून राहिल्या होत्या त्या समूहाला सभेचें स्वरूप प्राप्त झालें होतें. बऱ्याच स्त्रियांनीं सभेत भाषणें केलीं आणि आतां निर्मला जेव्हां त्या ठिकाणीं दाखल झाली तेव्हां त्या समूहाच्या मध्यभागीं एक अगदीं म्हातारी स्त्री उभी राहून भाषण करीत असताना तिला दिसली तिचेंहि भाषण बहुतेक संपत आलें होतें. भाषणाच्या शेवटीं जेव्हां तिनें म्हटलें, "आम्हांला तुरुगात घालण्यात आलं तरी त्याची आम्हांला पर्वा नाहीं. आम्हीं आमचा निर्धार सोडणार नाहीं. आणि हा अन्नसत्याग्रह करतांना जरी आम्हांला मरण आलं तरी आमचे आत्मे या कार्यामार्गेच धाव घेतील."

त्या स्त्रीचें भाषण संपताच त्या समूहांतून टाळयांचा प्रचंड कड-कडाट झाला. खरोखर तें दृश्य मन थरारून सोडणारें होतें. जिला आयुष्यांत वास्तविक कोणतेंच ध्येय उरलें नव्हतें, अशा यत्कःश्चित् वृद्ध स्त्रीनें या कार्यांत एवढा अपूर्व उत्साह दाखवावा

याचें निर्मलेला राहून राहून आश्चर्य वाटत होतें. आणि या अन्न-सत्याग्रहांत ती म्हणाल्याप्रमाणें जर तिला खरोखरच मरण आलें तर काय होईल या भीतीनें तिचें अंतःकरण भारावून गेलें. थोड्याच वेळात तो छोटा समुदाय हळू हळू पांगू लागला. तेव्हां निर्मला जड पावलानें व तितक्याच जड अंतःकरणानें आपल्या मोटारींत येऊन बसली; आणि मागच्या गादीवर आपल्या शरिराचा सर्व भाग टाकून देऊन ती शंकरला अगदीं खोल गेलेल्या स्वरात म्हणाली, "शंकर, चल !"

ती जेव्हां मलबार हिलवर आली तेव्हां सूर्य अगदीं पश्चिम क्षितिजावर टेंकला होता. जणू काय दिवसभर झालेल्या परिश्रमाचें परिशीलन करण्यासाठींच तो त्याठिकाणीं थोडासा विसावून परत स्वगृहीं जाणार होता. पश्चिमेकडे बरेच ढग जमा झाले होते; आणि मावळत्या सूर्याच्या किरणांनीं त्यांच्या कडा चमकत होत्या. सोनेरी शाईनें रेखाचित्र काढल्याप्रमाणें निर्मलला त्या ढगामध्यें अनेक आकृति दिसू लागल्या. विशेषतः एका आकृतीवर जेव्हा तिची दृष्टि स्थिर झाली तेव्हां तर त्याठिकाणीं तिला अरविंदाची स्पष्ट आकृति दिसूं लागली. तो जणूं काय आपल्याकडे बघून हसत आहे असाहि भास तिला झाला. हळू हळू सूर्यास्त झाला, आणि सोनेरी शाई पुसून गेली. कांहीं वेळानें त्या ढगांची पांगापांग होऊन त्या आकृतीहि लुप्त झाल्या. मग मात्र निर्मलेच्या मनांत एकप्रकारची हुरहूर उत्पन्न झाली. त्या ढगांचें तें दृश्य बघून तिला वाटलें कीं सृष्टीदेवीनें तें आपल्या प्रेमावर एकप्रकारचें रूपकच बसविलें असेल काय ! प्रथम अरविंदाचें प्रेम आपल्याला मिळालें नंतर त्या प्रेमाला पूर्णता येण्याच्या आधींच अरविंद आपल्यापासून दूर निघून गेला. पुन्हा तो आपल्याला भेटेल किंवा नाहीं याचीहि खात्री नाहीं. वाऱ्यानें ढगांच्या आकृति नष्ट केल्या. आपल्या दैवानेंसुद्धा आपल्या मनांतील अरविंदाची प्रेममय आकृति अशीच नष्ट केलेली नाहीं काय !......

अगदीं अंधार पडेपर्यंत तिचे असेच विचार चालले होते. तिला

अरविंदाच्या एका वाक्याची आठवण झाली. पूर्वी जेव्हां ती त्याच्या-बरोबर मलबारहिलवर आली होती तेव्हां अरविंद तिला म्हणाला होता, "याठिकाणीं आल कीं मनुष्याच कोणतंहि दुःख नाहींसं व्हाव असंच हें ठिकाण आहे" ती मनांत म्हणाली, "अरविंद, कोणतीच जागा मनुष्याचें दुःख नष्ट करूं शकत नाहीं. मनुष्यच मनुष्याचें दुःख नष्ट करतो!"

---

# प्रकरण १२

निर्मलेची प्रकृति दिवसेंदिवस खालावत चालली आहे ही गोष्ट आप्पांसाहेबांच्या नजरेंतून सुटली नाहीं आतांसुद्धां तिचें जेवण लवकर आटोपलेलें बघतांच ते म्हणाले, "झाल एवढ्यांत? तूं अलीकडे फारच कमी जेवायला लागली आहेस! तुझी प्रकृति बरी नाहीं का?" यावर निर्मलेनें म्हटलें, "छे! बरी नसायला काय झालं? पण मला अलीकडे भूकच लागत नाहीं"

मग आप्पासाहेबांनीं कांहींकाळ विचार केल्यासारखें केलें आणि नंतर ते निर्मलेकडे बघून म्हणाले, "निमाताई, तूं कांहीं दिवस कुठे-तरी हवापालट करायला जातेस का?"

रमाबाईनाहि ती कल्पना पसंत पडून त्या म्हणाल्या, "काहीं हरकत नाहीं. जा लोणावळ्याला आपल्या मावशीकडे." "खरंच, तिच्या मावशीचं माझ्या लक्षांतच आल नव्हतं"

या आप्पासाहेबांच्या बोलण्यावर रमाबाई थोड्या हंसून म्हणाल्या,

" तें बरोबरच आहे. तिची मावशी म्हणजे माझी बहीण. बायकोच्या माहेरचीं माणसं पुरुषांच्या फारशीं लक्षांत राहात नाहींत !"

रमाबाईचें हें बोलणें ऐकून आप्पासाहेब मोठ्यांदां हंसले नंतर पुन्हा कांहींसा गंभीर चेहरा करून त्यानीं निर्मलेला विचारलें, " मग जातेस लोणावळयाला ? "

निर्मलेनें म्हटलें, "हो माझी कांहींच हरकत नाहीं " आणि तिची तरी हरकत का असणार ? कारण तिच्या कॉलेजला उन्हाळयाची सुट्टी लागली होती. आणि शिवाय मुंबईत तिचें मन गुंतून राहावें असें मुंबईत सध्या कांहींच नव्हतें अरविंदाला अटक झाल्यापासून तिचें लक्ष संपातून जवळजवळ उडालेंच होतें संपाच्या पुढाऱ्याना अटक झाल्यानंतर त्याची सुटका व्हावी म्हणून स्त्री-कामगारानीं कांहीं दिवस जोरानें जी चळवळ सुरू केली होती त्या चळवळींत निर्मलेनें मनःपूर्वक भाग घेतला होता परंतु त्यामध्यें त्या कार्याच्या तळमळीपेक्षा केवळ अरविंदाच्या प्रेमाखातर तिनें त्या चळवळींत आपलें अग ठेवलें होतें. परंतु ज्या प्रेमाची तिला तळमळ लागली होती त्या प्रेमाच्या सफलतेची आशा अलीकडे तिनें जवळजवळ सोडलीच होती. कारण कालच जेव्हा तिच्या लग्नाचा प्रश्न निघाला होता तेव्हां रमाबाईनें त्या बाबतींत तीव्र शब्दांत आपली नापसंती दर्शविली होती इतकेंच नव्हे तर त्या असेंहि म्हणाल्या होत्या कीं, जर निर्मलेनें हट्टानें अरविंदाशीं लग्न केलें तर आपण आपल्या जिवाचें कांहींतरी बरेंवाईट केल्याशिवाय खचित राहणार नाहीं. अर्थात् त्याप्रमाणें त्यांनीं खरोखरच केलें असतें कीं काय हा मोठा प्रश्नच होता. किंबहुना त्यांच्या अप्रगट मनाला जर कोणी तसें विचारलें असतें तर त्यानें त्यांच्या म्हणण्याविरुद्धच आपली साक्ष दिली असती. परंतु कांहींहि असलें तरी त्यांच्या त्या बोलण्यानें निर्मलेच्यापुढें एक मोठाच पेचप्रसंग निर्माण झाला होता; आणि म्हणून तिनें अरविंदाच्या प्रेमाची आशा जवळ जवळ सोडलीच होती. त्यामुळें लोणावळयाच्या बेताला आपली संमति दर्शविण्यास तिला कांहींच

प्रत्यवाय नव्हता. किंबहुना आपण आपल्या आईवाडिलांच्यापासून कांहीं दिवस दूर जाऊन राहावें असेंच तिच्या मनानें अलीकडे घेतलें होतें तेव्हां ही आयती चालून आलेली संधि दवडण्यास ती मुळींच तयार नव्हती.

दुसरे दिवशीं सध्याकाळच्या गाडीला आप्पासाहेब तिला स्टेशनवर स्वतः पोंचविण्यास गेले. त्यांनी स्टेशनवर शंकरला जेव्हा दुसऱ्या वर्गाचें तिकीट काढायला सांगितलें तेव्हा निर्मला म्हणाली, "दुसऱ्या वर्गाचं नको. मी आपली तिसऱ्या वर्गानेंच जाईन."

"अग पण तुझी प्रकृति बरी नाहीं ना ? तुला त्रास होईल"

"तिसऱ्या वर्गात प्रकृति बरे नसलेले लोक नसतात वाटत ?"

या तिच्या बोलण्यावर आप्पासाहेब गप्प बसले तिच्या मनावर अरविंदाच्या विचारसरणीचा खूप परिणाम झालेला आहे तें त्यांनीं मनांतल्या मनांत ताडलें. पण उघड रीतीनें ते कांहींच बोलले नाहींत.

ती तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत बसली तरी आप्पासाहेब बाहेर प्लॅटफॉर्मवरच उभे होते. कदाचित् तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत प्रवेश करण्यांत त्यांना एक प्रकारचा कमीपणा वाटत असावा ! निर्मलेनें आपले दोन्ही हात खिडकीवर टेकले होते, व त्यावर रेलून ती आप्पासाहेबांशीं मधून मधून बोलत होती. त्यावेळीं त्यांनीं तिच्याकडे बरेंच न्याहाळून बघितलें. त्यावेळीं त्याना तिच्या गालाचीं हाडें प्रामुख्यानें वर दिसलीं तिच्या डोळयाभोंवतीं किंचित् काळीं वर्तुळें तयार झालीं होतीं. तींसुद्धां त्यावेळीं त्यांच्या नजरेंतून सुटलीं नाहींत. आणि तिची मानसुद्धां त्यांना तेव्हां अधिकच उंच भासली. या गोष्टी आप्पासाहेबांच्या जेव्हां लक्षांत आल्या तेव्हा त्यांना कांहींसें भडभडून आलें. आणि ते मनांत म्हणाले, "निमाताई, तुझें दुःख मी केव्हांच दूर करूं शकणार नाहीं काय ?" आणि खरोखरच आतांपर्यंत डोळयांदेखत दिसणारें आपल्या लाडक्या कन्येचें दुःख ते दूर करूं शकले नव्हते. या विचारानें त्यांना मनांतल्या मनांत थोडीशी शरमहि वाटली; आणि एखाद्या अपराध्याप्रमाणें ते तिच्याकडे सारखे बघत राहिले.

बहुतेक गाडी सुटेपर्यंत त्यांचें फारसें बोलणें झालेंच नाहीं. फक्त एक फेरीवाला मोसंबीं घेऊन जेव्हां त्यांच्यापाशीं आला तेव्हां ते तिच्याकडे बघून म्हणाले, "थोडीं मोसंबीं घेऊं?"

यावर ती फक्त म्हणाली, "नको. कांहीं जरूरी नाहीं."

इतक्यांत गाडीचा मोठा भोंगा झाला मग मात्र त्यांना वाटूं लागलें कीं आपण तिच्याशीं खूप खूप बोलायला हवें होतें. मनुष्याला जेव्हा वियोगाची कल्पना येते तेव्हा बहुतेक त्याची अशीच स्थिति होत असावी. गाडी सुरू होतांच ते तिला एवढेंच म्हणाले,

"गेल्यावर पत्र पाठव आणि प्रकृतीला सांभाळ बरं."

निर्मलेनें उत्तर देण्याचें ऐवजीं आपली मान नुसती हालवली. गाडी सुरू झाली तरी बराच वेळ ती तशीच बसून होती गाडी चालताना तिच्या डोळयासमोरून अनेक दृश्यें सरकत होतीं, आणि त्यांच्याकडे बघून तिच्या मनांत अनेक विचार येत होते तिला मधूनच डोंगरांच्या रांगा दिसूं लागत आणि त्या डोंगरांच्या माथ्यावर चरणारे मेंढ्यांचे कळप ठिपक्या ठिपक्याप्रमाणें दिसत. त्या कळपामध्यें कांहीं पांढऱ्या मेंढ्या होत्या त्यामुळें जणूं काय काळया रात्रीं आकाशांत शुभ्र चांदण्या चमकत आहेत असा भास तिला सहज होई. मग एखाद्या यक्षिणीच्या कांडीप्रमाणें ती सारी डोंगरांची रांग तिच्या दृष्टीसमोरून एकदम नाहींशी होई आणि नंतर दूरवर लांबच्या लांब सपाट प्रदेश पसरलेला तिच्या नजरेस पडे. हा एकदम झालेला बदल बघून तिच्या मनांत विचार येई कीं मनुष्याचें आयुष्य असेंच नाहीं काय? कधीं तो वैभवाच्या शिखरावर असतो. तर कधीं तो बहुजन समाजाच्या सम-पातळीवर उभा असतो. परतु या विचारांत तिचें मन फारसें गुंतून राहिलें नाहीं. कारण तिची नजर एकदम सूर्यास्तावर स्थिर झाली. आतांपर्यंत अनेक वेळां तिनें सूर्यास्ताचें रम्य दृश्य बघितलें होतें. पण चालत्या गाडींत त्या दृश्याकडे बघण्यांत तिला एकप्रकारचा नवीनच आनंद वाटला. त्यादिवशीं सर्व आकाश ढगांनीं व्याप्त झालें होतें.

परंतु त्या ढगांना सारखेपणा कोठेंच नव्हता. एखाद्या अजगराच्या अंगावर असलेल्या खवल्याप्रमाणें ते ढग दिसत होते. आणि त्यांच्या-वर मावळत्या सूर्याचीं तांबडीं किरणें पडलीं होती त्यामुळें जणूं काय समुद्रावरच्या हालत्या लाटांवरच किरणें पडून त्या लाटा चमकत आहेत कीं काय असा भास निर्माण होत होता. त्या मनोरम दृश्याकडे निर्मला सारखी टक्र लावून बघत होती. सूर्य अगदीं दृष्टिआड होईपर्यंत तिनें आपली नजर तेथून हालवली नाहीं सूर्य जरी दृष्टिआड झाला तरी त्याच्या किरणांची प्रभा बराच वेळ आकाशांत दृग्गोचर होत होती. निर्मलेला वाटलें कीं जणू काय त्या प्रभेच्या रूपानें सूर्य जगाला सांगत आहे, " मरावें परी कीर्तिरूपें उरावें ! "

सूर्याची ती प्रभासुद्धां नाहींशी होऊन जेव्हां ढगांना हळूहळू काळे-पणा येऊ लागला तेव्हां तिला वाटलें कीं आतां बाहेर बघण्यासारखें कांहींच नाहीं तिनें लगेच आपलें तोंड वळविलें आणि सर्व डब्यांतून आपली नजर फिरविली ती सारखी सूर्याकडे बघत असल्यामुळें प्रथम तिच्या दृष्टीला कांहींच दिसेना. म्हणून थोडावेळ ती डोळे मिटून बसली आणि तिला क्षणभर वाटलें कीं गाडी उलटच दिशेनें चालली आहे. इतक्यांत गाडीचा वेग हळूहळू कमी झाला डोळे उघडून तिनें बघितलें तों गाडी स्टेशनमध्यें प्रवेश करीत होती. तिला स्टेशनच्या कडेच्या पांढऱ्या पाटीवर अक्षरें दिसलीं " खडाळा." लोणावळें पुढचेंच स्टेशन असल्यामुळें तिची नजर सहाजीकच आपल्या सामानाकडे गेली. वाचावयाला बाहेर ठेवलेलें पुस्तक तिनें लगेच उठून आपल्या बॅगमध्यें ठेवलें. आणि पुन्हा आपल्या जागेवर येऊन बसली तिचें तावडतोब येण्याचें ठरलें असल्यामूळें स्टेशनवर आपल्याला उतरून घ्यायला कोणीतरी येईल अशी तिची अपेक्षा असणें शक्यच नव्हतें. तरी लोणावळें स्टेशनवर गाडी थांबतांच तिनें सर्व स्टेशनभर न्याहाळून बघि-तलें "अर्थात् तिच्या ओळखीचें तिला कोणीच आढळलें नाहीं. ती डब्या-खालीं उतरली; आणि सामान नेण्याकरितां हमालाची वाट बघत त्याच-

ठिकाणीं क्षणभर थांबली. परंतु तिला स्टेशनवर फारसे हमाल दिसले नाहींत. आता काय करावें या विचारांत ती असतांनाच एक म्हातारा मनुष्य तिच्याजवळ आला आणि म्हणाला, "बाईसाहेब, सामान घेऊं का ?"

तिनें हो म्हटल्यावर त्या वृद्धानें तिचें सामान डब्याबाहेर काढलें. त्याच्या मागून निर्मला हळू हळू चालूं लागली. ती अगदीं पुढच्या डब्यांत बसली असल्यामुळें सर्व गाडी ओलांडून तिला जावें लागलें. ज्या गाडींतून आपण प्रवास केला त्या गाडींतून उतरून जातांना मनुष्याला तिच्याकडे वळून बघण्याचा मोह अनावर होत असतो. निर्मलेलाहि तो मोह टाळतां आला नाहीं. सर्व डब्यांतून तिची नजर फिरत होती. बघतांना एकदम चमकून ती थबकली. क्षणभर तिला वाटलें कीं आपण झोपेंत असून आपल्याला स्वप्न पडत आहे. तिचा तिच्या दृष्टीवर विश्वासच बसेना. तिनें आपले डोळे चोळून बघितलें. पण पुन्हा तोच भास तिला झाला आणि तिच्या तोंडांतून अस्फुट अक्षरें बाहेर पडलीं "अरविंद !"

लगेच गाडीचा भोंगा वाजून गाडीनें स्टेशन सोडलें तिनें त्या डब्याकड पुनःपुन्हा रोखून बघितलें. तिला एका डब्यांत अरविंद बसलेला. दिसला. पण मौज ही कीं खरोखरच आपल्या डोळयांना अरविंदाची मूर्ती दिसली कीं तो नुसता भासच होता हें तिचें तिलाच उमगेना. गाडीच्या मागचा तांबडा दिवा नाहींसा होईपर्यंत ती सारखी त्या दिशेकडे बघत होती. पुन्हा तिनें मनाशीं विचार केला कीं गाडींत अरविंद असणें शक्यच नाहीं. तो सध्यां तुरुंगांत असेल. माणसासारखीं माणसं पुष्कळ असतात. आणि आपण त्याला समोरून तरी कुठे बघितला आहे ? छे ! आपल्याला नुसता भासच झाला असला पाहिजे !

आणि खरोखरच गाडींत तेव्हां अरविंद असता तरी तिनें त्यावेळीं काय केलें असतें ? कारण गाडी केव्हांच निघून गेली होती. तो मागचा तांबडा दिवाहि पण तिला दिसत नव्हता. तेव्हां ती कांहींशी

शुद्धीवर आली. तिनें बघितलें तो तिचा हमाल सामान घेऊन केव्हांच स्टेशनबाहेर पडला होता. मग तीसुद्धां मद मद पावलें टाकीत त्या दिशेनें चालू लागली.

× × ×

गाडीनें लोणावळें स्टेशन सोडतांच अरविंदानें आपलें डोकें पुन्हा उशीवर टेंकलें. विचार करून त्याच्या मनाला खूप थकवा आला होता. त्यानें वास्तविक फार थोडे दिवस तुरुगांत काढले होते परतु त्याला ठाण्याच्या तुरुंगाची हवा सोसली नव्हती तुरुंगांत गेल्याबरोबर दुसरे दिवशींच तो आजारी पडला आणि त्याचा आजार दिवसें दिवस वाढतच चालला त्यामुळें सरकारी हुकुमावरून तुरुंगाच्या अधिकाऱ्यानें कालच त्याची मुक्तता करण्याचें ठरविलें आणि त्याप्रमाणें त्याची मुक्तता करून त्याला मुंबईला आपल्या निवासस्थानीं कालच सोडण्यांत आलें होतें अर्थात् सपांत कोणताहि प्रकारचा भाग त्यानें घेतां कामा नये ही अट त्याच्यावर लादण्यांत आली असल्यामुळें त्याला आतां मुंबईला कोणत्याच प्रकारचें काम उरलें नव्हतें. याशिवाय त्याला मुंबईची हवाहि मानवणें शक्य नव्हतें. तेव्हां प्रकृतीला आराम पडण्यासाठीं पुण्याला जाण्याच्या हेतूनें आज तो निघाला होता. तुरुंगांतून सुटून आल्यानंतर आपला जणू काय पुनर्जन्म झाला आहे असें त्याला सारखें वाटत होतें. त्यानें तुरुगांत नाना-प्रकारचीं दृश्यें बघितलीं होतीं. तीं बघून त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झालेला होता. आणि लहानपणीं चित्रांत बघितलेल्या यमपुरीची त्याला सारखी आठवण होत होती. या सुधारणेच्या काळांतसुद्धां माणसाच्या रानटी अवस्थेची ज्याला कल्पना हवी असेल त्यानें या काळांतील तुरुंगांना एकदां भेट द्यावी म्हणजे त्याला त्याची खचित कल्पना येईल असें त्याचें ठाम मत बनलें होतें; आणि आतांसुद्धां पडल्या पडल्या त्याचे तेच विचार चालू होते खरोखर माणसाला इतक्या निर्दयपणानें बागविण्याची जरूरी आहे काय !

मनुष्याचे हातून अपराध होतात त्याला सर्वस्वीं तोच कारणीभूत असतो काय? दरोडेखोर दरोडे घालतात, त्यात सर्वस्वीं त्यांचाच अपराध असतो काय? तो तुरुंगांत असतांना एका कैद्यानें सांगितलेली हकीकत त्याला आठवली. चोरीमुळें शिक्षा झालेल्या एका कैद्याला त्यानें विचारलें, तेव्हां त्यानें आपली सर्व हकीकत त्याला निवेदन केली होती. तो मनुष्य एका श्रीमंत गृहस्थाकडे कामाला होता. एकदां त्याच्या दिवाणखान्याचा केर त्यानें नीट काढला नाहीं म्हणून त्यानें त्याला बेदम मारलें आणि त्या महिन्याचा पगार देणार नाहीं म्हणून सांगितलें. मागच्या दोन महिन्याचा पगारसुद्धां अशाच कांहीं कारणामुळें त्या श्रीमंत गृहस्थानें त्याला दिला नव्हता. त्या महिन्यांतच दिवाळी होती. त्याच्या घरांत खायला दाणाहि नव्हता. मग सण कसला साजरा करणार? त्यानें खूप गयावया करून पैसे मागितले. पण त्या श्रीमंत गृहस्थाला पाझरहि फुटला नाहीं. तो नोकर त्याचा मुलगाहि सांभाळत असे. आणि अखेर एक दिवस नाईलाजानें त्यानें त्या पोऱ्याच्या गळयांतील सोन्याची साखळी चोरली आणि त्यामुळें त्याला चोरीची शिक्षा झाली होती. अशा अनेक गोष्टी तुरुंगांत अरविंदानें ऐकल्या होत्या. आणि त्या ऐकून त्याची पक्की खात्री झाली होती कीं कोणत्यातरी भुकेनें मनुष्य अपराध करण्यास प्रवृत्त होतो. हा विचार येतांच त्याचे विचार लगेच सध्यांच्या संपाकडे वळले. आणि पुन्हा तो मनांत म्हणाला, "मजूर तरी संप कां करतात? त्यांच्या पोटाची भूक भागली तर ते खास संप करणार नाहींत." संपाच्या पहिल्या दिवशीं त्याच्या व्याख्यानाचे वेळीं जमलेला मजुरांचा प्रचंड समुदाय त्याला डोळ्या-समोर दिसूं लागला. त्यांचे "भूक, भूक" हे शब्द त्याच्या कानांत घुमूं लागले. स्त्रियांच्या मेळाव्यांत एका बाजूला बसून आपलें भाषण एकचित्तानें ऐकणारी निर्मलाहि त्याच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. ती जणूं काय त्याला म्हणत होती, "अरविंद, तुमच्या अंतः-

करणांतील कार्याची तळमळ मला पूर्णपणें दिसत आहे. तुम्ही वाटेल त्या दिव्यांत उडी घ्या. माझी उडी तुमच्या मागोमाग पडेल."

त्यानें तिच्याशीं बोलण्यासाठींच कीं काय आपले ओंठ हालवले. पण त्याच्या तोंडातून एकहि शब्द बाहेर पडला नाहीं त्याच्या घशाला कोरड पडली होती. त्याला पाणी हवें होतें. त्यानें डोळे उघडून सभोंवार बघितलें. पण आगगाडींत प्रेमानें त्याला पाणी देणारें कोण असणार ? मग हाताचा आधार घेऊन त्यानें मान वर केली व बरोबर आणलेल्या फिरकीच्या तांब्यांतील एक घोटभर पाणी तोंडांत टाकलें आणि पुन्हा आपलें डोकें पूर्ववत् उशीवर टेंकून त्यानें एक दीर्घ निःश्वास टाकला. त्याच्या अंगात ताप भरण्यास सुरवात झाली होती. आतां मात्र त्याला निर्मलेची उत्कट आठवण झाली. मनुष्याला आजारीपणांत आपल्या अगदीं प्रिय माणसाचीच प्रथम आठवण होते त्याप्रमाणें त्याला निर्मलेची आठवण होतांच त्यानें आपलें बळ एकवटून तिला हांक मारण्याचा निष्फळ प्रयत्न केला. जणूं काय त्या एका हांकेनें ती त्याच्याजवळ येऊन हजर होणार होती. योगायोग असता तर मघाशींच त्याची गांठ व्हायला हवी होती. कारण मुंबई पासून ते दोन प्रेमी जीव एकाच गाडीनें प्रवास करीत होते. पण त्यांच्या मीलनाचा योगायोग नव्हता हीच गोष्ट खरी !

आतां निदान या काळाच्या रुळावर आयुष्याच्या आगगाडींत तरी त्या दोन प्रेमी जीवांची गांठ पडेल काय ? छे, पण ! काळाच्या उदरांत कोणत्या गोष्टी दडलेल्या असतात हें मनुष्य तरी काय सांगणार !

---

# प्रकरण १३

आज जरी नाहीं तरी या शतकाच्या आरंभीं असा एक काळ होता कीं त्यावेळीं विधवांचें जीवन म्हणजे एक दिव्यच असे. त्यांतून बालविधवांची स्थिति तर कांहीं विचारूच नका! केवळ जीव जात नाहीं म्हणून जगायचें, याशिवाय त्यांच्या जीवनाला दुसरा कांहींच अर्थ नव्हता. परंतु अशाहि स्थितींतून आपल्या जीवनांत आनंद निर्माण करणाऱ्या स्त्रिया त्या काळीं कमी नसत. त्यागाला आपल्या जीवनाचें सूत्र मानून अशा स्त्रिया आपलें आयुष्य अगदीं आनंदानें कंठीत. निर्मलेची इंदू मावशी सुद्धां याच वर्गातील स्त्री होती. त्यांच्या पतीला मुंबईच्या एका गिरणींत मोठ्या पगारावर नोकरी होती. एके दिवशीं त्याच गिरणींतील अपघातानें त्यांनीं आपल्या जीवनाची यात्रा संपविली. त्या दिवसापासून इंदू मावशींच्या खऱ्या जीवनाला प्रारंभ झाला वास्तविक पतिनिधनानंतर त्यांना त्या गिरणीच्या उत्पन्नांतून ठराविक ठशाचें उत्पन्न मिळायला हवें होतें. त्यांना त्या उत्पन्नाची गरज होती अशांतला भाग नव्हता. कारण त्यांच्या पतीची लोणावळयाच्या आसपास पुरेशी इस्टेट होती परंतु कांहींतरी कारणें दाखवून जेव्हां त्या गिरणीच्या मालकानें त्यांना तसें उत्पन्न देण्याचें नाकारलें तेव्हांपासून इंदमावशींच्या मनांत मालक वर्गाबद्दल एकप्रकारची मनस्वी चीड उत्पन्न झाली होती व त्याचबरोबर त्यांना नोकर वर्गाबद्दल एकप्रकारचा जिव्हाळा वाटूं लागला होता. आतांपर्यंत त्यांनीं कोणत्याच मजुरांच्या चळवळींत जरी प्रत्यक्ष भाग घेतला नव्हता तरी तसल्या चळवळीबद्दल आपली आस्था दाखविण्यास त्या कधींच चुकल्या नव्हत्या. सध्यांच्या संपाबद्दलसुद्धां त्यांना तशीच आस्था वाटत होती आणि त्याचमुळें रोजच्या रोज वर्तमानपत्रांतून येणाऱ्या संपाच्या हकीकती

त्या अगदीं लक्षपूर्वक वाचीत असत. आतांसुद्धां त्यांच्या हातांत ताज्या वर्तमानपत्राचा अंक येतांच त्यांनीं वरच्या पानावरची संपाची हकीकत वाचून काढली पण वाचतांना मधूनच त्यांचें लक्ष निर्मलेकडे गेलें. ती अजून झोपलेली होती. बराच उशीर झाल्यामुळें त्यांनीं तिला हांक मारून म्हटलें, " निमाताई, अजून झोप झाली नाहीं वाटतं ? "

एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळतांना ती म्हणाली, " छे ! अजून जरा वेळ मी झोपणार आहें. इतक्यांत नको मला उठवूस!"

" अग, इतक्यांत म्हणजे काय ? आठ वाजून गेले. "

" वाजू देत ! घड्याळाला कांहीं उद्योग आहे का ? "

" वा ! घड्याळाला तर मोठा उद्योग आहे. आळशी माणसाला कामाला लावायचा उद्योग त्यालाच करावा लागतो. " असें म्हणून इंदूमावशी मोठ्यांदां हंसल्या मग निर्मला उठतांना लटक्या रागांत म्हणाली, " मावशी, माझी प्रकृति बरी नाहीं म्हणून मी विसांवा घेण्यासाठीं इथे आलें आहें हें तुला माहीत आहे ना ? "

" अग, झोपण म्हणजे कांहीं विसावा नव्हे. नेहमींचं काम सोडून दुसर काम करण्यांतसुद्धां एकप्रकारचा विसांवा असतो "

" मग मी कोणत काम करू सांग बर ? "

यावर इंदूमावशी हंसून म्हणाल्या, " तावडतोब तोंड धुऊन चहा घेण्याचं !"

निर्मला हंसून तोंड धुण्यास गेल्यावर त्यांनीं हातांतील वर्तमान पत्राचा अंक पुन्हा वाचण्यास सुरवात केली तोंड धुतल्यानंतर चहा घेतांना निर्मलेनें इंदूमावशींना म्हटलें, " कांहीं विशेष बातमी ? "

" विशेष बातमी अशी कांहीं नाहीं. संपाचा जोर दर दिवशीं वाढताच आहे. परंतु मला एका निराळ्याच गोष्टीची माहिती हवी आहे, ती कांहीं केल्या सांपडत नाहीं "

" कोणती गोष्ट ? "

"तुला संपाचा पुढारी अरविंद गोखले माहीत आहे का ?"

या प्रश्नाला काय उत्तर द्यावें हें निर्मलेला प्रथम सुचेना. आणि अरविंदाविषयीं त्यांना काय माहिती हवी आहे हेंहि तिला कळेना. इंदू मावशींचा काळजीयुक्त चेहेरा बघून तर तिचें कुतूहल अधिकच जागृत झालें. आणि इंदूमावशी आपल्याला पुढें काय सांगणार आहेत याची उत्कंठा अनावर होऊन तिनें तावडतोब म्हटलें, "हो, त्यांचं नांव मी ऐकलं आहे. बरं, त्यांच्याविषयीं काय ?"

दुसरं कांही नाहीं पण कांहीं दिवसापूर्वी त्याची प्रकृति बरीच बिघडली असल्याचं कुठेतरी वाचल्याचं आठवतं पण पुढें त्याच्या विषयीं कांहींच माहिती मिळाली नाहीं."

इंदूमावशींचें हें बोलणें ऐकतांच निर्मलेच्या डोळ्यासमोर एकदम अंधारी आली; आणि कपांतला उरलेला चहा घेण्याचें भान न राहून तिनें तो कप तसाच खालीं ठेवून दिला. इंदूमावशींच्या हें लक्षांत येतांच त्या अगदीं तिच्याजवळ जाऊन म्हणाल्या, "काय ग, एकदम असं काय तोंड केलंस ?"

"कांहीं नाहीं. डोळ्यासमोर एकदम थोडी अंधारी आली."

"तेवढा चहा घेऊन टाक म्हणजे जरा बरं वाटेल"

"छे ! मला नको चहा."

"मग थोडं दूध घेतेस ?"

"नको. मला नाहीं दूध आवडत."

मग इंदू मावशींनीं तिच्या कपाळाला हात लावून बघितला त्यावर मोठे घर्मबिंदू चमकत होते. नंतर जरा वेळ ती शांत पडून राहिली. कांहीं वेळानें ती जेव्हां उठून बसली तेव्हां इंदूमावशी तिला म्हणाल्या, "कशाला उठलीस ? पड कीं जरा !"

"कांहीं नको. मला बरं वाटतं आतां."

"किती ग नाजुक प्रकृति झाली आहे तुझी ?"

"चागली प्रकृति असती तर मला इथे यायला मिळालं असतं का?"

"वा, ग वा! मावशींचं घर म्हणजे दवाखाना आहे वाटतं?" असें म्हणून इंदूमावशी हंसल्या. निर्मलेलाहि आपलें हंसू आवरतां आलें नाहीं. परंतु तिच्या हंसण्यांत तितका मोकळेपणा नव्हता कारण तिच्या मनात अरविंदाच्या प्रकृतीविषयीं एक नवीनच काळजी निर्माण झाली होती. आणि त्यांच्याविषयीं उघड रीतीनें तशी काळजी दाखविणें हेंहि तिला शक्य नव्हतें. तरीपण अरविंदाविषयीं आपल्या मावशी-कडून आणखी कांहींतरी माहिती मिळते कीं काय हें बघण्यासाठीं तिनें इंदूमावशींना विचारलें, "अरविंदाची आणि तुझी ओळख आहे?"

"अग ओळख म्हणजे काय? मी अगदीं लहानपणीं बघितला आहे त्याला."

"कुठे?"

"त्याचे वडील नागपूरला वकील आहेत. आणि तुझी आई जेव्हां नागपूरला होती तेव्हां मी मधून मधून तिच्याकडे जात असें. तिथें बघितला होता मी त्याला खरोखर त्यावेळीं मोठा राजबिंडा पोरगा दिसे. तुझ्या आईला मी तेव्हां नेहमीं म्हणे कीं, हा पोऱ्या पुढें मोठा होणार. आणि खरोखरच आतां तो मोठा झाला आहे त्यानें परवां सपाच्या पहिल्या दिवशीं किती सुंदर भाषण केल! वाचलंस का तूं?" निर्मलेनें मनांत म्हटलें, "अग वाचलं कसल? प्रत्यक्ष ऐकल आहे मी!" पण तिनें उघड रीतीनें उत्तर दिलें, "हो; वाचलं आहे."

मग इंदूमावशी पुढें एक दीर्घ सुस्कारा टाकून म्हणाल्या, "अशा वेळीं माझ्या मनांत कधीं कधीं येतं कीं मला जर एखादी मुलगी असती तर ती मी त्यालाच दिली असती."

हें बोलल्यानंतर मात्र त्यांना वाटलें कीं आपणहें निर्मलेच्या देखत बोलायला नको होतें. परंतु मनुष्याच्या मनांत एखादें शल्य सारखें बोचत असलें म्हणजे तें कधींना कधीं बाहेर पडल्याशिवाय राहात नाहीं. निर्मलाहि त्यांच्या बोलण्यावर गप्प बसली. परंतु तिला कांहीं-

तरी बोलायचें आहे असें तिच्या तोंडावरून सहज वाटण्याजोगें होतें. आणि खरोखरच ती कांहींतरी बोलणार होती. परंतु त्या बोलण्यांतील युक्तायुक्ततेबद्दल तिच्या मनांत विचार चालला होता. अखेर मनाचा हिय्या करून ती खाळच्या नजरेनें म्हणाली, " मावशी, तुला मुलगी नसली तरी एक भाची आहे हें तूं विसरलीस वाटत ?"

तिचें बोलणें ऐकतांच इंदुमावशींनीं तिच्याकडे चमकून बघितलें कारण आपली कॉलेजमध्यें शिकणारी भाची एकदम असें कांहीं तरी बोलेल ही त्यांची मुळींच कल्पना नव्हती. आणि म्हणून मग कांहींशा आश्चर्यानें त्यांनीं निर्मलेला म्हटलें, "अरविंदाला न बघतांच त्याच्याशीं लग्न लावायला तयार झालीस वाटत ? वा ग वा !"

त्यांचें हें बोलणें ऐकून निर्मला अधिकच बुचकळ्यांत पडली. पण त्याचबरोबर आपलें हृद्गत आपल्या मावशीजवळ बोलून दाखविण्यास हीच वेळ उचित आहे असेंहि तिला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. आणि मनाचा मोठा निर्धार करून तिनें लगेच तसें केलेंहि ! ती म्हणाली, " मावशी, अरविंदाना मी बघितलं आहे म्हणूनच मी तसं म्हटलं "

अशी सुरवात करून अगदीं थोडक्यांत तिनें आपल्या प्रेमाची कहाणी इंदुमावशींना निवेदन केली. ती निवेदन करतांना तिला कळून आलें कीं आपलें हृद्गत आपल्या मनांत दडवून ठेवण्यापेक्षां तें उघड रीतीनें जगांत सांगणेंच अधिक कठीण काम आहे. परतु तें अवघड काम तिनें केवळ अरविंदाबद्दलच्या उत्कट प्रेमासाठीं केलें होतें. तिच्या प्रेमाची सर्व हकीकत ऐकून इंदुमावशी म्हणाल्या, " निमाताई, तुझं प्रेम खरोखरच अलौकिक आहे आणि अशा प्रेमाला विरोध व्हावा यासारखी खेदाची गोष्ट दुसरी कोणती नाहीं. "

इतकें बोलल्यानंतर त्या कांहीं काळ थांबल्या. त्यांचें पुढील बोलणें ऐकण्यासाठीं निर्मलेचे कान अगदीं आतुर झाले होते. आपल्या शरिरांतील सर्व शक्ति जणूं कानामध्यें एकवटून ती त्यांचें पुढील बोलणें ऐकूं लागली. इंदुमावशी पुढें म्हणाल्या, " तरीपण मी माझ्याकडून होईल

तेतका प्रयत्न करीन रमा माझं ऐकेल याविषयीं मला फारशी शंका वाटत नाहीं. पण आप्पासाहेबांच्याबद्दल मला फारसं सागतां येत नाहीं. तरी... "

पण त्यांचें पुढील बोलणें ऐकण्याच्या आधींच ती म्हणाली, " आप्पांची संमति मिळविण्याचं काम माझ्याकडे लागल. मला फक्त आईचीच भीति वाटते "

" तुझ्या आईची नको काळजी करूंस. मी तिची नक्की समजूत घालीन. "

इंदूमावशींचें हें अश्वासन ऐकतांच तिचें सर्व शरीर आनंदलहरींनीं पुरेपूर भरून गेलें. आणि तिला एक नवीनच उत्साह प्राप्त झाला. आपण बरेच दिवसांच्या आजारांतून एकदम मुक्त होऊन आपला पुनर्जन्म झाला आहे असें तिला वाटून तिनें आपल्या मावशीकडे अगदीं कृतज्ञतेनें बघितलें पण मावशीच्या तोंडाकडे बघताच त्याचा चेहेरा तिला जरा विचारयुक्त दिसला म्हणून गप्प बसून ती आपल्या भावी आयुष्याचें चित्र रेखाटण्यात रंगून गेली. मनुष्याला आशेचा थोडा जरी धागा मिळाला तरी त्या धाग्याच्या आधारानें तो लगेच अंतराळांत हिंडू लागतो निर्मलेचीहि सध्या हीच स्थिति झाली होती. परंतु इंदूमावशींचें पुढील बोलणें ऐकतांच तिला क्षणभर वाटलें कीं आपल्या आशेचा धागा अजून जरा कच्चा आहे इंदूमावशींना पुन्हा अरविंदाच्या आजाराची आठवण होऊन त्यांनीं तिला विचारलें.

" निमाताई, अरविंद ठाण्याच्याच तुरुगांत आहे ना ? "

तिलाहि त्याच्या आजाराची आठवण होऊन पुन्हा तिचा चेहेरा अत्यंत काळजीयुक्त झाला. कारण इंदू मावशीच्या मदतीनें तिच्या प्रेमाची सफलता होण्याचा पुन्हा योगायोग आला असतांना हें नवीनच संकट तिच्या वाटेंत उभें राहिलें होतें. आणि अशा स्थितींत त्याला भेटण्याची उत्कट इच्छा तिला वाटूं लागली. आणि म्हणून इंदूमावशींना तिनें म्हटलें, " हो. अरविंद ठाण्याच्याच तुरुगांत आहेत. पण मावशी त्यांची भेट घेतां येणार नाहीं का ? "

“ माझा तोच विचार चालला आहे. ”

“ पण भेटण्याची परवानगी लागते ना ? ”

“ ती सहज मिळेल. कारण तिथले मुख्य अधिकारी माझ्या चांगल्या ओळखीचे आहेत. ”

“ खरंच ? मग मी येऊं का ? ”

“ अग तुझ्यासाठींच तर जायचं ! ”

ठाण्याला जातांना गाडींत बसल्यावर निर्मलेचे अरविंदाविषयीं विचार चालणें साहजिक होतें. त्याची प्रकृति कशी असेल, आपल्याला भेटल्यावर त्याला आनंद होईल किंवा नाहीं, आपल्याशीं तो काय बोलेल वगैरे गोष्टी तिच्या मनांत सारख्या येत होत्या. इतकेंच नव्हे तर तो भेटल्यावर त्यांच्यामध्यें ज्या प्रकारचे संवाद होतील त्यांची जुळणीसुद्धां तिनें मनाशीं करून ठेवली होती त्यामुळें इंदुमावशीपाशीं गप्पा मारण्यास तिला मुळींच अवधि मिळाली नाहीं. ही गोष्ट जेव्हां त्यांच्या लक्षांत आली तेव्हां त्या म्हणाल्या, “ निमाताई, बोलत ग कां नाहींस ? ”

निर्मलेनें बाहेरील देखाव्यावर आपली नजर स्थिर करून म्हटलें, “ प्रवासांत बोलण्यापेक्षां मला सृष्टीसौंदर्याकडे बघणंच अधिक आवडतं अगदीं थोड्या वेळांत आपल्याला सृष्टीची. अनेक रूपं दिसतात. ती पाहून त्यांत मन तल्लीन होऊन जातं ”

यावर इंदूमावशींनीं हंसून म्हटलें, “ सृष्टीसौंदर्य बघण्यांत मन तल्लीन होतं कीं दुसऱ्या कोणत्या गोष्टींत तल्लीन होतं ? ”

इंदूमावशींच्या बोलण्यांतील भावार्थ लक्षांत येतांच निर्मलेनें लाजून तो विषयच बदलण्याच्या हेतूनें एखाद्या लहान मुलाप्रमाणें म्हटलें, “ मावशी, आज गाडी जरा हळू चालते आहे का ग ? ”

पुन्हा इंदूमावशी हंसून म्हणाल्या, “छे ! गाडी नाहीं हळू चालत. पण तुझं मन मात्र आज गाडीपुढें धावतंय. ”

हें ऐकून निर्मला अधिकच लाजली.

गाडीनें जेव्हां ठाण्याचा बोगदा ओलांडला तेव्हां निर्मलेला वाटलं कीं आतां आपल्या प्रेमाच्या अंधारांतील मार्ग संपून त्या मार्गावर आतां सर्वत्र प्रकाश पसरलेला आहे. पण थोड्यांच वेळांत तिला कळून आलें कीं अजून तिच्या प्रेमाच्या मार्गावरील अंधःकार सपला नाहीं. कारण इंदू मावशींनीं जेव्हां ठाण्याच्या तुरुगांतील मुख्याधिकाऱ्याजवळ अरविंदाची चवकशी केली तेव्हां त्यांनीं म्हटलें, "वा! अरविंदाची तर येथून केव्हांच सुटका झाली आहे."

मध्येंच निर्मलेनें घाईनें विचारलें, "मग सध्यां ते कोठे आहेत?"

"त्यांना मुबईला त्यांच्या निवासस्थानीं सोडण्यांत आलं आहे."

हें ऐकून निर्मलेनें इंदू मावशीकडे बघितलें. तिच्या मनाला निराशेचा धक्का बसला कृष्ण वर्ण ढगांनीं व्याप्त झालेल्या काळ्याकुट्ट आकाशांतून ज्याप्रमाणें मधूनच एकदम एखादी वीज चमकावी त्याप्रमाणें त्या निराशेच्या ढगांतून एक आशाकिरण चमकला आणि त्यामुळें तिला थोडेसें हायसें वाटलें तिनें जाणलें कीं आपली ही निराशा क्षणिक आहे. लवकरच आपल्याला अरविंद भेटेल, आणि तोहि बंदिस्त स्थितींत नसून अगदीं विमुक्त अशा स्थितींत तो आपल्याला भेटणार! हा विचार येताच तिच्या मनातील निराशेची जागा काहींशा अननुभूत अशा आनंदानें भरून गेली. वाऱ्यानें सारे ढग पांगून पौर्णिमेच्या चद्राचें विलोभनीय दर्शन व्हावें त्याप्रमाणें तिच्या मनाची स्थिति झाली; आणि ती लगेच इदू मावशींना म्हणाली, "मावशी, जायचं ना मग मुंबईला?"

पण यावर इंदूमावशींनीं उत्तर देण्याच्या आधींच त्या तुरुंगाचे मुख्याधिकारी नानासाहेब हंसून म्हणाले,

"वा! लागलीच जाणार वाटतं? पण मी कसा जाऊं देईन? महाटेची गाडी आहे कीं तुम्हांला!"

यावर इंदूमावशी हंसल्या आणि म्हणाल्या, "म्हणजे आम्हांला अगदीं कैद करण्याचाच विचार दिसतोय."

हें ऐकून नानासाहेब मनसोक्त हंसले.

निर्मलेला यापुढें तेथें राहणें मुळींच नको होतें. अरविंदाच्या भेटीची तिची आतुरता वाढल्यामुळें तिला त्यांच्या आग्रहाचा खूपच राग आला आणि मुंबईला जातांना गाडींत तिनें इदूमावशींना तसें बोलूनहि दाखविलें. ती म्हणाली, "तुरुंगाचे अधिकारी हे असेच! त्यांना लोकांच्यावर सक्ति करायची नेहमीं संवयच जडलेली असते."

\+ + +

हेमराजवाडी जवळ येतांच एका हॉटेलकडे अंगुलीनिर्देश करून निर्मलेनें व्हिक्टोरियावाल्याला म्हटलें, "तें हॉटेल आहे ना? त्या ठिकाणीं थाम्बव."

एका बारीक बोळींत प्रवेश करतांच इदूमावशींनीं विचारलें, "हीच का हेमराजवाडी?"

"हो. याच बिल्डिंगमध्यें ते चवथ्या मजल्यावर राहतात"

हेमराजवाडीचे जिने चढतां चढतां धांपा टाकीत इदूमावशी म्हणाल्या, "अगबाई, अजून किती चढायचे आहेत जिने?"

"आत्तांशीं कुठे चार झालेत. इतकेच आहेत अजून."

"शाब्बास! स्वर्गच गांठला म्हणायचा मग!"

यावर निर्मला किंचित् हंसून म्हणाली, "नाहींतरी स्वर्गांतच देव राहतात."

या बोलण्यावर इंदूमावशी आपली कांहींतरी चेष्टा करतील ही निर्मलेची खात्री होती. पण तसें कांहींतरी बोलण्याऐवजीं जिने संपल्या-बद्दलचा एक मोठा सुस्कारा टाकून त्यांनीं म्हटलें, "सुटलें बाई एकदांची!"

निर्मला जवळ जवळ पळतच अरविंदाच्या खोलीकडे निघाली. इच्छित वस्तु नजिक येतांच त्या बद्दलची उत्कंठा अनावर व्हावी हा मनुष्यधर्मच आहे. पण हाय! खोली जवळ येतांच एका मोठ्या कुल-पानें तिच्या उत्कंठेला जबरदस्त धक्का दिला. खोलीला कुलूप बघतांच तिला वाटलें कीं चवथ्या मजल्यावरून आपण एकदम खालीं पडलों

आहोंत—नव्हे, तिला क्षणभर इच्छा झाली कीं आपण येथून थेट खालीं उडी घ्यावी आणि आपल्या आयुष्याचा आणि त्याचबरोबर आपल्या आशेचा शेवट करून घ्यावा. पण तिनें तसें केलें नाहीं. मनुष्य उत्कट निराशेंतहि आशेचा शोध करीत असतो. तिनेंहि तसेंच केलें. खोलीला कुलूप लावून कदाचित् तो कोठेंतरी बाहेर गेला असा। म्हणून तिनें शेजारीं चवकशी करण्याचें ठरविलें शेजारच्या खोलीकडे बघताच एका पाटीवर तिला अक्षरें दिसलीं,

"बी शंकरराव. फिडिल वादनपटू"

ही पाटी न वाचतां देखील तिला त्याच्या वादनातील नैपुण्याची कल्पना आली असती आतांपर्यंत तिचें लक्ष नव्हतें नाहींतर मघां-शींच तिला व्हायोलीनवरचे स्वर्गीय स्वर ऐकूं आले असते ! आंत व्हायोलीनवर "जोगिया" राग चाललेला होता. आणि सकाळचे प्रशांत वातावरण त्या वाद्यावरील नादलहरींनीं पुरेपूर भरून गेलें होतें तिला क्षणभर वाटलें कीं खरोखरच आपण स्वर्गांत असून स्वर्गीय संगीत ऐकत आहोंत. संगीतामधील स्वरलहरीमध्यें मनुष्याची या ऐहिक जगांतील सारीं दुःखें नाहींशीं करण्याचें सामर्थ्य खचित आहे यांत कांहीं शंका नाहीं.कारण कांहींकाळ तरी ती आपल्या मनाच्या तीव्र वेदना खरोखरच विसरली परंतु ती तिची संगीत समाधि फार वेळ टिकणारी नव्हती. तिला पुन्हा सत्याचें दर्शन होऊन तिनें आपलीं बोटें त्या दारावर हळूच वाजवलीं. त्या खोलींतून ऐकू येणारें स्वर्गीय संगीत एकदम विराम पावलें. आणि आंतून आवाज आला, "कोण आहे ?"

बाहेरून निर्मला म्हणाली, "जरा दार उघडता का ?"

आंतून बोलणारी व्यक्ति म्हणाली, "विव्होलिना, तेवढं दार उघड बरं."

"विव्होलिना ! काय तरी बाई विचित्र नांव !" असें आश्चर्यानें निर्मला मनाशीं म्हणत असतांनाच दार उघडलें गेलें आणि एक सहा वर्षांची लहान मुलगी तिला आंत दिसली. आपण खरोखरच स्वर्गांत

आहोत असा भास तिला पुन्हा झाला. कारण त्या सुकुमार बालेचें सौंदर्य खरोखरच स्वर्गीय होतें. निर्मलेला वाटलें कीं त्या मुलीला चटकन् उचलून घेऊन तिची अनेक चुंबनें घ्यावींत. पण हा विचार तिच्या मनांतच राहिला. मग ती मुलगी बोबड्या भाषेंत म्हणाली, "कोण पाहिजे ? आमचे आप्पा ?" निर्मला हंसून म्हणाली, "हो तुझे आप्पा हवे आहेत"

निर्मलेनें चवकशी करतांच तिला कळून आलें कीं अरविंदानें ती जागा नुकतीच सोडून तो दुसरीकडे राहायला गेला आहे. तिनें त्याच्या नव्या पत्त्याची चवकशी केली. पण तोहि तिला कळला नाहीं. मग तेथून जाण्याशिवाय त्या दोघींना दुसरें कांहींच गत्यंतर नव्हतें. खालीं येतांच इंदूमावशी म्हणाल्या, "मग काय निमाताई ?"

यावर काहीं बोलण्याऐवजीं तिनें आपला हात फक्त कपाळाला लावला मग इंदू मावशी म्हणाल्या,

"तुझ्या आईला भेटून जायचं का ?"

निर्मला जवळजवळ ओरडूनच म्हणाली, "छे ! छे ! तें मुळींच नको. तिला जर आपलं सारं कळलं तर ती मला फाडूनच खाईल."

' असं काय बर बोलावं आपल्या आईबद्दल ?"

"नाहींतर काय ? तीच या सर्व गोष्टींना कारणीभूत आहे." असें म्हणून निर्मलेनें आपला रुमाल डोळ्यांना लावला. तिचें सांत्वन करून इंदू मावशी म्हणाल्या, "तू वाईट वाटून घेऊ नकोस. आपण त्याचा शोध करूं" रडक्या स्वरांतच निर्मला म्हणाली, "कोठें करणार शोध ?"

"हो तेहि खरच. मुंबई कांहीं लहान सहान नाहीं."

थोडा वेळ थांबून इंदू मावशी म्हणाल्या, "निमाताई, काळजी करूं नकोस. तो तुला खास भेटेल."

परंतु निर्मलेला त्यांच्या या अश्वासनानें फारसा धीर आला नाहीं. कारण केवळ आपल्याला बरें वाटावें म्हणून आपली मावशी तसें बोलली आहे हें निर्मलेनें जाणलें. बराच वेळ कोणी कांहींच बोललें

नाहीं. जेव्हां मनुष्याचें दुःख शब्दाबाहेरचें असतें तेव्हां त्याच्या सांत्वनार्थ कोणत्याच शब्दांचा उपयोग न करतां अगदीं स्तब्ध बसणें हाच योग्य मार्ग असतो. किंबहुना त्याच्या सांत्वनार्थ जितक्या अधिक शब्दांचा खर्च होतो त्या प्रमाणांत त्याचें दु ख वृद्धिंगत होत असतें. म्हणून इंदू मावशी बराच वेळ गप्प होत्या. नंतर निर्मलाच त्यांना म्हणाली, "मावशी, चल परत लोणावळ्याला. माझ्या नशिबीं प्रेमाची सफलता दिसतच नाहीं. त्याला तू तरी काय करणार?"

हें म्हणताना तिचा कठ अगदीं दाटून आला. आणि सर्वस्वीं निराश झालेल्या माणसानें आपल्या इच्छित वस्तूचा कायमचा नाद सोडून दिल्यानंतर ज्याप्रमाणें सुटकेचा दीर्घ निःश्वास टाकावा त्याप्रमाणें तिनें एक जड सुस्कारा सोडला.

ती गाडींत इंदू मावशीपाशीं एकहि शब्द बोलली नाहीं. जितक्या आशेनें ती मुंबईला आली होती तितक्याच निराशेनें ती परत लोणावळ्याला चालली होती गाडी चालतांना तिला सारखा भास होत होता कीं आपण सबंध जगाच्या प्रवासाला निघालों आहोंत आणि आपला हा प्रवास आपल्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत चालणार आहे आणि जेव्हां गाडीनें खंडाळ्याच्या बोगद्यात प्रवेश केला तेव्हां तिला वाटलें कीं हा अंधःकार आतां केव्हांच संपणार नाहीं तिच्या मनात निराशेचा एवढा घनदाट अंधःकार पसरला असतांना तिला बाह्य सृष्टींतील उजेडाची जरूरी होती कुठे?

# प्रकरण १४

आज हवेंत मनस्वी उकाडा होता खरा, परंतु अरविंदाला तो होता त्यापेक्षा अधिकच जाणवत होता. मनुष्य संत्रस्त मनःस्थितींत असला म्हणजे त्याला आपल्या भोंवतालचें वातावरण अधिकच तप्त वाटू लागतें की काय कोणास ठाऊक ! गेले दोन तीन दिवस अरविंदाची मनःस्थिति तशीच झाली होती. आणि त्याला कारणहि तसेंच होतें. संपाची परिस्थिति दिवसें दिवस अधिक बिकट होत चाललेली होती. मालकांनीं मजुराना चौदा दिवसांची नोटीस देऊन एकप्रकारची धमकीच दिली असल्यामुळें कामावर जाणाराची संख्या हळू हळू वाढत चालली होती काँग्रेसनें मध्यस्थी करण्याची तयारी दर्शविली असूनहि मालक आपलें धोरण बदलण्यास मुळींच तयार नव्हते. या सर्व गोष्टींचा काळजीपूर्वक विचार करण्यासाठीं गिरणी कामगार युनियनच्या मॅनेजिंग कमेटीची बैठक अखेर भरवावी लागली. आणि तीन तासांच्या चर्चेनंतर केवळ कामगारांच्या कल्याणासाठीं संप कायमचा स्थगित करण्याचा विचार त्यामध्यें कायम करण्यात आला होता. संप फुटला तरी हरकत नाहीं, पण तो मागें मात्र घ्यावयाचा नाहीं अशा मताचा अरविंद असल्यामुळें त्याला कमीटीचा तो निर्णय पटणें कधींच शक्य नव्हतें. आणि तो स्वतः जर त्या दिवशीं बैठकीला हजर असता तर संप स्थगित करण्याच्या ठरावाला त्यानें कसून विरोध करण्यासहि कमी केलें नसतें परंतु त्याची प्रकृति फारशी बरी नसल्या-कारणानें तो बैठकीला हजर राहू शकला नाहीं. आणि त्यामुळें प्राप्त झालेल्या परिणामाबद्दल मनातल्या मनांत चिडण्याशिवाय त्याला दुसरें कांहींच गत्यंतर उरलें नव्हतें. आणि आतांसुद्धां ताज्या वर्तमान पत्रांतून संपाची ही हकीकत वाचल्यानंतर त्याला मनस्वी चीड येऊन त्यानें वर्तमानपत्राचा तो अंक आपल्या हातातून दूर भिरकावून दिला;

आणि तिरस्कारानें त्या अंकावर एक दृष्टिक्षेप टाकतांच त्याला त्या अंकाच्या वरच्याच बाजूला जाड मथाळ्यांत अक्षरें दिसलीं, "संपांत मजुरांचा नैतिक विजय!" त्या अक्षरांवर नजर जातांच उपहासानें हसून तो मनात म्हणाला, "नैतिक विजय! अपजयाला वाटेल त्या शब्दाचा जरी मुलामा दिला तरी तो विजय केव्हांच ठरत नाहीं. अखेरपर्यंत लढण्यांतच खरा विजय असतो! पुढाऱ्यांना आपल्या शक्तींची जाणीव नव्हती तर त्यांनीं संपाला सुरवात तरी कशाला केली? बिचारे मजूर! पुढाऱ्यानीं झेंडा उभारतांच त्या झेंड्याखालीं आपल्या सर्वस्वाचें तर्पण करून उभे राहिले. त्यांना मध्येंच थांबायला लावून त्याचा उत्साहभग या पुढाऱ्यांनींच केला आहे हा मजुराचा नैतिक विजय खचित नव्हे! हा त्याच्या नैतिक धैर्याचा धडधडीत अपमान आहे."

याप्रमाणें त्याचे विचार चालू असतांनाच त्या खोलीचें दार एकदम उघडलें गेलें आणि नीलेनें आंत प्रवेश केला. तरी त्याला तिच्या येण्याची मुळींच चाहूल लागली नाहीं तो विचारात गढलेला पाहून नीला त्याच्या जवळ येऊन म्हणाली, "कसला विचार चालला आहे एवढा?"

परतु या प्रश्नानेंहि तो फारसा भानावर आला नाहीं त्यानें तो प्रश्न ऐकला एवढी गोष्ट मात्र खरी. कारण त्या प्रश्नाला अनुसरूनच पण जणू काय स्वतःशींच तो म्हणाला, "आतां विचार कसला? विचार करण्याच्या बाहेर सर्व गोष्टी गेल्या आहेत.

त्याच्या मनावर कसला तरी भयंकर परिणाम झालेला आहे हें नीलेनें तेव्हांच जाणलें. अशावेळीं त्याच्याशीं काय बोलावें या विचारांत ती असतांना तोच तिला म्हणाला, "बर झालं वहिनी, आलांत. मनुष्याच्या आयुष्यांत असें कांहीं क्षण येतात कीं त्यावेळीं त्याला एकांतवास असह्य होतो." असें म्हणतांना त्याला हंसण्याचा बराच प्रयत्न करावा लागला. मग नीला म्हणाली, "हो. म्हणूनच

मी तुमच्यापाशीं गप्पा मारायला आलें आहें." असें म्हणून बराचवेळ तीहि गप्प बसली. ती स्तब्धता असह्य होऊन अरविंदानें म्हटलें, "हें काय वहिनी? गप्पा मारायला आला आहांत ना? मग बोलत कां नाहीं?"

"खूप बोलणार आहें. पण कस बोलाव हेंच कळत नाही."

"वा! तें तर अगदीं सोपं काम आहे. तोंड उघडायच आणि बोलत सुटायच!" असें म्हणून अरविंद मनसोक्त हसला परतु चंद्राच्या भोंवतीं जसे कांहीं ढग रेंगाळत राहावेत त्याप्रमाणें त्या हंसण्याच्या मागें त्याच्या मनावर एकप्रकारची विषण्णता अजूनहि कायम होती. नीलाहि त्याचें बोलणें ऐकून हसली. परतु तिनेंहि लगेच गंभीर चेहरा केला. अरविंदानें जेव्हां तिच्या तोंडाकडे न्याहाळून बघितलें तेव्हां त्याला त्याठिकाणीं नेहमींचे भाव दिसले नाहींत. परतु त्याबद्दल त्याच्या मनात कांहीं विचार येण्यापूर्वीच नीला त्याच्याकडे बघून म्हणाली, "अरविंद, मी तुम्हाला एक प्रश्न विचारणार आहें. विचारूं का?"

हें ऐकून तो कांहींकाळ विचारात पडला पण तिच्या प्रश्नाविषयीं त्याचें कुतुहल वाढून तो एवढेंच म्हणाला,

"वहिनी, एक सोडून अनेक प्रश्न विचारा."

"छे! माझा प्रश्न एकच आहे. पण तो ऐकून तुम्ही रागावणार नसाल तर विचारतें."

त्याचें कुतूहल अधिक वाढीला लागून तो म्हणाला,

"छे! त्यांत रागवायचं काय?"

नंतर आपली नजर जमिनीला लावून शक्यतितक्या हलक्या स्वरांत नीला म्हणाली, "अरविंद भावोजी, तुमचं प्रेम मला मिळेल का?"

अमावस्येच्या रात्रीं एकदम पौर्णिमेचें लख्ख चांदणें पडलें असतें, किंवा तो पूर्ण चंद्र एकदम नाहींसा होऊन त्या ठिकाणीं ऐन माध्यान्हीच्या सूर्याचा तप्त गोळा दिसला असता, किंवा सृष्टीमध्यें पर्वताच्या ठिकाणीं

एकदम समुद्र आणि समुद्राच्या ठिकाणीं एकदम पर्वत हें स्थित्यंतर जरी घडलें असतें, तरी त्या सर्व गोष्टींबद्दल अरविंदाला यत्किंचितहि आश्चर्य वाटलें नसतें. इतकें आश्चर्य नीलेच्या त्या एका प्रश्नाबद्दल त्याला वाटलें. तो प्रश्न नीलावहिनींनीं आपल्याला विचारलाच नाहीं अशीहि समजूत त्यानें मनाशीं करून बघितली पण कांहीं केल्या तो प्रश्न त्याला मनावेगळा करता येईना. त्या प्रश्नाचें उत्तर आपल्याला कधींच देता येणार नाही आणि आपण उत्तर देण्याचा जर प्रयत्न केला तर आपली वाचाशक्ति एकदम लुप्त होऊन जाईल कीं काय अशीहि भीति त्याला वाटली आपल्या प्रश्नानें अरविंदाच्या मनांत उत्पन्न झालेलें वादळ नीलेनें ओळखलें पण तिनें त्या प्रश्नाचें उत्तर मिळविण्याचा आज निर्धारच केला होता त्यामुळें तिला पुढें गप्प बसणें शक्य झालें नाहीं पुन्हा ती तितक्याच निश्चयानें म्हणाली, "अरविंद, राग आला तुम्हांला माझ्या प्रश्नाचा? परतु कांहीं असलं तरी माझ्या प्रश्नाच उत्तर तुम्हीं दिलं पाहिजे. बोला, तुमच्या त्या एका उत्तरावर माझ्या आशेचा सर्व मनोरा उभा आहे. नाहीं म्हणू नका. अरविंद, पुन्हा मी तुम्हांला विचारतें कीं तुमच प्रेम मला मिळेल का?"

हें बोलल्यानंतर अरविंदाकडे बघण्याची तिला भीति वाटली. म्हणून तिनें आपली नजर बाहेरच्या दिशेला लावली. बाहेर खांबाच्या तारेवर पक्ष्याचा एक थवा जमला होता त्या पक्ष्याच्यावर जेव्हां तिची नजर स्थिर झाली तेव्हां तिच्या मनात विचार आला कीं आपल्या मनावर याचप्रमाणें आशेचे अनेक पक्षी बसलेले आहेत. पण अरविंदाचें जर आपल्याला अनुकूल उत्तर मिळालें नाहीं तर ते पक्षी एकदम सैरावैरा उडून जातील. इतक्यांत समरोच्या तारेवर बसलेले असंख्य पक्षी खरोखरच उडून गेले आणि त्याचवेळीं अरविंदानें बोलण्यास सुरवात केली. तो शांतपणानें म्हणाला, "नीलावहिनी, जो प्रश्न वास्तविक विचारायला नको होता तो प्रश्न तुम्हीं मला विचारलेला आहे. पण त्याला आतां इलाज नाहीं. कारण तोंडांतून सुटलेले शब्द पुन्हा कधींच परत येत नसतात."

तो पुढें बोलणार इतक्यांत मध्येंच त्याला थांबवून ती म्हणाली, "पूर्ण विचार करून बोललेले शब्द परत आले नाहींत तरी चालतील आणि ते शब्द जरी परत आले तरी मी तुम्हांला पुन्हा तोच प्रश्न विचारीन कीं तुमचं प्रेम मला मिळेल का ?"

यापुढें अरविंदाला आपल्या मनावर ताबा ठेवणें अशक्य होऊन तो जोरानें ओरडून म्हणाला,

"वहिनी, तुम्हांला नीतीची कांहींच पर्वा वाटत नाहीं काय ?"

पण जितक्या जोरानें तो ओरडला तितक्याच शांतपणानें कांहींसें उपाहासात्मक हास्य करून नीला उद्गारली, "नीति ! अरविंद, नीति दुबळी असते हो ! जगावर निसर्गाचीच सत्ता चालते निसर्गापुढें नीतीला नमावं लागत "

"वहिनी, माफ करा पण ज्या गोष्टी मी बोलणं उचित नाहीं त्या गोष्टी मला बोलाव्या लागणार आहेत घरांत प्रत्यक्ष पति जिवंत असतांना तुमच्या तोंडांतून असल घाणेरडं बोलण बाहेर तरी कसं पडलं ? वास्तविक पतीशिवाय बाकीचे सर्व पुरुष तुम्हांला परके वाटायला हवेत तुम्हांला आपल्या प्रेमाची भूक भागवायची असेल तर आपल्या पतीवरच त्या प्रेमाचा वर्षाव तुम्ही कां करीत नाहीं ? त्यामुळें कांहीं गोष्टींचा तुम्हांला त्याग करावा लागेल हें मला कबूल आहे. पण वहिनी, सतीच्या त्यागांतच विश्वाची सर्व शक्ति भरलेली असते हें विसरूं नका. त्यागी जीवनातच खरा ब्रह्मानंद भरलेला असतो."

त्याचें बोलणें अगदीं शांतपणानें ऐकून घेतल्यानंतर नीला म्हणाली, "अरविंद, या सर्व गोष्टी फक्त बोलण्याच्या आहेत तुम्हांला वाटतात तितक्या त्या सोप्या नाहींत. हृदयांत तारुण्याची भूक पेटली असतांना असल्या गोष्टींचा त्याठिकाणों विचारसुद्धां होत नसतो. मी माझ्या पतीवर प्रेम करावं असं तुम्ही म्हणतां. माझी त्यांच्यावर निस्सीम भक्ती राहील. पण त्यांच्यांवर प्रेम करणं मला कधींच शक्य होणार नाहीं. आणि मी तरी त्यांच्यावर कां प्रेम करावं ?

माझ्या तारुण्य सुलभ अशा कोणत्या आकांक्षा त्यांनीं पुऱ्या केल्या आहेत म्हणून मी त्याच्यावर प्रेम करूं ? मनुष्य नुसत्याच त्यागावर जगतो काय ? त्याला तितकेच भोगहि नकोत का ? किंबहुना त्याग आणि भोग यांचें मधुर मिश्रण म्हणजेच खरें मानवी जीवन नव्हे काय ? मी म्हणतें त्याचा नीट विचार करा आणि मग माझ्या प्रश्नाचें उत्तर द्या हो म्हणा नाहीं म्हणून मला निराश करू नका. तुम्ही जरी सारख नाहीं म्हणालांत तरी जिवात जीव असेपर्यंत तोच प्रश्न मी तुम्हाला सारखा विचारीत सुटेन कधींतरी त्या प्रश्नाच उत्तर तुम्हाला द्याव लागेल मग आतांच कां नाहीं देत उत्तर ? अरविंद, सागा ना तुमच प्रेम मला मिळेल का ? ''

ती बोलतांना अगदीं बेहोप झाली होती. अरविंदाविषयींच्या उत्कट प्रेमानें ती बोलत होती अरविंदालाहि स्त्रीप्रेमाची कल्पना नव्हती अशांतला भाग नव्हता. परन्तु ज्या प्रेमाचा त्याला स्वीकार करावयाचा होता तें प्रेम अत्यत विचित्र असें होतें. आणि म्हणून त्या प्रेमाचा स्वीकार तो कधींहि करू शकणार नव्हता. तथापि त्यावेळीं कोणताहि युक्तिवाद लढविणें म्हणजे केवळ मूर्खपणा आहे हें जाणून तो काहींवेळ गप्प बसला परतु पुन्हा जेव्हां नीला कांहींतरी बोलण्याच्या विचारांत दिसली तेव्हां तो म्हणाला, "वहिनी, तुम्ही आतां बोलू नका. कोणीतरी ऐकेल ''

आणि त्याची ही भीति अगदींच निराधार नव्हती. कारण मघाशीं उमाबाई नीलेच्या देखत बाहेर पडल्या होत्या खऱ्या. पण कांहीं पावलें चालून गेल्यावर त्याना वाटेंत गंगूताई भेटली होती; आणि पुन्हा त्या दोघी मायलेकी घरीं परत आल्या होत्या आणि अलीकडच्या खोलीं-तून त्या दोघींनीं त्यांचें सर्व संभाषण ऐकलें होतें. ही गोष्ट अर्थात् नीलेला माहीत नसल्यामुळें ती म्हणाली, "ऐकायला घरांत आहे कोण ? तरी पण तुम्हांला नको असेल तर मी पुढें बोलणार नाहीं. माझ्या प्रश्नाचं उत्तर केव्हां देणार हें तेवढं मला सांगा. म्ग मी येथून निघून जाईन. ''

अरविंदाच्या मनांत विचारांची जरी जोराची खळबळ सुरू झाली होती तरी ती दाबून तो अगदीं शांतपणानें म्हणाला, " वहिनी, उद्यां सकाळीं मी तुमच्या प्रश्नाचं उत्तर देईन. "

यानतर नीला लगेच उठली. उठताना तिचें लक्ष दुसऱ्यादां त्या तारेकडे गेलें. त्या तारेवर पुन्हा थोडे थोडे पक्षी जमायला लागले होते. परंतु तिची पाठ फिरताच एका उनाड पोऱ्यानें आपल्या हातातील गिलोरीनें त्या पक्ष्यांवर खडे मारले त्यासरशी ते सर्व पक्षी घाबरून दूर दूर उडून गेले.

अरविंदहि मग त्या जागेवरून उठला त्याला एकदम गळल्यासारखें वाटू लागलें. हेलकावे खात कसातरी तो गॅलरींत गेला. आणि कठाड्याला रेलून तो उभा राहिला. नुकत्याच झालेल्या प्रसंगानें त्याच्या मनावर जबरदस्त परिणाम झालेला होता. शून्य मनानें आणि भकास नजरेनें तो समोर बघत होता लॉ कॉलेजच्या टेकडीवरची पाण्याची टाकी त्याच्या अगदीं दृष्टीच्या टप्प्यांत होती. समोरच एक मोठा शेळ्यांचा कळप चरत होता. त्यांतील कांहीं शेळया आपले पुढील दोन पाय उंचावून बाभळीचे काटे खात होत्या. प्रभात कपनीचे पुष्कळ कामगार काम सुटल्यानंतर घरीं मोठ्या आतुरतेनें चालले होते. आणि कैऱ्यानीं डंवरलेल्या एका आम्रवृक्षाला काही मुलें दगड मारून कैऱ्या पाडण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु यापैकीं एकहि गोष्ट त्याला दिसली नाहीं. मग कांहीं वेळानें त्याची नजर क्षितिजावर स्थिर होतांच त्याला आपल्या नजरेसमोर आकाशाप्रमाणें निळाच्या निळा प्रदेश सर्वत्र पसरलेला दिसूं लागला. मधूनच त्या अफाट नील प्रदेशांत त्याला एक पुसट आकृति दिसूं लागली. कांहीं वेळानें ती आकृति आपल्या आईची असल्याचा त्याला भास झाला. ती आकृति अखेर अगदीं स्पष्ट होत होत त्याच्या अगदीं नजिक आली आणि तिनें उच्चारलेले शब्द त्यानें चांगले ऐकले कीं, " अरू, मी सदैव तुझ्या पाठीशीं आहे. " मग लगेच त्याला आपल्या आईच्या पत्राची आठवण होऊन त्या पत्रांतील दानेच वाक्यें त्याच्या कानांत हळूच कोणीतरी सांगितल्याचा त्याला

भास झाला. " आयुष्यांत मोहाचे क्षण अनेक येतात. पण त्यांच्यावर जो विजय मिळवितो तोच आयुष्याची लढाई जिंकतो. " आणि ही वाक्यें ऐकतांच तो त्या आकृतीला म्हणाला, " आई, मी मोहावर खचित विजय मिळवीन तू काळजी करूं नकोस. " हे त्याचे शब्द ऐकताच ती आकृति जशी हळू हळू पुढें आली तशीच हलके हलके मागें जाऊ लागली शेवटीं अगदीं पुसट पुसट होऊन ती नाहींशी होणार इतक्यांत अरविंद ओरडून म्हणाला, " आई, नीला वहिनींना मी उद्या काय उत्तर देऊ ? "

परतु तात्काळ ती आकृति विराम पावली आणि अरविंद त्या तात्पुरत्या स्वप्नांतून जागा झाला नंतर त्याला डोळ्यांसमोर गडद अधार दिसूं लागला आणि पुढें तर त्याच्या दृष्टीला गढद अंधःकारा-शिवाय दुसरें कांहींच दिसेना तेव्हां कठड्याचा आधार घेऊन गॅलरींत असलेल्या आराम खुर्चीवर त्यानें आपलें अंग टाकून दिलें आणि आपले डोळे अगदीं घट्ट मिटून घेतले

---

# प्रकरण १५

दुसरे दिवशीं एक अगदींच विस्मयकारक अशी घटना घडली. नीला तिच्या रोजच्या नियमाप्रमाणें विजयचा सकाळचा चहा घेऊन त्याच्या खोलींत गेली. तो झोपलेला आहे असें बघून तिनें चहाचें व तोंड धुण्याचें सर्व साहित्य नेहमींच्या मेजावर मांडून ठेवलें. आणि त्याला हळूच हांक मारली. परतु त्यानें ओ दिली नाहीं. पुढें दोन तीन हांका मारूनसुद्धां जेव्हां त्यानें कांहींच हालचाल केली नाहीं.

तेव्हां तिची खात्री झाली कीं त्यानें झोंपेचें मुद्दाम सोंग घेतलेलें असावें कारण मधून मधून त्याला तशी लहर येत असे आणि त्यावेळीं नीला विनोदानें कांहींतरी बोलून त्याला हंसविल्याशिवाय राहात नसे. आतांहि तिला तशी लहर येऊन तिनें म्हटलें, " आज अगदीं कुंभ-कर्णी झोप लागलेली दिसते ! "

परंतु या तिच्या विनोदावर तो नेहमींप्रमाणें हंसला नाहीं. मग अगदीं जवळ जाऊन तिनें त्याच्या तोंडावरचें पांघरूण जरा दूर केलें आणि त्याच्या मुखावरील कांहींसा हसरा भाव बघून म्हणाली. " इश्श्य ! मनुष्यान सोंग तरी किती करायचं ! "

परंतु तरीहि तो उठला नाहीं मग मात्र ती खरोखरच चिडली आणि तिनें त्याच्या खांद्याला गदगदा हालवून त्याला उठविण्याचा प्रयत्न केला. पण हाय !—हालवून जागृतावस्थेंत येण्याच्या स्थितींतून तो केव्हांच निघून गेला होता ! तुरुंगांतून कैदी निघून गेल्यानंतर तो तुरुंग कसला ? पिंजऱ्यांतून पक्षी निघून गेल्यानंतर तो पिंजरा कसला ? तसेंच देहांतून आत्मा निघून गेल्यानंतर तो देह तरी कसला ? प्रलय कालापर्यंत नीलेनें त्याला हालविलें असतें तरी तो जागा होणार होता काय ? परंतु त्याच्या देहाची ती अवस्था लक्षांत येण्यास तिला कांहीं काळ लागला. पण ती लक्षांत येतांच ती किंचाळून उठली आणि मागें सरकली तितक्यांत जवळच असलेल्या चहाच्या मेजाला तिचा धक्का लागून त्या मेजावरचें सर्व साहित्य एकदम खालीं कोसळलें किटलीचे आणि कपाचे तुकडे तुकडे होऊन त्याचा मोठा आवाज झाला. तो आवाज ऐकून एकदम गंगूताई धावत आली आणि म्हणाली, " काय हो वहिनी ? कसला आवाज झाला ? "

पण तिच्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजीं विजयकडे बोट करून ती काकुळतीनें म्हणाली, " गंगूवन्सं, बघाहो हें काय झालं ? " असें म्हणून तिनें मोठ्यांदा रडण्यास सुरवात केली. गंगूताईला त्या प्रकाराचा कांहींच अर्थ न कळून ती पुढें सरकली आणि गांगरून गेल्यासारखा चेहरा करून म्हणाली, " वहिनी, रडायला काय झालं ? "

मग आपल्या कपाळावर जोरानें हात मारून नीलेनें म्हटलें, "दुसरं काय ? माझं कपाळ फुटल ! वन्स, मला ते कायमचे सोडून गेले हो! "

" काय वहिनी ? विजय गेला ! सोडून गेला आपल्याला तो ! "

" खरच हो गेले ते ! मी आतां काय करूं ? "

मग जणूं काय आपल्या वहिनीवर विश्वासच नसल्यासारखें दाखवून गगूताई त्याच्या अगदीं नजिक गेली आणि तिनें त्याच्या अंगाला हात लावून बघितला त्याचा स्पर्श तिला अत्यंत गार वाटला. मग खात्री झाल्यासारखी वाटून ती धावत देवघरांत गेली आणि ओरडूनच उमाबाईंना म्हणाली, " आई, विजय आपल्याला कायमचा सोडून गेला ग ! "

त्या दिवशी उमाबाई रोजच्या पेक्षा जरा लवकरच उठल्या होत्या आणि अंग धुवून पहाटेपासून त्या देवासमोर सारख्या बसून होत्या आतां त्यांची पूजा जवळ जवळ संपत आली होती. तबकांत निराजन ठेवून त्या देवाला ओवाळीत होत्या गगूताईचें बोलणें ऐकताच एकदम तें तबक त्यांच्या हातातून खालीं गळून पडलें आणि निरांजनाची वात विझली परतु त्या जागच्या हालल्या नाहींत किंवा एरवीप्रमाणें पेटलेला निराजन खालीं पडून विझल्यावर त्यानी त्या विझलेल्या वातीला हळद कुंकूहि वाहिलें नाहीं त्या एखाद्या निश्चल पुतळ्याप्रमाणें देवा-कडे बघत राहिल्या हा प्रकार सहन न होऊनच कीं काय गगूताई पुन्हा ओरडून म्हणाली, " आई, विजय आपल्याला कायमचा सोडून गेला. खरंच ग गेला तो ! "

तरीहि जेव्हां जागेच्या उमाबाई उठल्या नाहींत तेव्हां तिला क्षणभर वाटलें कीं, विश्वांतील मातृहृदयाचा खून झाला आहे कीं काय ? आपली आई पुत्राचा मृत्यू ऐकून उठत कां नाहीं ? तिला त्याच्या मृत्यूचें कांहींच दुःख होत नाहीं काय ? कां अतिदुःखामुळेंच ती अशी जागेला खिळून बसलेली आहे ? हो, असंच असलं पाहिजे ! पुत्राच्या मृत्यूची वार्ता ऐकून जगांतील कोणत्या मातेला दुःख होणार नाहीं ?

हे विचार गंगूताईच्या मनांत येतांच ती उमाबाईच्या अगदीं जवळ गेली आणि त्यांच्या हाताला धरून तिनें त्याला उठविण्याचा प्रयत्न केला. जणू काय पुत्र शोकानें अंगांतून नष्ट झालेल्या त्यांच्या शक्तीला ती पुन्हा चालना देत होती. परतु तिच्या प्रयत्नानें उमाबाई जागेच्या उठल्या नाहींतच; उलट तिला म्हणाल्या, "गगूताई, शिवलीस मला. सोंवळयांत होतें मी! आणि त्या पवित्र स्थितींत राहूनच मी विजयच्या आत्म्याला निरोप देत होतें. उगीचच शिवलीस मला मला आता पुन्हा अंग धुवाव लागेल. नको का धुवायला?"

उमाबाईचें हें बोलणें ऐकल्यानतर गंगूताईची खात्री झाली कीं आपल्या आईला पुत्र शोकानें तात्पुरतें वेड लागलेलें आहे मग तेथें न थांबतां ती अरविंदाला ही दुःखद वार्ता निवेदन करण्यासाठीं निघून गेली. नीलाहि त्याचसाठीं अरविंदाच्या खोलींत प्रथम गेली होती. गंगूताई जेव्हां ओरडून म्हणाली, "अरू लवकर इकडे ये आपला विजय आपल्याला सोडून गेला रे!" तेव्हां नलिनें कार्होशा रडक्या स्वरांत म्हटलें, "गंगूवन्स, अरविंद भावोजींचा तरी कुठें पत्ता आहे? हीं बघा दोन पत्रं त्यांनीं आपल्यासाठीं ठेवलीं आहेत"

हें ऐकून गंगूताई अधिकच बुचकळयांत पडली. नलिनें उमाबाईच्या नांवावर असलेलें अरविंदाचें पत्र तिच्या हातात दिलें; आणि आपल्या नांवावर असलेलें पत्र ती वाचूं लागली. मनुष्याच्या दुःखापेक्षां त्याचें कुतूहलच अधिक तीव्र असतें कीं काय कोणास ठाऊक! पण तसें नसतें तर त्या अत्यंत दुःखित मनस्थितींत नीलेनें अरविंदाचें पत्र खचित वाचलें नसतें. अरविंदानें लिहिलें होतें. "वहिनी, मी आज तुमचं घर सोडून जात आहें. कदाचित यापुढें आपली गांठ कधींच पडणार नाहीं. परंतु ज्या हेतूनें मी घराचा त्याग करीत आहें तो माझा हेतू जर सफल न झाला तर मात्र मला परमावधीचं दुःख झाल्याशिवाय खचित राहणार नाहीं. विजयला सुख मिळावं या एकाच हेतूनें मला तुमच्या घराचा कायमचा त्याग करावा लागत आहे.

आणि माझा हा हेतू सफल करण्याचं काम सर्वस्वीं तुमच्याच हातांत नाहीं काय ? वहिनी, जगांत दुबळे जीव अनेक असतात. आणि दुबळेपणा फक्त शरीराचाच असतो अस्स नाहीं कित्येकांचं मनसुद्धां अत्यंत दुबळं असतं विजयचं शरीर दुबळं म्हणून तुमचं त्याच्यावरचं प्रेम उडालं. पण तसा विचार केला तर तुमचं मनसुद्धां विजयच्या शरीरप्रमाणेंच दुबळं नव्हे काय ? ज्या मनाला यत्किंचितहि स्थिरता नाहीं त्या मनाला दुबळं म्हणायचं नाहीं तर काय ? असं असतांना एका दुबळया माणसानं दुसऱ्या दुबळया माणसाचा त्याग करण्यांत काय अर्थ आहे ? वहिनी, तुम्हांला माझा राग येईल परंतु एक गोष्ट लक्षांत ठेवा कीं, जगात एका दुबळयानं दुसऱ्या दुबळयाकडे महानुभूतीनं बघण्यांतच विश्वाची खरी भूतदया सामावलेली आहे.

अर्थात् तसं करतांना तुम्हांला आपल्या अनेक सुखांचा त्याग करावा लागेल हें मला कबूल आहे. पण एक गोष्ट लक्षांत घेतली असतांना त्याचंहि तुम्हाला फारसं वाटणार नाहीं जग हें एक मोठं होमकुंड आहे. आणि ज्याला आपली मानवता सिद्ध करायची असेल त्यानें त्या होमकुंडात ती सिद्ध करण्यास लागणाऱ्या वाटेल त्या सुखांचा त्याग केला पाहिजे आणि हा त्याग करण्यांचं शिक्षण जो घेईल त्याला या जगांतील सुखदुःखांची किंमत सारखीच वाटायला लागेल खरोखर सुखदुःखांची एका मापानं मोजणी करण्यांतच माणसाचं असामान्यत्व व्यक्त होत असतं.

वहिनी, ही गोष्ट जरी कितीहि अवघड असली तरी ती तुम्ही शिकली पाहिजे मला हें कळतं कीं या वयांत तुम्हांला तारुण्यसुलभ वासना असणं अगदीं साहाजिक आहे पण त्याचबरोबर नीतिकडे कानाडोळा करून तुम्हांला चालणार नाहीं. वास्तविक मानवी वैभवाचं मंदीर या नीतिवरच उभारलेलं आहे आणि त्या वैभव मंदिराचा पाया पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या नीतीनेंच अधिक बळकट झालेला आहे ही गोष्ट विसरूं नका. वाटेल त्या काळाकडे नजर टाकली तरी ही गोष्ट सिद्ध

होईल कीं, पुरुषांपेक्षा स्त्री ही केव्हांहि अधिक नीतिमान आहे मृतपतीच्या चितेवर उभं राहून पूर्वीच्या स्त्रियानीं आपल्या नीतीचीच घोषणा केलेली नाहीं काय ? पतिनिधनानतर आपली नीति सुरक्षित राहील न राहील या शकेनेंच त्यांनीं आपले देह जाळून घेतले ना ? त्या स्त्रिया तरुण नव्हत्या का ? त्यांना तारुण्य सुलभ वासना नव्हत्या काय ? पतिनिधनानंतर त्यांनाहि आपल्या नैसर्गिक वासनांची भूक भागवतां आली नसती का ? होय ह्या सर्व गोष्टी त्यांना शक्य होत्या पण या आर्यावर्तात नीतीचा ध्वज सदैव उन्नत राहिला पाहिजे ही एकच आकांक्षा त्यांनीं आपल्या आयुष्यांत सतत बाळगली आणि शेवटी मृत पतीच्या चितेवर उभ राहून त्यानीं हाच मत्र म्हटला कीं, नीतीचा विजय असो !

वहिनी, या सर्व गोष्टी तुम्हांला दृष्टिआड करतां येण शक्य नाहीं माझ तुम्हाला हेंच सागण आहे कीं, त्या यशोमदिराच्या पायांतील दगड तुम्ही खिळखिळे करू नका

ह्या सर्व गोष्टी मीं उपदेश म्हणून मुळींच सांगितलेल्या नाहींत. तुम्हांला उपदेश करण्याचा मला काय अधिकार आहे ? पण मनुष्याला जेव्हां विरहाची कल्पना येते, तेव्हां त्याला खूप खूप बोलावस वाटत. म्हणून या पत्ररूपान मी तुमच्याशीं गप्पा गोष्टी केल्या आहेत

हें पत्र पुरं करतांना मात्र मला तुमच्यासमोर दोन ओळी ठेवाव्याशा वाटतात त्या माझ्या स्वतःच्या नाहींत माझ्या आईच्या आहेत. आणि माझ्या आयुष्यांत मार्ग दाखविण्यास मला त्या वेळोवेळीं उपयोगीं पडलेल्या आहेत कालसुद्धा त्यांनींच मला तारल असं मी म्हणतों. त्या दोन ओळी म्हणजे, " आयुष्यांत मोहाचे क्षण अनेक येतात. पण त्यांच्यावर जो विजय मिळवितो तोच आयुष्याची लढाई जिंकतो. " वहिनी, माझी आई माझ्या लहानपणीं वारली. पण या दोन ओळी माझ्या सतत डोळ्यांसमोर असल्या कारणानें मला वाटतें कीं, ती सदैव माझ्या पाठीशीं उभी आहे. अनुभवाचे बोल केव्हांच फोल ठरत नसतात.

माझ्यावर तुम्हीं सर्वांनीं जें अपरपार प्रेम केलंत त्याचा मला कधींच विसर पडणार नाहीं. आणि विशेषतः तुमच्या प्रेमाबद्दल विचार करतांना कालचा प्रसग मीं विस्मृतीच्या कप्प्यात लपवून ठेवून फक्त तुम्हीं केलेल्या प्रेमाचीच स्मृति मी माझ्या मनांत कायम राखीन. केलेल प्रेम कधींच वायां जात नाहीं.

जातांना मी एकच मागण तुमच्याशीं मागतों. त्याला तुम्ही नकार देणार नाहीं ही माझी खात्री आहे वहिनी, डोळयांत अश्रू आणून मी शेवटच हेंच मागणं मागतों कीं मला तुम्ही विसरू नका आणि विजयवर मनस्वी प्रेम करा "

अरविंद.

पत्र वाचून झाल्यानतर ती एखाद्या निश्चल दगडी पुतळयाप्रमाणें जागच्या जागीं स्थिर झाली तिला मनसोक्त रडण्याची इच्छा होती. पण तिच्या डोळयांतून एकहि अश्रू बाहेर येईना मनुष्याला जेव्हां अत्यत दुःख होतें, तेव्हां त्याची अशीच स्थिति होते कीं काय कोणास ठाऊक! आणि नंतर काहीं वेळानें तर रडण्याऐवजीं ती वेड्यासारखी मोठ्यांदां हसतच सुटली आणि खूप हसल्यानंतर पुन्हा कांहींशी गंभीर होऊन ती म्हणाली, "विजय, मींच तुमचा खून केला काय?"

# प्रकरण १६

"होय, तूंच त्याचा खून केलास!" नीलेचें बोलणें ऐकून गंगूताई म्हणाली. आणि तिचें म्हणणेंहि अगदीं सहाजिक होतें. कारण अरविंदानें उमाबाईंना लिहिलेलें पत्र तिनें वाचलें होतें. त्यांत त्यानें लिहिलें होतें, "उमा मावशी, मी तुमच्यापासून आज अगदीं दूर निघून जात आहें. माझ्या जाण्याचं ठिकाण सध्यांतरीं सांगणं मला इष्ट वाटत नाहीं. पुढें कधींतरी योग्य वेळ येतांच मी तें तुम्हांला कळवीनहि. तुमचं घर सोडून जातांना मला मनस्वी दुःख होत असल्यास नवल नाहीं. कारण प्रेमाचे बंध इतक्या सहज रीतीनें तोडतां येत नसतात. परंतु ते तोडण्याशिवाय मला दुसरें कोणतेंच गत्यंतर उरलें नाहीं. आणि म्हणून ते तोडतांना होणाऱ्या दुःखाला तोंड देण्यास मी तयार झालं पाहिजे. मला विजयबद्दल मात्र अत्यंत दुःख वाटतं. पण त्या दुःखाचा परिहार करणं माझ्या शक्तीबाहेरचं काम आहे. त्याला मी तरी काय करणार? पण म्हणून, उमामावशी, तुमचं माझ्यावरचं प्रेम कमी करूं नका. मी प्रेमाचा भुकेला आहें. मला तुमच्या प्रेमाची भिक्षा घाला. त्या गुप्त प्रेमावरच मी माझं आयुष्य अगदीं सुखानं कंठीन."

हें पत्र वाचून गंगूताईनें नीलेला उद्देशून वरील उद्गार काढले असल्यास नवल नव्हतें. कारण त्या दोघांच्यामधला झालेला कालचा सर्व संवाद तिनें ऐकला होता व त्यामुळें तिची खात्री झाली होती कीं आपली नीला वहिनी अरविंदावर पूर्णपणें अनुरक्त झालेली आहे. तेव्हां तिच्या मनांत शंका आली कीं विजयच्या आकस्मिक मृत्यूच्या बुडाशीं नीला वहिनी खचित असली पाहिजे. आणि शिवाय या तिच्या शंकेला अधिक स्पष्ट स्वरूप येण्यास अरविंदाच्या गृहत्यागाची अधिकच भर पडली होती. परंतु गंगूबाईचे उद्गार ऐकतांच नीला काकुळतीनें म्हणाली, "गंगूवन्सं, मी नाहीं हो केला त्यांचा खून! कसा करीन मी!"

यावर गंगूताईनें खात्रीच्या स्वरानें म्हटलें, " उगाच बोलूं नकोस ! तुम्हीं दोघांनीं मिळून त्याला ठार मारलंत. तो चांडाळहि होता त्या कृत्यांत सामील ! आणि आतां पळून कुठेतरी काळं तोंड केलंय त्यानें. खुनी आहेस तू ! "

प्रत्येक शब्दाला तिच्या बोलण्यांतील आवेग अधिक वाढत होता. आणि शेवटचें वाक्य तर तिनें इतक्या ठासून उच्चारलें कीं जणूं तिच्या गुन्ह्याबद्दल तिची शतशः खात्री झाली होती परंतु यावर नीला आपला हुदका आवरून अगदीं अगतिक स्वरांत म्हणाली, " वन्सं, त्यांच्यावर जरी माझं प्रेम नव्हत तरी माझी अढळ भक्ति होती "

पण तिला मध्येंच थांबवून गंगूताई ओरडून म्हणाली,

" आणि त्या दुष्टावर प्रेम केलंस ना ? "

" हो. केलंहि असेन. पण म्हणून माझी त्यांच्यावर भक्ति नव्हती असं थोडच आहे ? असं असतांना तुमच्या मनांत तरी असं कसं आलं ? "

परंतु जणूं नीलेचें हें बोलणें न ऐकतांच गंगूताईनें म्हटलें, " पापी आहेस तूं ! म्हणे माझी भक्ति होती त्यांच्यावर ? दिसलीच कीं तुझी भक्ति ! चांडाळणी त्याला मारून तूं काय मिळवलंस ? "

पुढें बराच वेळ तिला कांहींच बोलतां येईना. दुःखानें किंबहुना एकप्रकारची विलक्षण चीड येऊन तिचें सर्व शरीर वरपासून खालपर्यंत कंपायमान होत होतें. आणि दुःखानें किंवा रागानें वेड लागल्यासारखें होऊन तिनें पुढें ओरडून बोलण्यास सुरवात केली.

" थांब, चांडाळणी, तुला कळेल कीं आतां याबद्दल तुला काय प्रायश्चित्त भोगावं लागेल तें ! आणि त्या मांगालासुद्धां दाखवतें ! हा भाऊ कसला ? भावाच्या जिवावर उठणारा शुद्ध कसाई आहे हा ! त्याचा शोध करून त्याला आणलंच पाहिजे शिक्षा भोगायला."

आणि खरोखरच एखाद्या वेड लागलेल्या माणसाप्रमाणें विचित्र हात-

वारे करीत ती खिडकीपाशीं गेली. खालीं बागेंत रामा कांहींतरी काम करण्यांत गुंतला होता. त्याला हांक मारून ओरडून ती म्हणाली,

"रामा, ह्यांना घरून बोलावून आण. घरीं नसतील तर दवाखान्यांत जा. मला कळलं पाहिजे त्याला कोणतं वीष घातल तें. जा. लवकर बोलावून आण."

तिचें बोलणें ऐकून उमाबाई त्या ठिकाणीं आल्या आणि अगदीं शांतपणानें म्हणाल्या. "गगूताई, अस वेड्यासारख करू नकोस. रामाला परत बोलाव."

हें बोलतांना उमाबाईचें मुख इतकें शांत दिसत होतें कीं, त्यावरून त्याच्या घरावर एखादी मोठी आपत्ति कोसळलेली असेल असें कोणालाहि वाटणें शक्य नव्हतें परतु उमाबाईचा तो शांतपणा सहन न होऊनच कीं काय आपल्या चेहऱ्यावर त्याबद्दल एकप्रकारचा तिरस्कार व्यक्त करीत गंगूताई म्हणाली.

"आई, तू बोलूं नकोस पाप्याला त्याच्या पापाच प्रायश्चित मिळालच पाहिजे रामा, तू जारे. लवकर बोलावून आण त्याना." असें म्हणून तिनें बाहेर नजर टाकली तो रामा मघाशींच बाहेर गेलेला असावा हें तिनें ताडलें. मग पुन्हा उमाबाईकडे बघत ती म्हणाली,

"आई, बघ केवढं नीच कृत्य केल तें !"

यावर उमाबाई खालीं मान घालून म्हणाल्या,

"गगू, मीं केलं आहे तें कृत्य ! मीं त्याला ठार मारलं." असें म्हणतांना उमाबाईंना वाटलें कीं, आपलें आतांपर्यंत दाबून ठेवलेलें दुःख अश्रूंच्या रूपानें एकदम बाहेर येऊन आपली आतांपर्यंतची सर्व तपश्चर्या एकाएकीं वायां जाईल पण त्यांनीं मोठ्या प्रयत्नानें आपल्या मनाला आवरून धरलें. त्यांचें बोलणें मुळींच खरें न वाटून गगूताई म्हणाली,

"आई, दुसऱ्याच्या दोषावर असं पांघरूण घालूं नये. भलत्या गोष्टी मला सांगू नकोस. या कृत्याचा सूड घेतल्याशिवाय मी केव्हांहि राहणार नाही."

पण पुन्हा उमाबाई तितक्याच निश्चयानें म्हणाल्या, "गंगूताई, खोट नाहीं. खरच मीं माझ्या हातांनीं त्याला मारला"

उमाबाईंचे हे निश्चयात्मक शब्द ऐकतांच गंगूताईच्या मनांत पुन्हा विचार आला कीं जगांतून खरोखरच मातृहृदय नष्ट झालेलें आहे काय? का आपण हा सर्व प्रसंग स्वप्नांत बघत आहोंत? किंवा रजतपटावरून एखादें कल्पित कथानक तर आपल्या डोळ्यापुढून सरकत नसेल ना? क्षणभर आपण कोठें आहोंत, काय ऐकत आहोंत किंवा काय बघत आहोंत याचा तिला कांहींच बोध होईना. पण जेव्हा ती या तात्पुरत्या गुंगींतून शुद्धीवर आली तेव्हा तिच्या डोळयांपुढें उमाबाईंच्या बोलण्यातील सत्यता पुन्हा उभी राहिली आणि मग तिच्या अंगांतील शक्ति एकदम एकाएकीं लुप्त होऊन ती अगदीं हलक्या स्वरांत म्हणाली, "आई, खरच तू विजयला मारलस?"

"हो. खोट नाहीं सांगत."

"कां? असें गंगूताईनें म्हणताच उमाबाई कांहींकाळ अगदी स्तब्ध राहिल्या. आपल्या हृदयांतील एका अगदीं गुप्त कप्प्यांत ठेवलेलें गुपित एकदम असें उघडरीतीनें सांगण्याला कदाचित् त्याना धीर होत नसावा असें त्यांच्या चर्येवरून सहज दिसत होतें. कांहीं वेळानें त्यांनीं सांगण्यास सुरवात केली. त्यावेळीं त्यांचा चेहेरा अत्यंत निश्चयात्मक दिसत होता. त्या म्हणाल्या, "गंगूताई, विजयला मीं उगाच नाहीं मारलं. ती एक मोठीच कथा आहे. विजयला जेव्हा विमान अपघात झाला त्यावेळीं तू इथे होतीस त्याच्यानंतर आठ दिवसांची गोष्ट! बरीच रात्र झाली होती. तुला माहीत आहे कीं विजयच्या अपघातापासून रात्रीं फक्त मीच त्याच्याजवळ असें. त्या रात्रीं विजयला झोप लागलेली बघून मीहि झोपलें. थोडयाच वेळांत माझा डोळा लागला. पण कांहींतरी वाईट स्वप्न पडून मी एकदम जागी झालें. बघतें तों विजयनें भलताच प्रकार चालवलेला दिसला. तो त्यावेळीं आत्महत्येचा प्रयत्न करीत होता. मी त्याला तसें विचारताच तो म्हणाला,

'मला आतां जगून काय करायचं आहे? पति या दृष्टीनें तिच्या कोणत्या आकांक्षा मी पुऱ्या करूं शकणार आहें? असं असतांना तिचं तरी माझ्यावरच प्रेम कायम टिकेल का?' मीं त्याला सांगितल कीं 'नीलेचं तुझ्यावर खरोखरच फार प्रेम आहे.' यावर तो म्हणाला, 'म्हणूनच मला जाऊं दे. तिच माझ्यावर उत्कट प्रेम असतांना मी तिला सोडून गेलों म्हणजे मला अत्यंत सुख लाभेल. मनुष्य कोणत्यातरी भावनेवर जगतो. मी नीलेच्या प्रेमावर जगलों आहें. आणि तिचं माझ्यावरच प्रेम जर का नाहींस झाल तर मात्र मला जिवतपणीं मरणप्राय दुःख होईल.' पण शेवटीं मी त्याच म्हणण ऐकलं नाहीं तेव्हां तो म्हणाला, "आई, मला एक वचन दिलंस तर मी तुझ म्हणणं ऐकेन" पुढें कांहीं वेळ थांबून तो म्हणाला, "आई, तूं म्हणतेस त्याप्रमाणें सध्यां नीलेचं माझ्यावर उत्कट प्रेम असेल. पण तें प्रेम जेव्हां नाहींस होईल तेव्हां तुझ्या हातांनीं तूं मला मृत्युची वाट दाखविली पाहिजेस. मला तस वचन दे" गंगू, तें विचित्र वचन देतांना मला काय दुःख झालं असेल हें तुला सहज कळेल. कारण तूं मातेच हृदय जाणू शकतेस. पण त्यावेळीं तें वचन देण्याशिवाय मला गत्यंतरच नव्हतं अखेर मी म्हटलं, "विजू, ज्यावेळीं माझ्या लक्षांत येईल कीं नीलेच तुझ्यावरच प्रेम कमी झाल आहें त्यावेळीं मी तुला खरोखरच माझ्या हातांनीं परलोकीं पाठवीन. पण निष्प्रेम जीवन कंठायला लावून मरणप्राय यातना तुझ्या नशीबीं कधींहि येऊं देणार नाहीं." गंगू, कालचा सर्व संवाद तूं ऐकला आहेस. मला काल कळलं कीं, नीलेचं विजयवरचं प्रेम उडाल आहे; आणि त्याच क्षणीं त्याचा सारा कारभार आटोपला आहे. म्हणून कालरात्रीं या माझ्या हातांनीं वीष देऊन त्याला मीं परलोकीं आनंदान धाडला."

ही हकीकत त्यांनीं मोठा धीर धरून अगदीं एका दमांत सांगितली खरी. पण शेवटचें वाक्य उच्चारतांच त्यांचा तो धीर एकदम कोठें लुप्त झाला कोणास ठाऊक! त्यांच्या डोळ्यांतून असंख्य अश्रुधारा

वाहूं लागल्या. आतांपर्यंत सुप्तावस्थेंत असलेलें मातृहृदय एकदम उफाळून वर आलें आणि पुढें तर अश्रूंचा भर इतका वाढला कीं, जणू काय आतांपर्यंत मागें राहिलेली पुत्रशोकाची बाकी त्या अश्रूंच्या रूपानें एकदम फिटली !

बराच वेळ कोणी कोणाशीं कांहींच बोललें नाहीं. आणि आतां यापुढें बोलण्यासारखें तरी काय राहिलें होतें ? त्या सर्वांच्यावर दुःखाचा सारखाच भार होता आणि त्या भाराखालीं त्यांचीं हृदयें इतकीं चिरडून गेलीं होतीं कीं त्या स्थितींत त्यांच्या दुःखाला वाचा फुटणें शक्यच नव्हतें. आणि डॉक्टर प्रभाकरपंत त्याठिकाणीं आले नसते तर त्या स्थितींत त्या तिघीजणी किती वेळ राहिल्या असत्या हें सांगणें कठीण आहे. प्रभाकरपंतांनीं आल्याबरोबर तो प्रकार बघून घाबऱ्या घाबऱ्या विचारलें, " काय ? झालं काय ? "

गंगूताईनें त्यांना अगदीं थोडक्यांत सर्व हकीकत सांगितली आणि ती सांगून झाल्यानंतर तिनें म्हटलें, " विजय, अगदीं आपोआप मरण पावला असंच तुम्ही जगाला भासवलं पाहिजे. आईनें त्याचा खून केला असं लोकांना कळतां कामा नये. "

गंगूताईचें बोलणें ऐकून अत्यंत दुःखानतर येणाऱ्या एक प्रकारच्या वेडाच्या लहरींत उमाबाई म्हणाल्या, " गंगूताई, मी नाहीं त्याचा खून केला. मीं त्याला मुक्त केलं. खरंच, स्वर्गात तो आतां अगदीं आनंदांत असेल. "

डॉक्टर प्रभाकरपंत कांहींच बोलले नाहींत. उमाबाईचें दुःख इतकें पराकोटीला गेलेलें होतें कीं, त्यांच्याशीं बोलण्यांत कांहींच अर्थ नव्हता हें त्यांनीं जाणलें. मग ते विजयच्या मृत देहाजवळ जाऊन बसले. पण तत्पूर्वीच नीलेनें त्याच्या छातीवर डोकें टेकून त्याला घट्ट मिठी मारली होती. त्या मृत देहाला तिनें हालवून बघितलें. पण तो हालला नाहीं. त्याच्या मिटलेल्या पापण्या तिनें आपल्या हातांनीं विलग केल्या. पण त्यानें डोळें उघडले नाहींत. त्याच्याशीं खूप बोल-

ण्याचा तिनें प्रयत्न केला. पण एकहि शब्द त्या मुखावाटे बाहेर पडला नाहीं. मग तिनें अश्रू ढाळण्यास सुरवात केली व बराच वेळ त्याच्या छातीवरून तिनें आपलें मस्तक दूर केलें नाहीं. जणूं काय आपल्या अश्रूंच्या पाण्यानें ती त्या मृतदेहाला अखेरचा अभिषेक करीत होती ! मग मोठ्यानें ओरडण्यास सुरवात करून ती म्हणाली, " मीं तुमचा खून केला ! खरंच मींच तुमचा खून केला ! कसलं कृत्य केलं मी हें ! "

तिच्या बोलण्यांत दुःखापेक्षां पश्चात्तापच अधिक व्यक्त होत होता. तिचें पश्चात्तापदग्ध हृदय अश्रूंच्या रूपानें बाहेर पडलें पण जगात पश्चात्ताप कोणत्याहि गोष्टीची तीव्रता कमी करूं शकत नाहीं पश्चात्तापानें दुःखित हृदयें पुनित झालीं तरी झालेल्या दुःखाला विस्मृतीच्या गर्तेत गाडण्याचें सामर्थ्य पश्चात्तापांत नाहीं, यासारखी दुर्दैवाची गोष्ट जगांत दुसरी कोणती असू शकेल !

—:०:—

# प्रकरण १७

अरविंदाला लोणावळयात येऊन दीड महिना झाला होता. तरी त्याच्या प्रकृतीला फारसा आराम वाटेना वास्तविक "कैवल्य धाम" मध्यें त्याची सर्व व्यवस्था चोख होती। तरीहि जेव्हा त्याच्या प्रकृतींत काहींच फरक पडेना तेव्हां तेथील चालकांचें मत पडलें कीं त्याला कांहींतरी मानसिक दुःख होत असलें पाहिजे. आणि त्यालासुद्धां ही गोष्ट नाकबूल करतां येणें शक्य नव्हतें. लोणावळयांतील आश्रमांत रहायला आल्यानंतर पंधराच दिवसांनीं त्यानें उमाबाईना तसें कळविलें होतें व त्याचा पत्ता कळतांच मग उमाबाईंनींहि त्याला विजयच्या मृत्यूची दुःखद वार्ता पत्रांत निवेदन केली होती. ती बातमी कळतांच त्याच्या मनाला जो धक्का बसला त्यामुळें त्याची प्रकृति दिवसेंदिवस खालावत चालली होती. ज्या पवित्र हेतूनें त्यानें घराचा त्याग केला होता तो हेतू अशा रीतीनें विफळ होताच त्याला त्याबद्दल मनस्वी दुःख होणें अगदीं सहाजिक होतें. आणि वेळोवेळीं निराशेचे झटके खाल्ल्यामुळें या नवीनच निर्माण झालेल्या दुःखाला पायबंद घालण्याची शक्ति त्याच्या अगांत मुळींच उरली नव्हती. तो रोज विजयबद्दल विचार करी आणि खूप विचार करून जेव्हा त्याच्या मनाला अत्यत थकवा येई तेव्हांच काय ती त्याच्या मनाला तात्पुरती विश्रांती मिळत असे अशा स्थितींत त्याच्या प्रकृतींत फरक तरी कसा पडणार ?

आतांसुद्धां "कैवल्य धामच्या" टेंकडीवर चढतांना त्याचे तसलेच विचार चालू होते. परंतु टेंकडीच्या अगदीं माथ्यावर येतांच त्याची विचार मालिका एकदम तुटली आणि एका व्यक्तीवर त्याची नजर स्थिर होतांच त्याला वाटलें कीं आपण स्वप्नांत आहोंत. त्या, व्यक्तीची त्याच्याकडे पाठ होती आणि तिचें सर्व लक्ष मावळत्या सूर्यावर स्थिर

झालें होतें तिच्या बघण्यांतील एकतानता बघून अरविंदाच्या मनांत एक गमतीदार विचार येऊन गेला. त्याला वाटलें कीं खरोखर स्थिरता हा स्त्रीच्या स्वभावांतील एक विशेष आहे काय? कोणत्याहि गोष्टीशीं सर्वस्वीं समरस होण्याची शक्ति फक्त त्यांच्यांतच असते. परंतु ती वेळच अशी होती कीं, असले कांहींतरी सिद्धांत मांडण्यापेक्षां त्या व्यक्तीबद्दलचें कुतूहलच त्याच्या मनांत अधिक उत्पन्न व्हावें! तो खरोखरच भास असेल तर त्या भासमय सृष्टींत आपण आपल्या आयुष्याच्या अगदीं अखेरपर्यंत राहावें असें अरविंदाला वाटलें असल्यास त्यांत कांहींच नवल नव्हतें पण थोड्याच वेळांत त्याला कळून आलें कीं आपण स्वप्नांतहि नाहीं, आणि तो भासहि पण नाहीं. आपण लोणावळ्यांतील एका टेंकडीवर उभे असून आपल्यासमोर एका शिलाखंडावर आपली प्रेयसी निर्मला ही बसलेली आहे मग तिच्याकडे अत्यंत आश्चर्यानें बघत तो म्हणाला, "तू इकडे कशी?"

आणि तितक्याच आश्चर्यानें तिनेंहि पण म्हटलें, "आणि तुम्ही?"

"मला येथें येऊन दीड महिना झाला."

"अस्सं? मग आपली गांठ कशी पडली नाही?"

"गांठ घेण्याची इच्छाच नसल्यावर गांठ कशी पडणार?"

"कमाल आहे बाई! मीसुद्धां इथे चांगली दोन महिने आहें. पण मी या टेंकडीवर मात्र क्वचितच येतें."

"मी मात्र या टेंकडीशिवाय दुसरीकडे क्वचितच जातों." नंतर निर्मला हंसून म्हणाली, "मग आजचा दिवस आपल्या आयुष्यांतील क्रांतीचाच समजला पाहिजे."

यावर कांहींसा गंभीर चेहरा करून अरविंद म्हणाला, "क्रांती वगैरे भलतेच शब्द बोलूं नकोस."भारत संरक्षण कायदा सुरू आहे! माहीत आहे ना?"

अरविंदाचें बोलणें ऐकून निर्मला मनसोक्त हंसली.

बरेच दिवसांनीं आकस्मिक भेटलेल्या त्या दोन प्रेमी जीवांत एवढा

मामुली संवाद ताबडतोब झाला खरा. पण यापेक्षांहि अधिक महत्त्वाच्या गोष्टी एकमेकांपाशीं बोलायच्या होत्या. पण आकस्मिक झालेल्या भेटीनें त्या दोघांचीं हृदयें इतकीं हर्षभरित झालीं होतीं कीं तसल्या गोष्टींची सुरवात एकदम होणें शक्य नव्हतें. कांहीं वेळानंतर अरविंद म्हणाला, "चल आपण आणखी थोड फिरून येऊं. येतेस ?"

पण हो म्हणण्यापूर्वीच ती त्याच्याबरोबर उठून चालूं लागली. बोलायला कांहींतरी विषय काढण्याच्या हेतूनें निर्मला अरविंदाकडे न्याहाळून बघत म्हणाली, "तुमची प्रकृति बरी दिसत नाही."

यावर अरविंद अत्यंत गभीरपणानें म्हणाला, "निर्मले, अलीकडे माझ्यावर इतकीं दुःख कोसळलीं कीं, त्यामुळें माझी एवढी तरी प्रकृति शिल्लक राहिली हें मी नशीबच समजतों."

"कसलीं दुःख ?" असें निर्मलेनें विचारतांच त्यानें आपल्या सर्व दुःखांची कहाणी अगदीं थोडक्यांत तिला निवेदन केली. आणि विशेषतः विजयच्या मृत्यूची दुःखद हकीकत सांगून झाल्यानंतर तो शेवटीं म्हणाला, "म्हणून विजयबद्दल मला अत्यंत वाईट वाटत. त्या विवशीं नीलावहिनी जर माझ्याशीं तशा वागल्या नसत्या तर हा प्रसंग टळला असता यासाठीं माझ्या मनांत सारख येतं कीं मीच त्याच्या मृत्यूला कारणीभूत झालों आहें. आणि हें शल्य मला कधीं कधी इतक बोचत कीं, माझा मलाच स्वतःबद्दल तिटकारा वाटूं लागतो."

त्याचें बोलणें ऐकून निर्मला गंभीर स्वरांत म्हणाली,

"त्याच्याबद्दल वाईट वाटून घेण्यांत कांहींच अर्थ नाहीं. या सर्व योगायोगाच्या गोष्टी आहेत. एखाद्या गोष्टीला मनुष्य फक्त कारण मात्र होतो. हा कांहीं त्याचा दोष नाहीं."

"हो. तें खरं आहे. मलाहि त्या गोष्टी पटतात. पण मनावर मात्र त्या बिंबत नाहींत त्याला मी काय करूं ?"

यावर निर्मला कांहींच बोलली नाहीं. तार्किक युक्तिवादापेक्षां कालांतरानें त्याच्या मनांतून हें शल्य पार नाहींसें होईल हें तिनें

जाणलें. परंतु पुन्हा तो खोल विचारांत गढला आहे हें बघतांच त्या विचारांपासून त्याला परावृत्त करण्यासाठीं म्हणून तिनें विचारलें,

" तुम्ही दीड महिना इथे कुठे राहात होतां ? "

त्या विचारांतून जागें झाल्याप्रमाणें करून त्यानें म्हटलें.

" कैवल्यधाम मध्यें! आणि तूं ? "

" माझी मावशी आहे इथें तुम्हांला माग मीं सांगितल होत. फार चांगली आहे बरं का माझी मावशी, " असें म्हणून ती हंसली त्या हसण्यात आपल्या मावशीबद्दल तिला आणखी कांहीं-तरी सांगायचें असावें असें सहज वाटण्याजोगें होतें आणि तें खरेंहि होतें. कारण अरविंद जेव्हां तिला म्हणाला, " तुझीच काय, पण माझी मावशीसुद्धा फार चागली आहे " तेव्हा ती म्हणाली

" माझ्यापेक्षा खचित नाहीं. "

" कशावरून ? "

" मला तिची एका गोष्टींत खूप मदत होणार आहे. "

अरविंदाला जेव्हां तिच्या बोलण्याचा कांहींच बोध होईना तेव्हां ती म्हणाली, " आपल्या लग्नाला माझ्या आईची समति मिळत नव्हती ना ? ती मिळविण्याच काम ती करणार आहे. म्हणून मी तिला चागल म्हटल. " अशी सुरवात करून आपली मावशी त्याला कशी ओळखते, त्याचा तपास करण्यासाठीं तिनें आपल्याला कशी मदत केली आणि आपल्या प्रेमांतील अडथळा कळतांच तो दूर करण्याचें तिनें कसें आश्वासन दिलें वगैरे गोष्टी तिनें अरविंदाला तात्काळ सांगून टाकल्या आणि शेवटीं ती म्हणाली, " माझ सुखच तिनं मला परत मिळवून दिलं आहे माझं प्रेम मला मिळाल. माझ्या सुखांत आतां कोणतीच कमतरता उरली नाहीं " असें म्हणून ती गप्प बसली.

तीं दोघें चालत होतीं ती एक अगदीं अरुंद पायवाट होती. त्यामुळें त्या दोघांना अगदीं एकमेकांला बिलगून चालावें लागत होतें. त्याप्रमाणें चालतांना निर्मलेच्या मनांत सारखा विचार येत होता कीं

आपण आपल्या आयुष्याच्या मार्गावरून असेच एकमेकांला बिलगून चालत जाऊं! हा विचार तिच्या मनांत येतांच तिचा पाय उतरडीवरून एकदम घसरला आणि ती पडणार होती, पण तितक्यांत अरविंदानें तिला सांवरलें. आणि त्याचवेळीं त्याच्याहि मनांत विचार आला कीं आतांच काय पण पुढेंहि एकदर आयुष्यांत आपणच तिला सांवरलें पाहिजे आणि हा विचार त्यानें उघडरीतीनें बोलूनहि दाखविला निर्मला जेव्हा म्हणाली, " चांगलीच पडणार होतें " तेव्हा त्यानें म्हटलें, " मी असताना तुला पडूं कशी देईन ! आयुष्यांतील उतरंडीवरहि मलाच तुला सांवरल पाहिजे "

यावर ती नुसती हसली, आणि त्या हसण्यांत त्याच्या प्रेमळ आश्वासनाचें सर्व सुख सामावलेलें होतें मग बराच अंधार पडलेला पाहून तीं दोघें परत फिरलीं

काहींवेळानें निर्मला एकदम त्याला म्हणाली, " मनुष्याला पूर्ण सुख मिळूंच नये अशी देवाची नेहमीं इच्छा असते कीं काय कोणास ठाऊक ! " तिच्या बोलण्यांतील भावार्थ न कळून अरविंद म्हणाला,

" असं कां म्हणतेस ? "

" आतां हेंच बघाना ! माझं प्रेम मला मिळालं म्हणून मी पूर्ण सुखी झालें आहें हें खरं पण त्या सुखांतहि एक अजून न्यूनता आहे "

इतकें बोलून ती थांबली. अरविंदानें नुसतें गोंधळून तिच्याकडे बघितलें. मग ती म्हणाली, " विद्याधराची अजून मला भीति वाटते. नागपूरला जाताना तो माझ्याशीं भांडून गेला. आणि जातांना तो मला म्हणाला, 'निर्मले, लक्षांत ठेव, माझ्या सुखामध्यें जे जे लोक आले, त्यांचा सूड घेतल्याशिवाय मी कधींच राहणार नाहीं.' म्हणून मला वाटतं कीं तो केव्हांतरी येईल आणि आपल्या सुखाचा विध्वंस करील."

तिची भीति अगदींच निराधार वाटून अरविंद तिला म्हणाला, " निर्मले, मनुष्यानें एकदां कोणतीहि तीव्र इच्छा मनाशीं बाळगली

आणि त्या इच्छेला तीव्र निराशेचा जबरदस्त धक्का बसला म्हणजे त्याला जवळ जवळ वेड लागल्यासारखं होतं. त्यानं तुझ्यावर उत्कट प्रेम केलं आणि त्याच्या मागणीला जेव्हां तुझ्याकडून होकार मिळाला नाहीं तेव्हां त्याची तशीच स्थिति झाली असली पाहिजे. तेव्हां तो तस बोलला असल्यास नवल नाहीं. पण तीहि भीति आतां नष्ट झाली आहे. कांहीं दिवसांपूर्वी माझ्या मित्राकडून मला त्याच्या-बद्दल एक हकीकत कळली. तुझ्याशीं भांडून तो नागपूरला गेला आणि प्रेमनिराशेचं दुःख विसरण्यासाठीं खूपच दारू पिऊं लागला. एके दिवशीं त्या स्थितींत मोटार हांकीत असतां त्यानें एका माणसाच्या अंगावर मोटार घातली. तो माणूस मेला आणि निष्काळजीपणानं मोटार हांकल्याबद्दल विद्याधरला तीन वर्षांची शिक्षा झाली वाईट दशा झाली बिचाऱ्याची ! "

निर्मलेच्या मनाला ती हकीकत ऐकून खूप धक्का बसला. एके काळीं ज्या माणसाबद्दल तिनें तिरस्कार बाळगला त्या मनुष्याची अशी स्थिति होतांच त्याबद्दल तिला दुःख वाटावें ही मानवी मनाची मौजच नव्हे काय ? आणि तें दुःख तिच्या उद्गारांत प्रतीत झाल्यावांचून राहिलें नाहीं. तिनें म्हटलें, " एकूण मीच या सर्व गोष्टींना कारणीभूत झालें तर ! "

तिचें बोलणें ऐकून अरविंद म्हणाला, " तू कशी कारणीभूत झालीस ? त्याच्यावर तू प्रेम करूं शकली नाहींस हा तुझा दोष का ? मघांशींच तूं म्हणाली नाहींस का कीं या सर्व गोष्टी योगायोगाच्या असतात म्हणून ? "

" पण कांहीं असलं तरी त्याबद्दल मनाला लागून राहातं ही गोष्ट तितकीच खरी ! "

यावर अरविंद तिच्या बोलण्यांतील सत्यता पटून म्हणाला, " तुझं म्हणणं बरोबर आहे. विजयच्या मृत्यूला मी कारणीभूत झालों असं मलासुद्धां वाटत नाहीं का ? आणि माझ्या मनाचं समाधान होण्यासाठीं त्यावर मी एक उपायहि करणार आहें. "

असें म्हणून तो पुष्कळ वेळ थांबला. मग आपली नजर अगदीं दूरवर क्षितिजावर स्थिर करून तो बोलूं लागला. जणूं काय तो बोलणार होता ते सर्व सकेत त्या ठिकाणीं लिहिलेले त्याला लांबून अगदीं स्पष्ट दिसत होते. तो म्हणाला, " माझ्या मनांत कुठेतरी मजुरांच्यासाठीं एक आश्रम सुरू करावा अस आहे. मजुरांची खालावलेली स्थिति सुधारण्याच काम त्या आश्रमांत मला करायच आहे. त्यांना उपयुक्त असें शिक्षण त्या ठिकाणीं देण्यांत येईल. त्यामुळें त्याचं ज्ञान वाढून आपलं हित त्यांना कळूं लागेल. आणि निर्मले, माझ्या मनाच्या समाधानासाठीं मी त्या आश्रमाचं नांव 'विजय आश्रम' असं ठेवणार आहे. विजयच्या स्मृतीसाठींच मुळीं मी तो सुरू करणार आहें. त्यायोगानें स्वर्गांत असणाऱ्या विजयला तर आनंद होईलच ; पण माझ्या मनाचीहि बोचणी पुष्कळ अशीं कमी झाल्याशिवाय राहणार नाहीं "

तो सारखा बोलत होता आणि निर्मला एकचित्तानें ऐकत होती. जणूं काय त्या दोन कामांची विभागणीच त्यांनीं करून घेतली होती ! पुढें तो म्हणाला, " निर्मले, आतां माझ्या खऱ्या आयुष्याला सुरवात झाली आहे. आतांपर्यंत मी अनेक दुःखं भोगलीं, अनेक अडथळे माझ्या आयुष्यांत आले त्याचप्रमाणें मनुष्याचा अधःपात करणारे मोहाचे क्षणहि अनेक आले. पण त्या सर्वांवर मी विजय मिळविला आहे माझ्या आईचीं दोन वाक्यं मीं सतत माझ्या डोळ्यासमोर ठेवलीं आहेत. '**आयुष्यांत मोहाचे क्षण अनेक येतात. पण त्यांच्यावर जो विजय मिळवितो तोच आयुष्याची लढाई जिंकतो.**' वेदवाक्याप्रमाणें माझ्या आईचीं हीं दोन वाक्यं मी मानीत आलों आहें. आणि त्यांनींच वेळोवेळीं मला आतांपर्यंतच्या आयुष्यात तारलं आहे. पण या पुढील आयुष्यांत मात्र तुझ्या सहकार्याची मला अत्यंत जरूरी आहे. मला तुझं नुसतं प्रेम नको आहे. तर त्या प्रेमामुळें उत्पन्न होणाऱ्या शक्तीची मला आवश्यकता आहे. त्या शक्तीची तुला कदाचित् कल्पना नसेल. पण केवळ त्या शक्तीवरच जगांतील असामान्य

कार्य घडलेलं तुला आढळेल. तसलं सामर्थ्यवान प्रेम मला दे. त्याच्या जोरावर मी माझ्या आयुष्यांत जिकडे तिकडे विजय मिळवीन."

तो थांबला. निर्मला कांहींच बोलली नाहीं. जणूं काय आपण एक शब्द जरी उच्चारला तरी त्याच्या आतांपर्यंतच्या बोलण्याला एकदम हिणकसपणा येईल अशीच भीति तिला वाटली असावी.

त्या सुमारास पूर्व दिशा बरीच उजाळली होती. आणि चंद्रोदयाचीं चिन्हें पूर्वेला स्पष्ट दिसत होतीं. अरविंद त्यावेळीं टेंकडीवरच्या ध्वजाखालीं उभा राहिला. निर्मलाहि त्याच्या शेजारीं उभी राहिली. तो ध्वज मोठ्या डौलानें फडफडत होता. त्याच्यावर "ॐ कैवल्यधाम" हीं अक्षरें लिहिलीं होतीं. पण त्याऐवजीं अरविंदाला त्या ठिकाणीं "ॐ विजय आश्रम" ही अक्षरें दिसूं लागलीं. इतक्यांत पूर्व क्षितिजावर चंद्राचें पिवळें बिंब विलसूं लागलें. जणूं काय त्यांच्या प्रेमाला कोणीतरी साक्षीदार हवा म्हणूनच तो त्या ठिकाणीं एकदम प्रगट झाला होता. त्याच्या मंद प्रकाशांत त्या ध्वजावरील अक्षरें त्याला अधिकच स्पष्ट दिसूं लागली तो मनांत पुटपुटला, "ॐ विजय आश्रम!" आणि त्यासरशीं त्या दिव्य ध्वजाखालीं त्याचें मस्तक न कळत अवनत झालें. सहसंवेदनेनें निर्मलेचेंहि मस्तक त्याचबरोबर खालीं वांकलें. आणि त्यांच्या प्रेमी आयुष्यांतील तो मंगल क्षण साजरा करण्यासाठींच कीं काय कोण जाणे! पण नक्की त्याचवेळीं दूर कोठेंतरी बँड वाजूं लागला. आणि त्याचे मजूळ सूर त्यांच्या कानांत घुमूं लागले. आणि त्याच स्वर मालांनीं तीं दोन प्रेमी हृदयें बद्ध होऊन गेलीं.